

म. ग्रं. सं. ठाणे
...य — रजि
१९६०
REFBK-0010968

# ..झी जीवन-यात्रा

जानकीदेवी बजाज

# माझी जीवनयात्रा

जानकीदेवी बजाज

अनुवादक : बा. भ. बोरकर

पॉप्युलर बुक डेपो
मुंबई ७

किंमत तीन रुपये

© जमनालाल सेवा ट्रस्ट

प्रथम मुद्रण : नोव्हेंबर १९६०
१८८२

मुद्रक : मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण, पुणें २

प्रकाशक : ग. रा. भटकळ,
पॉप्युलर बुक डेपो,
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३०८२०
क्रमांक ... नों: दि:

## प्रस्तावना

जानकीदेवींनीं आपल्या पुस्तकासाठीं माझ्याकडे प्रस्तावना मागितली तेव्हां मी नाहीं म्हणूं शकलों नाहीं. जमनालालजींच्या सगळ्या कुटुंबाशीं माझा पुष्कळ संबंध राहिला आहे. त्याचें कोणतेंच श्रेय माझें नाहीं. जमनालालजींचें आक्रमक प्रेमच त्याला जबाबदार आहे. बाकी, जबाबदारी कुणाची का असेना, तो संबंध बनला तो बनला.

जानकीदेवींना जी कांहीं विद्या मिळाली आहे, ती अनुभवानें मिळाली आहे. त्यांत लेखनवाचनाचा फारसा भाग नाहीं. त्यामुळें त्यांची कहाणी फारच सोप्या भाषेंत सांगितली गेली आहे. ही लिहिली गेलेली नाहीं. तोंडीं सांगण्यांत आली आहे. त्यामुळें ही ‘ कहाणी ’ आहे आणि माझा समज आहे कीं कौटुंबिक वर्तुळांत ती रोचक देखील होईल.

जानकीदेवींचें एक वैशिष्टय हें कीं अजूनपर्यंत त्यांचें बालपण कायम आहे.

बोलण्यांत त्यांना फारसा संकोच किंवा कांच असत नाहीं. त्याचा प्रत्यय या कहाणींतहि येईल. त्यामुळें त्यांच्या भाषणाचा फार परिणाम होतो. जमनालालजींना एवढें वक्तृत्व साधत नव्हतें. जानकीदेवींनीं त्याचें एक फारच सोपें कारण सांगितलें. त्या म्हणाल्या, 'जसें बोलावें तसें करावें' हें एक भलतें भूत जमनालालजींच्या मागें लागलें होतें. बोलण्यांत कुठें अतिशयोक्ति होऊं नये, याची त्यांना काळजी असे. त्यामुळें वक्तृत्व त्यांच्या वाणींतून झरतच नव्हतें. असली कसलीच कैद मला नाहीं. मग वक्तृत्व कां साधणार नाहीं ? जमनालालजींच्या वृत्तीचें जें विश्लेषण यांत करण्यांत आलें आहे, तें मार्मिक आणि यथार्थ आहे, याची साक्ष सर्वच परिचित मंडळी देईल. पण जानकीदेवींच्या भाषणांत जी नि:संकोच वृत्ति दिसते, त्याचें कारण खरें पाहतां त्यांची बालवृत्ति आहे. बोलण्याप्रमाणें कृति करावी लागते, याचें भान त्यांनाहि आहे. केलेल्या संकल्पाच्या मागें त्या किती एकाग्र होऊं शकतात याची जाणीव १०८ कूप-दानपत्रांचा जो उल्लेख त्यांनीं केला आहे, त्यावरून येऊं शकते.

भूदान-यज्ञांत त्यांनीं जो विशेष पराक्रम केला आहे त्याचा उल्लेख या कहाणींत नाहीं. वाचकांपासून ही गोष्ट छपून राहतां कामा नये. बिहारची भूदान-यात्रा पुरी करून आम्ही बंगालमध्यें प्रवेश करीत होतों, त्या दिवशीं जानकीदेवी आमच्याबरोबर होत्या. गर्दी फार होती आणि त्यांत मुलांची संख्याहि मोठी होती. गर्दीतून वाट काढण्यासाठीं मी मुलांचे हात धरून धांवायला सुरुवात केली. वडीलधारीं माणसें मागें राहलीं. मुलांच्याबरोबर धांवत आम्ही पुढें गेलों. माझ्या लक्षांत आलें नाहीं कीं, ६२ वर्षांची एक मुलगीहि मुलांबरोबर धांवत येत आहे. धांवतां धांवतां त्या पडल्या. त्यांच्या गुडघ्याला मार लागला. ती दुखी अजून थोडीफार चालू आहे. आतां त्या धांवूं कशा शकणार ? एवढेंच काय, त्या विशेष चालूंहि शकत नाहींत. पण त्यांचें मन धांवतच राहतें.

परमेश्वराकडे माझी प्रार्थना आहे कीं जानकीदेवींची ही बालवृत्ति शेवटपर्यंत कायम राहावी आणि आम्हां सर्वांना तिचा स्पर्श व्हावा.

पोचपमल्ली
३०-१-१९५६

*विनोबा*

## पान उघडण्यापूर्वी —

आम्ही मंडळी वर्ध्याची. त्यामुळें आमच्या घरचे सगळे लोक मराठी चांगलें बोलूं शकतात. माझे थोरले बंधु कमलनयनजी आणि बहीण मदालसा यांचें तर शिक्षणहि मराठींतूनच झालें आणि तेंहि पू. विनोबाजींच्याजवळ. मी चार-पांच वर्षांचा होतों तेव्हां पिताजी आम्हांला घेऊन गांधीजींच्या साबरमती आश्रमांत राहायला गेले. तेथें आम्ही बरींच वर्षें राहिलों. तेथें मला गुजराती शिकायला मिळालें. पण मराठी भाषा दुरावली. पण १९४१ सालच्या वैयक्तिक सत्याग्रहांत आणि '४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनांत जेव्हां मला नागपूर-तुरुंगांत राहावें लागलें तेव्हां तिकडे मिळणाऱ्या वेळांत मी मराठी शिकून घेण्याचें ठरवलें.

तिकडे मराठीचा अभ्यास करतांना खांडेकर, फडके, आपटे, वरेरकर, जावडेकर, साने गुरुजी आदि अनेक नामवंत साहित्यिकांचें साहित्य मला

वाचावयास मिळालें आणि तें त्यांच्या गुणविशेषामुळें मला आवडलेंहि. माझें हें मराठी साहित्याचें वाचन चाललें असतांना श्रीमती रमाबाई रानडयांच्या ‘माझ्या आयुष्यांतील कांहीं आठवणी’ आणि लक्ष्मीबाई टिळकांचीं ‘स्मृतिचित्रें’ माझ्या हातीं आलीं. तीं वाचल्यावर माझ्या मनांत आलें, माझ्या आईनें असेंच आपलें आत्मचरित्र लिहिलें तर किती छान होईल ? एका अपूर्व अशा क्रांतिकारी काळांतून तिला जायला मिळालें आहे. जमनालालजी, गांधीजी आणि विनोबाजी या तीन महापुरुषांचा निकटचा सहवास आणि संस्कार तिला लाभले आहेत. त्यांच्या स्वभावांतले कितीतरी अर्थपूर्ण तपशील तिला प्रत्यक्ष पाहायला मिळाले आहेत आणि पाहायला मिळालेल्या या घरगुती दर्शनांतून या थोरांच्या व्यक्तिमत्त्वाचें आगळेंच दर्शन वाचकाला मिळणें शक्य आहे. शिवाय आईच्या ठिकाणीं स्वतःचें असें वेधक व्यक्तिमत्त्व आहे. मंगलाचें स्वाभाविक आकर्षण, जीवनाविषयींची अपार श्रद्धा, निर्मळ निरागस समर्पण, भाव, जें पटलें तें आचरणांत आणण्याची धडपड, स्वतःच्या दोषांकडे अंतर्मुख-तेनें पाहण्याची दृष्टि, मार्मिक विनोद बुद्धि, सरळ साधी शैली आणि जें अनुभवलें त्याचें कांटेकोर वर्णन करण्याची हातोटी या गुणांमुळें तिनें आपलें आत्मचरित्र लिहिल्यास तें अनेक दृष्टींनीं मनोरंजक आणि उद्‌बोधक होईल असें मला वाटलें आणि तिला तें लिहिण्याची प्रेरणा व्हावी म्हणून मी तिला हीं दोन्ही आत्मचरित्रें तुरुंगांतून पाठवून दिलीं आणि तीं वाचण्याबद्दल आग्रह-पूर्वक लिहिलें.

ही १९४५ मधली गोष्ट. तुरुंगांतून बाहेर आल्यावर आम्ही सारींच कोणत्या ना कोणत्या कार्यांत गुंतलों आणि आईच्या आत्मचरित्राचें काम टळतच राहिलें. तिला या बाबतींत मोठासा उत्साह नव्हता. ती म्हणे, रोज इतकीं पुस्तकें छापून निघतात. तीं वाचतो कोण ? मग उगीच आणखी कागद काळे करा कशाला ? पण आम्हां मंडळीच्या आग्रहामुळें ती थोडथोडें लिहीत राहिली आणि १९५६ मध्यें ‘मेरी जीवनयात्रा’ या नांवानें तिचें हें आत्मचरित्र हिंदीमध्यें प्रकाशित झालें. तिचा आरंभापासून आग्रह होता कीं आपल्या या आत्मनिवेदनांत नकारात्मक वाक्य कुठें येऊं नये. लहानमोठीं सारींच माणसें आजकाल ‘हें नाहीं, तें नाहीं’ असें म्हणत असतात याचें तिला फार वाईट वाटतें. ईश्वराच्या सृष्टींत सारें ऐश्वर्य अष्टौप्रहर सिद्ध असतांना

हा नकाराचा करंटेपणा कां, असें ती विचारीत असते. नकारात्मक वाक्य टाळण्याच्या तिच्या या आग्रहामुळें लिहितांना तिला किती जड गेलें असेल ! आणि तरी देखील तें सदैव साधलें असेलच असें नाहीं.

'मेरी जीवनयात्रा' चें हिंदी वाचकांनीं चांगलें स्वागत केलें. पुस्तकाची पहिली आवृत्ति संपून आतां दुसऱ्या आवृत्तीच्या गोष्टी सुरू झाल्या आहेत. मीठ-मिरची न लावतां सरळ साध्या शैलींत सांगितलेले प्रांजल निरागस अनुभव आणि मनमोकळें आत्मविश्लेषण वाचकांना आवडतें याचेंच हें प्रत्यंतर.

दरम्यान मराठीचे लोकप्रिय कवि आणि लेखक बा. भ. बोरकर यांचा आणि आम्हां मंडळीचा परिचय घनिष्ट झाला. त्यांनीं जेव्हां हें पुस्तक वाचलें तेव्हां त्यांनाहि तें आवडलें आणि इतकें प्रांजल आणि अनुभवसंपन्न पुस्तक मराठी वाचकाला विशेषच आवडेल असा त्यांचा अभिप्राय पडला. आणि वाटल्यास आपण स्वतःच त्याचा अनुवाद करूं असें त्यांनीं सांगितलें. अशा रीतीनें सोन्यांत सुगंध असा हा योग जमला. ते आतां आमच्या घरचेच झालेले असल्यामुळें मी आभार मानलेलें त्यांना रुचणार नाहीं. मराठी साहित्याच्या प्रेरणेंतून निघालेलें हें पुस्तक मराठी साहित्यांत अंतर्भूत होत आहे याचें मला समाधान वाटतें.

*रामकृष्ण बजाज*

## अनुक्रमणिका


| | पृष्ठांक |
|---|---|
| १. आईची माया | ... १ |
| २. गोगली गाय | ... २ |
| ३. आईची धार्मिकता | ... ५ |
| ४. माझे कुटुंबवत्सल वडील | ... ६ |
| ५. खिळेठोकीची वेदना | ... ९ |
| ६. कागद कसा बोलतो ? | ... १९ |
| ७. रूप की तरसे करम की खाय | ... १३ |
| ८. माझें लग्न | ... १५ |
| ९. दुसऱ्यांदा सासर | ... १८ |
| १०. माहेरची आठवण | ... २० |
| ११. लग्न सुटेल कसें ? | ... २२ |
| १२. त्याच्यात असें काय आहे | ... २५ |
| १३. एका सासवेच्या अभावीं अनेक सासवा | ... २९ |

| | पृष्ठांक |
|---|---|
| १४. 'एक दिवस मरायचेंच आहे !' | ... ३० |
| १५. डालूरामची सेवापरायणता | ... ३३ |
| १६. पतिभक्ति | ... ३६ |
| १७. उच्च शिक्षणांतलें अपयश | ... ३९ |
| १८. श्रीलक्ष्मीनारायणमंदिर | ... ४२ |
| १९. बच्छराजजींचा स्वर्गवास | ... ४४ |
| २०. दागिना सुटला | ... ४६ |
| २१. घुंगट फिटला | ... ४७ |
| २२. चरख्याचा ध्यास | ... ५० |
| २३. खादीचा प्रवेश | ... ५३ |
| २४. परदेशी कपड्यांची होळी | ... ५६ |
| २५. झेंडा-सत्याग्रह | ... ५८ |
| २६. वडील जनांची व्यथा | ... ६१ |
| २७. माझी नणंद आणि तिचीं मुलें | ... ६३ |
| २८. साबरमतीच्या आश्रमांत | ... ७३ |
| २९. आश्रमांतले आणखी कांहीं अनुभव | ... ७८ |
| ३०. पहिलें अपत्य | ... ८१ |
| ३१. मिठाचा सत्याग्रह | ... ८४ |

| | पृष्ठांक |
|---|---|
| ३२. आंदोलनांत भाग | ... ९२ |
| ३३. घरांत सून आली | ... ९६ |
| ३४. तुरुंगयात्रा | ... १०१ |
| ३५. नवें रत्न शोधून काढलें | ... १०५ |
| ३६. माझा कंजूषपणा | ... १०९ |
| ३७. बापू वर्ध्यास आले | ... ११४ |
| ३८. सीकर आणि जयपूर | ... ११८ |
| ३९. सोती सुंदरी | ... १२३ |
| ४०. शेंडेफळ | ... १२९ |
| ४१. माझे हाल | ... १३५ |
| ४२. पंगतीची रंगत | ... १३९ |
| ४३. गोसेवा | ... १४३ |
| ४४. जमनालालजींचें देहावसान | ... १४९ |
| ४५. बेचाळीसची क्रांति आणि त्यानंतर | ... १५३ |
| ४६. बापूंचें बलिदान | ... १५९ |
| ४७. बजाजवाडी सुनी झाली ! | ... १६३ |
| ४८. विनोबाजींच्या यज्ञांत | ... १६६ |
| ४९. उपसंहार | ... १७५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८६८

## १. आईची माया

मी चार वर्षांची होत्यें तेव्हां मला देवी आल्या. माझ्याहून एक भाऊ मोठा होता आणि दुसरा लहान. मी होत्यें मधली. आम्हां तिघांत दोन अडीच वर्षांचें अंतर होतें. जेव्हां मला देवी आल्या तेव्हां, म्हणजे पन्नास-साठ वर्षांमागें देवी टोंचून घेण्याचा प्रघात कमीच होता. मुलांना त्रास होऊं नये म्हणून आया त्यांना लस टोंचण्याचें टाळीत. माता शितळादेवीची पूजा करण्याचा प्रघात होता. आजहि होळीनंतरच्या सप्तमीला तिची पूजा चालते. ह्या दिवसांत साऱ्याच राजस्थानी वस्तूंना हुडहुडी भरते. आमच्याकडे माझ्या दोघांहि भावांना लस टोंचण्यांत आली होती. मीच तेवढी कशी राहून गेल्यें कोण जाणे. त्यामुळें मला जवळ जवळ चार महिने ह्या रोगाचा उपद्रव भोगावा लागला.

मला आठवतें कीं गाईच्या गोठ्यांत गोणपाटावर किंवा तरटावर रान-गोवऱ्यांची राख पसरून त्यावर मला झोपवण्यांत येत असे. आई माझ्या अंगावर राख शिंपडीत बसून राहात असे. मला जास्त त्रास झाला कीं नाहीं, हें कांहीं आठवत नाहीं. आई खूप काळजी घेत असे. चार महिनेपर्यंत दिवसरात्र माझ्या-जवळ बसून तिनें माझी शुश्रुषा केली होती.

गोमूत्र, शेण वगैरेंच्या वासानें देवीचा जोर ओसरत असावा. मीं असेंहि ऐकलें आहे कीं गवळ्यांत सामान्यत: हा देवीचा रोग एकंदरींत कमीच. गोण-पाटावर झोपवण्याचें कारण कदाचित् असें असावें कीं अंगभर आलेल्या फोडांतून जो पू आणि रक्त वाहतें त्यानें कपडे चिकटू नयेत. त्याचसाठीं मला गोणपाटावर घातलें जात होतें. दुसऱ्या मुलांना संसर्ग बाधेल म्हणूनहि मला वेगळी ठेवली असणें शक्य आहे.

मी मूळचीच सांवळी. त्यांत ह्या आजारामुळें या वर्णांत भर पडली. चेहऱ्या-वर देवीचे वण उठले. त्याचमुळें आई-वडिलांची आणि इतर कुटुंबीयांची मला विशेष ममता लाभली असावी. आधींच, पहिलीं वरींच मुलें गेल्यामुळें मी लाडकी झाली होत्यें. आतां ह्या आजारानें त्यांत सहानुभूतीची अधिकच भर पडली.

मोठी झाल्यावर कधी कधीं जेव्हां आईला मी गंमतीनें म्हणें कीं 'तूं तुझ्या मुलांना तेवढं टोंचून घेतलंस पण मला मात्र एका रुपयासाठीं कुरूप करून टाकलंस!' तेव्हां ती भावडेपणानें म्हणे, "माझीं इतकीं मुलं निघून गेल्यामुळें तूं जगशील असा फारच थोडा भरंवसा होता मला."

## २. *गोगली गाय*

माझ्या आईला घरचे तसे शेजारपाजारचे लोक गोगलीगाय म्हणत असत. गोगली हा मारवाडी भाषेंतला शब्द आहे. याचा अर्थ शांत तितकाच मृदु. गोगल गाय नांवाचा एक काळा किडाहि असतो. त्याचे पाय पोटांत असतात आणि तो फार मऊ असतो. नोकराला उगीच त्रास व्हायचा ह्या विचारानें जमेल तितकें काम ती स्वत:च आवरायची. नोकर बसलेला असला तरी ती स्वत:च पाणी घेऊन पीत असे. एकाद्या कामांत त्याचे हात भरलेले असले आणि दिवे-लागणीची वेळ झालेली असली तर ती म्हणायची, 'अरे बाबा, बस ना! मला हात धुवायचेच आहेत. मींच करत्यें दिवाबत्ती.' सैपाक-पाणी वरती व्हायचें, पण पाणीघर खालीं होतें. त्यामुळें पाणी खालून वर न्यावें लागे. सामान्य-

पणें हें काम नोकरच करीत. आईला वर यायचें झालें तर ती स्वतःच पाणी घेऊन येई आणि म्हणे, ' राहूं दे रे ! यायचंच होतं मला. तेव्हां आलें घेऊन ! ' नोकरचाकरांना कधीं कुठें पडलें लागलें तर ती त्यांना पट्टी बांधी. विसावा व्यायला सांगे. मुसलमानी राज्यांतलें गांव असल्यामुळें तिच्याकडे मुसलमानांचेंहि दळणवळण होतें. कांहीं नोकरहि मुसलमान होते. कुटुंबाचे ऋणानुबंधी असे जे म्हातारे नोकर-चाकर, भट-ब्राह्मण आणि शेजारीपाजारी होते, त्या सर्वांशीं आईची वागणूक फार प्रेमाची असे. हिवाळ्यांत ती डिंकाचे आणि मेथीचे लाडू तयार करून ठेवी आणि रोज ह्या म्हाताऱ्यांना वांटी. पहाटे पांच वाजतां झोंपलेल्यांना अंथरुणावरच ती ते द्यायची आणि कुणाकुणाच्या तर घरीं देखील पाठवायची. आईच्या ह्या स्वभावामुळें घरचीं माणसें म्हणत, दादीजींजवळ राहून आलेल्या माणसाचा दुसरीकडे टिकाव लागणें कठीणच. नोकरांशीं त्याप्रमाणें भांडीं घांसायला, केंसकाम करायला आलेल्या नेवगणी (न्हावीण)-शी ' जी ' च्या भाषेंतच ती बोलत असे आणि आम्हांलाहि असेंच बोलण्याची शिकवण देत असे.

दुसऱ्या गोष्टीचा माझ्यावर प्रभाव पडला तो तिच्या सेवाशीलतेचा. कसलाच धर्मजातीचा भेदाभेद न मानतां ती आजाऱ्यांना औषधें द्यायची. रॉकेलच्या रिकाम्या डब्यांत रानांतलीं पाळेंमुळें आणि काळीं मिरीं, सुंठ, लवंग, दालचिनी, पिंपळी, वेखंड, जायफळ, ओवा वगैरे जिनसांचे लहान लहान बटवे ती ठेवीत असे. एकाद्याच्या आजाराची बातमी कानावर आली किंवा कुणाचें बोलावणें आलें कीं हिनें आपला डबा घेऊन बसावें आणि त्यांतून योग्य तें औषध काढून द्यावें. लोकांची आईच्या औषधपाण्यावर श्रद्धा होती, विश्वास होता. तीहि मोठ्या प्रेमानें तें देत असे.

त्या पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या स्थितीशीं आजच्या डॉक्टरप्रधान स्थितीची जेव्हां मी तुलना करत्यें तेव्हां खरोखरच मला मोठें आश्चर्य वाटतें. आज शेंकडो रुपये खर्चूनहि चांगल्या चांगल्या डॉक्टरांना जो उपाय करणें कठीण जातें तोच त्या काळीं चार दिडक्यांत प्रेमानें होत असे. आजाऱ्यांत मुसलमान स्त्रियाहि असत आणि आई त्यांच्याकडेहि निःसंकोचपणें जात असे.

शिवण्याटिपण्याचें तर आईला व्यसनच होतें. शिलाईप्रमाणेंच पटव्याच्या कामांतहि (दागिने ओवण्याचें काम ) ती फार वाकबगार होती. कुठें कुणाकडे

लग्नसोहळा असला, घरभरणी असली, बारसें असलें तर ती कपडे शिवून द्यायची, गोठ-किनारी लावायची, दागिने ओवून द्यायची आणि वेण्यांसाठीं बाया जी लोंकर आणून देत त्यांच्या वेण्या करून द्यायची. लोकांचें शिलाईचें काम नेहमींच तिच्या टोपलींत तुंबलेलें असायचें. रात्रंदिवस तिचें कसलें ना कसलें शिवण्याचें, टिपण्याचें काम चालूच असे. हें पाहून कधीं कधीं घरचीं माणसें म्हणत, 'दादीजी, हें सारें कां करीत असतेस तूं?' ती म्हणे, 'बाबा, माझे हात तर कांहीं बिघडत नाहीत? शिवाय शिवून घेण्याराचे तेवढेच चार आठ आणे वांचले.'

सणासोहळ्याला जो कांहीं जिन्नस घरांत तयार होई तो ती नोकराचाकरांना आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना पोंचवून येई. कोणी अफू मागायला आला तर त्याला अफू देई. कुणाला अन्न, कुणाला वस्त्रहि देई. अशा प्रकारें ती सगळ्यांच्या उपयोगी पडे.

आईच्या भाबडेपणाचा एक प्रसंग तर मोठा गमतीदार आहे. जाजोदिया मंडळी राजस्थानांतल्या लक्ष्मणगडची राहणारी होती. त्यांचीं लग्नकार्ये तेथेंच होत. म्हणून केव्हां केव्हां आम्ही सगळीजणें तिकडे जात असूं. एकदां लक्ष्मणगडहून जावऱ्याला परतत होतों. वाटेंत एका विहिरीवर खाणेंपिणें उरकून घेण्यासाठी म्हणून आम्हीं थांबलों. खाणेंपिणें झाल्यावर आई माझ्या-ऐवजीं दुसऱ्या मुलीला कडेवर घेऊन निघाली. बरोबरच्यांनीं मला एकटी पाहून उचललें आणि मला बाजूला ठेवून आईला जाऊन विचारलें, "दादीजी, जानीबाई कुठं आहे?" ती उत्तरली, "ही आहे ना माझ्या कडेवर!" पण इतकें बोलते न बोलते तों ती चमकून भानावर येऊन म्हणाली, "अरेच्या!, मी विहिरीवरच आल्यें की तिला विसरून! पडली तर नाहीं विहिरींत!" आणि ती विहिरीकडे जाऊं लागली. पण बरोबरच्यांनी मला आईकडे दिलें. त्यावेळीं मी दोन अडीच वर्षांची असेन. ज्या कामांत लक्ष घालावें त्यांत ती अशी देहभान विसरत असे.

●

## ३. आईची धार्मिकता

माझे आई-वडील श्रीरामानुजसंप्रदायाचे वैष्णव होते. आमच्याकडे श्रीविष्णूची पूजा होत असे. यालाच व्यंकटेश, बालाजी किंवा वेणीगोपाळ असेंहि म्हणतात. व्यंकटेशाच्या सोबत रुक्मिणी-सत्यभामेच्याहि मूर्ति होत्या. घरांत एक प्रकारचें धार्मिक वातावरण असे आणि सोंवळ्या ओवळ्याचीं बंधनेंहि फार असत. पांखरें आंत आलीं तर स्वैपाकघर धुतलें जाई. माशांचा विटाळ टाळण्यासाठीं पडदा सोडलेला असे. लेकुरवाळ्या बायांसाठीं पाण्याची निराळी व्यवस्था असे. सैंपाकाला लागणारें पाणी ब्राह्मणानें स्नान करून रेशमी वस्त्रानिशी किंवा ओलेत्यानें भरावें लागे. ठाकूरजीला दाखवायचा नैवेद्य ह्याच पाण्यानें केलेल्या अन्नाचा असे. नळाचें पाणी ओवळें समजलें जाई ; म्हणून त्याचा उपयोग करण्यांत येत नसे. मंदिरांत जातांना त्याचा शिंतोडा उडाला तरी स्नान करावें लागे. अशा वेळीं चिंधी, खापरी वगैरे वस्तूवर पाय पडणार नाहीं याची कसोशीनें काळजी घेतली जाई. त्याकाळीं मुलांचें मलमूत्र खापरीतून बाहेर टाकलें जात असे. चिंधी वगैरे वस्तूहि मुलांचें शौच साफ करण्यासाठीं वापरून अशाच बाहेर फेंकल्या जात. म्हणून सांभाळून पाऊल घातलें जाई. पापड केळ्याच्या रसाचे करीत. मुगवडीचें दळणकांडणहि ब्राह्मणच करीत.

घरीं शाळिग्रामाची पूजा तर होतीच, नैवेद्यहि दाखवला जाई, आणि तरीहि दर्शनपूजनासाठीं देवळांतहि जावें लागे. विशेषकरून एकादशीच्या दिवशीं व्यंकटेश, रुक्मिणी आणि सत्यभामा यांच्या सुवर्णमूर्तींना दह्यादुधाचा अभिषेक होत असे तेव्हां. माझ्यावर ह्या अभिषेकाचा फारच प्रभाव पडे. भक्तीनें सद्गदित होऊन मी मघतच राह्यचीं. माझ्या माहेरीं हा जो विष्णुपूजेचा प्रघात होता तो तिथें अजूनहि चालू आहे.

आईची छाप पडून मीहि एकादशी पाळू लागल्यें आणि स्वत:ला खर्चासाठी मिळणाऱ्या पैशांतून मंदिरांत बसलेल्या भटांभिक्षुकांना एक एक दोन दोन पैसे दक्षिणेपायी देऊं लागल्यें. शाळिग्रामाची पूजा करणाऱ्या पुजाऱ्याला एक दिवस मी विचारलें, ' कोणत्या नामाचा जप केला तर देव प्रसन्न होतो ? ' त्यानें मला ' ओम् नमो नारायण ' चा जप करायला सांगितलें. मी गच्चीवर जाऊन हा जप करायचीं. मी ऐकलें होतें कीं माळेची वा जपाची गोष्ट दुसऱ्याला

कळली तर पुण्य क्षीण होतें. म्हणून मी मुकाट्यानें जप करीत असें. ह्या संस्कारानें माझ्यांत असें कांहीं मूळ धरलें की चांगलें काम मुकाट्यानें करणेंच मला बरें वाटतें. दुसऱ्याला सांगावें, प्रचार करावा हें मला मुचत नाहीं.

## ४. माझे कुटुंबवत्सल वडील

माझ्या वडिलांचें नांव गिरिधारीलालजी. त्यांचा कामधंदा अफूचा होता. शेतांतून अफूच्या रसाच्या घागरीवर घागरी भरून येत. कांहीं दिवस ठेवल्यावर मोठमोठ्या परातींत तो मळला जाई आणि मग त्याचे लाडवासारखे गोळे बनविले जात. त्यांना अफूच्या गोळ्या म्हणत. कोठींत लाखाची अफू भरून ठेवलेली असे.

वडिलांचा वर्ण गोरा होता. गुडघ्यापर्यंत ते उंची धोतर नेसत असत. लाल पगडी बांधीत असत. ते लाल रंग पवित्र मानीत आणि म्हणून धोतराची किनारहि लालच पसंत करीत.

किनारीला बारीक नक्षी असे. कानांत सोन्याच्या राजकड्या घोलीत. मिशा ठेवणें धार्मिक दृष्टीनें वर्ज्य समजत. श्रीवैष्णवसंप्रदायांत दूध, पाणी किंवा खाण्याच्या वस्तू यांना केसांचा स्पर्श होणें अशुद्ध समजतात. अंगांत ते पुरत्या बाह्यांची बगलबंदी घालीत. बसले म्हणजे मोठे भव्य दिसत. शरीरहि चांगलें धडधाकट होतें. ८९ वर्षांचें वय होईपर्यंत ते पायींच देवळाला जात. मालाच्या कोठडींत जात. त्यांची, वाटेंत हात जोडून नमस्कार करण्याची आणि सुखदु:खाची वास्तपुस्त करण्याची अजूनहि आठवण होते. तोंडांतून ते पहिला शब्द काढीत तो "नारायण" हाच ; कारण श्रीवैष्णवसांप्रदायिक रिवाजानुसार बोलतांना तोंडांतून येणारा पहिला शब्द नेहमीं 'नारायण' हाच असावा अशा प्रकारचा परिपाठ होता. याच्या पाठीमागें नारायणाच्या स्मरणाची भावना किंवा 'सर्व कांहीं नारायणाचेंच आहे' अशी समर्थनाची भावना असावी किंवा मृत्यु केव्हां येईल याचा नेम नाहीं तेव्हां 'नारायण' हा शब्द मुखावाटें नेहमीं येत राहावा अशीहि कल्पना असावी. "नारायणाचें सर्व कांहीं

ठीक चाललें आहे ना ?" "नारायणाला फळ न्यायचें आहे." "नारायणाला नैवेद्य दाखवायचा आहे." स्वत:विषयीं बोलायचें झालें तरी ते असेंच बोलत. त्यांना लोक सत्पुरुष, दु:खितांचा सखा आणि कुटुंबाचा नियंता मानीत.

कुणाची गांठभेट होतांच ते त्याच्या सुखदु:खाची वास्तपुस्त करीत. कुणाच्या मुलीचें लग्न आहे, कुणाच्या घरीं कार्यकारण आहे असें समजलें कीं ते विचारीत, "नारायणाच्या घरीं व्यवस्था कितपत आहे ?' तो म्हणे, "दादाजी, शंभर एक रुपयांची तेवढी सोय आहे पण —" याला पन्नास शंभरांची गरज आहे हें त्यांच्या लक्षांत येई आणि मग लगेच एकादें पोतें धान्य आणि कांहीं रुपये ते पाठवून देत. रुपये कधीं मोजून देत नसत. देत असत मुठी भरूनच. आमच्याकडे रुपयांचे 'जावळे' फडताळावर ठेवलेले असत. रुपयांचा व्यवहार सामान्यत: वजनावर चाले. त्यांच्याकडून ज्यांना मदत होई त्यांत ब्राह्मण, वाणी, शेतकरी, मजूर, हिंदु, मुसलमान सगळेच असत.

धार्मिक नियम पाळण्यांत ते कर्मठ होते पण सेवासाहाय्य करण्याच्या बाबतींत त्यांच्याकडे भेदभाव नव्हता.

कुटुंबीयांना मदत पाठविणें किंवा त्यांची काळजी घेणें हें तर ते आपलें कर्तव्यच मानीत. आमच्या कुटुंबांतले वडिलांचे एक दूरचे बंधु नेहमीच त्यांच्यावर दावे-खटले करून त्यांना उपद्रव देत असत. पण त्यांच्या मुलांबाळांना त्रास होऊं नये याची वडील नेहमीं खबरदारी घेत. बाजारांत फळें खरेदी केलीं तर त्यांतलीं कांहीं ते त्यांच्याकडे पाठवीत. म्हणत, "गोपाळ कांहीं मिळवीत नाहीं, कोर्ट-कचेऱ्या करीत फिरतो, मुलें काय खातील ? जा बाबा, त्यांच्या शिक्यावर हें ठेवून ये."

कुटुंबीयांना सांभाळून घेणें हा तर त्यांचा स्वभावच होऊन बसला होता. आमच्या चुलत्याचीं मुलें सोबतच राहात. त्यांना पुष्कळच मुलें होतीं. माझ्या वडिलांचीं अकरा मुलें आधीं निवर्तलीं होतीं. आम्ही तीन भांवडें म्हातारपणांत झालों होतों. सारें कांहीं वडीलच करीत. त्यांच्या मुलाबाळांपैकीं कुणाचें ना कुणाचें लग्न हें असायचेंच. माझ्या लग्नाची वेळ आली तेव्हां गांवच्या बाया येऊन आईला म्हणाल्या, "दादीजी, जानीबाईचें लग्न आहे तेव्हां कपडे दागिने काय काय करणार ?" आई म्हणाली, "जसें इतरांचें झालें तसें हिचेंहि होईल." तेव्हां त्या म्हणाल्या, "त्यांचा खर्च होतच राहातो. तुमची ही एवढी एक."

तेव्हां आई वडिलांना म्हणाली, "जानकीसाठीं कपडे, दागिने काय करायचे ?" वडिलांनीं उत्तर दिलें, "इतरांचें झालें तसेंच हिचेंहि होईल." तेव्हां आईनें म्हटलें, "इतरांचीं काय, रोज होतच आहेत. आपली ही एवढी एक." तेव्हां ते म्हणाले, "त्यांचें त्यांच्या नशिबाप्रमाणें. त्यांचें नांव कां घेतेस ? तुला जें काय करायचें असेल तें सांग."

अशा तऱ्हेनें कुटुंबीयांत प्रेमभाव सांभाळतांना भेदाला उत्तेजन मिळणार नाहीं याची खबरदारी ते घेत. जसा प्रसंग येई तसा तो ते निभावून नेत, पण मनांत ईर्षा येऊं देण्याचा त्यांचा प्रयत्न असे आणि त्यांनीं शेवटपर्यंत असें आपल्या कुटुंबाला सांभाळलें.

आमच्याकडे जे मुनीम-गुमास्ते, नोकरचाकर होते त्यांना वडिलांनीं कुटुंबीयच बनवून टाकले होते. ते त्यांच्या सुखदु:खाची काळजी घेत. जरी भटा-ब्राह्मणांची संख्या जास्त असे तरी सगळ्या जातींचे लोक आमच्याकडे राहात. मुसलमान नोकर देखील होते. त्यांच्याविषयीं अनादराचा भाव नसे. आणि श्रीविष्णुसंप्रदायानुसार शिवाशीव चालत नसे. आणि म्हणून ते चालतांना सावधगिरीनें चालत. पण त्यांचें त्या लोकांनाहि वाईट वाटत नसे आणि आपुलकींतहि अंतर पडत नसे. घरांत जी जी वस्तू तयार होई ती ती त्यांना दिली जाई. पत्रावळीवर जेवण्यांतहि त्यांना अपमान वाटत नसे.

लग्नानंतर जेव्हां मी सासरीं जायला निघाल्यें तेव्हां त्यांनीं मला म्हटलें होतें, "बेटी, तूं परक्या घरीं चालली आहेस; तेथें चांगल्या तऱ्हेनें राहा. जास्त बोलूं नकोस. कुणीं चारदां विचारलें तर एकदां बोलावें." सासरीं सुरुवातीच्या दिवसांत मी अगदींच कमी बोलत होत्यें. लहानपणांतहि लाजेमुळें कमीच बोलत होत्यें.

वडिलांचें जीवन सर्व प्रकारें उच्चच राहिलें. व्यापारांत त्यांची पत होती आणि ते होते तोंपर्यंत धनधान्याची समृद्धि राहिली. त्यांचा स्वभावच असा कांहीं बनून गेला होता कीं थोडासा जरी फायदा झाला तरी माल विकून टाकीत. विशेष लोभांत पडत नसत.

आमच्याकडे म्हण आहे की लोभ गळा कांपतो. वडिलांच्या पश्चात् घरच्या लोकांना प्राय: नुकसानच सोसावें लागलें. कारण ते त्यांच्या नीतीप्रमाणें चालले नाहींत. थोड्या फायद्यांत संतोष मानणाऱ्यांना मोठी जोखीम उचलावी लागत

नाहीं. आणि तें फायद्यांतच पडतें. त्यांच्या ह्यातींत कुटुंबाची स्थिति सर्वच दृष्टींनीं चांगली राहिली.

त्यांचें जीवन जसें भव्य राहिलें तसाच त्यांचा मृत्यूहि. त्यांचें निधन झालें त्या दिवशीं सकाळीं ते मंदिरांत जाऊन आले. अकरा वाजेपर्यंत पत्र लिहीत बसले, नंतर आंघोळ करून धोतर नेसतात तोंच त्यांच्या पोटांत गोळा उठला. ही त्यांची जुनी व्यथा होती. ते तिथेंच आडवे आले. लोक जमले. डॉक्टर बोलावण्यांत आले. इंदूरहूनहि डॉक्टर आणले गेले. पण कांहींच उपयोग झाला नाहीं. संध्याकाळीं सात वाजतां त्यांचा प्राण गेला. असें सांगतात कीं त्यांचा प्राण ब्रह्मरंध्रांतून गेला. त्यांची टाळू फुटली आणि रक्त वाहूं लागलें. अशा प्रकारचा मृत्यु योगी किंवा महापुरुष यांच्याच वांट्याला येतो असा समज आहे.

त्यावेळीं माझें वय दहा अकरा वर्षांचें होतें.

## ५. खिळेठोकीची वेदना

माझे आईवडील नव्या घरांत राहायला गेले होते. तेथे खोलींतली एक भंडारिया मला देण्यांत आली होती. भिंतींतल्या छोट्या कपाटाला भंडारिया म्हणतात. तें खेळणीं ठेवण्याचें कपाट होतें. त्यांत देवाचें चित्र लावावें अशी माझी इच्छा. म्हणून मी त्यांत एक खिळा ठोकला. आईनें मला पाहिलें. अत्यंत करुण मुद्रेनें ती मला म्हणाली, 'मुली, विनाकारण कां बरं खिळा ठोकलास ? चुन्याच्या भिंतीची खपली निघून जाईल ना !' ते शब्द अशा कांहीं कारुण्यानें उच्चारण्यांत आले कीं ते माझ्या अंतःकरणावर कायमचे कोरले गेले. मला वाटूं लागलें कीं भिंत, लांकूड वगैरेनाहि दुःख होतें. तेव्हांपासून कुठेंहि कशालाहि खिळा ठोकतांना बघितलें कीं मला वाटतें, जणूं माझ्या काळजांतच खिळा ठोकला जात आहे. आजहि असेंच वाटतें !

वर्ध्याला आमच्या जिनिंग प्रेसांत इंजिन बसवण्यांत आलें तेव्हां लोकांनीं जमनालालजींना सुचवलें कीं घरांत वीज बसवावी. भिंतीला खिळे ठोकणें मला दुःसह होतें हें त्यांना ठाऊक होतें म्हणून पंधरावीस वर्षेंपर्यंत घरांतलें

विजेचें फिटिंग टळलें. पहिल्या वहिल्यानें विजेचें फिटिंग झालें तें लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत. हा बेत मला विचारल्याशिवाय ठरविण्यांत आला. कारण सगळ्यांना माहीत होऊन चुकलें होतें कीं मला पत्ता लागला तर हें काम होणेंच अशक्य होऊन बसेल. तेथें काम सुरू झालें आणि धमाधम आवाज येऊं लागले तेव्हां मला कळलें कीं मंदिरांत विजेचें फिटिंग चाललें आहे! पण आतां बोलून काय होणार होतें?

खिळे ठोकल्याशिवाय प्राय: कुणाचेंच काम चालत नाहीं. आमच्या घरांतहि अनेक कामें झालीं आणि त्या सर्व कामांत सुतार-कारागीरांनीं खिळे ठोकलेहि; पण मला अजूनहि खिळे ठोकण्याची ही गोष्ट असह्य होते. एकाद्या लांकडांतहि खिळा ठोकलेला मला सोसत नाहीं. जेव्हां मीं मुलांसाठीं पाट करवले तेव्हां पायहि लाकडाचेच करवले. अगदीं अलीअलीकडची गोष्ट अशी झाली कीं एका चित्रकारानें जमनालालांचें आणि माझें अशी दोन चित्रें एन्लार्ज करून पाठवलीं. कांहीं दिवस तीं इकडे तिकडे ठेवलीं गेलीं. शेवटीं तीं बजाजवाडींत लावावीं असें ठरलें. आमच्या सूरजपाल ड्रायव्हरनें म्हटलें कीं मुख्य दिवाणखान्यांत तीं लावलीं पाहिजेत. हें काम खिळ्यांशिवाय तर होऊंच शकत नव्हतें; म्हणून फोटो लावण्याच्या वेळीं मी महिलाश्रमांत चालती झाल्यें. परत आल्यावर खिळे ठोकलेल्या जागांवर खपल्या उडालेल्या दिसल्या! दु:ख झालें. पण हें सारें होतच राहणार असा विचार करून मी मनाला धीर दिला आणि गप्प राहिल्यें.

## ६. कागद कसा बोलतो?

मी सहा सात वर्षांची असेन. वडिलांच्या हातांत एक कागद होता आणि ते तो आईला दाखवीत होते. तो कागद चांगला लांब होता आणि रुंदीला कमी होता. पूर्वी पत्रें अशीच लिहिलीं जात. पत्रांना म्हणतहि कागदच. वडील सांगत होते कीं कनीरामनीं अमुक लिहिलें आहे, तमुक लिहिलें आहे. मला हें ऐकून मोठें आश्यर्य वाटलें. मी राहून राहून कधीं वडिलांच्याकडे तर कधीं आईच्या-

कडे बघत राहिल्यें. हा कागद बोलतो कसा अशा विचारांत मी पडल्यें. माझें आश्चर्य वाढतच चाललें. माझ्या बाबतींत ही गोष्टअगदींच नवीन होती. कागद असा बोलतो कसा हें मीहि शिकून घेईन असें मी मनांतल्या मनांत ठरवून टाकलें.

दुसरे दिवशीं पाटी-पेन्सिल घेऊन मी जोशीजींच्याकडे जाऊन पोहोंचल्यें. आमच्याकडे शिकविणाऱ्यांना जोशीजी म्हणत. मी त्यांना म्हटलें कीं कागद कसा बोलतो तें मला सांगा. माझा प्रश्न त्यांच्या लक्षांत आला आणि **कखगघङ** हीं ही पांच अक्षरें पाटीवर लिहून देऊन त्यांनीं मला घोकायला सांगितलीं. मला जणूं इच्छित वस्तूच मिळाली! मला तर आपल्या बालवुद्धीनुसार असेंच वाटत होतें कीं कागदांतून देव बोलतो. जोशीजींनीं दिलेलीं अक्षरें मी मन लावून घोळूं लागल्यें.

अक्षरें घेऊन जोशीजींच्याकडून जेव्हां मी घरीं परतल्यें तेव्हां माझ्या हातांतील पाटी-पेन्सिल पाहून दुकानाच्या सोप्यावरून वडील म्हणाले, "बेटीजी, आज कुठें गेली होतीस पाटीपेन्सिल घेऊन?" मी गालांतल्या गालांत हंसत पाटीवरचीं अक्षरें दाखविलीं. मला तर अक्षरें घोकण्याचा ध्यासच लागला होता. घोकतां घोकतां मला कळून चुकलें, मी जी काकाजी म्हणत्यें त्यांतला 'क' तो हाच. माझी उत्कंठा पाहून वडील आईला म्हणाले, "अग, आपल्या बाळीसाठी आतां मास्तर ठेवावा लागणार." आणि त्यांनीं माझ्या शिक्षणाची व्यवस्था करून टाकली. हळूहळू माझी बाराखडी शिकून झाली आणि थोडें फार मोडकें तोडकें कां होईना, मी वाचूंहि लागल्यें. कागद बोलतो तो हा असा हें आतां मला कळून आलें!

आईच्याबरोबर मी देवाला तर जात होत्येंच. शिवाय पूजापाठ, कथाकीर्तन वगैरे गोष्टींतहि तिच्याबरोबर असें. पंतोजींकडन मी विष्णुसहस्रनाम शिकायला सुरुवात केली. मला अर्थ थोडाच कळत होता म्हणा! पण मोडक्यातोडक्या उच्चारांत मीं पाठ सुरू केला. सहस्रनाम शिकल्यावर जणू मला देवच सांपडला. देवाची एक हजार नांवें घेणें माझ्या लेखीं किरकोळ गोष्ट थोडीच होती! सकाळ-संध्याकाळ सहस्रनामाचा पाठ केल्यावरच जेवण करण्यांत मला धर्म वाटायचा.

तेरा चौदा वर्षाच्या वयांत मला थोडथोडें वाचायला येऊं लागलें होतें.

पतिव्रता स्त्रियांच्या बाबतींत मी एक पुस्तक वाचलें त्यांत राजस्थानच्या रजपूत स्त्रियांच्या सती जाण्याच्या किंवा जोहार करण्याच्या गोष्टी होत्या. त्यांनीं मी फारच प्रभावित झाल्यें. रजपूत स्त्रिया सती जाण्यांत गौरव मानीत. राजस्थानांत "सतीपूजा" नांवाचा सोहळाहि भाद्रपदांत अमावास्येला पाळला जातो. ह्याला 'सती अमावास्या' म्हणतात. माझ्या मनांतहि सती जाण्याची इच्छा उचंबळून आली. सती केव्हां आणि कसें जायचें किंवा तें आवश्यक आहे कीं अनावश्यक, याची मला त्यावेळीं काय कल्पना ! बस्स, मला आपला एकच ध्यास लागला कीं सती जाणें ही स्त्रीच्या बाबतीत गौरवाची गोष्ट !

जें थोडेंबहुत मी वाचायला शिकल्यें होत्यें त्यानें माझा फायदा झाला. मला असेंहि वाटू लागलें कीं प्रत्येक स्त्रीला वाचतां आलें पाहिजे. सासरीं, मी माझ्या नणंदेला आणि जावांना शिकवणें सुरू केलें. गांवांतल्या इतर मुली देखील माझ्याकडे शिकायला येऊं लागल्या. आमच्याकडे "हतकार" (स्वयंपाकघरांत जेवण होतें त्यांतून एक पान ब्राह्मणाला दिलें जातें त्याला 'हतकार' म्हणतात. आजकाल ही प्रथा बंदच झाल्यासारखी आहे. ) घेण्यासाठीं जी ब्राह्मण-कन्या येई, तिला मी अक्षरांची ओळख करून देऊं लागल्यें आणि त्याच्याचबरोबर शिवणटिपणहि शिकवूं लागल्यें. तिचें पाहून इतर मुलीहि येऊं लागल्या.

आज जेव्हां मी त्या वेळेच्या माझ्या शिकण्याचा, भावनेचा आणि शिकवण्याचा विचार करूं लागल्यें तेव्हां मला आनंदहि होतो आणि हसूहिपण येतें. आनंद होतो तो यासाठीं कीं चाळीसपन्नास वर्षांपूर्वी, जेव्हां स्त्रीशिक्षणाविषयीं फारसा कुणाचा कल नव्हता तेव्हां मला थोडें फार शिकतां-शिकवतां आलें, आणि हसू येतें तें अशासाठीं कीं माझी अक्षरओळख मोडकी तोडकी असली तरीहि मी शिकवूं लागल्यें होत्यें.

## ७. रूप की तरसे करम की खाय–

माझें वय सुमारें चार वर्षांचें होतें. देवींच्या आजारांतून उठल्यें होत्यें. तोंडावर देवीचे डाग उठले होते आणि आजारानंतरच्या जपण्या-सांभाळण्यानें

थोडी जाडहिपण झाल्यें होत्यें. याच वेळीं वर्ध्याहून मला पाहण्यासाठीं एक भटजी आले. त्यांचें नांव होतें भानीरामजी.

त्याकाळीं मुलगा-मुलगी पाहण्याचें काम भटजी किंवा न्हावीच करीत असत. न्हावी-ब्राह्मणांवर लोकांचा विश्वास असे. तेंहि समाजाचें एक उपयोगी अंग आहे असें समजलें जाई. त्यांच्याशीं व्यवहार होई तोहि घरोब्याच्या नात्यानें.

भानीरामजी मला पाहायला आले होते ते शेठ बच्छराजजींच्याकडून. म्हणून त्यांचें खूपच स्वागत झालें असावें. वडिलांकडे संपत्ति जरी फारशी नसली, तरी राहणी इतमामाची आणि नबाबी थाटाची होती. या राहणीचा आणि थाटामाटाचा लोकांत मोठा प्रभाव असे.

भानीरामजी फार हुपार होते. त्यांनीं वर्ध्याला जाऊन सांगितलें असावें: घराणें फार चांगलें आहे, धार्मिक आहे. मुलगी सांवळी आहे. अंगापिंडानें चांगली आहे. नुकतीच देवीच्या आजारांतून उठली आहे. अर्थात तोंडावर देवीचे डाग आहेत पण मोठी होतांच ते डाग भरून निघतील इ. या शब्दांत माझी प्रशंसा कुठें होती ? पण भानीरामजींनीं ही गोष्ट अशा कांहीं पद्धतीनें सांगितली असावी कीं बच्छराजजींच्या मंडळींचा ओढा वाढला. बच्छराजजींची पत्नी सदीबाई भरल्या घरची आणि धार्मिक वातावरणाची गोष्ट ऐकून सोरगत करायला राजी झाल्या. बच्छराजजींच्या कुटुंबांत संतानाची वाण होती. एक तर संतान होत नव्हतें आणि दत्तक घेतला तर त्याचा अपमृत्यु घडे किंवा त्याला वेड लागे. माझ्या सासू ( रामधनदासजींची बालविधवा पत्नी ) नें आपल्या सासूला (सदीबाईला) म्हटलें, "आपला मुलगा गोरा आणि देखणा आहे तेव्हां नवरी मुलगीहि देखणीच आणली पाहिजे." सदीबाईंनीं म्हटलें, "मुली, आपण तर खूप सुदर आहोंत पण मुलांसाठीं सुस्कारे टाकतों आहोंत. तुझ्या मामीजींनाच पाहा. त्या कुठें देखण्या आहेत ? पण सात रत्नें दिलीं. आपल्याला अशी मुलगी पाहिजे कीं जी कुल वाढवील. रूपांत काय आहे ?"

त्याच वेळीं जमनालालजींचे जनक वडील कनीरामजी सीकरहून वर्ध्याला यावयाचे होते. त्यांना वर्ध्याहून लिहिण्यांत आलें कीं येतांना जावऱ्याला उतरून मुलगी पाहून या. ते जावऱ्याला आले आणि मला पाहून गेले.

पूर्वीची माणसें रूपापेक्षां कुलालाच अधिक महत्त्व देत. आईवडील जी सोयरीक ठरवीत तीच पक्की मानली जाई. कनीरामजींनीं आपल्या मुलामुलींची लग्नें

कुल आणि माणसें पाहूनच केलीं होतीं. संयोगच असा झाला होता कीं वर्धा आणि सीकरच्या परिवारांत पुरुष सुंदर व सुरेख होते पण मुली सर्व माझ्या-सारख्याच आल्या म्हणून माझे मुलगे केव्हां केव्हां त्यांना थट्टेनें म्हणत, "दादाजी, आपण शोधशोधून काय पण नमुनेदार जोडचा जुळविल्या आहेत!" पण आजकाल अशीं लग्नें जुळणें जवळजवळ कठीणच आहे. प्रत्येक मुलाला वाटतें की आपण कितीहि कुरूप असलों तरी आपणाला बायको सुंदर पाहिजे!

आईवडिलांत आणि भावाबंधांतहि सोयरिकीच्या बाबतींत विचारविनि-मय तर झाला असलाच पाहिजे. आमची धार्मिक पद्धति वर्धावाल्यांहून निराळी होती. जावरावाले वर्धावाल्यांना "घोग्या" म्हणत. राजस्थानचे जे लोक दक्षिणेला आले आणि ज्यांच्या राहणी-करणीवर व खाण्यापिण्यावर दक्षिणी लोकांचा प्रभाव पडला, त्यांना "घोग्या" म्हटलें जाई. राजस्थान-माळव्याचे लोक त्यांच्याकडे थोडचा हलक्या नजरेनें बघत. पण वर्धावाले सधन होते. मुलगा देखणा होता आणि इकडे मी तर सांवळी व देवीचे वण असलेलीं. म्हणून त्यांनीं विचार केला असावा कीं हे वर्धावाले जरी "घोग्या" असले तरी धनवान तर आहेत! तेव्हां सोयरीक करून टाकावी हेंच बरें.

सोयरिकीनंतर पुष्कळसे दागिने माझ्यासाठीं वर्ध्याहून आले. दागिने अस्सल सोन्याचे होते. पण सारे दागिने पाहिल्यावर माझे भाऊबंद म्हणाले, "एवढें बुट्टीभर सोनें आहे पण ह्यांतला एकतरी दागिना घाटदार असेल तर शपथ!" माझ्या पुतणीचे यजमान चेष्टेनें म्हणत, "पण सोन्यालाच गालबोट लागलं जणूं." सुरवातीसुरवातीला मला वाटे कीं हें सहज गमतीनें चाललें आहे. पण नंतर माझ्या लक्षांत आलें की सोनें खूप आहे पण घालणारी ही अशी, हा त्यांच्या बोलण्यांतला मतलब.

मला माझ्या रूपामुळें कुणाला भेटायचें म्हटलें तरी जिवावर येई. आरशांत आपलें तोंड पाहायची देखील लाज वाटे. मी स्वतः जरी कशीहि असल्यें तरी दुसऱ्याच्या तोंडावर देवीचे डाग पाहतांच मला कसेसेंच होऊन जाई. कारण जमनालालजींचें सुंदर रूप पाहण्याची मला संवय झाली होती. जमनालालजींच्या महाराष्ट्रीय मित्रांना तर अजूनहि आश्चर्य वाटतें कीं त्यांनीं माझ्याशी लग्न करायला संमति दिली कशी? महाराष्ट्रांत वधूवर एकमेकांना पाहूनच सामान्यपणें संमति देतात. अर्थात् त्यांना आश्चर्य वाटणें स्वाभाविकच

आहे. एकदां जमनालालजींचे सेक्रेटरी श्री. महादेवलाल सराफ यांना बजाज-वाडींत कुणींतरी सांगितलें कीं आपल्याला शेठाणीजींचें दर्शन घ्यायचें आहे. तेव्हां सराफ त्यांना विनोदानें म्हणाले– " घरांत जा आणि जी सर्वांत कुरूप बाई दिसेल त्याच शेठाणी असें खुशाल समजा ! " श्री. महादेवलाल विलायतेहून नुकतेच परतले होते. मी त्यांना थट्टेंत म्हटलें, " सध्या तुमचे डोळे अस्मानांतच आहेत. पण तुमच्यासाठींहि कुणी माझ्यासारखीच वाट पाहात बसली असेल हें लक्षांत ठेवा ! " माझी वाणी खरी निवेल हें तेव्हां मला काय माहित ?

कांहीं असो, माझ्या बाबतींत तर " रूप की तरसे करम की खाय- रूपकी धराणी पाणी भरवा जाय* " ही राजस्थानची म्हण खरी ठरली ! 'करम की खाणारी' बनण्यांत पूज्य सदीबाईचा आशीर्वाद फळला ! रूपवान होण्यापासून मी बचावल्यें हा मी ईश्वरी अनुग्रह मानत्यें. श्रीमंत कुटुंब, जमनालालजीसारखा सुंदर नवरा आणि सर्व प्रकारची अनुकूलता, एवढें मिळून देखील रूपाच्या अभावीं मी अहंकाराच्या तावडींतून सुटल्यें. माझ्यांत जो साधेपणा आला, धर्मभावनेची आवड वाढली, कमी खर्चाची संवय लागली, त्याला माझी कुरूपता हेंहि एक कारण असावें !

## ८. माझें लग्न

मी सुमारें साडेआठ वर्षाची असेन. वर्ध्याहून लग्नाच्या तगाद्याचीं पत्रें येऊं लागलीं. वर्धावाल्यांचें म्हणणें होतें कीं आपल्या कुटुंबांत हें एकच लग्न, आणि त्यांत जमनालालजींची विधवा आई घरीं एकटीच, म्हणून आपला विशेष आग्रह. माझ्या आईवडिलांमध्येंहि चर्चा झाली. वडील स्वभावानें सरळ आणि सगळ्यांचें मन राखणारे. ते आईला म्हणाले, " मुलगी लहान आहे खरी. पण काय करायचें ? एक तर वर्धावाल्यांचा आग्रह आणि दुसरें शास्त्रांतहि " अष्टवर्षा भवेत् गौरी " असें लिहिलें आहे. "

* रूपाची झुरते, कर्मांची तरते, रूपाची राणी पाणी भरते.

वडिलांनी वर्धावाल्याचें म्हणणें मान्य केलें. विवाहाची तिथि ठरली आणि सगळी मंडळी वर्ध्याला येऊन पोहोंचली. घरच्या मंडळीशिवाय न्हावी, ब्राह्मण, नोकरचाकर मिळून सुमारें पन्नास माणसें होतीं. जाजोदिया कुटुंबांतले श्री. दत्तूरामजी वर्ध्याला राहात असत. दत्तूरामजींचें बच्छराजजींकडे जाणें येणें असे. आम्हां मंडळींची सगळी व्यवस्था एक प्रकारें दत्तूरामजींनींच केली होती.

उत्तर भारतीय लोकांत लग्नाआधीं कांहीं दिवस पिठी किंवा हळद लावण्याची प्रथा आहे. लग्नापूर्वी न्हावीण किंवा 'नेवगण' पिठी लावते. अंगाला हरभऱ्याचें पीठ, तेल, हळद वगैरचें जें उटणें लावतात त्याला पिठी म्हणतात. त्यानें अंग लुसलुशीत होतें, मळ जातो आणि कांति चढते. अशी पिठी अनेकदां लावली जाते. एकदां नेवगण मला पिठी लावीत होती. माझा भाचा म्हणाला, "नेवगण-बाई, मुलीला अशी पिठी काय लावतेस? थोडा रंग चढूं दे ना!" नेवगण बिचारी काय करणार! ती म्हणाली, "कुंवरजी, मी सगळ्यांना करत्यें तसेंच हिलाहि करत्यें. पण . "

नवऱ्यामुलाला केळवण करण्याचा रिवाज आहे. विवाहाच्या आधीं जमना-लालजींचें केळवण करण्यांत आलें. या समारंभासाठीं ते आपल्या सोबत्यांसह मंडपांत आले. ते आमच्याकडे येतांच, बायकामंडळींत बोलणीं सुरूं झालीं : "मुलगा तर फारच देखणा आहे. जणूं गुलाबाचें फूल!" मलाहि कुणींतरी सांगितलें, तूंहि पाहून घे. त्याकाळचीं दारें चपखल बसत नसत. थोडी फट राही. मला आठवतें कीं त्यावेळीं त्यांना मी दाराच्या फटींतून पाहून घेतलें. त्यांचें केळवण झालें. पदरांत फळें, नगद पैसे वगैरे. शिवाय पंचवस्त्रेंहि होतीं. कोट-टोपीच्या मखमलीवर जरीचें काम होतें. त्या जमान्यांत मखमल आणि जरीचा कपडा वापरण्याचा रिवाज होता. चांदीचीं खेळणींहि होतीं.

लग्नांत नवरामुलगा हत्तीच्या अंबारींत बसून द्वारपूजेसाठीं आला होता. अंबारींत नवऱ्यामुलाच्या शेजारीं त्याचे वडील आणि दोन भाऊ बसले होते. लोक म्हणाले, "चौघेहि कसे भावासारखेच दिसतात!" लग्न मध्यरात्री होतें. मला तर सप्तपदीसाठीं झोपेतूनच कपडे चढवून आणून बसविण्यांत आलें!

सप्तपदीसाठीं मुलीला न धुतलेलें कोरें शुभ्रवस्त्र, कच्च्या सुतानें शिवलेला परकर आणि वर चादर असा वेष असतो. त्यावर सव्वा वार लाल कपडा घुंगट म्हणून घेतला जातो. दाग-दागिने आणि जरीचे कपडे सप्तपदीनंतर वापरले

जातात. सप्तपदीच्या वेळीं मुलीच्या कानांत मासाभर सोन्याची मळसूद आणि डाव्या हातांत चार सहा मासे वजनाची चांदीची पात दोन्ही बाजूला भोंकें पाडून कच्च्या सुतानें बांधली जाते. पाणिग्रहणसंस्कार कसा पार पडला याची मला दादहि नव्हती ! आठ नऊ वर्षांच्या मला सप्तपदी म्हणजे काय हें कसें कळावें ?

लग्न मोठ्या थाटामाटानें झालें. वरपक्षातर्फे मैफल भरली होती. नाच-गाणें करणाऱ्या कलावंतिणींचा ताफाहि बोलविला होता. वच्छराजजींच्या घराण्यांत हें लग्न महत्त्वाचें होतें. त्यांनी आपल्या नातवाचें लग्न मनापासून केलें. आतषबाजीहि खूपच झाली.

सप्तपदीनंतर रिवाजाप्रमाणें मला सगळेच दागिने घालण्यांत आले होते. लग्न तर पडद्यांतच झालें होतें. पन्नास वर्षांपूर्वीची ही गोष्ट. त्या काळच्या आपल्या स्थितीबरोबर आजची सामाजिक स्थिति आणि विचारसरणी यांचा मी विचार करूं लागल्यें तेव्हां दोन परस्परविरोधीं चित्रें माझ्या डोळ्यांसमोर उभीं राहतात. ज्या रूढींना आज आपण वाईट म्हणतों त्या त्यावेळीं चांगल्या समजल्या जात होत्या.

लग्नानंतर वधू जेव्हां घरीं येते तेव्हां रातजागराची प्रथा असे; त्यांत रात्रभर देवदेवतांचीं गाणीं गाइलीं जात. पहाटें वधूवरांकडून देवीदेवतांना नमस्कार केला जात असे. त्याच वेळीं वराला वधूचा चेहरा दाखविला जाई. आम्हां दोघांना एका खोलींत बंद करण्यांत आलें. दाराच्या फटींतून बायका पाहूं लागल्या. मला भेट देण्यासाठीं म्हणून पांचशें रुपयांची थैली ठेवण्यांत आली होती आणि जमनालालजींना सांगण्यांत आलें होतें कीं तोंड पाहून रुपये द्यायचे! ते खोलींत गुपचुप बसून राहिले. त्यांनीं तींतून एक रुपया काढून वाजवला व परत तसाच थैलींत टाकून दिला. जेव्हां बाहेरच्या बायकांनीं पाहिलें कीं दोघेंहि अगदीं मुकाट्यानें बसलीं आहेत तेव्हां त्यांनीं दार उघडलें. मला स्वतःला तर कांहीं समज आलेली नव्हतीच पण तेंहि संकोचाची मूर्तीच होतें.

एका गोष्टीचें आजहि मला राहून राहून वाईट वाटतें ती ही कीं, पू. सदीबाई माझ्या लग्नाच्या दोन वर्षें आधींच या जगांतून निघून गेल्या. त्यांच्या आशीर्वादानें माझी सोयरीक त्यांच्या नातवाशीं ठरली होती; आणि नातसुनेचें मुख पाहावें अशी त्यांची इच्छा होती. पण त्यांच्या पायांना स्पर्श करून त्यांचा आशीर्वाद घेण्याचें भाग्य मला लाभलें नाहीं.

## ९. दुसऱ्यांदा सासर

पहिल्या खेपेला अडीच महिने सासरीं राहून नक्षत्र ओसरल्यावर भावा-बरोबर मी जावऱ्याला परतल्यें. जातांनाच भावाला सासरच्या मंडळींनीं मला लवकर पाठवायला सांगितलें होतें. इकडे मी जावऱ्याला पोहोंचल्यें आणि तिकडून "सुनेला न्यायला माणूस पाठवितों." अशीं पत्रें येऊं लागलीं. त्यामुळें घरभर चर्चा सुरू झाली कीं मुलीला सोडीत तर नाहींच; घ्यायला माणूस येणार !

आजे सासरे म्हातारे आहेत. ते म्हणतात "मी मेल्यावर सुनेचा हात कसा लागायचा ? घरीं सासू बालविधवा आणि तीहि एकटी. घरांत बघणारें कोण आहे ?" अशी चर्चा ऐकून मी तर अगदीं सुन्न होऊन जात होत्यें. काय बोलावें हेंच मला सुचेना. तुरुंगांतून कैदी सुटावा आणि लगेच नवें वॉरंट त्याच्या हातीं पडावें तशीच माझीहि गत झाली होती. मी योजलें होतें कीं आपण जानकी मंगल आणि मयूरध्वज यांची कथा शिकून घ्यायची. सासरीं कोण शिकविणार ? विष्णुसहस्रनामाचाहि एक एक श्लोक कागदावर लिहून घेऊन पाठांतर शुद्ध व्हावें असा प्रयत्न मी करीत होत्यें. श्लोकाच्या कागदाचे तुकडे मी खिशांत ठेवीत होत्यें. मंदिरास जातांना वाटेंत तो कागद मी बघायचीं, पुन: खिशांत ठेवायचीं; एवढेंच नव्हे तर पायखान्यांत देखील मी तो कागद घोकीत असें ! सासरीं केव्हां जावें लागेल याचा काय नेम, अशी मला धास्ती पडली होती. आणि म्हणून मी म्हणत होत्यें कीं जितकें शिकतां येईल तितकें शिकून घेऊं. आईहि म्हणे, "बाळ, तिथें कुणाशीं बोलणार ?" शिवणें-टिपणें आणि कलाबूत वगैरे शिकण्याचाहि मला खूप षोक होता. एक दिवस मी कापडाचीं कांहीं कात्रणें शेजारणीकडे घेऊन गेल्यें. तिच्याकडून एका बाहुलीचे कपडे शिववून आनंदानें घरीं परतल्यें. तें सर्व बघून आई म्हणाली, "मुली, शिवणकाम शिकायचें असेल तर मी तुला सहज शिकवून देईन !" मला कपड्यावर, किंवा भिंतीवर किंवा मेंदीनें हातावर मोरपिसें काढण्याचा खूप उत्साह असे. आजहि मोराचीं पिसें दिसलीं कीं मी तीं गोळा करून ठेवत्यें. हें सर्व करतांनाहि तोंडानें घोकणें चालूच असे. स्वयंपाकाबाबत आई म्हणायची, 'स्वयंपाक देखील मुली यायला हवाच; पण एकतर तूं लहान आहेस.

आणि दुसरें, आपल्याकडे ब्राह्मण सोंवळ्यांत स्वयंपाक करतो. त्याला शिवाशीव चालत नाहीं. आणि तेथें स्वयंपाकाला स्वयंपाकी तर आहेच ! " दोन्ही ठिकाणीं स्वयंपाकी असल्यामुळें मला स्वयंपाक शिकण्याची संधीच मिळाली नाहीं. या कामांत मी कच्चीच राहून गेल्यें. चूल पेटविणें, भांडीं घासणें आणि केरकचरा काढणें हीं कामें मला दुरावल्यासारखींच झालीं.

शेवटीं मला नेण्यासाठीं मंडळी आलीच. मी झोंपल्यें होत्यें. आई माझ्याजवळ येऊन झोंपली आणि अंगावरून ममतेनें हात फिरवीत म्हणाली, "जानी, तुला न्यायला माणूस तर आलेंच." मी हें ऐकलें पण डोळे मुळींच उघडले नाहींत. माझ्या तोंडून शब्दहि फुटेना. पाषाणाच्या मूर्तीप्रमाणें मी जणूं निर्जीव बनल्यें होत्यें. आंतल्या आंत माझा जीव गुदमरूं लागला.

आई माझ्या जाण्याची तयारी करूं लागली. मला न्हाऊंमाखूं घालण्यांत आलें. केस बांधले गेले. मेंदी लावली गेली.मारवाडी समाजांत केस बांधण्याचा रिवाज होता. एकदां ते बांधले म्हणजे आठदहा दिवसपर्यंत ते सोडण्याची गरज नसे आणि धुण्याचीहि नसे. केसांत मेण भरून वेण्या घातल्या जात आणि सोन्याचा बोर बांधला जाई. मागें लोकरीची तीन फुटांची वेणी असे. दुसऱ्या बाईची मदत घेतल्याशिवाय केस बांधून घेणें अशक्य होतें. सामान्यत: न्हावीणच हीं कामें करीत असे. हळू हळू ही प्रथा कमी होत चालली आहे.

घरच्या बायकांत बोलणीं चालत– "राधातर बिचारी विधवा झाली. तिला इकडेच राहणें भाग. तिला कोण बोलावतो !" हे शब्द माझ्या मनांत ठसून गेले. लहानपणीं आईची ओढ असतेच. सासर मला तुरुंगासारखें वाटायचें. मला आईजवळ राहायला हवें होतें. मीं पाहिलें कीं राधा विधवा झाल्यानें इथेंच राहाते. मीहि विधवा असत्यें तर मलाहि आईजवळ राहतां आलें असतें. पण विधवा होणें हातचें थोडेंच होतें ! त्या वेळीं आईजवळ राहण्याचें सुख तेवढेंच मला कळत होतें. वैधव्य कशाला म्हणतात हें मला काय माहीत ? शेवटीं आईला सोडून मला दुसऱ्यांदा सासरीं यावें लागलें.

●

## १०. माहेरची आठवण

माहेराहून मी दुसऱ्यांदा सासरीं आल्यें तेव्हां सासूबाई माझीं कोडकौतुकें करीत. अल्पवयांतच वैधव्य आल्यामुळें स्वत: सासूबाईंना चांगले कपडे-लत्ते करणें शक्य नव्हतें. आपली ही इच्छा माझ्यामार्फत पुरी करणेंच त्यांना शक्य होतें. माणूस स्वत:च्या हौशी पुरवून तरी सुखी होतो किंवा आपल्या एकाद्या निकटच्या माणसाला लेवून, नेसवून सुख मानतो. सासूबाईंच्या लेखीं मी त्यांची आवडती सून होत्यें. माझ्यासाठीं त्या तऱ्हेतऱ्हेचे दागिने करवीत. मुंबईहून मोतीं आणि कपडे मागवीत. तिकडे याद्या पाठवीत. गोठ, किनारीच्या साड्या खरेदी करीत. वर्ध्याहून मुंबईला जाणारा प्रत्येक माणूस त्यांना भेटूनच जायचा. अर्थात् त्याच्याबरोबर नवी यादी जायचीच. आईकडून मी थोडेंफार शिवणें टिपणें शिकून घेतलें होतें. बरेंवाईट, थोडें फार शिवीतहि होत्यें. एवढ्यानेंच सासूबाई खुशींत असत. दहाबारा वर्षांची सून आणि तिला शिवणें टिपणें येतें ही सासूबाईंच्या हिशेबानें खुशीचीच गोष्ट होती.

त्याच दिवसांत वर्ध्याला प्लेग पसरला. बच्छराजजी सहकुटुंब आपल्या बगीच्यांत राहायला गेले. आज जिथें मगनवाडी आहे तिथें त्यांचा बगीचा होता. तिथें कांहीं झोंपड्या उभारल्या गेल्या आणि गांवांतल्या कांहीं ओळखी-देखीच्या आणि नात्यागोत्याच्या लोकांनाहि तेथें राहण्यासाठी बोलावण्यांत आलें. बगीच्यांत राहावयास जाण्याच्या तिसऱ्याच दिवशीं सासूबाईंना प्लेग झाला आणि त्या वारल्या.

आतां काय करायचें ? बच्छराजजी गांवचे मुख्य. दूरदर्शी आणि व्यवहारी. ज्या लोकांना त्यांनीं बगीच्यांत वस्तीला आणलें होतें त्यांना तेथून बाजूला काढणें त्यांना योग्य वाटेना. तेव्हां स्वत: आपणच लांब जावें असें त्यांनीं ठरविलें. आणि आम्हांला घेऊन ते पुलगांवच्या आपल्या दुकानावर गेले.

मी तर दहा बारा वर्षांची पोर ! नुकतीच अडीच महिने सासरीं राहून माहेरीं गेल्यें, तोंच परत बोलावली गेल्यें होत्यें. मग माझें मन इकडे कसें लागावें ! कोडकौतुक करणाऱ्या सासूबाई होत्या त्याहि गेलेल्या. आतां मला आईची राहून राहून आठवण होऊं लागली. इकडे वसायला म्हणजेच शोक प्रगट करायला म्हणून ज्या स्त्रिया येत, त्या मला म्हणत, " डोक्यावरून

पदर घे. सासूबाई सासूबाई म्हणून रड." मारवाडी समाजांत पल्ला घेण्याची प्रथा आहे. मरणानंतर दहाबारा दिवसपर्यंत आणि नंतरहि जेव्हां कोणी स्त्री, पुरुष "बसायला" येतात तेव्हां घरच्या स्त्रियांना मेलेल्या माणसाचें नांव घेऊन रडावें लागतें. न रडल्यास निंदा, कुचाळकी होते. या दिवसांत घरच्या स्त्रियांनीं कांठपदरी साडया वापरायच्या नसतात. बसायला आलेल्या स्त्रियाहि साधेंच वस्त्र नेसून येतात. या रडण्याच्या गोष्टीमुळें माझें मन अधिकच दुःखी झालें. कुटुंबांतल्या स्त्रिया पुन्हां पुन्हा म्हणत, "पल्ला घे." माझ्या मनांत जें दुःख होतें तें मला रडून कसें सांगतां आलें असतें ! मला दहाबारा वर्षाच्या पोरीला रिवाजाचें रडणें कसें माहीत असणार ? मला एवढेंच कळत होतें कीं कोणत्या ना कोणत्या उपायानें मी जर आईजवळ जाऊन पोहोंचल्यें तर माझें दुःख ओसरेल.

इकडे माझ्या पायाला नारू झाला. त्रास वाढतच चालला. पोर एकटी, तिकडे तिचें मन कसें लागायचें ? अशी माहेरच्या माणसांना काळजी पडली. मला धीर देणारें, माझ्यावर प्रेम करणारें वर्ध्याला माझ्याजवळ दुसरें कोण होतें ? त्यांना मला न्यायला हवें होतें. माझा भाऊ मला न्यायला आला. बच्छराजजी मला पाठवूं इच्छित नव्हते. ते म्हणाले, "व्याहीजी, बाकी सगळचा गोष्टी बोला पण मुलीला नेण्याची गोष्ट काढूं नका." आणि त्यांनीं दोन चार शिव्याहि ऐकविल्या. म्हणाले, "मी दत्तक कशाला आणला ? मी मरेन तेव्हां मला मुला-सुनेचा हात लागायलाच हवा !" बच्छराजजीच्या अशा प्रकारच्या रोख ठोक उत्तरानें माझा भाऊ सर्दच झाला. त्याचें तोंड उतरलें. प्रारंभीं तर बच्छराजजींनीं माझ्या भावाला चांगलेंच धारेवर धरलें. पण नंतर समजूत काढून त्याला प्रसन्नहि केलें. म्हणाले, "व्याहीजी, मेरी गाली तो घी की नाली है." (माझी शिवी तर तुपाची धार आहे.) पण भावाला चैन कुठलें ! बहिणीला कसें घेऊन जावें याच विचारांत तो पडला होता. पण बच्छराजजींच्या पुढें त्याचें कांहींच चालेना. आणि तो परत फिरला.

नारू झाल्यामुळें माझा पाय सुजून निघाला. सारख्या कळा येऊं लागल्या. बच्छराजजी मुंबईहून डॉक्टरना आणूं पाहात होते. ते चांगलेच काळजींत पडले. माझी स्थिति तर अशी झाली होती कीं मला नोकराकरवीं उचलून पायखान्यापर्यंत न्यावें लागे. अशा स्थितींत देखील आईकडे जाण्यासाठीं माझ्या

जिवाची तडफड चालली होती. दुखण्यांत तर माहेरची आठवण जास्तच तीव्रतेनें होऊं लागली.

मी आंतल्या आंत रडत होत्यें. मला भाकर जात नव्हती. पण आपलें दु:ख प्रकट करण्याची अक्कलहि माझ्यांत होती कुठें? हे मनाचे इतके कोमल होते कीं मी दु:खी आहे हें जरी त्यांना कळलें असतें तरी त्यांनीं मला माहेरीं पाठविलें असतें. त्यांना सांगायचें कसें हें मला ठाऊक नव्हतें. आणि सांगितल्यानें देखील कांहीं होऊं शकतें कीं नाहीं हेंहि मला माहीत नव्हतें!

## ११. लग्न सुटेल कसें?

लग्नानंतर मी आईवडिलांवरोबर जावऱ्याला गेल्यें पण लगेच वर्ध्याहून पत्रें येऊं लागलीं कीं सुनेला पाठवा. बच्छराजजींच्याकडे गणगौर होत असे. त्यांच्या घरीं मुली नसल्यामुळें गांवांतल्या दहा पंधरा मुली बोलावून दोन आठवडे गणगौरीचें पूजन चाले. गणगौर म्हणजे शिवपार्वती. चैत्र शुद्ध तृतीयेला गणगौरी सजवून तिची मिरवणूक काढली जाई. वर्ध्यांतलें मोठें घर असल्यामुळें आमच्या घरून ही मिरवणूक निघे. लग्नानंतरच्या पहिल्या वर्षी गणगौरीची पूजा वधूला करावी लागते. या उत्सवाला वधूला घरीं बोलवावें ही जमनालालजींच्या आईची स्वाभाविकच इच्छा होती. माझे आईवडील तर **एकेश्वरवादी** होते. ते विचारांत पडले कीं, "आपण तर एकाच भगवंताचे उपासक आहोंत. आणि आतां ह्या पोरीला तर गणगौरीची पूजा करावी लागणार." पण बच्छराजजींची इच्छा ध्यानांत घेऊन वडिलांनीं मला वर्ध्याला पाठवून दिलें. माझ्याबरोबर एक पाठराखीण आली होती. तिच्या अंगावरहि पुष्कळसे दागिने होते. फरक एवढाच होता कीं माझे दागिने सोन्याचे आणि तिचे चांदीचे होते सासरचें माझें हें पहिलेंच येणें होतें. माझ्यावर आईवडिलांच्या धार्मिक संस्कारांची छाप होती. मीं जेव्हां पाहिलें कीं इकडे नळाचें पाणी पितात तेव्हां मला फारच खेद झाला. तिकडे नळाच्या पाण्याचा शितोडा उडाला तरी स्नान करावें लागे. आणि इकडे तर पिण्यासाठीं त्याचा उपयोग होतो. पाणी भरणारा होता

तोहि जाठ. पहिल्यांदा मला वाटलें कीं कुणी ब्राह्मण असेल. पण नंतर जेव्हां कळलें कीं तो जाठ आहे, तेव्हां मला जणूं अंगावरून घागरी ओतल्यासारखेंच झालें. इकडे तर धर्मच बुडाला! मी मनांतल्या मनांत ठरविलें कीं माहेरीं जातांच पंचगव्य घेईन, आणि नळाचें पाणी कधींहि पिणार नाहीं.

इथलें खाणेंपिणहि जाजोदियांकडच्यासारखें रुचकर नव्हतें. जेवणांत तुरीच्या डाळीची आमटी तेवढी मला आवडत होती. पण इतर जिन्नस खातांना सारखी जावऱ्याची आठवण व्हायची.

जावऱ्याला काय, मी मोकळी होत्यें. स्वतंत्र होत्यें. इकडे तिकडे खेळत बागडत होत्यें, पण इकडे मला पडद्यांत बसून राहावें लागे. मला वाटत होतें कीं आपल्याला एकाद्या तुरुंगांतच आणून सोडलें आहे. वडिलांनीं मला बच्छराज-जींच्या आग्रहामुळें गणगौरीच्या पूजेकरतां म्हणून पंधरा दिवसांसाठीं पाठविलें होतें. पण पुन्हां नक्षत्र लागल्यामुळें अडीच महिनेपर्यंत पाठवितां यायचें नाहीं असें बच्छराजजींनीं वडिलांना कळवलें. आतां तर वर्ध्यातला क्षणन् क्षण मला जड वाटूं लागला. मी विचार करूं लागल्यें, "देवा, माझें हें लग्न सुटेल कसें?" मन मारून मी राहूं लागल्यें. आंतून रडूं येत होतें. पण डोळ्यांत अश्रु येऊं देत नव्हत्यें. हो, एकाद्याच्या लक्षांत आलें तर कां रडत्यें म्हणून काय सांगणार? लग्न कसें सुटतें किंवा सुटतें कीं नाहीं हें मला नऊदहा वर्षांच्या मुलीला काय माहीत? पण मी सारखी एकच प्रार्थना करीत होत्यें कीं कसल्याहि उपायानें कां होईना, माझें हें लग्न एकदांचें सुटो!

याच दिवसांत एक घटना घडली. जमनालालजींचें वय जरी तेरा वर्षांचें होतें तरी त्यांच्या मातोश्रींना त्यांचें कोडकौतुक आणि सत्कार-सोपस्कार करण्याची इच्छा राहावी हें स्वाभाविक होतें. प्रेम आणि साधेपणा यांच्या बाबतींत बुद्धीचा उपयोग फारसा केला जात नाहीं. मारवाडी समाजांत असा एक रिवाज आहे कीं लग्नानंतर वधूवरांना एके ठिकाणीं झोपविण्यांत यावें. वयाकडे लक्ष देण्याऐवजीं प्रथा म्हणूनच या गोष्टीवर भर दिला जातो. जमना-लालजी, आपले आजोबा बच्छराजजी यांच्याजवळ झोंपत असत. म्हातारपणांत ममतेची भावना विशेष असते. जमनालालजी आधींच दत्तक, त्यांत देखणे, अर्थात त्यांच्यावर बच्छराजजींचें विशेष प्रेम असावें हें स्वाभाविकच होतें.

एके दिवशीं जमनालालजींच्या मातोश्रींनीं नोकराला सांगून आम्हां

दोघांच्या झोंपण्याची व्यवस्था एकाच खोलींत केली. त्या खोलींत झोपण्यासाठीं मला पाठविण्यांत आलें. मी तर पोरच होत्यें. गेल्याबरोबर तावडतोब झोंपीं गेल्यें. माझ्याजवळ पाठराखीण बसून राहिली. जमनालालजी नेहमींप्रमाणें आपल्या आजोबांजवळ झोंपले होते. त्यांच्या मातोश्री मनांतल्या मनांत अधीर आणि अस्वस्थ झाल्या होत्या. कोणत्या ना कोणत्या उपायानें जमनालालजींना त्या बोलावूं पाहात होत्या. पण त्यांना धीर होत नव्हता. शेवटीं त्यांनीं आपल्या नोकराला म्हटलें, "अरे खेता, जमनला बोलाव." जमनालालजी आले. ते माझ्या खोलींत येतांच पाठराखीण बाहेर गेली आणि बाहेरून कडी लावण्यांत आली.

मी तर ऐन झोंपेंत होत्यें. त्यांनीं कदाचित् माझ्या पायाला चिमटा घेतला असावा. पण तो देखील कुणाच्यातरी शिकवण्यानें. कारण ते स्वत: फार लाजाळू होते. मला जाग आली आणि मी दचकल्यें. लग्नाच्या आधीं जमनालालजींना मी दाराच्या फटींतून एकदांच पाहिलें होतें. ही कोण केस कापलेली मुलगी माझ्याजवळ झोंपली आहे या विचारानें मी घाबरल्यें. पाठराखीण तर मला दिसेना. मीहि गप्प आणि तेहि गप्प ! मी उठल्यें आणि जोरजोरानें दार खड-खडावूं लागल्यें. हा आवाज बच्छराजजींपर्यंत जाऊन पोहोंचला. जमनालालजी आपल्याजवळ नाहींत असें दिसतांच त्यांच्या लक्षांत आलें कीं ही सारी भानगड यांच्या आईनें करून ठेवली आहे. ते संतापून शिव्या देऊं लागले. म्हणाले, "पोरीला दु:ख देण्यासाठीं का आणलें आहे ?" भीतीनें सासूबाईनीं दार उघडलें आणि पाठराखीण आंत आली. त्यानंतर माझ्या सासरच्या वास्तव्यांत असला प्रकार पुन्हां कधीं घडला नाहीं.

मी आल्यें होत्यें तेव्हां होळीचे दिवस होते. होळीच्या दुसऱ्या दिवसाला 'छारडी' म्हणतात. त्या दिवशीं रंग खेळतात. नव्या वधूवरांनाहि एकमेकांशीं रंग खेळायला सांगण्यांत येतें ! हा एक आनंदाचा दिवस असतो. आम्हां दोघांना रंग खेळतांना पाहावें अशी सासूबाईंची इच्छा होती. त्यांचें कोडकौतुकहि विशेष होतें. त्यांनीं अंगणांत रंगावीं भांडीं भरून ठेवलीं; आम्हां दोघांना बोलावून आणलें. जमनालालजींच्या हातांत पिचकारी देण्यांत आली व माझ्या हातांत ग्लास. आम्ही दोघें समोरासमोर सुमारें आठदहा गज अंतरावर उभीं होतों. दोघांपैकीं कोणीच रंग उडवीना. दगडाच्या मूर्तीप्रमाणें आम्ही मुकाट्यानें

उभीं होतों. सासूबाई आम्हां दोघांनाहि पुन्हा पुन्हा सांगत होत्या पण आम्ही जणूं निश्चेतन झालों होतों. जमनालालजींना त्या म्हणत, "एक पिचकारी तर सोड !" आणि मला म्हणत, "तूंच एक ग्लास फेकून शकुन कर !" पण माझी स्थिति जणूं फासावर लटकलेल्या माणसासारखी झाली होती. सासूबाईंच्या परवानगीशिवाय आम्हां दोघांनाहि तेथून बाजूला होणें कठीण होतें. आणि लाज तर इतकी होती कीं कुणीच कुणावर रंग उडवीत नव्हतें !

"विवाह कसा सुटेल ?" हे त्या वेळचे शब्दहि किती निर्विकार होते ! आणि म्हणूनच मी समाधान मानून घेत्यें कीं सरलतेंत आणि विकारशून्यतेंत निघालेल्या वचनाचा विपरीत परिणाम होत नाहीं. यद्यपि आज माझ्या लक्षांत येतें कीं एकाद्या समजूतदार भारतीय नारीच्या मुखांतून असे शब्द निघणें किती......

## १२. त्याच्यांत असें काय आहे ?

हिंदु कुटुंबांत—विशेषत: स्त्रियांत प्राचीन रीतिरिवाज आणि शकुन—अपशकुन यांच्या बाबतींत पुष्कळच विश्वास असतो. प्रत्येक बाबतींत शुभाशुभाची कल्पना करणें हा एक प्रकारें त्यांचा स्वभावच होऊन बसला आहे. कुठें जायचें झालें तर वार, तिथि पाहतील, यायचें झालें तरी पाहतील. लग्नकार्यासारखीं कामें तर मुहूर्त पाहूनच व्हायचीं. रात्रीचें असो किंवा दिवसाचें असो, लहान सहान कामांत देखील शकुन—अपशकुनावर इतकें लक्ष असतें कीं त्यांची यादी करावयाची म्हटल्यास त्यांचें एक पुस्तकच बनेल !

माझी आई अशा तऱ्हेच्या शकुन-अपशकुनाच्या भ्रमापासून बऱ्याच प्रमाणांत मुक्त होती. जगांत जें काहीं आहे तें सारें नारायणाचेंच, असें ती मानीत होती. म्हणूनच तिच्या मनांत कसल्याच प्रकारच्या भ्रमांना किंवा शंकाकुशंकांना जागा नव्हती. जेव्हां एकाद्या गोष्टीला लोक अपशकुन मानीत तेव्हां सरळ भावानें ती म्हणे, "त्याच्यांत असें काय आहे ?" राजस्थानांत रक्षाबंधनाच्या दिवशीं घराच्या दारांखिडक्यांवर 'सूण' मांडण्याचा रिवाज आहे. दाराच्या किंवा

खिडकीच्या दोन्ही बाजूना चुन्यानें किवा मातीनें थोडी जागा सारवून गेरूनें एकादें चित्र–स्वस्तिक–ॐ वगैरे काढलें जातें. त्या दिवशीं–जो स्वयंपाक खीर-पुरी वगैरे बनविली जाते त्याचा आधीं या 'सूणा'ला नैवेद्य दाखविला जातो. एकदां घरांत 'सूण' मांडण्यांत आला नाहीं. घरच्या स्त्रियांनीं आईला म्हटलें, "स्वयंपाक तयार आहे पण 'सूण' मांडायचा आहे." आई म्हणाली, "मी तर बाई सूण मांडायचा विसरल्येंच, पण देवाला नैवेद्य तर होणारच आहे. त्यांत तो आलाच."

आईच्या अशा प्रकारच्या गोष्टींचा माझ्यावर खोल परिणाम झाला आणि त्यामुळेंच मलाहि अशा प्रकारच्या भ्रमापासून दूर राहणें सोपें झालें.

माझें लग्न झालें तेव्हां मी नऊ साडे-नऊ वर्षांची होत्यें पण जेव्हां वयाला वीस वर्षें झालीं तरी मला मूल होईना, तेव्हां आमच्या जातींतल्या स्त्रिया येऊन मला विचारूं लागल्या, "अजूनपर्यंत मूलबाळ कसें नाहीं झालें?" कोणी मंत्रतंत्र करायला सांगे. कोणी जादूटोणा करण्याचा सल्ला देई तर कोणी विशिष्ट प्रकारचें औषध घ्यायला सांगे. मी असल्या गोष्टींपासून आपला बचाव करूं पाहात होत्यें. एकाद्या बाईनें असें कांहीं सांगितलें तर मी तिला लगेच म्हणें, "माझ्यासमोर असली गोष्ट काढूं नका." जर मी अशा गोष्टींत गुंतल्यें असत्यें तर माझी काय स्थिति झाली असती कोण जाणे!

देशांत बहिष्काराची चळवळ जोरांत चालू होती तेव्हांची गोष्ट. गांवोगांव आणि घरोघर परदेशी कपड्यांची होळी केली जात होती. शेठजी तर या कामांत आघाडीलाच होते. आमच्याकडेहि शोधशोधून परदेशी कपडे जाळले जात होते. या गोष्टीचा माझ्यावर असा कांहीं कैफ चढला कीं मी लग्नांतले कपडे देखील–पगडी-अंगरखा वगैरे जें शुभ मानलें गेलेलें आणि बासनांत ठेवलेले–जाळून टाकले. हे कपडे तर कुणीं वापरणार नव्हतेंच, मग एकाद्या कोपऱ्यांत पडून राहिले असते तर काय बिघडलें असतें, असें मला विचारण्यांत आलें. लग्नांतलीं वस्त्रें जाळायचीं नसतात; तीं तर सौभाग्याचीं वस्त्रें! मलाहि तीं जाळतांना थोडासा संकोच वाटलाच, पण मी माझें मन घट्ट केलें आणि ठरविलें कीं हे कपडे जाळण्यानें नवऱ्याचें आयुष्य कमी होतें, असें थोडेंच आहे!"

तीं वस्त्रें घरांत कशीं ठेवलीं जाऊं शकत होतीं? पाप कोणी घरांत थोडेंच

ठेवील? पण लग्नाच्या वेळीं नवऱ्या मुलावर जें छत्र धरलें जातें तें कसें जाळायचें? स्वराज्य घ्यायला निघालों.–मग छत्र जाळणें तर ठीक झालें नसतें. मलाहि तें पटलें नाहीं. मी तें मनगवाडीच्या विहिरींत टाकायला लावलें.

मी साबरमती आश्रमांत होत्यें. बापूजींच्या सांगण्यानें दागिने तर मीं केव्हांच टाकले होते. मारवाडी समाजांत सुवासिनी लाखेच्या बांगड्या घालतात; पण जेव्हां मीं दागिन्यांचा त्याग केला तेव्हां लाखेच्या बांगड्याहि वापरणें मला शक्य नव्हतें, कारण त्यावर सोन्याची पोत असते आणि लाखेंत हिंसाहि होते. म्हणून मी कांचेच्या बांगड्या वापरूं लागल्यें. पण कांचेच्या बांगड्या देशी असल्यामुळें वारंवार वाढवत असत आणि अहमदाबाद तर तेथून चार मैल लांब होतें. हा त्रास चुकविण्यासाठीं बांगड्यांची पर्वा करण्याचें मीं सोडून दिलें. मिळाल्या तर वापरीत होत्यें, न मिळाल्या तर तसेंच भागवीत होत्यें. एके दिवशीं बांगड्यांशिवाय, बिंदीशिवाय, पांढरी साडी नेसून मी दारांत बसल्यें होत्यें. मला अशी बसलेली पाहून अनुसूया साराभाई एकदम चमकल्या. भीत भीत त्यांनीं मला विचारलें, "जमनालालजी कुठें आहेत?" मी म्हटलें, "ते वर्ध्याला गेले आहेत."

त्या म्हणाल्या, "जानकीबहन, मी तर तुमच्या वेष पाहून फारच घाबरून गेल्यें."

"बांगड्यांत सौभाग्य थोडेंच आहे!" मी म्हटलें. बापूजींच्या सांगण्यानें आणि प्रभावानें दागिन्यांचें महत्त्व तर कमी होत चाललेंच होतें, पण बिंदी आणि बांगड्या यांच्या बाबतींत कस्तुरबांचा आग्रह होता. कारण दुसरा कोणताच दागिना नसला तरी चालेल पण बिंदी आणि बांगड्या तर सौभाग्याचीं मुख्य चिन्हें मानलीं जात. माझें वर्तन पाहून बा तर इतकें देखील म्हणून चुकल्या, "जानकीबहन तर बापूंना आणखी उत्तेजन देईल आणि मग एक दिवस ते असें देखील म्हणतील, 'जानकीबहनला बघ, ती बांगड्या देखील आवश्यक मानीत नाही!'"

मारवाडी समाजांत जावळ काढण्याचा रिवाज आहे. मुलांचें मुंडण, पहिल्या, तिसऱ्या, पांचव्या वगैरे विशिष्ट वर्षांत करण्यांत येतें. त्यासाठी एखाद्या तीर्थावर किंवा वाडवडिलांच्या भूमींत (विशेषेंकरून राजस्थानांत) आणि मुहूर्त पाहूनच हें मुंडण केलें जातें. स्वयातियांना जेवणावळ घातली जाते, न्हाव्याला

बक्षीस दिलें जातें. एक प्रकारें हा एक संस्कार मानला जातो. कमलनयनचें जावळ काढण्यासाठीं आम्हांला मारवाडला जायचें होतें. पण अडीच महिन्यांचें नक्षत्र लागलें होतें. नक्षत्राच्या अस्ताला 'नक्षत्र लागणें' म्हणतात. या दिवसांत मारवाडी समाजांत लेकीसुनांचें जाणें येणें थांबतें. कोणत्याहि चांगल्या कामाला हात घातला जात नाहीं. इकडे नक्षत्र होतें. तें थांबण्याच्या पक्षांतलें होतें आणि तिकडे गांवांत प्लेग पसरला होता. म्हणून राहायची इच्छा नव्हती. आमच्या स्वयंपाक्यानें म्हटलें, "जिथें गांवांत महामारी फैलावली आहे तिथें नक्षत्र काय करणार आहे?" गोष्ट सर्वस्वी बरोबर होती. नक्षत्र लागलें असतांनाहि आम्ही मारवाडला निघालों. कमलनयन माझा पहिला मुलगा असल्यानें भलतेंच कांहीं झालें तर? अशी थोडी धाकधूक होतीच. पण ती फार वेळ राहिली नाहीं आणि आम्ही जाऊन जावळ काढलें देखील! त्यानंतर मी तर असल्या ठिकाणींच जावळ काढणें सुरू केलें. आणि आमचें पाहून बजाज कुटुंबांतले कांहीं लोकहि असेंच करूं लागले.

अशाच प्रकारें बुधवारला कुठें जाणें येणें आमच्या समाजांत अशुभ मानतात. 'सून' माणसाला बुधवारीं निरोप देण्याचें टाळतात आणि शुभ कार्याचा प्रारंभहि बुधवारीं केला जात नाहीं; पण योगायोगाची गोष्ट अशी कीं १९४२ सालीं मला राधाकृष्णवरोबर बुधवारींच सीकरला जाण्यासाठीं निघावें लागलें. तेथून बुधवारींच निघाल्यें तीहि वाटेंत इंदूरला भावाकडे उतरल्यें आणि तेथूनहि बुधवारींच निघाल्यें. माझ्यावरोबर दादीजीहि होत्याच. मला पुष्कळ सांगण्या-समजावण्यांत आलें. पण माझ्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. दैवयोगानें एक महिना झाला नाहीं तोंच जमनालालजी निर्वतले. आतां फार लोकांना म्हणायला पुरतें निमित्त मिळालें कीं बुधवारीं गेल्यामुळेंच ही अशी दुःखद घटना घडली! माझ्या मनाच्या मोहानें आपल्या दुर्बलतेचा क्षणिक आवेग प्रकट केला आणि मला वाटलें कीं कदाचित् हेंच कारण असेल. पण लगेच माझें चित्त स्थिर झालें आणि माझ्या अंतरात्म्यानें मला म्हटलें कीं बुधवारीं निघाल्यामुळें हा मृत्यु जर घडून आला तर मग माझा किंवा दादीजींचा मृत्यूहि घडून यायला हवा होता! आमच्या लहानसहान शकुन-अपशकुनांनीं जमनालालजी निघून थोडेच जाणार होते! त्यांचें शुभ इच्छिणारे तर पुष्कळच होते.

भ्रम वगैरे गोष्टींपासून मला लांब राहतां आलें ही मी आईची देणगी समजत्यें.

•

## १३. एका सासवेच्या अभावीं अनेक सासवा

जेव्हां प्लेग संपला तेव्हां आम्ही मंडळी वर्ध्याला परतलों आणि प्रेसमध्यें राहूं लागलों. आतां आमच्याच कुटुंबांतली एक वाई माझ्याकडे येऊन नाना गोष्टी सांगूं लागली. म्हणाली, " घरांत सासूबाई वारल्या तेव्हां बारा महिने-पर्यंत ब्राह्मणाला जेवू घातलें पाहिजे." वर्ष पूर्ण झाल्यावर त्या बाईनें ब्राह्मणाला कांहीं कपडे द्यायला लावले. मला वाटलें होतें कीं धार्मिक दृष्टीनें हें आवश्यक असेल. मी लहान असल्यामुळें त्यावेळीं घरची सारी व्यवस्था बच्छराजजीच पाहात. त्यामुळें माझ्याजवळ माझ्या लग्नाचे आणि आईनें दिलेले कपडे तेवढेच होते. तेच मीं दाखविले आणि त्यांतलाच एक रेशमी व किनारीचा घागऱ्याचा पोशाख तिनें काढून घेतला आणि एक सुती कपड्याचाहि काढला. रेशमी वेष घरच्या पुरोहिताला दिला आणि सुती एका ब्राह्मणाला.

ही गोष्ट बच्छराजजींना कळली तेव्हां त्यांनीं त्या बाईला खूप शिव्या दिल्या आणि म्हणाले, 'बाया येऊन येऊन पोरीला सतावतात व लुबाडतात.' आणि म्हणून त्यांनीं मागचा दरवाजा बंदच करावयास लावला. त्यांनीं त्या बाईला असाहि धाक घातला कीं गांवांतून तुला हुसकून लावीन. बच्छराजजींना ही बातमी लागली हें कळतांच त्या बाईची पांचांवर धारण बसली. ही गोष्ट आपल्या नवऱ्याच्या कानांवर जाईल म्हणूनहि तिनें धसका घेतला. ती धांवत धांवत माझ्याजवळ आली अन् मलाच उलटी दटावूं लागली. म्हणाली, " मी कुठें तुला काय सांगितलें होतें ? तूंच तर दिलेस!" या प्रकारानें मी तर एकदम गडबडून गेल्यें. आपला बचाव करण्यासाठीं ती असें म्हणाली होती! पण इतक्यांत मोलकरीण म्हणाली, " तुम्हीच तर कपडे द्यायला लावलेत. आणि वरून तुम्हीच दटावतां? या मुलीला काय समजणार?"

आतां मी माझा नित्यक्रम –पूजापाठ, सहस्रनामाचा जप वगैरे – करूं लागल्यें

आणि सुखानें राहूं लागल्यें. कांही दिवस मोलकरणी आणि " हतकार " न्यायला येणाऱ्या मुली, यांच्यावरोबर मी पत्तेहि खेळत असें. तरी पण माझें चित्त त्यांत लागेना. अर्थात् पत्ते खेळणें बंद झालें. मला आनंद वाटे तो शिवण्या टिपण्यांतच. पूजापाठांतहि वेळ चांगला जात असे. शिलाईचें सामान आई पाठवून देत असे. गांवांतल्या बायाहि माझ्याजवळ कांहीं ना कांहीं शिवणकाम आणून देत. टोपलींत हें सगळें सामान पडून राही. यामुळें माझा वेळहि जाऊं लागला, शिलाईंत सफाई येऊं लागली.

आज जेव्हां मी विचार करूं लागत्यें, तेव्हां माझ्या आजे-सासऱ्यांनीं बायकांचें जाणें येणें बंद करून माझें कल्याणच केलें असें मला वाटतें. सासूवेगळ्या मुलीच्या सगळ्याच सासवा होऊन बसतात आणि नव्या सुनेला त्या सगळ्यांचा मान राखतां राखतां पुष्कळच सोसावें लागतें.

## १४. 'एक दिवस मरायचेंच आहे !'

जमनालालजी दत्तक गेले तेव्हां त्यांचें वय पांच वर्षांचें होतें. दादीजी (आजीबाई) त्यांचे फार लाड करीत. त्यांचा वृद्धापकाळ आला होता. आणि दत्तक घेतलेला तरुण मुलगा लग्न होतांच निवर्तला होता. यामुळें ह्यांच्यावर त्यांनीं प्रेमाचा पाऊस पाडावा हें स्वाभाविकच होतें. सदीबाई स्वतः फारच सरळ स्वभावाच्या आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्याकडे साधुसंतांची पंगत सदैव लागलेली असे. हेहि येणाऱ्या साधुसंतांना जीवनाच्या सार्थकतेसंबंधीं प्रश्न विचारीत, आणि त्यांचें म्हणणें ऐकून घेत. पण दुर्दैवानें त्यांना अकरा वर्षें होतात न होतात तोंच दादीजी दिवंगत झाल्या, त्यामुळें त्यांचें मन उदास झालें.

त्यांची विधवा आईहि त्यांचे फार लाड करी. लग्नानंतर त्यांना हा एवढाच प्रेमाचा तंतू राहिला होता. खाऊं जेवूं, कपडेलत्ते वगैरे कोडकौतुकें त्या करीत, पण दादीजींसारखी परिपक्वता त्यांच्यांत कुठून येणार? माणूस जसजसा मोठा होतो तसतशी त्याच्या प्रेमाची खोली वाढत जाते. तरीपण त्यांच्या विधवा आईनें, त्यांना रिझविण्यांत कोणतीच उणीव राहूं दिली नाहीं. दोन वर्षांनंतर

आमचें लग्न झालें. लग्नांत कोडकौतुकहि खूप झालें, पण झालें असें कीं लग्नाला दहा महिने होतात न होतात तोंच ह्यांच्या या आईलाहि देवाज्ञा झाली. ह्या घटनेचाहि ह्यांच्यावर फार परिणाम झाला.

लग्नाच्या वेळीं ह्यांचे जनक वडील कनीरामजी मारवाडांतून सहकुटुंब आले होते. त्यांना तीन मुलगे होते. थोरले माधवलालजी यांच्याचबरोबर राहण्यासाठीं आणि बच्छराजजींच्याजवळ काम शिकण्यासाठीं म्हणून वर्ध्याला आले होते. दुसरे हे दत्तक गेले होते. तिसरे बद्रीप्रसाद लग्नाच्या वेळीं ह्यांच्या-बरोबर आले होते. पण दैवाची लीला विचित्र खरी. मुदतीचा ताप आला आणि नऊ दिवसांतच बद्रीप्रसादजी वारले. त्यांचें वय अकरा वर्षांचें होतें. विवाहा-नंतर वर्ध्यालाच ही दु:खद घटना घडली. या घटनेमुळें सगळींच शोकसागरांत बुडून गेलीं. कनीरामजीवर तर आकाशाची कुऱ्हाडच कोसळली. एका मुलाचें नुकतेंच लग्न झालें, अंगावरची हळदहि उतरहि नाहीं तोंच दुसरा निघून गेला! घरच्या माणसांची हौसहि पुरी झाली नव्हती; तोंच हें महान् संकट आलें. कनीरामजींना तर वर्ध्यांत पाणी घेणेंहि दु:सह झालें. बच्छराजजींनीं नाना तऱ्हांनीं त्यांना सांगितलें, समजावलें कीं आतां इथेंच राहा. पण कनीरामजी कसचे मानतात! ते स्वाभिमानी होते. शेवटीं कनी-रामजींची मन:स्थिति लक्षांत घेऊन माधवजींना त्यांचेबरोबर देऊन थोड्या दिवसांकरतां मारवाडला पाठवावें लागलें. येतांना केवढ्या उत्साहानें सगळी वाट मंगलगीतें गात आले होते आणि आतां जातांनाचें हें दृश्य किती करुण होतें!

बच्छराजजी तिखट स्वभावाचे असले आणि तुपाच्या धारेप्रमाणें त्यांच्या तोंडांतून नेहमीं शिव्यांची धार लागे हेंहि खरें असलें तरी जमनालालजींवर त्यांचा इतका जीव होता कीं बहुतकरून रात्रीं ते ह्यांना जवळ घेऊनच झोंपत. दादीजींच्या आणि माताजींच्या पश्चात् तर घरांत सर्व कांहीं बच्छराजजीच होते. सारा भार त्यांच्यावरच होता. मी तर काय पोरसवदाच होत्यें. ओळखी-पाळखीहि झाल्या नव्हत्या. माझा तसा परिचयहि वाढला नव्हता. हे सोळा सतरा वर्षांचे असतील तेव्हांच बच्छराजजी दिवंगत झाले. आतां कुटुंबांत आम्ही दोघेंच राहिलों ह्यांचे मोठे बंधू माधवजी कारभार पाहात. आतां आमचें कौतुक करील, आमच्या बालसुलभ चुका सांभाळून घेईल, आमच्या सुखसोयींची

काळजी घेईल, आमचीं आंसवें पुशील असें आतां कोण उरलें ? इतकें असूनहि ह्यांनीं, आपले बंधू जवळ असल्यामुळें, अवसान गळूं दिलें नाहीं.

माधवजी ह्यांचे थोरले बंधू. त्यांनीं बच्छराजजींच्या हाताखालीं व्यवहाराचें शिक्षण घेतलें होतें. तेच कारभार पाहात. चांगले धट्टे कट्टे आणि निरोगीहि होते. पण दु:खाची मर्यादा अजून शिल्लक होती, याचा कोणाला पत्ता होता ? कांहीं दिवसांनंतर तोच मुदतीचा ताप माधवजींनाहि आला आणि तेहि नऊ दिवसांतच निधन पावले. आश्चर्याची गोष्ट अशी कीं आठ दिवसपर्यंत ताप भरला असूनहि ते अंघोळ करून कापसाची खरेदी करण्यासाठीं बाहेर जात राहिले. आणि कुणाला त्यांनीं कांहीं सांगितलें सुद्धां नाहीं. नवव्या दिवशीं एकाएकीं त्यांना घेरी आली. त्या दिवशीं लोक जेव्हां विचारायला गेले तेव्हांहि ते म्हणाले कीं "आजारपणांत देखील एक मजा आहे. त्यामुळें लोक झोपलेल्याचीहि विचारपूस करायला येतात." इलाज करण्यासाठीं पुष्कळ धांवपळ केली गेली. पण त्यांना वांचविणें शक्य झालें नाहीं. यामुळें ह्यांच्या धैर्याचा बांध फुटला आणि डोळ्यांसमोर अंधेरी आली. राहून राहून मृत्यूचेंच चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर येऊं लागलें. आजींची निर्मळ माया, आईचे लाड, आजोबांचें वात्सल्य आणि भावाची ममता यांच्या आठवणीनें हे विव्हल होऊं लागले. आतां स्वत:वर त्यांचा ताबा राहूं शकला नाहीं. या घटनेचा त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं त्यांना १०४ ताप भरला आणि ते बेशुद्ध झाले. यांच्या मनांत विचार घोळूं लागले, " आतां मी वडिलांना तोंड कसें दाखवूं ? आम्हां तीन मुलांपैकीं त्यांचा एकहि राहिला नाहीं. त्यांचे तिघेहि मुलगे वर्ध्याला वाहिले गेले. दोन निघून गेले आणि मी तर परका झालों. " याच विचारानें ते अस्वस्थ झाले. ह्यांचें उपजत वैराग्य जास्तच तीव्र होऊन उठलें आणि हे साधु बनण्याचा व गंगाकाठांवर झोंपडी बांधून राहण्याचा विचार वारंवार मनांत घोळवूं लागले. कनीरामजींवर तर माधवजींच्या मृत्यूनें वज्राघातच झाला. ते वेड्यासारखे रानावनांत हिंडूं दौडूं लागले. वृक्षांवर कपाळ फोडून घेऊं लागले. ह्यांची आई आणि गांवचे लोक त्यांच्या मागें मागें राहात. लोक त्यांना सांभाळीत. पण त्यांच्या दु:खाला पार नव्हता ! जमनालालजी त्यांच्याजवळ गेले. त्यांना वाटत होतें कीं आई-वडिलांनीं आपल्याजवळ राहावें. पण वर्ध्याला यायला ते कबूल झाले नाहींत.

कनीरामजींना बांधकामाची आवड होती. म्हणून जमनालालजींनीं त्यांच्या मनाला विरंगुळा वाटावा म्हणून सीकरचे रावराजे माधोसिंहजी यांच्याकडून जमीन घेऊन एक घर बांधण्याचें काम त्यांच्याकडे सोपवलें. त्यालाच आज 'कमरा' असें म्हणतात. तिकडे बंगल्याला कमराच म्हणतात. सीकरमध्यें माधवजींच्या नांवें "माधव दवाखाना" उघडण्यांत आला. हा दवाखाना अजून चालू आहे.

ह्या घटनांनीं जमनालालजींना सावध केलें. त्यांना डोक्यावर सदैव मृत्यूच दिसूं लागला. मृत्यू केव्हां येईल याचा काय नेम! म्हणून त्यांनीं आपल्या आयुष्यांत कित्येकदां मृत्युपत्रें तयार केलीं. आणि एक वाक्य तर त्यांच्या तोंडीं नेहमींच राहिलें–

"एक दिवस मरायचेंच आहे. अन्यायाला नेहमीं भिऊन असां"

हें वाक्य छापून त्यांनीं त्याच्या अनेक प्रती आपल्या खोलींत आणि इतर ठिकाणींहि टांगून ठेवल्या होत्या.

अनुक्रम ३०५२० दि:
क्रमांक नों: दि:

## १५. डालूरामची सेवापरायणता

पहिल्या खेपेला माझ्या भावाला तर निराश होऊन परत फिरावें लागलें होतें. कांहीं महिन्यांनंतर मला नेण्यासाठीं तो पुन्हां आला. पण याहि खेपेला बच्छराजजींनीं मला पाठविण्याचें नाकारलें. आतां माझ्या बाबतींत तो अगदीं निराश झाला होता. आणि बाईचें ( माझें ) माहेरीं जाणें कठीण आहे असा त्याचा समज होऊन बसला. त्यावेळीं दत्तूरामजी जाजोदियांकडे डालूराम चौबे नोकरीवर होता. माझ्या लग्नाच्या कामकाजांत माझ्या माहेरच्या लोकांशीं त्याचा संबंध आला होता. त्यामुळें माहेरचीं माणसें डालूरामला ओळखूं लागलीं होतीं. माझ्या भावानें विचार केला कीं जर डालूराम बच्छराजजींकडे नोकरीला राहिला तर बाईचा समाचार कळत राहील. त्यानें डालूरामला म्हटलें कीं तूं बच्छराजजींकडे नोकरीला राहा; म्हणजे बाईविषयींची काळजी कमी होईल.

डालूरामनें म्हटलें, "बच्छराजजींच्याकडे ? बापरे बाप ! त्यांच्या शिव्या कोण खाईल ?"

भावानें म्हटलें, "ते ज्या शिव्या देतील त्या आम्हांला लागतील. पण बाईच्यासाठीं तूं त्यांची नोकरी कर."

माझा भाऊ डालूरामला बरोबर घेऊन बच्छराजजींकडे गेला आणि त्यांना म्हणाला कीं, याला कामाला ठेवा.

बच्छराजजी म्हणाले, "ठीक. त्याला राहा म्हणावें खुशाल."

भावानें म्हटलें, "पण याचें म्हणणें आहे कीं आपल्या तोंडून शिव्या फार निघतात !"

यावर बच्छराजजी बोलले, "व्याहीजी, माझ्या शिव्या म्हणजे तुपाची धार आहे, माझा स्वभावच तसा बनला आहे. काय करूं ?"

तेव्हां माझ्या भावानें डालूरामची समजूत काढून म्हटलें, "बाबा, जेव्हां ते स्वत:च असें सांगताहेत तेव्हां त्यांच्या शिव्या मनाला लावून कां घ्यायच्या ?"

अर्थात् डालूराम आमच्याकडे काम करूं लागला. प्रारंभीं डालूराम गांवांतल्या लटपटच्या माणसांपैकीं गणला जात असे. आणि त्याच वातावरणांत राहात असे. पण आमच्याकडे राहूं लागल्यानंतर त्याच्यांत जबाबदारीची जाणीव जागी झाली. त्यानें मनांत विचार केला कीं जमनालालजींचा काय भरवंसा ? वाटेल तेव्हां साधू बनतील ! बाईचें वय लहान आहे आणि जावऱ्याच्या लोकांनीं तिची जबाबदारी आपल्यावर सोंपवली आहे ; तेव्हां आपण आपलें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. त्यानें मनाशीं ठरविलें कीं आपण यांच्याकडे मारुति होऊन सेवा करायची. मला तो धर्मभगिनी मानून वागू लागला. मला येवढीहि तसदी होऊं नये म्हणून तो जिवापाड जपूं लागला. खालच्या जिन्याजवळूनच मोलकरणीकडून तो माझी वास्तपुस्त करीत असे. मी वर गॅलरींत कधीं उभी असलेली दिसल्यें तर बाईला आंत जायला सांग असें तो सांगून पाठवी. कुणीं पाहिलें तर लोक काय म्हणतील ? सून माणसानें आंतच राहिलें पाहिजे. मी दागिने घातले तर तो त्यांची यादी बनवी. मी त्यावेळीं पोरच होत्यें. न्हाणी-घरांत किंवा अन्य कुठेंहि एकादा दागिना मी विसरत असें. म्हणूनच डालूराम त्यांची यादी बनवीत असे. त्यानें आमच्याकडल्या भांडीं वगैरे सर्व वस्तूंचीहि यादी बनविली होती.

एक प्रकारें तो आमच्या घरचा 'सुपरिंटेन्डन्ट'च झाला होता. मला तर असें वाटूं लागलें कीं मला तुरुंगांतच बंद करण्यांत आलें आहे आणि डालूराम जेलरप्रमाणें माझ्यावर पहारा ठेवीत आहे! पण तो जो तुरुंग होता त्यांत कोणतेंच बंधन नव्हतें. आणि जो जेलर होता तो स्वत:ला सेवक समजत होता. प्रत्येक बाबतींत मला सुख लागावें म्हणून त्याची धडपड होती. पण त्याची शिस्त इतकी कडक होती कीं मला तो सासूसारखा वाटे.

डालूराम शिकला संवरलेला होता. त्याला, मला सति सीता बनवायचें होतें ; म्हणून त्यानें मला 'पतिभक्ति' नांवाचें एक पुस्तकहि वाचण्यासाठीं पाठवून दिलें. आमच्या कुटुंबांत त्यानें स्वत:ला वाहून घेतलें होतें.

समाजांत माझी प्रतिष्ठा वाढेल अशी लज्जाशील मी असावें असें त्याला वाटे! त्याकाळीं समाजांत पडदा वगैरे गोष्टींची प्रतिष्ठा होतीच. मी देवाला जात असें तेव्हां तो इतरांना बाजूला करी. स्वयंपाकघरांत भोजनाची वेळ झाली म्हणजे तो इतरांना जायला मनाई करी. माझी सांवली देखील कुणी बघूं नये अशी त्याची इच्छा असे ; मीहि या सर्व बाबतींत स्वत:ची प्रतिष्ठा पाहात होत्यें. माझे मामे सासरे बिरदीचंदजी पोद्दार यांच्याकडे जेव्हां कधीं मी जात येत असें, तेव्हां घोड्याच्या बंद गाडींतून मला जावें लागे. आणि त्यांच्या दरवाजावरहि पांढरी चादर झांकली जाई. समाजांत कांहीं असा परिपाठ नव्हता. पण माझें वय लहान असल्यामुळें तो जें करी तें खपत होतें. तो सामान्यत: आपल्या घरींहि जात नसे. त्यानें खरोखरच आमच्याकडे हनुमान बनून काम केलें.

मला जेव्हां मुलेंबाळें झालीं तेव्हां तो त्यांना खेळवीत राही. एकदां जमनालालजींनीं विचार केला कीं डालूराम शिकला संवरलेला आहे ; तेव्हां त्याला त्याच्याजोगतें काम दिलेलें चांगलें. गल्ल्याचें काम त्याच्यावर सोंपविण्यांत आलें. पण डालूरामहि एक प्रकारें छांदिष्टच होता. ठरलेलें गल्ल्याचें काम तो रात्रीं दोनदोन वाजेपर्यंत जागून पुरें करी, आणि दिवसा बहुतेक वेळ मुलांबाळांचा सांभाळ करी.

एके दिवशीं त्यानें जोशीबुवांना विचारलें की जर एकादा माणूस आपल्या बहिणीकडे नोकरीला राहिला तर त्याला तिच्याकडे जेवतां येईल कीं नाहीं? यावर जोशीबुवांनीं उत्तर दिलें कीं नोकरी धरल्यानंतर जेवण करायला कांहींच

हरकत नाहीं. तरी देखील आमच्याकडचे पदार्थ तो खात नसे. आणि खालीं जो स्वयंपाक होत असे तेथेंच तो जेवण उरकीत असे.

१९१७ सालीं देशभर इन्फ्ल्युएन्झाची सांथ फैलावली. या सांथींत हजारों माणसें दगावलीं. आमच्याकडेहि सगळीं आजारीं पडलीं. डालूरामची खूप काळजी घेतली गेली; पण मृत्यूनें ज्याला टिपलें आहे त्याच्यावर कोणतीच मात्रा चालत नाहीं. कित्येक वर्षें त्यानें आमच्या कुटुंबाची निष्ठेनें आणि भक्ति-भावानें सेवा केली होती. शेवटच्या घटकेला त्याला विचारण्यांत आलें कीं तुझी जी काय इच्छा असेल ती सांग. तो म्हणाला– "गंगा नांवाची जी मोलकरीण आहे तिला सोडूं नका. नाहींतर मुलें विहिरींत पडतील." त्यानें ही गोष्ट अशासाठीं सांगितली होती, कीं देवळाची विहीर जवळच होती आणि मुलें तेथें खेळत असत.

त्याचे आईबाप आणि बायको हीं तर आधींच निवर्तलीं होतीं. दोन भाऊ होते. त्यांच्यासंबंधींहि त्याला विचारण्यांत आलें, पण तो कांहीं बोलला नाहीं. केवळ त्यानें हात हलविले आणि 'त्यांची मला कसली काळजी ?' असें ध्वनित केलें. त्याच्या दोघाहि भावांना शिकण्यासाठीं बोर्डिंगमध्यें ठेवण्यांत आलें होतें. पुढें शेठजींनीं त्या दोघांचीं लग्नेंहि केलीं आणि त्यांना कामालाहि आमच्याकडेच ठेवलें.

●

## १६. पतिभक्ति

धार्मिक संस्कारांचें मला बाळकडूच मिळालें होतें. आणि हे संस्कार माझ्या वयाबरोबर वाढूं लागले होते. जें जें पुस्तक मी वाचीत होत्यें त्यांतल्या सर्व गोष्टींचें पालन करण्याचा माझा प्रयत्न असे. कारण माझा असा समज होता कीं पुस्तकांत जें कांहीं लिहिलेलें असतें तें सारें ईश्वरलिखित किंवा वेदवाक्यच आहे. मुख्यतः मी धार्मिक पुस्तकेंच वाचीत असें. जेव्हां डालूरामनें 'पतिभक्ति' नांवाचें पुस्तक मला पाठविलें होतें तेव्हां तें याच मी भावनेनें वाचलें होतें. आणि त्यांत लिहिलेल्या गोष्टींना धरून वागण्याचा प्रयत्न मी करीत राहिल्यें.

माझ्यावर विशेप परिणाम झाला ती पहिली गोष्ट म्हणजे नवरा किंवा वडील माणसें यांच्या भोजनानंतरच भोजन करायला हवें. मी तसें करूं लागल्यें. बच्छराजजी आणि हे सकाळीं न्याहारीला बदामाचा शिरा व कांहीं तिखट-मिठाचे पदार्थ खाऊन कामाला लागत. माझ्यासाठींहि त्या वस्तु वर पाठविल्या जात. सूनबाईनें न्याहारी केली कीं नाहीं असें मोलकरणीला बच्छराजजी वरचेवर विचारीत. मी न्याहारी न करतांच होय म्हणून सांगून पाठवीं. पूजे-अर्चेत आणि शिवण्या टिपण्यांतहि मी गर्क राहात असें. दोन वाजतां जेवीत असें. ते सकाळीं न्याहारी करून घेतात तेव्हां मीहि न्याहारी करूं शकतें हें माझ्या लक्षांत येणें कठिण होतें. जेव्हां बच्छराजजी आणि हे जेवून उठत तेव्हां मी जेवून घेई. एवढ्यांत दोन वाजत. नियम पाळण्याची दक्षता मी इतकी ठेवीत असें कीं एकादी वस्तू खाण्याची इच्छा झाली तरी देखील मी ती तोंडांत टाकीत नसें. माहेरीं तर दिवसांतून कैकदां मी खातपीत असें. पण आतां माझें खाणेंपिणें पतिभक्तींत समाविष्ट होऊं लागलें होतें ; दुसरें पतीच्या उष्टया ताटांत जेवण्याला मी पतिभक्ति समजत होत्यें. म्हणून मी त्यांचें ताट ठेवून देत असें व त्यांतच जेवीत असें.

अशा प्रकारें अवेळीं जेवण्यानें माझ्या शरिरावर त्याचा परिणाम दिसूं लागला. माझ्या पोटांत गांठी होऊं लागल्या !

शौचाला जातांना फार त्रास होऊं लागला. लाजेमुळें ही गोष्ट कुणाला सांगण्याचा संकोच होई. आणि त्यांत दुसरा कुणी काय करणार, असा विचार करून मीं गप्प बसें. याचा परिणाम असा झाला कीं मला मुळव्याध जडली आणि ती वाढतच गेली.

शेठजींचे मामा बिरदीचंदजी पोद्दार वेदान्ती होते. ते आपल्या बगीच्यांत जाऊन ध्यानादिक करीत असत. शेठजी देखील आपल्या बगीच्यांत शंकराची पूजा करीत. गोमुखींत हात घालून रुद्राक्षांची माळ जपीत. खोलींत योग्यांचीं चित्रें टांगलेलीं असत.

जेव्हां शेठजींशीं माझी सलगी वाढली तेव्हां मी त्यांना घरींच पूजा करायला सांगितलें. पूजेचें सामान बगीच्यांतून घरीं मागविण्यांत आलें. ते स्नान करून पूजेला बसत आणि मी स्वतः त्यांचें धोतर धुऊन त्यांची पूजा करीं. त्यांचें धोतर धुण्याला नोकरांना मीं मनाई केली. वैष्णव जसें गुरूचें पादोदक घेतात

तसें पतीचें घेतलें पाहिजे आणि पांढऱ्या फुलानें त्याची पूजा केली पाहिजे असें मी वाचलें होतें. म्हणून मी एक कुंडी वर ठेवून घेतली होती आणि तींतून रोज एक फूल घेऊन मी तें वाहात असें व श्लोक म्हणत चांदीच्या वाटींत त्यांच्या डाव्या पायाचा अंगठा धुऊन घेऊन तें पाणी पीत असें.

जमनालालजींना या दोन्ही क्रिया – उष्टया ताटांत जेवणें आणि अंगठा धुऊन पिणें– रुचत नसत. उष्टया ताटांत जेवण करणें थोडया दिवसांनीं बंदच करावें लागलें. एक म्हणजे त्यांची अरुचि आणि दुसरें उष्टया ताटावर माशा वगैरे बसत हें ! म्हणून मलाहि तें बरें वाटत नसे. माझ्या आग्रहापुढें त्यांनीं पाहिलें कीं जास्त सांगून फायदा नाहीं. आणि पादोदकाची ही क्रिया चालू राहिली. ते जेव्हां जेलमध्यें वगैरे जात तेव्हां त्यांचें पादोदक मी वाटलींत भरून ठेवीत असें आणि जेव्हां कधीं त्यांना भेटायला जाईं तेव्हां मुकाटयानें पाय धुऊन पाणी घेऊन येईं. जेव्हां ते निधन पावले आणि त्यांचें शरीर गंगोदकानें धुतलें गेलें तेव्हांहि मी तें पाणी पिऊन घेतलें. तें पाहून आश्रमांतल्या मुलींनींहि तें गंगोदक घेतलें. ही क्रिया आपल्या स्वभावानुसार केली होती. आणि त्यावेळीं मी इतकी लीन झाल्यें कीं माझा मलाच विसर पडला होता.

एकदां आम्ही सर्व मंडळी चित्रकूटला गेलों होतों. तेथील मातीचा कण न् कण पावन आहे. तिथली माती मला आणायची होती. पण माती आणण्यांतला माझा हेतू असाहि होता कीं त्यांच्या पायाचे रजःकण अधिकच पवित्र होतील. म्हणून जोंपर्यंत आम्ही तिकडे राहिलों तोंपर्यंत मी एक काम केलें तें हें कीं जेव्हां जेव्हां हे बाहेरून येत तेव्हां तेव्हां मी त्यांचा उजवा अंगठा धुऊन घेत होत्यें आणि त्या पाण्यानें तेथील मातीचे पेढें तयार करून घेईं. अशा रीतीनें आजदेखील या वडया माझ्याजवळ ठेवलेल्या आढळतील आणि रोज स्नानानंतर त्यांतला एक कण मी तोंडांत टाकत्यें. पादोदक पिण्याच्या क्रियेचा माझ्यामार्फत प्रचारहि झाला आणि कांहीं भगिनींनीं यापासून शिकवणहि घेतली.

भाद्रपदांतील अमावास्येला सतीपूजा केली जाते. सती झाल्यें तर माझीहि पूजा होईल. पण सती व्हायचें कसें ? पतीच्या आधीं जर मी मेल्यें तर सती होण्याची संधि हातची निसटणारच– असे विचार मनांत येत असत.

जमनालालजी हमेशा मृत्यूची चर्चा करीत. ते म्हणत कीं मृत्यूची चर्चा

केल्यानें त्याचें भय मावळत जातें, व्याकुळतेपासून आपण बचावतों. त्रास न होतां किंवा न देतां मरतां यावें. यावर मी म्हणें, कीं अशा प्रकारच्या मरणांनीं घरची मंडळी काळजींत पडते आणि नीट बोलणेंहि होऊं शकत नाहीं. तेव्हां ते म्हणत कीं सारा जन्म बरोबर राहून जर घरांतील माणसें एकमेकांना समजूं शकत नाहींत तर शेवटच्या वेळीं समजून घेण्याची किंवा समजावून देण्याची आशा करणें व्यर्थ आहे. जाणाऱ्या माणसाला कुटुंबाच्या मोहांत पडून काय फायदा होणार ? जाणारा सुखासमाधानानें जावा यांतच घरच्या माणसांनींहि संतोष मानला पाहिजे. अशा मरणाला ईश्वराची कृपा समजलें पाहिजे.

त्यांची जशी श्रद्धा होती तसेंच मरण त्यांना लाभलें. त्यांच्या या चर्चेचा फायदा त्यावेळीं मला दिसून आला.

## १७. उच्च शिक्षणांतलें अपयश

लहानपणीं, लग्नाआधीं, शिकण्यासवरण्यांत मला गोडी होती. लग्नानंतर शिकणें सुटल्यासारखेंच झालें. पांच सहा वर्षांनंतर जेव्हां ह्यांचा माझा परिचय वाढत गेला तेव्हां माझें शिक्षण पुढें चालूं राहिलें तर बरें होईल असें त्यांच्या मनांत आलें. ह्यांचेंहि लहानपणी शिक्षण थोडें झालें होतें. याचें कारण होतें दादीजींचें ह्यांच्यावरील प्रेम. या गोष्टींचें त्यांना वैषम्य वाटत होतें आणि आपल्याहि शिक्षणाचा प्रयत्न हे करीत राहात. व्यापारामुळें ह्यांना फुरसत फार कमी मिळे हें एक कारण होतेंच. शिवाय लहानपणीं नियमित शिक्षण न झाल्यामुळें मान मोडून शिकायला बसण्याची त्यांना संवय नव्हती. पण ते शिकलासंवरलेला एक माणूस नेहमीं आपल्या पदरीं सेक्रेटरी म्हणून ठेवीत. आणि तो त्यांना शिकवण्याचेंहि काम करी. त्या काळीं इंग्रजी शिक्षणाचें फार महत्त्व होतें. म्हणून हेहि आपल्या सेक्रेटरीशीं इंग्रजींत बोलण्याचा प्रयत्न करीत. ह्यांचा हा प्रयत्न चालूच असे. सवड मिळाली कीं शिक्षणाचें काम सुरू व्हायचें. त्यांचा हा प्रयत्न शेवटपर्यंत चालला. जेव्हां जेव्हां ते तुरुंगांत जात तेव्हां तेव्हां शिक्षणाची खटपट करीत. त्यांच्या तुरुंगांतल्या वह्या पाहिल्या म्हणजे विद्यार्थ्या-

प्रमाणें अभ्यास केलेला त्यांत दिसतो. एवढें सगळें करून देखील उच्च शिक्षणांत ते फारसे पुढें जाऊं शकले नाहींत. शाळा-कॉलेजांच्या शिक्षणांत जरी ते पुढें जाऊं शकले नाहींत तरीहि त्यांनीं आपलें व्यवहारज्ञान इतकें वाढविलें कीं सार्वजनिक आणि व्यावसायिक कामांत त्यांनीं पुष्कळच यश मिळविलें. मोठमोठे व्यापारी आणि पुढारी देखील त्यांची सल्लामसलत घेत आणि त्यांच्या व्यवहारज्ञानाचें प्रभुत्व मान्य करीत. ते म्हणत कीं या वाण्यानें शिक्षण नसतांनाहि लोकांवर वजन ठेवलें आहे. शिक्षण घेतलें असतें तर काय केलें असतें कोण जाणें !

इकडे मी घरांतच राहात असें. मला कामकाजहि कांहीं नव्हतें. मुलेंबाळें झालीं तींहि उशीरा. यामुळें माझें अधिक शिक्षण झालें तर तें चांगलें असा विचार ह्यांच्या मनांत येणें स्वाभाविकच होतें. एक मराठी मास्तरीण ठेवली गेली. त्या दिवसांत आपल्याकडे मराठी मास्तरणीच मिळणें सोपें होतें म्हणून शिक्षणहि मराठींत होत असे. वर्ध्याची बोलण्याचालण्याची भाषाहि मराठीच होती. म्हणून मराठीचें ज्ञान वाढलें तर चांगलें अशी दृष्टि ठेवण्यांत आली. पण मला "इकडे तिकडे" शिकण्यामध्यें गोडी वाटेना. प्रयत्न करूनहि मराठींत माझी प्रगति होऊं शकली नाहीं. मास्तरीण बिचारी वर्ष दोन वर्षे येत राहिली, पण जास्त वेळ गप्पागोष्टींतच जात असे.

ह्यानंतर एक पारशी बाई मला शिकवण्यासाठीं ठेवण्यांत आली. माझें सर्वसामान्य ज्ञान वाढविण्याचें काम तिच्यावर सोंपविण्यांत आलें. ती मला वर्तमानपत्र वाचून दाखवी. त्यांतून मला नवनवे शब्द ऐकायला मिळूं लागले, माझी गोडी वाढूं लागली. यांत आणखी एक गोष्ट होती ती ही कीं मला केवळ ऐकावें लागत असे, लिहिण्या वाचण्याची मेहनत करावी लागत नसे. आम्ही जेथें राहात होतों तेथें आंगणांत रोज व्याख्यानें होत असत; त्यालाच आतां गांधीचौक म्हणतात. अशा प्रकारें माझें सामान्यज्ञान हळू हळू वाढत गेलें.

त्या दिवसांत मी पडद्यांत राहात असें. माझा स्वभावहि लाजाळू होता. अर्थातच सामाजिक आणि राजकीय गोष्टी मला कशा कळाव्या ? पण वर्तमान-पत्रांचें वाचन आणि सभा यांच्यामुळें माझें ज्ञान वाढत गेलें. घरांत जसजशी थोरामोठ्यांची ये-जा वाढली आणि मी बाहेर जाऊं लागल्यें तसतशा पुष्कळशा गोष्टी मला समजूं लागल्या. चर्चा आणि सभा यांच्यामुळें बऱ्याच गोष्टी शिकायला मला मिळत. धार्मिक पठणपाठण तर नेहमीं होतच राही. पण वाचन फारसें

होऊं शकलें नाहीं. त्यामुळें पुस्तकी ज्ञानाऐवजीं सभा-चर्चानींच माझें ज्ञान वाढलें. हे मला आपलें टपालहि वाचायला सांगत. पण एकाद्या पत्राहून अधिक वाचण्यांत माझें मन लागत नसे. मुलें झाल्यावर तर शिकण्याचा क्रम कांहीं काळ सुटल्यासारखाच झाला.

जेव्हां आम्ही साबरमतीला राहायला गेलों तेव्हां तेथें दुसऱ्यांना शिकतांना पाहून आणि आश्रमाचें वातावरण पाहून शिकण्याची इच्छा होऊं लागली. जेथें गीतेचा वर्ग चाले तेथें मी गीता घेऊन जात असें. सतारीच्या वर्गात मी सतार घेऊन जाई. बापूजी स्त्रियांचा वर्ग घेत तेव्हां मी तेथेंहि असायचीं. बापूजी रामायण वगैरे धर्मग्रंथांतून शुद्धलेखन घ्यायला सांगत. मी अत्यंत आवडीनें शुद्ध आणि सुंदर लिहून दाखविण्याचा प्रयत्न करीत असें. नकला पाहून गांधीजी मार्क देत. त्या नकला अजूनहि माझ्याजवळ आहेत. मुलींच्याबरोबर साबरमती नदींत पोहोण्याचाहि मी प्रयत्न करीत असें. शिकण्याच्या प्रत्येक ठिकाणीं मी पोंहोंचल्यें, पण कोणत्याच विषयाचें पुरें ज्ञान मी मिळवूं शकल्यें नाहीं. आश्रमांतल्या स्त्रिया नेहमीं माझी चेष्टा करीत आणि म्हणत कीं जानकीबहन पाहावें त्या वर्गात हजर ! पण त्या बिचाऱ्यांना मी जिथल्या तिथेंच असल्यें हें काय माहीत ! कृष्णदास गांधींनीं सतारीच्या साठ गती शिकविल्या, हार्मोनियम शिकविण्याचाहि प्रयत्न केला; गाणें शिकविण्याचीहि खटपट केली. पण माझी आपली स्थिति "पुढचें पाठ मागचें सपाट !" नवा घडा शिकायला चुकत नव्हत्यें आणि मागल्याची आठवण राहात नव्हती. गीतेच्या शिक्षणाचीहि तीच गत झाली. बऱ्याच वर्षांनंतर जेव्हां विनोबाजींची सुबोध गीताई मिळाली तेव्हां काय तो गीतेचा थोडा थोडा अर्थ माझ्या लक्षांत येऊं लागला.

ती शिकण्याची तेव्हांची इच्छा आजहि जशीच्या तशी कायम आहे. पण शिक्षणांत एकाग्रतेचा अभाव माझ्यांत लहानपणापासूनच राहिला. एकाग्रता ही एक तपस्या आहे. ती मला साधली नाहीं. त्यामुळेंच त्यांनीं आणि मी पुष्कळसा प्रयत्न केल्यानंतरहि मी पुढें जाऊं शकल्यें नाहीं. तथापि ज्या वातावरणांत मी राहिल्यें त्यापासून मला बरेंच ज्ञान लाभलें आनि तेवढ्यावर मी माझें काम भागवीतहि असल्यें.

## १८. श्रीलक्ष्मीनारायणमंदिर

ह्यांच्या आजी सदीबाई धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनीं आपल्या आयुष्यांत धर्मकार्यांत मनसोक्त पैसा वेंचला आणि शेवटच्या क्षणीं देखील आपल्या रकमेंतून लक्ष्मीनारायणाचें मंदिर बांधावें असें सांगून त्या परलोकवासी झाल्या. त्यांचे एक लाख रुपये दुकानांत जमा होते. त्यांतली बरीचशी रक्कम तुपाची होती. त्यांच्या पांचशें गाई-म्हशी होत्या. त्यांचें रोज एक पिप तूप तयार होत होतें. हें तूप मुंबईला पाठविलें जात असे आणि त्याची रक्कम दादीजींच्या नांवें जमा होत असे.

बच्छराजजी एक तर म्हातारे झाले होते व दुसरें त्यांचें सारें लक्ष व्यापारा-वरच होतें. त्यामुळें मंदिराचें काम सुरू करण्याकडे त्यांचें लक्ष जाणें कठीणच होतें. पण ही गोष्ट जमनालालजी विसरले नव्हते. एक म्हणजे दादीजींचा त्यांच्या-वर अत्यंत जीव होता. शिवाय ते स्वत: धर्मभाव राखणारे होते, आणि घेतलेली जबाबदारी पुरी करण्याची तत्परता त्यांच्यांत होती. अर्थात् त्यांनीं मंदिराचें काम सुरू करण्याविषयीं दादीजींकडे प्रश्न काढला. त्यांची मान्यता मिळाली आणि काम सुरू झालें.

मंदिराचें काम हिरालालजी फतेहपुरिया यांच्या सल्ल्यानें होऊं लागलें. हिरालालजीचें बच्छराजजींकडे नेहमीं येणें जाणें असे. आपल्या देखरेखेखालीं त्यांनीं एक जैन-मंदिर बांधून घेतलें होतें. अर्थात् मंदिराच्या कामाचा त्यांना अनुभव होता. कामाच्या देखरेखींत त्यांची मदत व्हावी म्हणून मंदिराजवळच्या या घरांतच आम्हीं राहूं लागलों. जसजसें मंदिराचें काम वाढूं लागलें तसतशी बच्छराजजींनाहि यांत गोडी वाटूं लागली.

मूर्तीसाठीं मुंबईच्या माधवबाग मंदिरांतील नमुना देण्यांत आला. पण मूर्ती आल्या त्या त्यापेक्षां मोठ्या. मूर्तींचे जरीचे पोपाख तयार करण्यासाठीं मुंबईहून कारागीर आणले. दागिने घडविण्याच्या वेळीं बच्छराजजी म्हणाले, "देवासाठीं घरचे दागिने द्यायचे कीं नवे बनवायचे हें मुलीला विचारा." बच्छराजजी मला 'मुली' अशीच हांक मारीत. त्या दिवसांत माझ्यावर भक्तीचा कैफ चढला होता. मी सांगून पाठविलें कीं मूर्तींना वापरतां येतील ते दागिने घरचेच द्यावेत आणि हातांतील दागिने मूर्तींच्या हाताचें माप घेऊन

घडवून घ्यावेत. अजमासें वीस हजारांचे दागिने घरून दिले गेले आणि बाकीचे नवे घडविण्यांत आले. प्राणप्रतिष्ठेच्या दहा महिने आधींपासूनच कारागीर बसविण्यांत आले. प्रतिष्ठेपर्यंत काम चालतच राहिलें. मी देखील रात्रौं दहा दहा वाजेपर्यंत मूर्तीचे कपडे शिवत बसत असें.

आम्हां तिघांनाहि एकच ध्यास लागून राहिला कीं मंदिर भव्य व्हावें, दागिने आणि पोषाख सुंदर व्हावेत व प्राणप्रतिष्ठाहि थाटानें व्हावी.

सदीबाई निवर्तल्यामुळें बच्छराजजींची प्रकृति ढांसळत चालली. ते पलंगावर पडूनच असत आणि तेथूनच कामधंद्याच्या गोष्टी करीत. मूर्ती त्यांच्या पलंगाशेजारींच ठेवण्यांत आल्या होत्या. आतां ते म्हणूं लागले कीं मरण्यापूर्वी मला प्रतिष्ठेचा सोहळा पाहतां आला तर बरें होईल. त्यांच्यावर भक्तीचा अंमल चढूं लागला होता. त्यांच्या जीवनांतील ही एक मोठी क्रांतीच होती. कारण त्यांचें सारें आयुष्य व्यापारांत गेलें होतें. सदीबाई जिवंत असेपर्यंत ज्याचें लक्ष कधीं चुकूनहि धर्माकडे गेलें नाहीं ते आतां धर्मात रंगून गेले. हा सदीबाईचा पुण्यप्रभावच समजला पाहिजे.

प्रतिष्ठेनंतर पांचच महिन्यांनीं त्यांना देवाज्ञा झाली. प्रतिष्ठा मोठी थाटामाटांत झाली. बनारसहून पंडित शिवकुमारजी कित्येक पंडितांना घेऊन आले होते.

सदीबाईनीं मंदिरासाठीं एक लाख रुपये ठेवले होते, पण काम सुरू झाल्यावर आम्ही सर्व त्यांत इतकी दंग झालों कीं खर्चाचें आम्हांला भानच राहिलें नाहीं. सुमारें पावणे दोन लाख रुपये खर्च झाला. पुढच्या काळांत मंदिराचा खर्च नीट चालत राहावा म्हणून मंदिरासाठीं ट्रस्ट बनविण्यांत आला आणि मंदिराच्या नांवावर बरीच स्थावर जंगम संपत्ति ठेवण्यांत आली. त्यांतूनच अजनहि हा खर्च चालतो.

●

## १९. बच्छराजजींचा स्वर्गवास

बच्छराजजींना दम्याचा विकार होता. त्यामुळें त्यांची प्रकृति खंगत तर चाललीच होती ; पण दादीजींच्या मृत्यूनंतर त्यांची कंबरच खचल्यासारखी झाली. आतां ते अंथरुणावरच पडून राहूं लागले. मध्यंतरीं मंदिराच्या कामांत त्यांचें चित्त थोडेंबहुत लागलेलें असेल पण प्रतिष्ठेनंतर तेंहि काम संपलें.

प्रतिष्ठेच्या पांचच महिन्यांतनंतर त्यांना एके दिवशीं अचानक उचकी आली. माधवजी धांवत बालूरामजी चुडीवाला यांच्याकडे गेले आणि म्हणाले, "भाया, दादाजींना उचकी आली ; चला !" बालूजी सारें उमजले. त्यांनीं दानधर्म करण्यासाठीं धान्य, तूप, साखर वगैरे सामान मागविलें. पण बालूजी दादाजींच्याजवळ पोंहोंचायच्या पूर्वींच त्यांनीं देह ठेविला होता.

मंदिरांतल्या संध्याकाळच्या आरतीच्या वेळींच दादाजींचें प्राणोत्क्रमण झालें. मारवाडी समाजांत सूर्यास्तानंतर दहन करण्याचा रिवाज नसल्यामुळें सारी रात्र आम्ही त्यांच्या शवाशेजारीं बसून राहिलों. सकाळीं थाटामाटानें त्यांची स्मशानयात्रा निघाली. रस्ता झाडण्यांत आला आणि त्यावर पाण्याचा सडा घालण्यांत आला. तिरडीवर पैसे उधळले गेले. दिवस उन्हाळ्याचे होते. पण तिरडी उचलण्याचे वेळीं पाऊस पडला. वातावरणांत गारवा आला. बगीच्यांत जेथें आधीं सदीबाईंचा दहनसंस्कार झाला होता तेथेंच ह्यांचाहि झाला. उभयतांचें स्मारक म्हणून तेथें छत्री बांधण्यांत आली असून तेथें साधु-संन्यासी ध्यानधारणाही करीत असत, त्यांच्यासाठीं दूध, जेवण वगैरे घरून पाठविलें जात असे. याला आज 'सदीबाईचा बगीचा' असें म्हणतात.

बच्छराजजींच्या मरणानंतर गोरगरिबांना जेवणावळी सुरू झाल्या. त्या बाराव्या दिवसापर्यंत चालल्या. बाराव्याला ब्राह्मणांना आणि ज्ञातिबांधवांना जेवण देण्यांत आलें. त्या दिवशीं जेवणारे पुष्कळच होते. ब्राह्मण आणि ज्ञातिबांधव यांचेसाठीं तरटें बांधून सांवली करण्यांत आली होती. पण गरिबांसाठीं असें करणें अशक्य होतें. ज्येष्ठांतल्या उकाड्यांत ते होरपळून निघतील आणि हरिद्वारला अस्थि नेण्यासाठीं स्टेशनपर्यंत जाणाऱ्यांना उन्हांतून अनवाणी जावें लागेल असें वाटूं लागलें होतें. तोंच ढगांनीं आकाश भरून आलें. स्त्री-पुरुष भजनें गात स्टेशनवर पोंहोंचले. आलेल्या मंडळीनेंहि ढगांच्या सांवलींत सुखानें

भोजन केलें. जी मंडळी अस्थि घेऊन गेली होती ती गंगाजलाचे आठ घडे भरून घेऊन आली. त्यांचा वापर होतां होतां शेवटीं शेठजी वारले तेव्हां एक घडा उरला होता. आश्चर्याची गोष्ट अशी कीं चाळीस वर्षांनंतर देखील या पाण्यांत कोणत्याच प्रकारची विकृति उत्पन्न झाली नाहीं कीं जीवजंतू उत्पन्न झाले नाहींत !

वर्ध्याप्रमाणेंच मारवाडांतहि बारावा व्हायला पाहिजे म्हणून येथून बालूरामजी यांना पाठविण्यांत आलें. तिकडे कनीरामजी आणि बालूरामजी यांनीं ब्राह्मणांना आणि ज्ञातिबांधवांना थाटाचें जेवण दिलें. ब्राह्मणांना एक एक रुपया दक्षिणा दिली. दहा दहा कोसांवरून पुष्कळ ब्राह्मण मुलांबाळांसह आले होते. त्याकाळीं देशांत एक रुपया दक्षिणा ही फार मोठी गोष्ट समजली जात असे. त्या काळच्या कलदार रुपयाला चेराशाही म्हणत. इंग्रजी राज्यांत मुखवटचाचा रुपया निघाला होता तो संस्थानिकांच्या चलनापेक्षां मूल्यवान होता. दक्षिणा शिरगणतीप्रमाणें दिली जाई; म्हणून बरोबर जनावरेंहि आणलीं जात असत.

त्या जमान्यांत अशा तऱ्हेच्या जेवणावळी सर्वत्रच होत असत. त्यासाठीं तयारीहि पुष्कळ करावी लागे. पुष्कळशी मंडळी तांब्यांतून मिठाई लपवून नेत असत. स्त्रिया घागऱ्यांतून नेत. एका बाईच्या घागऱ्याचा बंद तर लाडवाच्या वजनानेंच तुटला ! त्यांतून चाळीस लाडू खालीं पडले ! ही गोष्ट शेठजींना कळली तेव्हां त्यांच्या मनावर फारच परिणाम झाला आणि त्यांना वाटलें कीं ही प्रथा बंद झाली पाहिजे. कारण यामुळें दक्षिणा घेणाऱ्यांमध्यें लाचारी येते आणि देणाऱ्यांत अहंकार. खर्च करणारा लाखों रुपये खर्च करूं शकेल पण हे बिचारे लोभामुळें पतित होतात. म्हणून शेठजींचे जन्मदाते (जनक वडील) कनीरामजी जेव्हां मरण पावले तेव्हां त्यांनीं जेवणावळ वगैरेचा कार्यक्रम बंद ठेवला. त्यामुळें त्यांच्या मातोश्री बिरदीबाई यांना दुःख झालें. त्यांनीं आपल्या मातोश्रींना विचारलें– "आई, तूं दुःखी कां होतेस ?"

माताजी म्हणाल्या– "तुझे वडील घरचे पैसे खर्चून लोकांचीं कार्यें निभावून नेत. आज त्यांचेंच मृत्युभोजन होत नाहीं तेव्हां दुःख तर होणारच !"

यावर त्यांनीं उत्तर दिलें, "आई, मी काकाजींच्या नांवानें असें कांहीं काम करीन की तेणेंकरून त्यांची कीर्ति याहूनहि जास्त वाढेल आणि त्यांच्या आत्म्याला संतोष होईल."

जमनालालजींनीं कनीरामजींच्या नांवें हरिजनांसाठीं एक शाळा उघडली. ही 'कनीराम हरिजन-शाळा' सीकरमध्यें आजहि आपलें कार्य करीत आहे.

## २०. दागिना सुटला

मी त्यावेळीं तेरा चौदा वर्षांची असेन. एके दिवशीं आमच्याकडे पाहुणे आले. त्यांच्या कमरेला सोन्याचा करगोटा होता. तो पाहिल्यावर माझ्या मनांत आलें कीं आपल्याकडे इतके करगोटे पडले आहेत, तर त्यांतला एकादा शेठजींनीं वापरावा. मी त्यांना म्हटलें, "आपणहि सोन्याचा करगोटा वापरा ना!" त्यांनीं उत्तर दिलें– "सुवर्ण तर ईश्वरस्वरूप आहे. तें कमरेखालीं वापरतां कामा नये." आतां मी काय उत्तर देणार ? माझ्यापुढेंहि प्रश्न पडला कीं आपण आतां काय करावें ? वादविवाद करण्याइतका माझा वकूब नव्हता. मला जें कांहीं सांगितलें जाई तें मी मुकाटयानें श्रद्धापूर्वक ऐकत असें आणि मानून घेत असें. जेव्हां त्यांनीं सोन्यांत ईश्वराचें स्वरूप दाखवून दिलें तेव्हां मी तरी कमरेखालीं सोनें कसें वापरावें ? पण कमरबंदाचा मोह सोडणें सोपें तरी कुठें होतें ? लग्न ठरल्यापासून मी कमरबंद वापरीत आल्यें होत्यें. आणि स्त्रियांच्या शृंगारांत कमरबंदाला विशेष स्थान आहे असें मानीत. घागरा-ओढणीच्या पोशाखांत कमरबंद वापरणें साजाला उठाव येण्यासाठीं आवश्यक होतें. वेशभूषेच्या बाबतींत मी त्या दिवसांत विशेष चोखंदळ होत्यें. मोठ्या घरांत जेथें सोन्याचे कमरबंद आहेत तेथें चांदीचे कसे वापरायचे ? शेवटीं मी मनाशीं निर्णय घेतला कीं कमरबंद घालण्याचें सोडून देणें चांगलें. आणि त्याप्रमाणें मीं तो काढून टाकला. पुढें अग्रवाल महासभेंत जमनालालजींनीं कमरबंदाच्या बाबतींत एक भाषण दिलें. तेव्हांपासून बजाज कुटुंबांत कमरबंद घडवायला लावण्याचें धैर्य कुणालाच झालें नाहीं.

कमरबंदच काय, एक दिवस तर असा आला कीं साऱ्याच दागिन्यांचा त्याग करावा लागला. जेव्हां बापूंनीं भगिनी-वर्गाला सांगितलें कीं दागिने वापरूं नका, तेव्हां जमनलालजींनीं मला पण लिहिलें कीं दागिने सोडून दे; असा

बापूंचा आदेश आहे. हीच गोष्ट जर ते समोरासमोर म्हणाले असते तर कदाचित् मी ह्यांच्याशीं हुज्जत घालीत बसल्यें असत्यें. पण त्यांचें पत्र मला वेदवाक्या-सारखेंच होतें. पत्रांतला प्रत्येक शब्द मला भक्तीनें भारावलेला वाटे. पत्र माझ्यासमोर होतें आणि मी एक एक दागिना उतरून खालीं जमिनीवर ठेवीत होत्यें.

या खेपेला मला सांगण्यांत आलें–"सोनें कलीचें स्वरूप आहे. तें दुसऱ्याच्या मनांत ईर्षा उत्पन्न करतें. तें हरवलें जाण्याची आणि चोरलें जाण्याची भीति असते. अंगावर मळ सांचतो. नाका-कानांतून घाण येते. त्याच्यामुळें व्याजहि बुडतें." या सर्व गोष्टींचा माझ्यावर फार परिणाम झाला.

मारवाडी समाजांत स्त्रियांमध्यें पायांतल्या चांदीच्या तोरड्या पाया-वेगळ्या केल्या जात नव्हत्या. गरिबांतल्या गरिबाच्या पायांत देखील तोरड्या असतातच. पण जेव्हां कोणताच दागिना वापरायचा नाहीं असें एकदां ठरलें तेव्हां मी खोट्या मोहाचाहि त्याग केला. तोरड्या काढल्यावर लोकांना आश्चर्य वाटलें. आणि कित्येक स्त्रिया तर माझे तोरड्यावेगळे पाय बघायला मुद्दाम आल्या !

## २१. घुंगट फिटला

१९१७ ची गोष्ट. वर्ध्याला अग्रवाल महासभेचें अधिवेशन व्हायचें होतें. अधिवेशनाची सारी तयारी होऊन चुकली होती. मंडप घातला गेला होता. आमंत्रणें पाठवलीं गेलीं होतीं. पण याच वेळीं देशभर इन्फ्ल्युएन्झाची सांथ फैलावली. लोक पटापट मरूं लागले. त्यामुळें अधिवेशन स्थगित करावें लागलें. पण ज्यांना आमंत्रणें गेलीं होतीं ते येऊन ठेपलेच.

जमनालालजींनीं आपलें भाषण तयार केलें होतें त्यांत पडद्याच्या प्रथे-विरुद्ध थोडें लिहिलें होतें. त्यांना माहीत होतें कीं मी आणि माझ्या जाऊबाईनीं वगैरे पडदा काढला आहे. ते जें कांहीं सांगत त्याची सुरुवात घरापासून करीत. अर्थात् त्यांची नजर आमच्यावर जाणें स्वाभाविक होतें.

आमची स्थिति मोठी विचित्र होती. पड्याचा संस्कार एक दोन दिवसांचा किंवा एकदोन पिढ्यांचा थोडाच होता ! तो एकाएकीं सुटावा कसा ? त्या काळीं राजस्थानी समाजांत पडदा हा प्रतिष्ठा, सभ्यता आणि कुलीनता यांचें चिन्ह समजला जात असे.

श्रीकृष्णदासजी जाजूंना जमनालालजी आपले थोरले बंधू मानीत. जमनालालजींनीं जाजूजींना म्हटलें कीं आपण घरच्या स्त्रियांशीं बोललें पाहिजे आणि त्यांच्यावर सुसंस्कार केले पाहिजेत. त्यांचें बोलणें चालणें होतें तें खालच्या दर्जाच्या लोकांत किंवा नोकरां-चाकरांत. अशानें उच्च विचार त्यांच्यांत कसे येतील ? आपल्यासारख्या लोकांनीं संकोच सोडून त्यांचा संकोच दूर केला पाहिजे. पण जाजूजी जाजूजीच राहिले. त्यांच्यांशीं कुणीं बोललें तरच बोलायचे. एरवीं चूप.

अखेर एके दिवशीं जमनालालजींनीं आपले वडील कनीरामजी यांना तयार केलें. आम्हांला म्हटलें– " आपल्या घरांत घुंगट सोडला जायचा आहे. तेव्हां काकाजींपासूनच सुरुवात करूं. चला खालीं. काकाजींना मी तयार करून आलों आहे. " मीं माझ्या जाऊबाईंना म्हटलें कीं, " जाऊबाई, मामंजी-कडे चलायचें आहे. " तिनें म्हटलें, " थोरली पुढें असली कीं धाकटीला मागून जावें लागणारच. " मोठें संकट होतें. आम्ही कसचे जातों त्यांच्याजवळ ! आम्ही तर ही गोष्ट ऐकूनच घामाघूम झालों ! हरी जाणे आम्ही दोघी जणी खालीं त्यांच्याजवळ कशा गेलों तें ! नमस्कार केला न केला तोंच निसटलों. हेहि घामानें डबडबून गेले होते. प्राचीनतेचा अंत आणि नवीनतेचा उदय यांचा आमच्या घरांतला तो संधिकाल होता. एक वेळ पर्वताच्या शिखरावर पोहोंचणें सोपें होतें, समुद्र ओलांडणें सोपें होतें, पण त्या काळीं आमच्या घरांत पड्याशिवाय मामंजींच्याजवळ बोलण्यासाठीं जाणें केवढी अवघड गोष्ट होती !

त्यानंतर कपाळावरचा बोर सुटला. घुंगट तर सुटलाच होता. आतां घागऱ्या-ऐवजीं लेहंगे आले. त्या काळीं घागरे चाळीसपासून पन्नास वारांपर्यंत लांबीचे असत ! आणि त्यांवर तीनशेंपासून चारशेंपर्यंत चुण्या असत. चारशें चुण्यांचा घागरा तर मींहि वापरलेला आहे. असले मोठाले घागरे वर्षानुवर्षे धुतलेहि

जात नसत. प्रारंभीं पडदा हा मला लज्जावतीचें लक्षण वाटे, समाजांत त्याची प्रतिष्ठाहि होती. मी सुंदर नसल्यामुळें मला वाटे कीं चेहरा झांकला गेला तर उत्तमच. पण पडदा टाकून देण्यांतहि प्रतिष्ठा आहे हें जेव्हां मला समजलें तेव्हां मी धाडस केलें. पण हें धाडस यायला बराच त्रास पडला. अहमदाबाद काँग्रेसमध्येंहि थोडाबहुत पडदा होता. पण मी साबरमती आश्रमांत राहायला गेल्यें तेव्हां तो पुरता सुटला.

जेव्हां माझा पडदा सुटला तेव्हां मला दुसऱ्यांना पडदा सोडायला लावण्याचा ध्यासच लागला. अनेक भगिनींना पडदा सोडायला लावून मी सभेंत व्यासपीठावर आणीत असें. मी जेथें जेथें जाईं तेथें तेथें माझें हें कामच होऊन बसलें. ज्या भगिनी साहस करून व्यासपीठावर पडदा सोडून देत त्यांपैकीं कांहींनीं हें व्रत पुढें चालवलें. पण कांहीं जणींना समाजाच्या आणि कुटुंबांच्या भीतीनें पुन्हां पडद्यांत राहावें लागलें. तीनचार वर्षांमागें जेव्हां मी विनोबाजींच्या बरोबर राजस्थानच्या दौऱ्यावर गेल्यें तेव्हांहि बिकानेर-सारख्या राजस्थानी लोकांच्या माहेरघरांत कांहीं स्त्रियांचा पडदा मी त्यांना व्यासपीठावर काढायला लावला !

माझा असा समज आहे कीं, पडदा सोडून देणें हें एक साहस आहे. आणि त्यामुळें मन व बुद्धि मोकळीं होतात. कार्य करण्याचें साहस वाढतें. पण पडदा सोडण्यांतला हेतु स्वच्छंदता किंवा उच्छृंखलता असेल तर त्याला चांगलें कसें म्हणतां येईल ? पूर्वीच्या स्त्रियांत जो लाजाळूपणा वडील जनांविषयींचा आदर आणि मर्यादशीलता होती ती स्वीकारण्यासारखी गोष्ट आहे असें मला वाटतें. सुधारणेनें आम्ही उन्नत झालों तरच तिची सार्थकता. मला जर कुणीं विचारलें तर मी असेंच म्हणेन कीं प्रत्येक घरांत मुलगी आणि सून यांना सारखें लेखण्यांत आलें पाहिजे. मुलगी जितकी मोकळी असते आणि असावी असें आपण समजतों तितक्याच मोकळेपणानें सुनेलाहि राहतां आलें पाहिजे. बावीस वर्षांमागें कलकत्त्याला मारवाडी महिलासम्मेलन झालें होतें. तिकडच्या लोकांनीं मला संमेलनाची अध्यक्ष निवडलें. त्या प्रसंगीं बापूजींनीं पडद्याच्या बाबतींत स्त्रियांना फार सुंदर संदेश दिला होता—

वर्धा, २५।१०।३३

प्रिय भगिनी,

आपण स्त्रियांना पडदा सोडायला लावण्यासाठीं कलकत्त्याला निघालां आहांत म्हणून धन्यवाद. पडदा सौभाग्यचिन्ह थोडेंच आहे! मला त्यांत पापाचा वास येतो. पडदा कुणाआड? काय पुरुषमात्र विषयासक्त असतात! पड्याशिवाय काय स्त्री आपलें पावित्र्य सांभाळू शकत नाहीं? पवित्रता मानसिक वस्तु आहे. सर्व पुरुषांत ती स्वाभाविक झाली पाहिजे.

जर या बुद्धिप्रधान युगांत स्त्रीला धर्म पाळायचा असेल तर तिला दरिद्रनारायणाची सेवा करावी लागेल, शिक्षण घ्यावें लागेल. दरिद्र-नारायणाची सेवा करण्याचा अर्थ आहे खादीप्रसार, सूत काढणें इत्यादि. हरिजनसेवेचा अर्थ आहे अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढणें. हीं ईश्वराचीं दोन मोठीं कार्यें आहेत. आणि विद्या मिळवण्याचें काम पडदा पाळून कधीं चालूं शकणार नाहीं.

पडदा पाळून काय सीता रामचंद्राबरोबर रानावनांत हिंडली असेल? सीतेपेक्षां पवित्रतर स्त्री काय कधीं जगांत झाली आहे? भगिनींना सांगा, पडदा टाकून द्या. धर्म पाळा.

आपला

मोहनदास गांधी

## २२. चरख्याचा ध्यास

आम्ही उभयतां मुंबईला श्रीशांतिकुमारजी नरोत्तम मुरारजी यांच्याकडे गेलों होतों. ही गोष्ट १९२० मधली असेल. दरवाजांत विचित्र टोपी घातलेला एक माणूस मीं पाहिला. ही कागदाची होडी डोक्यावर चढवून हा माणूस असा कां उभा आहे याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. ती पांढरी टोपी कागदाच्या होडीसारखीच वाटत होती. पण विचारण्याची अक्कल होतीच कोणाला! पुढें हळूहळू कळून आलें कीं गांधी टोपी म्हणतात ती हीच!

बापूंचें पहिलें दर्शन इथेंच झालें. ते सूत कातीत होते. मी त्यांना विचारलें, "सूत कांतणें चांगलें का ?" त्यांनी म्हटलें, "सूत कांतणें फारच चांगलें." या गोष्टीचा माझ्या मनावर परिणाम झाला. वर्ध्याला आल्यावर सासूबाईंना मीं म्हटलें कीं मला सूत कातणें शिकवा. गांधीजींचें सांगणें आहे. त्यांनीं दोनतीन दिवसांत शिकून घ्यायला सांगितलें. मीं एक चरखा मागवला. त्याला सात रुपये पडले होते. सात दिवसांत मी सूत कातायला शिकल्यें.

मी सूत काढायला तर शिकल्यें पण मनांत येऊं लागलें कीं दुसऱ्यांनाहि शिकवीन. हळूहळू घरांत साठ चरखे गोळा केले आणि कताईचा वर्ग सुरू केला. वर्गात स्त्रिया, मुली, विद्यार्थी– सर्वच येत. वेळेला तर कसलाच पायबंद नव्हता. जेव्हां म्हणून जो कोणी येईल तेव्हां त्याला सारें काम सोडून मी शिकवायला बसत असें. उत्साहाला सीमा नव्हती. पण व्यवस्थेच्या बाबतींत मी नेहमीं ढिलीच राहिल्यें. आणि याच कारणामुळें मी कुणाचा वेळ बांधून घेऊं शकल्यें नाहीं, कीं चरखा किंवा अन्य सामान नीट ठेवलें जावें असें सांगूं शकल्यें नाहीं. कुणी पेळू चरख्याला लोंबतो आहे अशा स्थितींतच सोडून जाई ; कुणाचा कचरा तिथेंच पडलेला असायचा, कुणाची दोरी तुटे तर कुणाचें त्राक वांकडें झालेलें असे. या साऱ्या कामांत मी इतकी गर्क असें कीं दुसरें कसलेंच काम मला सुचत नसे. जेवणालाहि आठ नऊ वाजत. जेवतांनाहि कुणी आलें तर ताट टाकून मी धांवत जायचीं !

पहिल्या पहिल्यानें त्राकांवर लपेटलेलें सूत तसेंच काढून बापूंच्याकडे पाठवीत असें. तें पाहून त्यांनीं लिहिलें की सूत आटीवर आवळून त्यांच्या गुंड्या केल्या पाहिजेत. तेव्हां मी तसें करूं लागल्यें.

पेळू देऊनहि मी सूत कातायला लावीत असें. सुतापासून कपडा विणला जातो हें मला माहीत नव्हतें. त्यामुळें सुताचे ढिगारे झाले. कांहीं सूत कामठीला विणण्यासाठीं पाठविलें पण उरलेलें सूत तसेंच पडून राहिलें. हें सूत गाड्यावर घालून विनोबाजींकडे पाठविण्यांत आलें. त्या सुताचा किती कपडा झाला किंवा त्याचें काय झालें हें कधीं मी विचारलें नाहीं.

सूत तुटतहि होतें पुष्कळ. तें मी जमा करीत असें. त्यानें लोड-तक्क्ये भरून घेतले. कताईचें काम मी घरींच चालवीत असें, असें नाहीं तर चरख्याचा जास्तीत जास्त प्रचार व्हावा म्हणून दुसऱ्यांच्याकडे जाऊन चरखे नीट करूनहि देत असें. कारण या गोष्टींनीं आतां माझ्या मनांत घर केलें होतें. लोकहि चरखा,

तकली शिकून घेण्यांत उत्साह दाखवील. पण खादीचें शास्त्र न बनल्यामुळें नीट सूत काढून कपडा विणण्यांत अडचणीहि होत्या. त्यामुळें सूत कातूनहि खादी न मिळाल्यामुळें आवड वाढली नाहीं. हळूहळू लोकांचा उत्साहहि क्षीण होत चालला. जे ज्ञानपूर्वक कातू लागले होते ते अडचणीतूनहि वाट काढीत सुताचा उपयोग करूं लागले. ते आपल्या सुताची खादी विणून घेत आणि त्यांचें कातणें चालू राही. पण ज्यांनीं चळवळीच्या उत्साहांत कातणें सुरूं केलें ते लोक हळूहळू कमी होऊं लागले. ज्यांनीं कातणें कायम ठेवलें होतें ते आजहि कातीतच आहेत. आणि आजहि जेव्हां कोणी मला कातणें शिकण्याला किंवा चरखा नीट करून द्यायला सांगतो तेव्हां माझा उत्साह द्विगुणित होतो.

कताईचें काम सावकाशीनें चालण्यांत पेळूंची अडचण देखील कारण झाली आहे. चांगल्या स्वच्छ पेळूंशिवाय चांगलें सूतहि निघत नाहीं. तें वारंवार तुटत राहतें. अशानें कातणारा कंटाळून जातो याची मला जाणीव झाली. जेव्हां-पासून बजाजवाडीच्या शेतीकडे मी लक्ष देऊं लागल्यें तेव्हांपासून मी हीहि गोष्ट लक्षांत ठेवूं लागल्यें कीं पेळूंसाठीं चांगल्या जातीची कपाशी लावली जावी. कपाशीची वेंचणी स्वत: मी, मुलें आणि नोकर करीत असूं. अजूनहि करत्यें. अशा प्रकारच्या वेंचणींत पुष्कळच वेळ मोडतो. कपाशी वेंचल्यानंतर मी हातानें त्यांतला कापूस काढत्यें आणि पेळू बनवत्यें. या पेळूंपासून मी स्वत: सूत कातत्यें, घरच्या मंडळींना देत्यें आणि नेमानें कातणाऱ्यांसहि देत्यें.

माझी इच्छा एवढीच असते कीं एवढ्या मेहनतीनें तयार केलेल्या कापसाचा चांगला उपयोग व्हावा. त्यामुळें गेलीं दोन तीन वर्षें कापूस माझ्याजवळ पडूनच आहे. माझ्या दिरानें कित्येकदां मला म्हटलें कीं कापूस घरीं कां ठेवतां ? कार-खान्यांत पाठवून द्या. इकडे उंदीर वगैरे खातात, नासाडी करतात. पण मी कांहीं तिकडे पाठविला नाहीं. एकाद्या संस्थेला देणें मला योग्य वाटतें. या वर्षीं मी आपला तीन वर्षांचा कापूस गोपुरीवाल्यांना देऊन टाकला.

या वर्षी मी पंचवीस शेर पेळू तयार केले होते. कापूस वेचण्यांत आणि पेळू बनविण्यांत माझे चार पांच महिने खर्ची पडले. त्या दृष्टीनें हे पेळू फार महाग पडले असें दिसलें, पण आम्ही सर्व माणसें हें काम फुरसतीच्या वेळीं करतों. त्यामुळें वेळेचा उपयोगहि होतो आणि स्वत: आपल्या हातानें केल्यामुळें कामांत गोडीहि येते. मला तर असल्या कामांत प्रार्थनेपेक्षांहि अधिक आनंद होतो.

गांधीजींच्या एका शब्दानें जो ध्यास लागला होता तो आजतागायत चालू आहे.

●

## २३. खादीचा प्रवेश

नागपूर काँग्रेसपर्यंत आमच्याकडे ' हे ' तर स्वदेशी कपडाच वापरीत असत. पण मला कोणताहि कपडा चाले. नागपूर काँग्रेसच्या वेळीं जेव्हां गांधीजी वर्ध्याला आले तेव्हां मीं जाडच्या साडच्या मागवल्या. जाडी साडी नेसूनच मी काँग्रेसला गेल्यें. माझा आपला समज असा कीं जाडच्या कपड्यालाच खादी म्हणतात. पण जेव्हां महादेवभाईनीं सांगितलें कीं हें तर गिरणीचें कापड, खादी नव्हे ! तेव्हां कुठें माझ्या लक्षांत आलें कीं खादी आणि गिरणीचा कपडा यांत फरक आहे !

काँग्रेसहून परतल्यावर मी एका इसमाकडून थोडें सूत नागपूरजवळच्या कामठी गांवीं पाठविलें; आणि खादी विणून मागविली. कामठीहून खादीचें जें ठाण विणून आलें त्याचा पन्हा लहान होता आणि कापड पण जाड होतें. तरी तें पाहून मला जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें कठीण आहे. खादी तर आली पण पन्हा लहान. तेव्हां वापरायची कशी ? अर्थात् मधोमध जोडून घेतली आणि हळदींत रंगवून काढून मी ती वापरूं लागल्यें.

खादीची ही एक एवढीच साडी होती. रात्रीं जुनी साडी नेसून झोंपीं जात असें आणि सकाळीं आंघोळ करून ही साडी नेसत असें. तीन तीन दिवस ती साडी मी धुऊं शकत नव्हत्यें. आतां दुसऱ्या साडीची काळजी पडली. आम्हीं तीनचार स्त्रिया अर्जुनलालजी सेठींकडे गेलों आणि म्हणालों, कीं आम्हांला खादी मागवून द्या. त्यांनीं अहमदाबादहून खादीचें एक ठाण मागवून दिलें. हें ठाणतर कामठीच्या ठाणाहूनहि जाड होतें. हें ठाणहि हळदींत रंगवून काढण्यांत आलें. आतां माझ्याजवळ दुसरीहि साडी झाली. आणि तिच्यामुळें रात्रीची जुनी साडी बदलणें वंद झालें.

उकाड्याचे दिवस होते. रात्रीं ही साडी नेसून झोंपल्यें म्हणजे झोंप येत

नसे. अस्वस्थता वाटे. वाटे कीं पोत्यावर झोंपल्यें आहें. पण मनांत अशीहि भावना उठे कीं सीतामाईसारख्या राजकन्येनें तर वल्कलें धारण केलीं होतीं आणि ही तर खादी आहे; ही नेसल्यानें सालटें निघालें किंवा रक्त आलें असें कांहीं नाहीं. तेव्हां हीच चांगली. कित्येक दिवस ही अशा प्रकारची भावना मनांत उठत राहिली.

जें कापड उरलें त्याचे मुलांसाठीं कपडे करायला हवे होते. वर्ध्याचा उकाडा आधींच जबर आणि वरून हें जाड कापड ! घामानें मुलांना घामोळचा झाल्या. कोरी खादी वापरल्यानें मुलांची कोंवळी कातडी सोलून निघाली. छातीवर ओरबाडेसे निघाले. धोब्याकडे धुवायला टाकली असती तर कदाचित् असा त्रास झाला नसता. कापड मऊ झालें असतें. पण धोब्याकडे धुवायला टाकणें रुचलें नाहीं; कारण एक तर खादीचे कपडे थोडे होते आणि दुसरें, लौकर फाटण्याची भीति होती. पहिली साडी मीं अडीच वर्षेपर्यंत वापरली आणि नंतर तिच्याच चादरी बनवून घेतल्या.

कांहीं वर्षांनंतर मी जेव्हां खादी वापरण्याची गोष्ट इतर स्त्रियांना सांगितली तेव्हां त्यांतल्या कांहींनीं मला म्हटलें, "आपलें काय, अधिक पैसे खर्च करून आंध्रची महाग खादीहि आपण वापरूं शकतां. पण इतकी महाग खादी आम्ही कशी विकत घ्यायची ?" तेव्हां मी सांगितलें कीं 'तुमच्यासारखीच जाडी खादी मीहि वापरीन.'

कांहीं स्त्रियांनीं खादी वापरण्याचें कबूल केलें आणि मला मागवून द्यायला सांगितलें. त्यांच्यासाठीं ती मागवून आणि हळदींत रंगवून मी त्यांच्या घरीं पाठवूं लागल्यें. त्यामुळें आमच्याकडचें स्त्रियांचें येणें जाणें कमी होऊं लागलें. त्या आपसांत चर्चा करीत– "शेठाणी तर विधवेसारखे कपडे वापरायच्या गोष्टी सांगतात तिकडे कोण जाणार ? दागिने घालूं नका, काँग्रेसला पैसे द्या आणि विधवेसारखे कपडे करा. हें बाबा कोण करील !"

जेव्हां खादी वापरायला सुरुवात केली तेव्हां आमच्याकडे पडदा होताच. खादी जाडी असल्यामुळें पडदाहि फार त्रासाचा होई. बापूंना विचारलें, "बाकी सगळचा अडचणी निभावतील पण पडदा घेतल्यावर दिसेल कसें ?" यावर बापू म्हणाले, "खोजा जातींच्या बायांप्रमाणें डोळयांच्या जागी जाळी लावावी." बापू हें विनोदानेंच बोलले होते. खूप हसूं आलें. या गोष्टींत बापूंची विशेषता

दिसून येते. त्यांनीं प्रश्नाला उत्तर दिलें, पडदा टाकून द्यायला सांगितलें नाहीं. ते पडद्याच्या बाजूचे नव्हते पण समोरच्या माणसाचें अंत:करण दुखवून कोणतेंच काम ते करीत नसत.

त्यानंतर आम्ही अहमदाबाद काँग्रेसला गेलों. तेथें खादीप्रदर्शन होतें. खादीचीं दुकानें पाहिलीं. भुकेलेल्याला अन्न मिळावें किंवा निर्धनाला धन मिळावें तसें मला झालें. मी एकसारखी खादी खरेदी करूं लागल्यें. पैशाचा तर प्रश्नच नव्हता. मी खादीवर अशी तुटून पडल्यें कीं जणूं ती पुढें मिळणारच नाहीं. मी मनसोक्त पुष्कळ खादी खरेदी केली आणि वळकटीप्रमाणें एक गठ्ठा बांधून घेतला. त्या दिवसांत आमच्याबरोबर सामान खूप असे. जेथें जेथें काँग्रेसला जात असूं तेथें तेथें आमचा स्वयंपाक चालायचा आणि त्याला लागणारें सामानहि पुष्कळ न्यावें लागायचें. नोकर चाकरहि असत. अशी कांहीं धामधूम चालायची कीं जणूं लग्नच चाललें आहे. इकडे काँग्रेसची गर्दी आणि तिकडे आमच्याकडचें बेसुमार सामान. त्यामुळें एकादी वस्तू राहून जाण्याचा संभव असे. दैवयोगानें खादीचा तो गठ्ठाच राहून गेला! नोकरांनीं खूप तपास केला पण गठ्ठ्याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. मी तर एकदम सर्दच झाल्यें. खादी गमावल्याची गोष्ट सांगण्याचा धीर नव्हता आणि सांगितल्याशिवाय राहणेंहि शक्य नव्हतें. शेवटीं कसाबसा धीर करून मी हें जमनालालजींना सांगितलेंच. ऐकून ते म्हणाले–" जो अति लोभ करतो त्याच्यावर ही अशीच पाळी यायची. झाली गोष्ट चांगलीच झाली. जो ती घेऊन गेला तो खादीच वापरील. अर्थात् खादीचा प्रचारच झाला."

हे तर ही गोष्ट केव्हांच विसरून गेले. पण या गोष्टीचें दु:ख माझ्या मनांत मात्र बरेच दिवसपर्यंत राहिलें. रंकाला रत्न मिळावें आणि कुणी तरी तें लुबाडून न्यावें तशी माझी गत झाली. मोठ्या प्रयासानें खादी मिळाली होती, आणि आतां कसलाच त्रास व्हायचा नाहीं असें मनांत योजलें होतें. पण व्हायचें तें झालें. आणि मी जशी होत्यें तशीच राहिल्यें. आजदेखील मला आणि माझ्या मुलांना काँग्रेसच्या प्रदर्शनांत खादी खरेदी करण्याची मोठी हौस आहे.

घरांत किंवा बाहेर खादीची नासाडी झालेली मला खपत नाहीं. माझी ही वृत्ति इतक्यापर्यंत जाते कीं जेव्हां कधीं खादी-भांडारांत, खादीचा एकादा तागा फाटलेला असतो, उंदरांनीं मारलेला असतो किंवा खराब झालेला असतो

आणि त्याचा नीट उपयोग कोणी करूं शकत नाहीं, तेव्हां मी तो सार्थकीं लावत्यें. किमती कपड्याला खिळ्यानें जेव्हां धस लागते किंवा तो फाटतो तेव्हां मी तो रफू करून देत्यें. खादीचा सदुपयोग व्हावा अशी नेहमींच माझी दृष्टि राहिली आहे.

●

## २४: परदेशी कपड्यांची होळी

जेव्हां कॉंग्रेसचे सभासद करण्याची गोष्ट निघाली तेव्हां मीहि त्या कामांत गुंतल्यें. घरोघर जाऊन स्त्रियांना सभासद करून घ्यायला सुरुवात केली. माझ्या या कामानें बायका मंडळींत घवराट सुरू झाली. ज्या मला आधीं आदर-पूर्वक वोलवीत आणि माझ्या ओळखी पाळखीच्या असत त्यांना मी त्यांच्याकडे न आल्यें तर बरें असें वाटूं लागलें; त्या दारें बंद करीत आणि घरीं नाहीं असें सांगून पाठवीत. कांहीं जणी तर साफ सांगून पाठवीत कीं शेठाणींनीं आमच्या-कडे येऊं नये. प्रश्न केवळ वर्गणीचाच नव्हता तर स्त्रियांचीं नांवें लिहून घेणें, अंगठा लावून घेणें वगैरे गोष्टींचाहि प्रश्न होता. यामुळें त्रास तर होतोच. सर्वांत जास्त सभासद हरिजन वस्तींतच झाले. आमच्या म्हणण्याला तेथें चांगलीच साद मिळाली. ही मंडळी आम्हांला प्रेमानें बोलावीत, आदर करीत आणि अशा प्रकारें सारी वस्ती सदस्य वनून जाई. ही मंडळी पैशांच्या पिशव्या भरून देत असे. चालत आलेल्या संस्कारामुळें हरिजन वस्तींत जायला मन सुद्धां कांकूं तर करीच ; पण कामाच्या धुंदींत आम्हीं तिकडे सुद्धां जाऊन पोहोंचत असूं. हळूहळू विचारांत पालट होत गेला. पण हरिजनांशीं मिळण्या-मिसळण्याची गोष्ट आचारांत आणणें मला अजूनहि कठीण जातें. संस्थांमध्यें हरिजनांच्यावरोवर उठण्या-बसण्यांत आणि खाण्यापिण्यांतहि संकोच वाटत नाहीं. पण घरी येतांच स्वच्छतेच्या संस्कारांमुळें असें करणें कठीण जातें. त्या काळांत हरिजनांना आणि गोरगरिबांना कॉंग्रेसविषयीं विशेष प्रेम होतें. सामान्य जनतेंत तर उत्साह होताच. कॉंग्रेसचे सभासद केल्यानंतर कॉंग्रेसच्या कामाला आणि प्रचाराला सुरुवात झाली. दर शनिवारीं मी एक सभा घेत

असें आणि तींतून कॉंग्रेसचें म्हणणें समजावून सांगत असें. याच वेळीं परदेशी कपड्यांच्या होळीचा प्रश्न पुढें आला. जमनालालजींनीं मला सांगितलें, "गांधी-जीचें सांगणें आहे कीं विलायती कापड राक्षसाच्या रूपांत आपल्या देशांत घुसलें आहे. हें पाप हिन्दुस्थानांतून घालविलें पाहिजे. आपल्या घरांतहि एक तुकडा देखील असतां कामा नये." गांधीजींच्या म्हणण्याचा त्यांच्यावर परिणाम झाला, आणि त्यांच्या म्हणण्याचा माझ्यावर. हें काम कसें करायचें? घरांत, देवळांत, दुकानांत सर्वत्र विलायती कापड आलें होतें. ही सार्वत्रिक सफाई कशी करायची? एकदां ह्यांच्याशीं बोलणें झालें. हे म्हणाले, "असाहि विचार चालला आहे कीं कोरें कापड परत विलायतेला पाठविलें जावें." तेव्हां मी कोरे कपडे एका बाजूस काढले आणि वापरायचे दुसऱ्या बाजूस काढले. होळीची वेळ जवळ येतांच कापडाची जर आणि किनार निराळी काढली. मंदिरांतले पोशाखहि बाहेर काढले. दिसेल तिथला विलायती कपडा निराळा काढला. घरचे कपडे काढले, लग्नांतले कपडे, खास वरातीचे कपडे, दुकानांत होते ते ते काढले, नोकरांचे काढले, गणगौरीचे देखील कपडे काढले. मुलांनीं आपल्या बाहुल्यांचे कपडेहि काढले. फर्निचरवर लावलेलें कापडहि काढून गोळा केलें. ह्यांचें लग्नांतलें पागोटें, अंगरखा वगैरे शकुनाचे कपडे जे अलग ठेवले होते ते देखील काढले. या मंगल वस्तूंची होळी करतांना मन थोडें कचरलें. पण शेवटीं विचार केला कीं हे कपडे जाळल्यानें आयुष्य तुटतें असें थोडेंच आहे! मनाचा निश्चय कायम केला. हे कपडे घरांत ठेवणें कसें शक्य आहे? पाप थोडेंच घरांत ठेवतां येतें! लग्नाच्या वेळीं नवरदेवावर जें छत्र धरलें जातें तें जाळायचें कसें? आपण स्वराज्य घ्यायला चाललों असतांना छत्र जाळणें मला कसेंच रुचेना. मी विचारपूर्वक तें मगनवाडीच्या विहिरींत टाकायला लावलें.

सर्व कपडे गोळा करून मोठ्या इतमामानें मिरवणूक काढण्यांत आली. गांवच्या लोकांनींहि आपले जुने कपडे त्यांत टाकले. लोकांनीं बहुतकरून हॅट्स्च टाकल्या होत्या. हॅटच्या बाबतींत उपयोगाच्या ऐवजीं लोकांत तिच्या विलायती स्वरूपाची भावनाच अधिक होती. कपड्यांत जरीचे आणि रेशमी पाहून लोकांना फार दुःख झालें. आणि ते म्हणूं लागले, कीं इतके किमती कपडे जाळून काय फायदा? त्यापेक्षां आम्हांला द्या कीं! पण विलायती कपडा म्हणजे

हिन्दुस्थानांतलें पाप ! मग पाप वांटावें कसें ? पाप ही जाळायची वस्तू आहे. शेवटीं सर्व कपडयांची होळी करण्यांत आली. होळींत जरीचे खूप कपडे जळाले. या जरीच्या कपडयांत मंदिरांतले पोशाख होते. जर निराळी काढतां यावी म्हणून गांधी चौकांत दोन चबुतऱ्यांवर दोन होळ्या पेटविण्यांत आल्या. आम्हांला तर चांदीची आठवणहि झाली नाहीं. पण कनीरामजींना ती झाली ! सारी रात्र त्यांनीं पहारा ठेवला आणि त्यांतून सुमारें अडीच शेर चांदी काढली !

मुख्य होळी झाल्यानंतर सात दिवसपर्यंत लहानमोठे कपडे बाहेर निघत राहिले आणि त्यांच्या होळ्या पेटत राहिल्या. होळीचें हें वातावरण मुलांत देखील फैलावलें. माझी मुलगी ओम् त्यावेळीं दीड दोन वर्षांची होती. तीहि आपल्या अंगावरचे कपडे—हे तर खादीचे नाहींत, खादीचे नाहींत !—म्हणून फाडीत होती.

●

## २५. झेंडासत्याग्रह

१८ मार्च १९२३ ची गोष्ट. जबलपूरमध्यें कांहीं स्वयंसेवक राष्ट्रीय झेंडा फडकवीत छावणीच्या बाजूनें चालले होते. महात्माजींच्या कारावास-दिनावरून ही मिरवणूक निघाली होती. पोलिसांनीं त्यांना तिकडे जायला मनाई केली.

राष्ट्रीय सप्ताहांत जालियनवाला बागेंतील हत्याकांडाच्या स्मरणार्थ जेव्हां नागपूरला मिरवणूक निघाली आणि ती सिव्हिल लाइन्समधून जाऊं लागली तेव्हां तिकडे त्यांना पिटून काढण्यांत आलें, पकडून खटला चालवण्यांत आला आणि दोन दोन महिन्यांची सजा देण्यांत आली.

या घटनेवर विचारविनिमय करण्यासाठीं वर्ध्याच्या सत्याग्रह आश्रमांत प्रांतिक कॉंग्रेस कमितीची बैठक भरली. आश्रम तेव्हां आमच्या बजाजवाडीच्या जागेंत होता. याला पूर्वी ‘ घास का बंगला ’ म्हणत. सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला गेला. सत्याग्रही पाठवून सत्याग्रहाला जोराची चालना देण्याची जोखीम जमनालालजी, बाबासाहेब वरोळकर आणि भगवानदीनजी यांनीं घेतली. १८ मेला नागपूरहून सत्याग्रह सुरू झाला. जमनालालजींनीं रोज कमींत कमी

दहा माणसें तयार करण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली. त्यावेळीं स्वयंसेवक तयार करणें फार कठिण होतें. घरचे पुरुष आणि मुलगे तयार झाले तर स्त्रिया आणि आया त्यांना थोपवून धरीत. एवढ्या अडचणी असून देखील जमनालाल-जींनीं पुष्कळ सत्याग्रही तयार केले. पण थोड्याच दिवसांत खुद्द जमनालाल-जीच पकडले गेले आणि त्यांना १८ महिन्यांची सजा आणि तीन हजार रुपये दंड झाला.

ही त्यांची पहिली अटक होती. तिच्यावर वर्धाभर सामसूम पसरल्यासारखी झाली. या वेळेपर्यंत तुरुंगाच्या बाबतींत लोकांत हाच समज होता कीं तिकडे जातात ते फक्त चोर, डाकू, आणि खुनी गुन्हेगार ; आणि तेथें भयंकर छळ केला जातो. तुरुंगांत जाणारा समाजाच्या नजरेंतून उतरत असे. देशभक्तीसाठीं देखील माणसें तुरुंगांत जाऊं शकतात याची लोकांना त्यावेळीं काय कल्पना ? त्यामुळें जमनालालजी तुरुंगांत गेल्याच्या वार्तेनें घरच्या नोकरचाकरांत आणि गांवच्या लोकांत हाहा:कार माजला.

दंड न भरल्यामुळें आमची मोटार आणि घोड्यांची गाडी जप्त करण्यांत आली. पण उभ्या मध्यप्रदेशांत त्यांच्यासाठीं आंकडा बोलणारा कुणी निघाला नाहीं ! शेवटीं मोटार सौराष्ट्रला नेण्यांत आली. सौराष्ट्रला तेव्हां काठेवाड म्हणत आणि तेथें छोटीं छोटीं संस्थानें होतीं. तिथल्या कुठल्यातरी राज्यांतील कोणा इंग्रज अधिकाऱ्याला ही मोटार कांहीं शेंकड्यांना विकण्यांत आली. जमनालालजींच्या अटकेनंतर सत्याग्रहाचें काम कांहीं दिवस वल्लभभाई पटेलांनीं सांभाळलें. चोहींकडून तुरुंगांत जाण्यासाठीं लोक येऊं लागले. सत्याग्रहासाठीं कांहीं स्त्रिया देखील येऊन थडकल्या. हा सत्याग्रह फारच यशस्वी झाला. सार्वजनिक स्वरूपांत झालेला हा पहिला सत्याग्रह असें म्हणतां येईल.

अंतीं सत्याग्रहाचा विजय झाला आणि गोकुळाष्टमीच्या दिवशीं सर्वांबरोबर जमनालालजी तुरुंगांतून सुटले. गांवभर आनंदाची लाट उसळली. रस्तोरस्तीं लोक उत्साहानें इकडे तिकडे हिंडू लागले आणि म्हणूं लागले, 'कृष्ण जन्मले आणि शेठजी सुटले !'

वर्ध्याला जमनालालजींच्या स्वागताची तयारी होऊं लागली. सारें शहर सजवलें गेलें. लोकांतला उत्साह अपूर्व होता. हे दुपारचे वर्ध्याला आले. त्यांच्या स्वागतासाठीं स्टेशनावर हजारो लोक गेले. त्यांना पाहून लोकांचें अंत:करण

हिन्दुस्थानांतलें पाप ! मग पाप वांटावें कसें ? पाप ही जाळायची वस्तू आहे. शेवटीं सर्व कपडयांची होळी करण्यांत आली. होळींत जरीचे खूप कपडे जळाले. या जरीच्या कपडयांत मंदिरांतले पोशाख होते. जर निराळी काढतां यावी म्हणून गांधी चौकांत दोन चवुतऱ्यांवर दोन होळ्या पेटविण्यांत आल्या. आम्हांला तर चांदीची आठवणहि झाली नाहीं. पण कनीरामजींना ती झाली ! सारी रात्र त्यांनीं पहारा ठेवला आणि त्यांतून सुमारें अडीच शेर चांदी काढली !

मुख्य होळी झाल्यानंतर सात दिवसपर्यंत लहानमोठे कपडे बाहेर निघत राहिले आणि त्यांच्या होळ्या पेटत राहिल्या. होळीचें हें वातावरण मुलांत देखील फैलावलें. माझी मुलगी ओम् त्यावेळीं दीड दोन वर्षांची होती. तीहि आपल्या अंगावरचे कपडे—हे तर खादीचे नाहींत, खादीचे नाहींत !—म्हणून फाडीत होती.

## २५. झेंडासत्याग्रह

१८ मार्च १९२३ ची गोष्ट. जबलपूरमध्यें कांहीं स्वयंसेवक राष्ट्रीय झेंडा फडकवीत छावणीच्या बाजूनें चालले होते. महात्माजींच्या कारावास-दिनावरून ही मिरवणूक निघाली होती. पोलिसांनीं त्यांना तिकडे जायला मनाई केली.

राष्ट्रीय सप्ताहांत जालियनवाला बागेंतील हत्याकांडाच्या स्मरणार्थ जेव्हां नागपूरला मिरवणूक निघाली आणि ती सिव्हिल लाइन्समधून जाऊं लागली तेव्हां तिकडे त्यांना पिटून काढण्यांत आलें, पकडून खटला चालवण्यांत आला आणि दोन दोन महिन्यांची सजा देण्यांत आली.

या घटनेवर विचारविनिमय करण्यासाठीं वर्ध्याच्या सत्याग्रह आश्रमांत प्रांतिक कॉंग्रेस कमितीची बैठक भरली. आश्रम तेव्हां आमच्या बजाजवाडीच्या जागेंत होता. याला पूर्वी 'घास का बंगला' म्हणत. सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला गेला. सत्याग्रही पाठवून सत्याग्रहाला जोराची चालना देण्याची जोखीम जमनालालजी, बाबासाहेब वरोळकर आणि भगवानदीनजी यांनीं घेतली. १८ मेला नागपूरहून सत्याग्रह सुरू झाला. जमनालालजींनीं रोज कमींत कमी

दहा माणसें तयार करण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली. त्यावेळीं स्वयंसेवक तयार करणें फार कठिण होतें. घरचे पुरुष आणि मुलगे तयार झाले तर स्त्रिया आणि आया त्यांना थोपवून धरीत. एवढ्या अडचणी असून देखील जमनालालजींनीं पुष्कळ सत्याग्रही तयार केले. पण थोड्याच दिवसांत खुद्द जमनालालजीच पकडले गेले आणि त्यांना १८ महिन्यांची सजा आणि तीन हजार रुपये दंड झाला.

ही त्यांची पहिली अटक होती. तिच्यावर वर्धाभर सामसूम पसरल्यासारखी झाली. या वेळेपर्यंत तुरुंगाच्या बाबतींत लोकांत हाच समज होता कीं तिकडे जातात ते फक्त चोर, डाकू, आणि खुनी गुन्हेगार ; आणि तेथें भयंकर छळ केला जातो. तुरुंगांत जाणारा समाजाच्या नजरेंतून उतरत असे. देशभक्तीसाठीं देखील माणसें तुरुंगांत जाऊं शकतात याची लोकांना त्यावेळीं काय कल्पना ? त्यामुळें जमनालालजी तुरुंगांत गेल्याच्या वार्तेनें घरच्या नोकरचाकरांत आणि गांवच्या लोकांत हाहा:कार माजला.

दंड न भरल्यामुळें आमची मोटार आणि घोड्यांची गाडी जप्त करण्यांत आली. पण उभ्या मध्यप्रदेशांत त्यांच्यासाठीं आंकडा बोलणारा कुणी निघाला नाहीं ! शेवटीं मोटार सौराष्ट्रला नेण्यांत आली. सौराष्ट्रला तेव्हां काठेवाड म्हणत आणि तेथें छोटीं छोटीं संस्थानें होतीं. तिथल्या कुठल्यातरी राज्यांतील कोणा इंग्रज अधिकाऱ्याला ही मोटार कांहीं शेंकड्यांना विकण्यांत आली. जमनालालजींच्या अटकेनंतर सत्याग्रहाचें काम कांहीं दिवस वल्लभभाई पटेलांनीं सांभाळलें. चोहींकडून तुरुंगांत जाण्यासाठीं लोक येऊं लागले. सत्याग्रहासाठीं कांहीं स्त्रिया देखील येऊन थडकल्या. हा सत्याग्रह फारच यशस्वी झाला. सार्वजनिक स्वरूपांत झालेला हा पहिला सत्याग्रह असें म्हणतां येईल.

अंतीं सत्याग्रहाचा विजय झाला आणि गोकुळाष्टमीच्या दिवशीं सर्वांबरोबर जमनालालजी तुरुंगांतून सुटले. गांवभर आनंदाची लाट उसळली. रस्तोरस्तीं लोक उत्साहानें इकडे तिकडे हिंडूं लागले आणि म्हणूं लागले, ‘ कृष्ण जन्मले आणि शेठजी सुटले ! ’

वर्ध्याला जमनालालजींच्या स्वागताची तयारी होऊं लागली. सारें शहर सजवलें गेलें. लोकांतला उत्साह अपूर्व होता. हे दुपारचे वर्ध्याला आले. त्यांच्या स्वागतासाठीं स्टेशनावर हजारों लोक गेले. त्यांना पाहून लोकांचें अंत:करण

भरून आलें. त्यांची मिरवणूक काढण्यांत आली आणि आयाबहिणींनीं अबीर-गुलाल उधळून कुंकूं लावलें आणि साखर खोबरें तोंडांत घातलें.

घराघरासमोर लोकांनीं आपल्याकडे ज्या ज्या वस्तु होत्या त्यांचीं तोरणें लावलीं. भांडींवाल्यांनीं भांड्यांचीं, कपडेवाल्यांनीं कपड्यांचीं, किराणेवाल्यांनीं किराणा मालाचीं आणि भाजीवालींनीं हिरवी मिरची, शाकभाजी यांची. सजावट अपूर्व होती. माळाफुलांची तर मोजदाद नव्हती. असलें हें अपूर्व स्वागत पाहून डोळ्यांचें पारणें फिटत होतें.

जरी जमनालालजींना 'अ' वर्गांत ठेवण्यांत आलें होतें तरी त्यांनीं सर्वांबरोबर 'क' वर्गांतलेंच अन्न घेतलें होतें. दुधातुपाशिवाय त्यांनीं केवळ ज्वारीची भाकर खाल्ली आणि इतके त्रास काढले असा हा त्यांच्या जीवनांतला पहिलाच प्रसंग होता. त्याचा त्यांच्या शरिरावर असा परिणाम झाला कीं तो लोकांना पाहवला नाहीं. चरबी पार उतरली होती. कोमल आणि सुदर चेहऱ्यावर लालीच्या ऐवजीं काळसरपणा पसरला होता. दाढी वाढली होती. आणि शरिराचा वाळून सापळा झाला होता. त्यांनीं जेव्हां घरचे कपडे चढवले तेव्हां असें वाटलें कीं जणूं त्यांनीं मागून आणलेले कपडे वापरले आहेत !

त्यांचे मित्र म्हणाले की दोन महिन्यांनीं सुटूं हें जर आम्हांला माहीत असतें तर आम्हीही तुमच्याबरोबर गेलों असतों ! यावर ते हंसून म्हणाले, 'दोन महिन्यांनीं सुटूंच असें कसें सांगतां येईल ? तयारी करायची ती लांब पल्ल्याचीच केली पाहिजे.'

जेव्हां जमनालालजी सुटून आले तेव्हां त्यांच्याबरोबर सुटलेले १५०० सहकारीहि आले. भोजनाच्या व्यवस्थेसंबंधानें तार आधींच येऊन ठेपली होती. अर्थात् भोजन संध्याकाळीं तयार होतें. त्या दिवसांत बगीच्यांतून आलेले पुष्कळसे कोहाळे घरांत राखून ठेवलेले होते. संध्याकाळीं त्यांची भाजी केलेली होती. दुसऱ्या दिवशींहि या कोहाळ्यांचीच भाजी बनवली आणि तिसऱ्या दिवशींहि जेव्हां त्यांचीच भाजी पानावर पडली तेव्हां जमनालालजींना फार दुःख झालें. ते म्हणाले, "तीन दिवसांपासून सारखी एकच भाजी होते आहे. गांवांत काय दुसरी भाजीच मिळत नाहीं ? हें चाललें आहे काय ? तुरुंगांत एकच एक भाजी तर मिळतच होती !" मी म्हटलें, "जी, घरांत मळ्यावरची भाजी आलेली होती म्हणून तीच करायला लावली." तेव्हां ते म्हणाले, "हे

लोक काय आपल्याकडे रोज रोज येणार आहेत ?" ही गोष्ट त्यांनीं एवढ्या व्यथेनें सांगितली कीं मनाची जिव्हाळी निघून मलाहि दु:ख झालें. पण आतां उपाय काय होता ?

## २६. वडील जनांची व्यथा

जेव्हां मी घुंगट घेत होत्यें तेव्हां अगदीं रजपूत स्त्रियांप्रमाणें, आणि जेव्हां मी त्याला फांटा दिला तेव्हां तो इतका दिला कीं लोकांत जाऊन मी व्याख्यानें-हि देऊं लागल्यें. ही गोष्ट घरच्या वडील माणसांना आणि विशेषत: वृद्ध स्त्रियांना चांगलीच खटकली. जमनालालजींच्या मामी म्हणूं लागल्या, " पडदा वापरलास तेव्हां असा वापरलास कीं नखसुद्धा दिसूं नये. आणि सोडला तेव्हां असा सोडलास कीं पुरुषांच्या सभांत व्याख्यानें झोडूं लागलीस !" मी हंसून उत्तर दिलें, " तुम्हीं तर लग्न झाल्यापासून आहां तिथेंच आहां आणि जाईपर्यंत तशाच राहाल. माझे तर सात जन्म एकाच जन्मांत पुरे व्हायचे आहेत."

माझे मामंजी कनीरामजी यांनाहि मी घुंगट टाकून देऊन कॉंग्रेसच्या कामांत पडल्यानें थोडेंबहुत वैषम्य वाटलें होतें. ते मला टाळू लागले. मी बाहेर जायला निघाल्यें कीं ते स्वत:च तोंड फिरवीत. माझ्याविषयीं त्यांना शेवटपर्यंत सहानु-भूति होती. कारण मी जें कांहीं करत्यें तें जमनालालजींच्या सांगण्यावरून करत्यें, असें ते समजत. कनीरामजींचें आपल्या मुलावरहि इतकें प्रेम होतें कीं ते त्यांनाहि कांहीं सांगत नसत. पण त्यांचा राग होता गांधीजींवर. त्यांना वाटत होतें कीं घरांत हें जें कांहीं चाललें आहे त्याचें मूळ आहेत गांधीजी. तशी त्यांना गांधीजींची खादी आवडे. ते म्हणत, " खादी म्हणजे देशाचें जीवन आहे." स्वत: ते खादी वापरीत. माझ्या सासूबाईंनी तर राशींनीं सूत कांतून कपडे तयार केले होते. पण त्यांना गांधीजींच्या इतर गोष्टी पसंत नव्हत्या. मी दागिन्यांना रजा दिली हें माझ्या सासूबाईना आवडलें नव्हतें. त्या म्हणत, 'या मुलीनें तर सगळे दागिने उतरून ठेवले. आणि आम्ही घालतों हें रुचत नाहीं.' अशा रीतीनें सहजासहजीं कुटुंबांतले दागिने कमी होत गेले.

मामंजी देवळीला जिनिंग फॅक्टरींत राहात असत. मी एकदां देवळीला व्याख्यान द्यायला गेल्यें आणि व्याख्यानांत सांगितलें कीं विडी-तंबाखू पिणें चांगलें नाहीं. जेव्हां मामंजींनीं ही गोष्ट ऐकली तेव्हां ते म्हणाले, ‘सुनबाई लोकांना तंबाखू सोडायला सांगते तेव्हां मी कसा पिऊं ?’ बस्स. त्याच दिवसापासून त्यांनीं गुडगुडी ओढणें सोडून दिलें.

केवळ घरच्या माणसांनाच नव्हे तर घरच्या पुरोहिताला आणि नोकरांना देखील या साऱ्या गोष्टींचें वाईट वाटे. जोशीजी तर एका परीनें घरचेच मानले जात. ते खादी तर शेठजींबरोबर आरंभापासूनच वापरीत असत. आमच्या कुटुंबाशिवाय कुणाचीच दानदक्षिणा त्यांनीं कधीं घेतली नाहीं. त्यांना जेव्हां कळलें कीं मी कॉंग्रेसच्या कामासाठीं पडदा टाकून देऊन हिंडूं लागल्यें आहे तेव्हां ते माझ्यासमोर यायला कचरूं लागले. जिथून मी निघें तिथेंच मी कदाचित् बोलेन म्हणून दडी देत. त्यांनीं सांगून पाठविलें कीं शेठाणीजींनीं आपल्यासमोर येऊं नये किंवा बोलूं नये. नाहींतर आपण विहिरींत जीव देऊं किंवा वर्धा सोडून जाऊं. जोशीजी रूढिप्रिय होते आणि त्यांना पडद्यांतच प्रतिष्ठा दिसत होती. अजूनपर्यंत मी कधीं त्यांच्याशीं बोलल्यें नाहीं. मीहि त्यांना टाळीत असल्यें.

जोशीजी मंदिराच्या कोठीचें काम पाहात असत. पण जेव्हां मंदिरांत हरिजनांचा प्रवेश झाला तेव्हां त्यांनीं मोठ्या कष्टानें मंदिर सोडलें आणि जवळ जवळ पंचवीस वर्षेपर्यंत मंदिरांत पाऊल देखील ठेवलें नाहीं. त्यांनी खादी सोडली नाहीं खरी, पण गांधीजींची पोटभर निंदा ते करीतच राहिले. गांधीजींच्या स्वर्गवासानंतर त्यांची शिवीगाळ कमी झाली आणि आनंदाची गोष्ट ही कीं हल्लीं हल्लीं जमनालालजींच्या अकराव्या श्राद्धतिथीच्या दिवसापासून जोशीजी मंदिरांतहि येऊं लागले. आतां ते म्हणतात, ‘शेठजींची प्रेरणाच मला मंदिरांत घेऊन आली.’ जमनालालजींच्या बाबतींत गांधीजीची निंदा ही सहन करण्यापलीकडची गोष्ट होती. तरी देखील त्यांनीं या जोशीजींना आणि त्यांच्या कुटुंबाला शेवटपर्यंत सांभाळलें आणि आजहि सांभाळलें जातें. कारण या जोशीजींनीं कधी कसलेंच कमाईचें काम केलें नाहीं. प्रत्येक माणसांत सरळपणा असतो पण संस्कार आणि रूढी यांच्यामुळे ती कधी कधीं झांकून राहाते. प्रसंग आणि परिस्थिति यांच्या अनुकूलतेमुळें त्याचा विकास होत असतो. जोशीजी पुन्हां मंदिरांत आले ही गोष्ट कळल्यानें मला फार आनंद झाला.

अशाच तऱ्हेचा आमच्याकडे छोटू नांवाचा एक स्वैंपाकी होता. वयाच्या चौदाव्या वर्षापासून आमच्याकडे तो काम करीत होता. सगळे वय त्यानें येथेंच घालवलें आणि घरचाच झाला होता. घराची एवढी काळजी घेई कीं म्हणायचा, बच्छराजजींनीं मोठ्या कष्टानें पैसा मिळवला आणि शेठजी तो उधळताहेत ! शेठजींना काय कळतें ! हे गांधी टोपीवाले त्यांना बिघडवून टाकतील !' मला कोठीपर्यंत जाऊंच देत नसे. म्हणे, "इथें उकाडा आहे तेव्हां तुम्ही वर चला." नंतर म्हणे, 'ही ब्राह्मणी आली फसवायला.'

तो माझ्या आणि मुलांच्या खाण्यापिण्याची फार काळजी घ्यायचा. दुसऱ्यांनाहि असें खाऊं घालायचा कीं जणूं ते आपल्याच घरी जेवताहेत. शंभर माणसें का येईनात, एकटा स्वयंपाक करायचा. कधीं 'नाहीं' म्हणायचा नाहीं. म्हणायचा, 'शेठजींचें घर भरलेलें आहे. इथें नाहीं काय ?' घरांत त्याच्या सांठ्याला प्रत्येक जिन्नस थोडाथोडा तरी असायचाच. कधीं माणसें जास्त आलीं आणि शाकभाजी कमी पडली आणि जेवणाऱ्यांनीं भाजी मागितली तर हा 'नाहीं' न म्हणतां दाळीची कढी वाढीत असे. जेवणाऱ्यानें जर म्हटलें कीं दाळ नको, भाजी पाहिजे तर पुन्हां ताटांत दाळ किंवा कढी घालायचा. शेवटीं मागणारा थकून जाई पण याच्या तोंडून कधीं 'नाहीं' यायचें नाहीं.

बाळंतपणांत जेव्हां मी स्वैंपाकघरांत जेवत नव्हतें तेव्हां तो माझ्या वरच्या खोलींत ताट घेऊन यायचा. नर्स किंवा डॉक्टरीण सांगायची 'महाराज, आंतून जा.' पण मी झोपलेली असल्यामुळें त्यानें आंत कसें यावें ? ताट तर तो दुसऱ्याकडे देऊं शकत नव्हता कारण त्याला भीति असे कीं त्याला नजर लागेल. म्हणून तो पीठ झांकण्याचा कपडा आणायचा आणि त्यानें आपले डोळे झांकून घेऊन आणि ताट खालीं ठेवून निघून जायचा. माझ्याकडे बघायचा देखील नाहीं !

## २७. माझी नणंद आणि तिचीं मुलें

मला तीन नणंदा होत्या. तिघीहि माझ्याहून लहान होत्या. एक जी राजारामगढला दिलेली होती ती एक मुलगा झाल्यावर वारली. तो मुलगाहि वांचला

नाहीं. उरलेल्या दोन नणंदांतली एक केशरबाई आणि दुसरी गुलाबबाई. गुलाबबाईचें लग्न लोसलच्या डेडाराजजी खैतानशीं झालें होतें. तिला मूलबाळ झालें नाही. केशरबाईचें लग्न सुमारें बाराच्या वयाला फतेहपुरच्या जोरावर-मलजी पोद्दारांशीं झालें. ते उंच, सुडौल, सुंदर आणि सुस्वभावी होते. ते आपल्या विधवा चुलतीला दत्तक गेले होते. चुलतीचें माहेर फत्तेहपूरलाच होतें. तिचें नांव होतें भूरीबाई. भूरीबाईच्या माहेरचे लोक श्रीमंत होते आणि तिच्याकडेहि संपत्ति होती. ती शंकेखोर आणि तापट स्वभावाची होती. तिला सारखी शंका वाटत राहायची, दत्तक मुलगा आपल्या हाताबाहेर जाईल कीं काय ? म्हणून ती जोरावरमलजींना कुणाशीं मिळू मिसळूं किंवा बोलूं करूं देत नव्हती. त्यांनीं कुणाशीं प्रेमानें राहावें हेंहि तिला खपत नव्हतें. लग्नानंतर मुलगा आपल्या बायकोच्या आहारीं जाऊं नये म्हणून तिनें पहिल्यापासून आपल्या सुनेची नालस्ती आरंभली. ती जोरावरमलजींना बायकोशीं बोलूहि देत नसे. म्हणे, ‘ ती तर गांवढळ आहे. तिला कसलीच अक्कल नाहीं, मूर्ख आहे. ’ ती केशरबाई-कडून खूप काम करवून घेई. तिला त्रासहि देई. अशा रीतीनें चारपांच वर्षें गेलीं. केशरबाई जरा भोळीभाबडी होती. तिचें सारें बालपण काशीवास याच गांवीं गेलें होतें.

जमनालालजींची इच्छा असे कीं आपल्या सर्व कुटुंबीयांना नेहमीं सुखी करावें. केशरबाईचा जो छळ होई त्यामुळें तिच्या आईवडिलांनाहि फार मन:-क्लेश होत. तें हलके व्हावे म्हणून ते सारखे खटपट करीत.

केशरबाईवर होणाऱ्या अन्यायामुळें घरचीं सारीं माणसें दु:खी असत. पण एवढेंच नव्हतें तर भूरीबाईनें जोरावरमलजींचें दुसरें लग्न करण्याचें ठरविलें होतें. हें जेव्हां जमनालालजींना कळलें तेव्हां त्यांनीं सीकरच्या रावराजांना तार करून लग्न थांबवायला लावलें आणि जोरावरमलजी आणि केशरबाई यांची दिलजमाई घडवून आणण्यासाठीं ते आपल्या मायभूमीला गेले. सीकरला राहून त्यांनीं अनेक प्रयत्न केले. पण व्यर्थ. कारण भूरीबाईनें जमनालालजींचें जोरावरमलजींकडे बोलणें होऊंच दिलें नाहीं. हताश होऊन जमनालालजी सीकरहून कांहीं पंचांना घेऊन फत्तेहपूरला गेले. दोन महिनेपर्यंत सर्व प्रकारची खटपट केली, आळवण्या केल्या पण भूरीबाई रतिभर देखील द्रवली नाहीं. जोरावरमलजींना घरांतून बाहेर पडणें देखील तिनें अशक्य करून टाकलें.

तिनें वहाणा केला कीं जोरावरमलजी मुदतीच्या तापानें आजारी आहेत आणि कुठें कुणाची सावली पडेल अशी भीति घालून घरीं येणारासहि बंदी केली.

अधिकारी वर्ग, गांवचे लोक, एवढेंच नव्हे तर जोरावरमलजींचे आईवडील देखील फार सज्जन होते आणि जमनालालजींच्या बाजूला होते. पण त्यांचा निरुपाय होता. बिचारे करणार होते तरी काय ? एक म्हणजे भुरीबाई स्वभावाची तापट होती आणि पुन्हा पडली विधवा ! ती भलभलत्या शिव्या देत राहायची. सगळ्यांनाच वाटत होतें कीं तिची समजूत घालून कांहीं मार्ग काढतां आल्यास बरें. जेव्हां कोणताच प्रयत्न सफल होण्याचें लक्षण दिसेना तेव्हां अधिकारी लोकांनीं एक डाव रचला. भुरीबाई माहेरच्या मंडळीकडे जात येत असे. एके रात्रीं जमनालालजी पन्नास रजपुतांना घेऊन गेले. बरोबर आमच्या नोकराणीलाहि घेतलें. तिनें दाराशीं जाऊन 'भूरीबाई, भूरीबाई' अशा हाका मारल्या. भूरीबाईला वाटलें माहेरहून कुणी ब्राह्मणी आली असेल. म्हणून तिनें जोरावरमलजीला दार उघडायला सांगितलें. जोरावरमलजींनीं दार उघडून एक पाऊल टाकलें होतें मात्र तोंच जमनालालजींनीं त्याचा हात पकडून त्यांना बाहेर ओढलें आणि रजपुतांनीं त्यांना गराडा घालून ते त्यांना मुक्कामावर घेऊन जाऊं लागले. या गडबडीची चाहूल लागून भूरीबाई बाहेर आली. आणि तिनें जेव्हां पाहिलें की जोरावरमलजींना ते घेऊन चालले आहेत तेव्हां ती मोठ्यामोठ्यानें ओरडूं लागली. 'बाळा, तूं कुठें चाललास ?' आणि मागून येऊं लागली. जोरावरमलजी आपल्या आईला धीर देण्यासाठीं म्हणाले, 'मा, तूं आणखी पुढें येऊं नकोस, माझ्याबरोबर माझा मेव्हणा आहे.' जोरावरमलजी फार भिडस्त आणि लाजाळू होते. पण भूरीबाई कुठली जुमानायला? ती रडत ओरडत आणि मधून मधून शिव्या घालीत मागून येत राहिली. शिव्यांमुळें संतापून कांहीं रजपुतांनीं तिला चांगलाच धाक घातला. पण जमनालालजींनीं मध्यें पडून परिस्थिति सांभाळून घेतली. हे लोक आपल्या मुक्कामावर—म्हणजे हिरालाल रामगोपाळच्या वाड्यांत आले. जोरावरमलजींना जमनालालजींनीं आपल्याबरोबर आपल्या खोलींत झोपवलें. खालीं पहारा होताच. बराच वेळपर्यंत भूरीबाई आरडत राहिली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मग ती ठाण्यावर गेली. पण तिकडेहि कुणीच तिचें म्हणणें ऐकून घेतलें नाहीं. तेव्हां ती पुन्हां येऊन रडूं लागली. आतां मात्र जमनालालजींना तिची दया आली.

त्यांनीं काय हवें म्हणून विचारलें. ती म्हणाली, 'मला माझ्या मुलाचें तोंड पाहूं द्या!' पण तेवढ्यानें तरी जाशील ना असें विचारल्यावर ती म्हणाली, "मला त्याच्याशीं एक तासभर बोलूं द्या." पुन्हां यांनीं तिला विचारलें, मग तरी जाशील ना? यावर ती म्हणाली, 'मला माझ्या घरीं तासभर जोरावरशीं बोलायचें आहे; त्याला पाठवून द्या. नंतर मीं त्याला परत पाठवीन.' तेव्हां चार माणसें बरोबर देऊन जोरावरमलजींना त्यांनीं भूरीबाईबरोबर पाठवून दिलें आणि बोलणीं आटोपल्यावर परत आणलें.

जमनालालजी दुसऱ्याच दिवशीं सीकरला आणि तिकडून वर्ध्याला रवाना झाले. केशरबाई आणि मी बंद बैलगाडींत बसलों. जोरावरमलजी आणि जमनालालजी उंटावर बसले. भूरीबाई कांहीं वेळ मागून येत राहिली आणि म्हणूं लागली, "जमनालालजी, आतां मी तुमच्या बहिणीला सुखांत ठेवीन. तुम्ही जोरावरला आणि तुमच्या बहिणीला माझ्याजवळ ठेवून जा. माझ्यावर दया करा हो!" जमनालालजींनीं म्हटलें, "माईजी, आम्हांला एकदां वर्ध्याला तर जाऊं द्या. नंतर तुमच्याकडे पाठवून देऊं."

आम्ही मंडळी सीकरला आलों आणि तेथें माझ्या सासू-सासऱ्यांचे आशीर्वाद घेऊन वर्ध्याच्या वाटेला लागलों.

वर्ध्याला मी केशरबाईला उत्तम प्रकारें न्हाऊं माखूं घालणें, रंगीत छापाच्या साड्या नेसवणें आणि नीटनेटकें राहणें वगैरे गोष्टी सुरू करवल्या. उभयतां पतिपत्नींत तसें कांहींच बिनसलें नव्हतें. सारा अडसर घातला होता तो भूरीबाईनें. हळूहळू दोघेंहि प्रेमानें आणि उत्तम तऱ्हेनें नांदूं लागलीं. महिनाभरांतच भूरीबाई वर्ध्याला आली आणि गांवांत वेगळी राहून जोरावर-केशरना आपल्याबरोबर पाठवावें म्हणून खटपट करूं लागली. पण तिचें म्हणणें कुणी मानलें नाहीं. कांहीं दिवसांनंतर जमनालालजींनाच वाटलें कीं जोरावरमल आणि केशरबाई यांना एक वेळ पाठवणें योग्य होईल. त्यांनीं जोरावरमलजींना जायला सांगितलें. निघतांना जमनालालजी जोरावरमलजींना म्हणाले, "तुमच्या आईला आणि केशरला योग्य रीतीनें सांभाळण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. थोडे दिवस गांवीं राहून तुम्हीं दोघांनाहि मुंबईला घेऊन या. तिकडे व्यापारधंदा करण्याबाबत कांहीं विचार करूं."

कांहीं महिने गांवीं राहून ते मुंबईला आले. पांच सहा वर्षेपर्यंत ते तिकडे

पोटापाण्याचा व्यवसाय करीत असत आणि अधून मधून गांवीं जाऊन येत. दरम्यान त्यांना तीन मुलें झालीं. त्यांची नांवें ठेवलीं होतीं प्रल्हाद, नर्मदा आणि श्रीराम. पुढें त्या सगळ्यांना वर्ध्याला बोलावून आणलें. ही मंडळी वर्ध्याला आल्यामुळें आम्हांला फार आनंद झाला. लग्नानंतर मी एकटीच राहात होत्यें. जेव्हां मी माझे मामेसासरे बिरदीचंदजी पोद्दार यांच्याकडे जात असें तेव्हां त्यांचें घर कसें भरलेलें दिसे. केशरबाईच्या येण्यानें आमच्या घरांत माझीं तीन आणि केशरबाईचीं तीन अशीं सहा मुलें झालीं. घर गजबजून जाऊन भरल्यासारखें वाटूं लागलें आणि केशरबाईच्या वास्तव्यामुळें माझा एकाकीपणा दूर झाला. मी केशरबाईला लिहिणें वाचणें आणि शिवणें टिपणें मोठ्या आवडीनें शिकवूं लागल्यें. गांवांतल्या आणखी पांचदहा मुलीहि येऊं लागल्या.

मी सैंपाकघरांतून वरच जेवण मागवीत असें आणि सगळ्या मुलांना बरोबर बसवून भरवीत असें. प्रल्हाद सर्वांत अधिक देखणा होता. त्याचा चेहरा फारच आकर्षक वाटायचा. मुलांचें शिक्षण घरीच सुरूं झालें. शिकवण्याची खोली निराळीच करण्यांत आली. एक पंतोजी तर घरींच राहात होते. बाहेरूनहि मास्तर शिकवायला येत. अशा रीतीनें सगळ्यांचा वेळ आनंदांत जाऊं लागला.

एकदां जमनालालजी कुठें बाहेर गेले होते. दरम्यान जोरावरमलजी आजारी झाले. त्यांना विषमज्वर झाला. बाळारामजी चुडीवाले जमनालालजींचे मामेबंधु होते. वयानें सर्वांत वडील आणि समजूतदार होते. त्यांच्या सल्ल्यानें वैद्याचा इलाज चालला. इलाजांत कांहींच उणें पडूं दिलें नाही तरीदेखील जोरावरमलजींची प्रकृति दिवसें दिवस खालावतच गेली. आम्ही सारीं काळजींत तर होतोंच पण आतां आमची घबराट झाल्यासारखी झाली. जमनालालजींना सारा समाचार देण्यांत आला आणि त्यांना ताबडतोब येण्याबद्दल लिहिलें. ते आले, पण तोंपर्यंत त्यांची तब्येत अधिकच बिघडली होती. वांचण्याची कोणतीच आशा राहिली नाहीं. अंतसमय जवळ आला. जमनालालजी जोरावरमलजीच्या जवळ बसले होते तेव्हां त्यांनीं केशरबाईकडे कष्टी नजरेनें पाहिलें आणि त्यांच्या मुद्रेवरून ते मुलांच्या विचारानेंहि सचिंत आहेत असें दिसलें. जमनालालजीनीं जोरावरमलजीना सांगितलें, तुम्हीं धीर धरला पाहिजे आणि केशर आणि मुले यांचा कसल्याच प्रकारचा घोर वाहतां कामा नये. तुमच्या आणि माझ्या मुलांना मी सारखेच सांभाळीन.'

जोरावरमलजींना तसा विश्वास तर होताच. तरीदेखील जमनालालजींच्या अशा प्रकारच्या सांगण्यानें त्यांना पुष्कळ दिलासा वाटला असें दिसलें. मी केशर-बाईला जवळ बोलावून जोरावरमलजींच्या पायाचा अंगठा धुऊन चरणामृत प्यायला लावलें. जमनालालजींचे थोरले बंधु माधवजी—राधाकृष्णचे वडील—पांच वर्षे आधीं २७ वर्षांच्या ऐन उमेदीच्या वयांत याच आजारानें वर्ध्याला निधन पावले होते. तो घाव अजून ताजाच होता. पुरता भरलाहि नव्हता तोंच जोरावरमलजीहि निघून गेले! केशरबाई मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळली. आम्हां मंडळीवर तर दु:खाचा कडाच तुटून पडला. जमनालालजींनाहि मोठाच धक्का बसला. घरांत आईवडिलांना पुत्रशोकाचें दु:ख होतें. शिवाय वहिनी विधवा होती. आतां विधवा वहिणीचें दु:खहि दत्त म्हणून पुढें उभें राहिलें! पण उपाय काय होता? मला तर ही जखमेवर जखम होती. नीट बोधच होईना. मी सुन्नच झाल्यासारखी झाल्यें. थोडेच दिवस आधीं किती आनंदांत राहिलों होतों आम्ही! एकाएकीं सामसूम व्हावी असें झालें तरी काय? सारें कुटुंब दु:खानें विव्हळ होऊन गेलें.

जमनालालजींनीं दिलेलें आश्वासन पाळण्याचें भान आयुष्याच्या अखेरी-पर्यंत चालू ठेवलें. आपल्या स्वत:च्या मुलांकडे नोकरचाकर देखील लक्ष देतात म्हणून सुद्धां जमनालालजी आपल्या मुलांपेक्षांहि वहिणीच्या मुलांची अधिक काळजी घेत असत. मला तर जमनालालजी वारंवार सांगत कीं केशर दु:खी आहे, तेव्हां तिच्याकडे आणि तिच्या मुलांकडे आपल्याला अधिक लक्ष दिलें पाहिजे. हें आश्वासन जोरावरमलजींना त्यांनीं अंतसमयीं दिलेलें आहे ही गोष्ट माझ्या विशेष ध्यानांत राहिली होती. केशरबाई कोणत्याहि प्रकारें दुखावली जाऊं नये म्हणून नेसण-पांघरूण, खाणें पिणें, चालचलणूक वगैरे सर्व बाबतींत मी साधेपणा पाळीत होत्यें. सगळ्या मुलांना एकच वस्तु आणि ती देखील समान प्रमाणांत वांटून दिली जाई. खाण्यांत, पोषाखांत वगैरे केशर-बाईच्या मुलांत आणि माझ्या मुलांत किंवा मुलींत कसल्याच प्रकारचा भेदभाव पाळला जात नसे. तसा प्रसंग आलाच तर मी माझ्या मुलांना उणें करीं. कां, तर केशरबाईला कोणत्याहि प्रकारची कमतरता जाणवूं नये. माझी मधली मुलगी मदालसा सोडल्यास माझ्या इतर मुलांच्या मानानें केशरबाईचीं मुलें अशक्त होतीं. आणि नर्मदा तर विशेषच. आईची स्वाभाविकच दुबळ्या मुलावर

अधिक मायाममता असते आणि ती त्याच्या खाण्यापिण्याकडे अधिक लक्ष देते आणि त्याची अधिक काळजी वाहते. ह्याच कारणामुळें केशरबाई नर्मदेची विशेप काळजी घेत असे आणि तिनें चांगलें खाऊनपिऊन सुदृढ व्हावें म्हणून तिला दूध किंवा पौष्टिक अन्न देण्याचा तिचा प्रयत्न असे.

माझ्या मुलांना आरंभापासूनच दूध गाळून पिण्याची सवय असल्यामुळें त्यांना साईची आवडहि नव्हती आणि असल्या गोष्टींची दादहि नव्हती. पण नोकरांना यांत भेदभाव वाटे आणि ते त्याची चर्चा करीत. जमनालालजींच्या मुलांनीं साईवेगळें दूध प्यावें आणि या सर्वांनीं साय खावी हें विशेषत: जुन्या नोकरांना पसंत नसे आणि ते आपल्या परीनें माझ्या मुलांना चांगले पदार्थ खाऊं घालण्याची खटपट करीत. मला या गोष्टीचा पत्ता लागू नये म्हणूनहि ते दक्ष असत, पण कधीं मुलांच्या सांगण्यावरून तर कधीं अन्य घटनांमुळें अशा प्रकाराच्या गोष्टी समोर येत. या असल्या गोष्टी चढवून वाढवून सांगणारेहि कांहीं नोकर होते. त्यांत कधीं त्यांच्या संकुचित स्वभावाचा दोप राही तर कधीं भांडणें लावण्याची वा कटुता वाढवण्याची इच्छा दडलेली असे. प्रारंभीं माझ्या मनावरहि असल्या गोष्टीचा कांहीं परिणाम होत नसे आणि मी नोकर-चाकरांना धमकावीत असें. जमनालालजींसमोरहि एकादी कागाळी आली तर ते केशरबाईच्या मुलांचाच कैवार घेत. पण कालांतरानें माझ्याहि मनावर थोडा परिणाम होऊं लागला आणि केव्हां केव्हां वाटे कीं जमनालालजी धरून घरांतले सगळेच लोक केशरबाईच्या मुलांचाच कैवार घेत आहेत. अशा प्रकारचे भाव माझ्या मनांत येऊं लागले कीं मीं ते बाजूस काढण्याचा प्रयत्न करीत असें. अशा प्रकारचा भाव माझ्या मनांत डोकावला हें कुणाला कळेल अशी देखील भीति मला वाटायची. म्हणून हें मी कुणाला सांगतदेखील नसें. त्यामुळें मनांत एक प्रकारचा झगडा सुरू झाला आणि त्यामुळें माझ्या नणंदे-विपयीं माझ्या मनांत जें स्वाभाविक प्रेम होतें त्यांत कमतरता आली. माझें सर्व चांगलें चाललें आहे आणि केशरबाईवर दु:ख कोसळलें आहे हें मलाहि कळत होतें. तेव्हां तिच्यासाठीं किंवा मुलांसाठीं कांहीं थोडे अधिक केलें केलें तर तें उचितच होतें. आरंभींच मला विश्वासांत घेऊन हें सारें माझ्यावरच सोपवण्यांत आलें असतें तर माझ्या मनावर कदाचित् अशी वाईट प्रतिक्रिया झाली नसती. जमनालालजींचें मन निर्मळ होतें आणि हेतु शुद्ध होता. कित्येकदां ते धर्मसंकटांत

पडत आणि दुसरीकडून चूक झाली तर माझीच समजूत घालीत. त्याचा माझ्यावर परिणामहि होई. पण महिन्याचे महिने त्यांना बाहेर जावें लागे. आणि पुढें पुढें बाहेरगांवचें राहणें जास्त जास्त होत गेलें. थोडेबहुत घरीं राहिले तरी त्यांचा अधिक वेळ इतर कामांत जाई. घरच्या कामासाठीं किंवा मुलांशीं बोलण्यासाठीं त्यांना फुरसतच मिळूं शकत नव्हती. कधीं थोडी सवड असलीच तर मला वाटायचें कीं ते थकलेले आहेत, त्यांना घरच्या गोष्टींत गुंतवून आणखी त्रास कां द्या? अशा रीतीनें महिन्याचे महिने आणि कधीं कधीं तर वर्षानुवर्षें देखील अशा प्रकारच्या गोष्टी केल्याशिवाय गुदरत. आम्हां मंडळींत गैरसमज निर्माण व्हायला आणि आमच्या प्रेमांत दुरावा यायला हेंहि एक कारण होतें. माझ्या स्वभावांत आपपरभाव फारसा नव्हता पण एक प्रकारचा कंजूपपणा होता. माझें मन जमनालालजींसारखें उदार नव्हतें आणि कधीं मनात उदारता आली तरी ती त्यांच्याप्रमाणें सदासर्वदा टिकत नसे. माझ्यांत रागहि अधिक होता. आणि सहनशीलताहि थोडी कमी होती. माझ्या स्वभावाचे हे उपजत दोष होत आणि माझ्या नणंदेंतहि कांहीं व्यक्तिगत उणीवा होत्या. घरच्या इतर लोकांनीं आणि नोकरचाकरांनींहि, विशेषत: जमनालालजींच्या दीर्घ अनुपस्थितीमुळें, आमच्या या उणीवांत गैरसमजानें भरच पाडली आणि त्यांतून अनुचित फायदा काढण्याचा प्रयत्न केला.

संस्कार तर आम्हांला पूज्य बापूजी, विनोबाजी आणि जमनालालजी यांचे मिळाले होते आणि ते सर्व प्रकारें चांगले होते पण आमचे स्वभावदोषहि तितकेच प्रबळ होते. विचारांतीं सगळें कांहीं समजत होतें पण वृत्ति त्यांच्याशीं जुळवून घेणें सोपें नव्हतें. जेव्हां या मंडळीपैकीं कुणालाच निरंतर संपर्क दीर्घकाळपर्यंत मिळत नसे तेव्हां माझ्यांतल्या उणीवा माझ्यावर स्वार होत. या सर्व कारणांमुळें माझा अहंकार दुखावला. मला स्वत:ला नीट सांभाळून घेतां येईना आणि मलाहि, अल्पांशानें कां होईना, या भेदभावानें स्पर्श केला. पूर्वीप्रमाणें अजून देखील घरांतला जिन्नस सगळ्यांना सारखा वांटला जात असे; पण विचारांत जी एक प्रकारची निर्मळता होती, ती राहिली नाहीं. सगळ्यांना एकच जिन्नस जर सारखा वांटायचा तर तो साधाच कां नसावा असाहि विचार मनांत यायचा. घरांतलें वातावरणच असें होतें कीं कुणाच मुलाला दागदागिने घालण्यांत हौस नव्हती. पण माझ्या मनांत असाहि भाव यायचा कीं घरच्या

मुलांसाठीं घडवलेले दागिने कांहीं झालें तरी घरांतच राहायचे आहेत, पण केशरबाईच्या मुलांसाठीं केलेले प्रसंगाला घरच्या कामीं थोडेच येणार आहेत !

माझ्या सवयी संकुचित होत्या हें खरें आहे पण तरी देखील माझ्या मुलांनीं आणि मीं दागिने घालावे आणि केशरबाईनें आणि तिच्या मुलांनीं ते घालूं नयेत असें मला चुकूनहि कधीं वाटलें नाहीं. कधीं मनांत थोडा दुजाभाव आला तरी तो वाईट आहे असें मी नेहमींच मानीत आल्यें आणि मुलांवर त्याचा परिणाम होऊं नये अशी काळजी घेत आल्यें. मुलांवर उत्तमांतले उत्तम संस्कार घडावे ही माझी मनापासूनची इच्छा होती. विचारांनीं हें मला पटलें होतें आणि तसा माझा प्रयत्नहि चाले ; पण स्वभावांतल्या वैगुण्यांमुळें जितकें सुंदर वातावरण मला निर्माण करायला हवें होतें तितकें मला साधत नव्हतें. मी कित्येकदां मनाशीं म्हणें, मी आपलें मन मोठें करीन आणि पूर्वीसारखी दुजाभाव न बाळगतां वागेन ; पण एकादी गोष्टच अशी घडून यायची कीं जिच्या-मुळें आपल्या विचाराप्रमाणें वागण्यांत अडचण यायची.

केशरबाईलाहि तसा खास लोभ नव्हता आणि मला दुखवण्याची तिची इच्छा नव्हती. नोकर-चाकरांमुळें अशा प्रकारचें थोडें दूपित वातावरण निर्माण झालें तर ती जमनालालजींना म्हणे, "भाईजी, मला वेगळी राहूं दे. मी शंभर रुपयांत महिन्याचा खर्च भागवीन. पण मला या नोकरांच्या कटकटींतून सोडव. वहिनीलाहि त्रास होतो हें बरें नाहीं." पण जमनालालजींना आपल्या बहिणीनें आणि तिच्या मुलांनीं निराळें राहावें ही कल्पनाहि असह्य झाली. आम्हीं उभयतां नणंद-भावजयीनें प्रेमानें मिळूनमिसळून राहावें असाच त्यांचा प्रयत्न असे. त्यांनाहि मी दुःखी झालेलें नको होतें. सगळींच आपापल्या परीनें दुसऱ्याच्या सुखाची आणि भावनांची काळजी घेत, पण व्यवहारांत अशी कांही परिस्थिति निर्माण झाली होती कीं तिच्यांतून प्रत्येकाच्या पदरीं कांहीं ना कांहीं असंतोषच पडे. आमच्यामधला हा गैरसमज साबरमती आश्रमाच्या दीर्घ मुदतीच्या एकत्र वास्तव्यामुळें वाढला आणि जेव्हां आम्ही वर्ध्याला येऊन बजाजवाडींत राहूं लागलों तेव्हां तर त्यांत जास्तच भर पडली. वीसपंचवीस वर्षें आम्ही एकत्र राहिलों. आतां मुलेंहि मोठीं झालीं होतीं. तुरुंगवास आणि अन्य कामें यांच्यामुळें जमनालालजींचें घरचें वास्तव्य कमीच होत गेलें. आम्हां मंडळीची सहनशक्ति अपुरी पडायला हेंहि एक कारण होतें.

जमनालालजींचें मन मोठें होतें. आपल्या मुलांपेक्षांहि आपल्या बहिणीच्या मुलांची सगळ्यांनीं अधिक काळजी घ्यावी असें नेहमी त्यांना वाटत असे. या बाबतींत त्यांच्या प्रयत्नांच्या मानानें त्यांना सफलता मिळूं शकली नाहीं. मला वाटत होतें कीं त्यांच्या शब्दासाठीं सर्वस्व अर्पण करावें पण आरंभीं पैदा झालेल्या छोटया छोटया गोष्टींनीं स्वभाव बनून गेल्यासारखा झाला आणि आम्ही सर्व त्याच्या आहारीं जात राहिलों.

माझे मामंजी कनीरामजी म्हणत, 'केशर, तूं जमनचें म्हणणें ऐकूं नकोस, दुःखी होशील.' व्यवहारदृष्टया त्यांना असें वाटे कीं केशरबाईनें आपल्या भावावर विसंबण्याऐवजीं ती माझ्यावर विश्वास टाकून वागली तर तें तिच्या हिताचें होईल. कारण घरचे व्यवहार शेवटीं स्त्रियांच्याच हातीं असतात. माझ्या डोक्यांत दुसरी हीहि गोष्ट होती कीं ह्यांनीं आपल्या पुतण्याला—राधाकृष्णला विनोबाजींच्या आश्रमांत ठेवलेलें होतें. राधाकृष्ण म्हणे कीं आपल्याला लग्न करायचें नाहीं आणि जमनालालजी त्याचें लग्न जमवण्याचा प्रयत्नहि करीत नसत. त्यामुळें साहजिकच अशी भीति वाटायची कीं जमनालालजी प्रल्हाद-कमलला देखील अविवाहितच ठेवतील कीं काय ? प्रल्हाद मोठा होता. तो जेव्हां गांवीं गेला तेव्हां त्याची सोयरगत जमनालालजींना विचारल्याशिवायच ठरविण्यांत आली. ती त्यांनीं मोडायला लावली. एक म्हणजे मुलगी शिकलीसवरलेली नव्हती आणि ती मंडळी जुन्या मताची होती. शिवाय मुलगी उफाडयाची होती आणि प्रल्हाद तेव्हां पोरच होता. जेव्हां प्रल्हाद आणि कमल लग्नाच्या वयाचे झाले तेव्हां सांगून आलेल्या सगळ्या मुली आधीं प्रल्हादसाठीं विचारांत घेण्यांत आल्या आणि त्या दृष्टीनें बोलणीं होऊं लागलीं. त्याचें लग्न श्री. सीतारामजी सेक्सरियांची मुलगी पन्ना हिच्याशीं ठरविण्यांत आलें. मग नर्मदा आणि मदालसा यांच्या लग्नाची गोष्ट होती. मदालसा तर मुलखावेगळीच होती आणि ती लग्नाला कबूल होईल कीं नाहीं याचा भरंवसाच नव्हता. पण जितक्या सोयरगती आल्या त्या सगळ्या जमनालालजींनीं आधीं नर्मदेला दाखवल्या. नर्मदेला योग्य स्थळ मिळालें तेव्हां कुठें मदालसेचें लग्न ठरवायला वाट मोकळी झाली.

दरम्यान बजाजवाडींत केशरबाई आणि मुलें यांच्यासाठीं एक घर बांधण्यांत आलें. कां, तर तिला आपल्या लेकांमुलांसह स्वतंत्रपणें संसार थाटतां यावा

आणि आमच्या जवळपासहि राहतां यावें. कित्येक वर्षेंपर्यंत केशरबाई त्यांत राहिली. नंतर मुलांच्या कामधंद्यापायीं तिला मुंबईला आणि कलकत्त्याला राहावें लागलें. त्यामुळें केशरबाईनें घर परत करण्याची इच्छा दर्शवली आणि तें घर पाहुण्यांसाठीं म्हणून घेण्यांत आलें.

जेव्हां मी माझ्या गतायुष्याच्या सगळ्या गोष्टींची मनांत उजळणी करत्यें त्यावेळीं किती क्षुद्र कारणांवरून आमच्यांत गैरसमज माजले आणि त्यांतून क्लेश वांट्याला आले हा विचार मला सारखा जाणवतो. थोडा समजूतदारपणा आणि विवेक ठेवून लहानमोठ्या गोष्टी कानामनावर न घेतां सहन केल्या तर त्यामुळें आपसांतलें प्रेम, सद्‌भाव आणि आदर वाढतो आणि त्यांत एक प्रकारचें अपूर्व समाधान आणि सुख प्राप्त होतें.

●

## २८. *साबरमतीच्या आश्रमांत*

नागपूरच्या झेंडा सत्याग्रहानंतर आम्हीं मंडळी साबरमती-आश्रमांत राहायला गेलों. जमनालालजींना वाटलें कीं आश्रमांत राहिल्यानें मुलांच्या विकासासाठीं उत्तम शैक्षणिक वातावरण मिळेल, हातानें काम करण्याची सवय लागेल आणि मलाहि थोडें घरसंसाराचें शिक्षण मिळू शकेल.

माहेरीं तर मला कसलेंच काम करावें लागलें नाहीं, आणि वर्ध्याला सारीं कामें नोकरच करीत. अशा प्रकारें माझ्या जीवनांत व्यवस्थितपणा आलाच नाहीं. जमनालालजींना माझ्या सवयी आणि वैगुण्यें चांगलीं माहीत होतीं आणि त्यामुळें ते बेजारहि होत. माझी नणंद केशरबाई तर थट्टेनें नेहमींच म्हणे, 'पुरुषाऐवजीं तुला बाई केलें ही विधात्याचीच चूक!' म्हणून साबरमतीला जाण्याचा प्रश्न निघाल्यावर जमनालालजींनीं बापूजींना सांगून टाकलें कीं आश्रमाच्या नियमांप्रमाणें वागून जानकीदेवीचा निभाव लागणें कठीण होईल. म्हणूनच बापूंनीं सर्व गोष्टींचा विचार करून आश्रमाच्या हद्दीबाहेर, लाल बंगल्याच्या जवळ एक घर दिलें आणि सांगितलें कीं वेगळ्या घरांत राहिल्यानें जानकीदेवी सर्व नियमांच्या सक्तींतून बचावेल आणि निकट संपर्कामुळें वाता-

वरणाचा लाभ मिळून हळूहळू नियमपालनाच्या दिशेनें तिला वाटचाल करतां येईल.

आम्हीं ऐकलें होतें कीं आश्रमांत साप, विंचू वगैरे कोणताच प्राणी मारला जात नाहीं. तिकडे कुत्रेहि पुष्कळ होते. प्रत्येक क्षणीं कुत्र्यांचा त्रास असायचा. मला तर जास्तच त्रास व्हायचा. वर्ध्याला आम्ही बंगल्यांतल्या वरच्या मजल्या-वर राहात असूं. खालीं अंगणांत पहारा असे. दारें वगैरे लावून टाकण्याची आमची सवय नव्हती. आश्रमाच्या कोठींतून आम्ही सामान आणीत होतों आणि इकडेतिकडे ठेवून देत होतों. पण कुत्रे येत आणि सामान घेऊन जात. अशा रीतीनें कुत्रे मिळून मिसळून गेले होते. एके दिवशीं आमचें एकादशीचें व्रत होतें. शहर आश्रमापासून चार मैल अंतरावर होतें. नोकर फळें वगैरे आणण्यासाठीं शहरांत गेला होता. संध्याकाळ होत आली होती. मी आणि माझी नणंद गुलाब-बाई यांनीं विचार केला कीं विहिरीवरून पाणी घेऊन यावें. काळोख पडूं लागला होता. आश्रमांत जाण्यायेण्याच्या धांवपळीमुळें भूक जोराची लागली होती. व्हरांड्यांत सगळी तयारी ठेवली होती. भगीरथ फळें घेऊन येतांच आम्ही फराळ करणार होतों. इतक्यांत रामकृष्णनें पाण्यांत चप्पल टाकली. तो त्यावेळीं तीन चार वर्षांचा होता. आतां काळोखांत पाणी आणायला कोण जाणार? ‘अब्रह्मण्यं’ म्हणून डोळ्यांवर हात धरून आम्ही पाण्याची चिंता करूं लागलों. तोंच एक कुत्रा आला आणि समोरच्या दुधांत जीभ घालून तें पिऊं लागला. आतां दूध कुठून मिळणार अशा चिंतेंत होतों तोंच दुसऱ्या कुत्र्यानें सुक्या अंजि-रांची माळ उचलून पोबारा केला! तोंच तिसरा कुत्रा आला आणि त्यानें पपई पळवली. एक म्हणजे एकादशीच्या फराळाचा घोटाळा आणि त्यांत सायं-प्रार्थनेची वेळ झालेली. प्रसंग तर विचित्र आला.

रात्री व्हरांड्यांत आम्ही सगळीं आणि पांचहि मुलें जमिनीवरच झोंपत होतों. सर्वांसाठीं खाटा मिळणें कठीण होतें. आणि आम्हांलाहि खाटा वापरण्याची इच्छा नव्हती. पण सापा-विंचवांचें भय तर होतेंच. सकाळच्या प्रार्थनेची वेळ झाली कीं आम्ही मुलांच्या अंगावर चादरी पसरून जात असूं. प्रार्थनेहून परतलों कीं त्यांच्याजवळ खरूज झालेलीं रोगी कुत्रीं झोंपलेलीं पाहून मोठी किळस यायची.

स्वैंपाकघरहि बंद करून ठेवण्याचा आमचा प्रघात नव्हता. काढलेलें लोणी

तपेलींत ठेवून कोठींत दुसरें सामान आणायला गेलों तर इकडे कुत्रे येऊन लोणी पळवीत. लोण्याची तपेली पाहायला गेलों तर तिकडे दुसरा कुत्रा गुळाचा खडा लांबवायचा. गुलाबबाई होती मोठी हुषार. पण आश्रमाच्या नव्या जीवन-क्रमांत तिची अक्कल आणि शरीर देखील काम देऊं शकत नव्हतें. एके दिवशीं आश्रमाची वेलाबहन दुपारचें खाणेंपिणें आटोपून आमच्याकडे आली. आल्या-बरोबर तिनें म्हटलें, 'काय तुमचें अजून जेवण देखील झालें नाहीं ? चला. मी, पोळ्या करून देतें.' याला मी कबूल झाल्यें. मी चण्याचें पीठ दळून आणलें तेव्हां कुठें जाऊन कढी तयार केली. वेलाबहन पोळ्या तयार करून जाऊं लागली तोंच एक कुत्रा जीभ काढीत आला आणि तोंडांत मावतील तितक्या पोळ्या उचलून पळून गेला ! आम्ही सर्व आधल्या दिवसाचे उपाशी होतों ; राहिलेल्या पोळ्यांवर आम्हीं कशीवशी भूक भागवून घेतली. या साऱ्या गोष्टी वेलाबहननें किशोरलालभाईंच्या कानांवर घातल्या. त्यांनीं आपले गुरु केदारनाथजी यांना बघून यायला सांगितलें आणि म्हटलें, 'जमनालालजी स्वत:तर नोकराला बरोबर घेऊन दौऱ्यावर असतात आणि बायामुलांना ते नोकर-स्वैपाक्याशिवाय एकटे सोडून गेले आहेत.' मला वाटतें कीं जमनालालजी हें जाणून बुजूनच करीत होते. कारण ते म्हणत कीं स्त्रियांना घरचा स्वैपाक आपल्या हातांनीं करतां आलाच पाहिजे मला स्वैपाक करतां यावा म्हणून ते स्वैपाक्याला आपल्याबरोबर घेऊन जात.

नाथजी येऊन पाहतात तर दोन कुत्रे एका खोलींत, दोन दुसऱ्या खोलींत आणि बाकी व्हरांड्यांत हजर आहेत ! त्यांनी लहान लहान दगडांची रास रचली आणि कुत्र्यांवर दगड मारायला सुरुवात केली. ते दगड अशा बेतानें मारूं लागले कीं कुत्र्यांना ते लागू नयेत पण त्यांनीं भिऊन मात्र जावें. कुत्रे खरोखरच इतके घाबरून गेले कीं ते परत येण्याचें विसरूनच गेले आणि आम्हीहि हा धडा शिकून घेतला. मुलांनाहि हें एक नवें शस्त्र सांपडलें. बाह्य कठोरतेच्या पोटचा हा नम्रतेचा गुण आम्हांला प्रत्यक्ष पाहायला मिळाला.

आश्रमांत वेळांप्रमाणें वारंवार घंटा होत असत. पण आम्हांला वेळेचें भान मुळींच राहात नसे. घंटा वाजली की धांवपळ व्हायची आणि आम्ही विस्कटलेले केस घेऊन आणि अव्यवस्थित कपड्यांतच कसेबसे तिकडे पोंचत असू. आमची ही दशा पाहून सर्वांनाच दया यायची आणि हंसूदेखील. नदीवर स्नानासाठीं

जात असूं तेव्हां मुलांना आम्ही आधीं पाठवीत असूं. कमला रडत रडत आणि कपडे खालीं पाडीत जायची. इतर माणसें कपडे उचलून नेत. नदीवर आम्ही कपडे धूत असलों तर तिकडे घंटा वाजत असायची.

एक दिवस कलमनयन काका कालेलकरांच्या वर्गात चालला होता तो अर्ध्या वाटेवरूनच परत आला. म्हणाला, रस्त्यांत साप आहे. मी म्हटलें साप एव्हांना गेलाहि असेल. हें ऐकून कमलनयम वर्गात गेला खरा पण त्या रस्त्यानें जाण्याची माझी हिंमत होईना. दुसऱ्या रस्त्यानेंच वर्गाला गेल्यें. मी अशी घाबरत होत्यें आणि तरी देखील मुलें निर्भय व्हावीं अशी इच्छा बाळगीत होत्यें !

कांहीं दिवसांनंतर आश्रमांत वेगवेगळीं स्वयंपाकघरें बंद करण्यांत येऊन एक सार्वजनिक स्वयंपाकघर सुरू करण्यांत आलें. त्यांत गायीचें दूध-तूपच वापरण्याचा नियम होता. सर्वानुमतें हा नियम ठरविण्यांत आला होता. जमनालालजी मला म्हणाले, 'तूं वर्ध्याला जा. कारण एक तर सगळ्यांसाठीं एक सैंपाकघर झालें आणि दुसरें असें कीं श्रीमंतांना इथें राहतां येत नाही.' तेव्हां मी म्हटलें, 'संपत्तीची गोष्ट काय ती तुम्हांला माहीत, मला तर रसोड्यांत आयतें जेवण मिळेल. माझी सैंपाक करण्याची पीडाच मिटली.' जेव्हां आम्ही रसोड्यांतलें जेवण घेण्यासाठीं जात असूं तेव्हां पहिल्या घंटेला न पोंचलों तर दुसरी घंटा होईपर्यंत आम्हांला बाहेर उभें राहावें लागे.

मी जेवत असें फार सावकाश. इतर स्त्रिया तर जेवण आटोपून धान्य वगैरे निवडायला बसत आणि शिवाय आपल्याकडच्या मुलांसाठीं दुधाची वेळ झाल्यावर दुधासाठींहि येत. मी मात्र जेवतच बसलेली असायची. त्यामुळें माझा धान्य वगैरे निवडण्याचा वेळ जेवणांतच जायचा.

एक दिवस जेवणानंतर मी दुधासाठीं रसोड्यांत उभी होत्यें. दुसऱ्या बाया म्हणाल्या, पुढें व्हा आणि घ्या. असें उभें राहून तुम्हांला इथें दूध कोण देणार ? धान्य निवडण्याची वेळ तर टळून गेली. आतां वर्गात तर गेलेंच पाहिजे. तेव्हां दूध घेऊन लगेच जाणें आवश्यक होतें. दुधाची तपेली ताटांत ठेवून मी चालल्यें होत्यें. त्यामुळें ती सारखी डळमळत राहिली. दुधासाठीं मी लोटा आणायला हवा होता. मी ताट दोन्ही हातांत घट्ट पकडून चालल्यें होत्यें तोंच समोरून गोगाळेंतील गायींची झुंड आली. मी घाबरल्यें आणि शेताच्या निवडुंगाच्या कुंपणाजवळ जाऊन उभी राहिल्यें. मागून एक गाय आली आणि तिनें माझ्या

दोन्ही पायांमधून शिंग खुपसलें. ताट घेऊन मी कांपत राहिल्यें होत्यें आणि दूध सांडूं नये याचीहि मला काळजी होती. मी तर आतां पडत्यें कीं नंतर पडत्यें अशा मनःस्थितींत होत्यें. निदान ताट खालीं टाकून देऊन एक तरी हात मोकळा ठेवावा एवढी देखील शुद्ध मला राहिली नाहीं. तेवढ्यांत दुसरीकडून गुराखी आला आणि त्याला पाहून गायीनें हलकेच शिंग काढून घेतलें. तेव्हां कुठें जिवांत जीव आला.

त्यावर्षी पाऊस खूप झाला होता. साबरमती नदीला पूर येण्याचा संभव होता. सरदार पटेल पुराची वार्ता घेऊन आश्रमांत आले आणि म्हणाले, कीं आश्रम खाली करण्याची सूचना मिळाली आहे. बापूंनी प्रार्थनेंत सगळ्यांना सांगून टाकलें, 'ज्याला कुणाला थोडें देखील भय वाटत असेल त्यानें अहमदाबाद शहरांत किंवा अन्य कुठेंहि खुशाल जावें. लाजण्याची जरूर नाहीं. आणि ज्यांना इथें राहायचें असेल त्यांनीं इथें राहावें. मी तर इकडेच राहणार आहें. जेव्हां पूर येईल तेव्हां विद्यापीठाच्या छपरावर बसून 'रघुपति राघव राजाराम'चा जप करणार आहें.' घाबरले तर होते सगळेच ; पण बापूजींना सोडून जायला कोण तयार होणार ? मलाहि बापू म्हणाले, तुम्हांला वर्ध्याला जातां येईल. पण मी तिकडेच थांबल्यें.

नदीला तसा मोठा पूर आला नाहीं, पण पाऊस कित्येक दिवस कोसळत राहिला. साऱ्या आंगणांत पाणीच पाणी होऊन गेलें. वरूनहि पाणी गळत होतें. बाहेर पडणेंहि मुष्किल होऊन बसलें होतें. सारे कपडे भिजून गेले. सामानहि भिजून गेलें. लक्ष्मण आचारी सैंपाक तयार करीत होता. पावसाच्याच पाण्यानें सैंपाक केला जात असे आणि प्यायलाहि तेंच पाणी वापरलें जाई. बापूजींनीं सांगून पाठविलें कीं आम्ही मंडळीनेंहि आश्रमांतच झोपावें. पण माझा धीरच झाला नाहीं. आश्रमांत तर लोक भल्या पहांटे चारांच्या ठोक्याला उठणारे होते. नियमानें राहात होते. मला तें कसें जमायचें ? किशोरलालभाईंनीं कुणाला तरी आमच्या घराशेजारीं झोपायला सांगितलें. कां, तर आम्ही पाऊस, वीज, वादळ वगैरेमुळें घाबरूं नये आणि चोरीचें भयहि राहूं नये. पण मी सांगून पाठविलें कीं मी अंगणांत पांढरी चादर पांघरून झोपत्यें, तेव्हां पहाणाऱ्यांना कुणी पुरुष झोपला आहे असेंच वाटेल. इतक्यावरहि कुणी कांहीं नेलेंच तर तो काय नेणार ? फक्त भांडीं आणि कपडे !

## २९. आश्रमांतले आणखी कांहीं अनुभव

प्रौढीनें किंवा उत्साहाच्या भरांत मी बापूजींना म्हणायचीं, मला कांहीं काम द्या. बापूजी म्हणाले, इकडे काम तर खूप आहे. जा आणि गोशाळेत झाडलोट करा. दुसऱ्या दिवसापासून मी झाडणें सुरू केलें, पण त्यापूर्वीं झाडू कधीं मीं हातांत धरला नव्हता. त्यामुळें मला पाहतांच पोरी हंसूं लागायच्या आणि म्हणायच्या, 'जा, जा, जानकीबहन, तुम्ही तर काम बिघडून ठेवाल.' याचप्रमाणें स्वयंपाक-घरांतहि पोरी हंसायच्या. म्हणायच्या, 'राहूं द्या, तुम्ही पोळी करपून टाकाल. आम्ही करूं.'आश्रमांत संडास-सफाईचें काम आश्रमवासीच करीत असत. बापूंनीं जीवनसाधनेची सुरुवात भंगीकामानें होते असें मानलेलें आहे. ज्याला या कामाचा उबग असेल, भय असेल त्यानें आश्रमांत राहणें असंभव होतें. मात्र हें पाहुण्यांना अनिवार्य नव्हतें.

आम्ही मंडळीहि शौचाला पायखान्यांतच जात असूं. मी पाहिलें कीं इकडे तर भटब्राह्मण देखील न कचरतां पायखान्याचें काम करीत आहेत. मीहि एक दिवस धाडस करून गेल्यें. मनांत उत्साह होता ना ! नाकावरून पदर बांधून घेतला आणि चालल्यें. मैल्याच्या बालद्या दांडयाला अडकवून दोन्हीं टोकें धरून दोन माणसें त्या खताच्या खड्ड्याकडे घेऊन चालली होतीं. मैल्यावर माती ओढल्यानें घाण येण्याचा किंवा घृणा वाटण्याचा प्रश्नच नव्हता. मीहि दांडयाचें एक टोंक पकडलें आणि भीत भीत तोंड वळवून तो खड्ड्यापर्यंत पोंचवला. मी मैला उचलण्याचें आणि पायखाना साफ करण्याचें काम तर करून टाकलें पण बालद्या पोंचवून परतल्यावर मी अंग घांसून घांसून आपादमस्तक स्नान केलें आणि शेण लावून हातपाय शुद्ध केले ! संडास-सफाईचा हा माझा पहिलाच प्रसंग होता !

मारवाडी समाजांत सौभाग्यवती स्त्रिया लाखेच्या बांगडया वापरीत असत. पण जेव्हां मी दागिने घालण्याचें सोडून दिलें तेव्हां मी लाखेच्या बांगडयाहि सोडल्या. कारण त्यांच्यावर सोन्याची पात असते हें एक, आणि लाखेंत हिंसा आहे हें दुसरें. म्हणून मी कांचेच्या बांगडया वापरूं लागल्यें. पण कांचेच्या बांगडया देशी असल्यामुळें वारंवार वाढवायच्या आणि जिथें त्या मिळत तें अहमदाबाद होतें चार मैलांच्या अंतरावर. तिकडे जाण्याचा त्रास वांचविण्या-

साठीं मी बांगड्यांचीहि पर्वा करीनाशी झाल्यें. मिळाल्या तर घालीत होत्यें आणि त्यांच्याशिवायहि चालत होतें. एक दिवस बांगड्यांशिवाय, बिंदी-शिवाय, पांढरी साडी नेसलेली अशी मी दारांत बसल्यें होत्यें. मला अशा प्रकारें बसलेली पाहून अनुसूया साराभाईंनीं मला भीत भीत विचारलें, " जमना-लालजी कुठें आहेत ?"

मी म्हटलें, " वर्ध्याला गेले आहेत."

त्या म्हणाल्या, " जानकीबहन, मी तर घाबरूनच गेल्यें तुमचा हा वेष पाहून !"

" बांगड्यांतच काय तें सौभाग्य आहे असें थोडेंच आहे ?" मी म्हटलें.

बापूजींच्या गोष्टींनीं आणि प्रभावानें दागिन्यांचा प्रभाव तर कमी होत चाललाच होता. पण बिंदी आणि बांगड्या हे दागिने नसून सौभाग्यलक्षणें आहेत आणि म्हणून तीं वापरलीं पाहिजेत असा पूज्य बांचा आग्रह होता. माझें असलें वागणें पाहून बा म्हणायच्या, ' जानकीबहन तर बापूंना अधिकच उत्तेजन देत आहेत. एक दिवस हे असें देखील म्हणायचे, ' पहा जानकीबहनला, ती तर बांगड्या देखील आवश्यक मानीत नाहीं.'

एकदां एका हरिजनानें बापूंना विचारलें, तुम्ही माझ्या मुलींला आश्रमांत ठेवून घेऊन तिचें पालनपोषण कराल का ? बापू नाहीं कसें म्हणतील ? त्यांनीं हो म्हटलें आणि मुलगी आश्रमांत आली. आतां बापू बांना म्हणाले, ' हरी-लालच्या मनूप्रमाणेंच हिला सांभाळ.' बापूंच्या समोर त्या काय म्हणणार ? पण त्या एकदम चमकल्या. बांनीं आम्हां बायकामंडळींत भोळेपणानें म्हटलें, ' बापू म्हणतात लक्ष्मीला मनूप्रमाणें सांभाळ. मी तिला न्हाऊं घालीन, खाऊं पिऊं घालीन, तिच्या उवा काढीन पण स्वयंपाकघरांत तिला कसें घ्यायचें ?' पण पुढें पुढें बांच्या बाबतींत देखील बापूंच्या सगळ्या आज्ञा स्वाभाविकच होऊन बसल्या.

एक दिवस आश्रमीय मंडळीसमोर प्रार्थनाप्रवचन करतांना बापूजींनीं सांगितलें, ' जरूरीपेक्षां जास्त सामान जवळ बाळगणें हा परिग्रह आहे. जें अधिक असेल तें आश्रमाच्या कचेरींत नेऊन दिलें पाहिजे. तें ज्याच्या कामाचें असेल तो ते वापरील. उदाहरणार्थ, मी मेलों आणि माझा चष्मा असला तर बांनीं तो आपल्याजवळ ठवतां कामा नये, कचेरींत ठेवून दिला पाहिजे. ज्याच्या

कामाचा असेल तो त्याचा उपयोग करील.' बांनीं आमच्यांत येऊन म्हटलें, 'बापूजी हें काय सांगतात कीं नवऱ्याच्या वस्तूवर बायकोचा देखील हक्क नाही ?'

श्रीमती सरलादेवी चौधरानी आजारी होत्या. त्यांना टायफॉइड आला होता. त्यांच्या सेवेसाठीं भाई जमनादास गांधींची योजना झाली होती. सरलादेवींनीं बापूंकडे तक्रार केली कीं जमनादासभाई आपली सेवा नीट करूं शकत नाहींत. बापूंनीं आपल्या धाकटचा मुलाला—देवदासला म्हटलें, 'उद्यांपासून देवा, तूं जा'. देवदासभाई म्हणाला, 'बापूजी, दुसऱ्या दिवशीं त्या माझ्याबद्दलहि तक्रार करतील. तेव्हां मी न जावें हेंच बरें.' बापूजी हंसत राहिले. दुपारीं श्रीमती संतानम्‌ची ड्यूटी होती. तिच्याविषयींहि तक्रार आली. हें सारें पाहून सेवा करण्याचा उत्साह माझ्यांत जागा झाला. मी बापूजींना विचारलें, मी त्यांच्या सेवेला जाऊं शकत्यें काय ? बापूंनीं दुसऱ्या दिवसापासून जायला सांगितलें त्याचा मला फार आनंद झाला. माझ्या मनांत सेवा कशी केली जाते, हें शिकण्याची इच्छा होती.

दुसऱ्या दिवसापासून मी त्यांच्या सेवेला हजर झाल्यें. धूप आणि अगरबत्ती घेऊन मी धुपाटच्यांत विस्तव घालून त्यांची खोली सुगंधित केली. सेवा मलाहि सुकेल म्हणून मला भय वाटत होतें ! हलके हलके झाडूनहि घेतलें. त्यांनीं लघवीचें भांडें बाहेर न्यायला सांगितले तें मी उचलून बाहेर ठेवून दिलें. नंतर वेणी घालायला सांगितलें. मी वेणी घालायला सुरवात केली. त्यांचे केंस चांगले लांबसडक होते. वेणी अशी जपून जपून घातली कीं कुठें एकादा केंस देखील खेंचला जाणार नाहीं. त्यांना बरें वाटलें. वेणी घालतांना रोगाचे जंतु माझ्या शरीरांत जाऊं नयेत म्हणून साडीचा पदर नाकावरून घ्यावा असें मनांत होतें. पण भीति वाटत राहिली.

मलमूत्राचा कमोड तर मी बाहेर ठेवून देत होत्येंच पण भंग्यानें हातानें धुतलेला ओला कमोड आंत कसा आणून ठेवूं ? हा पेंच मी गोमतीबहनच्या पुढें ठेवला. त्या म्हणाल्या, तुम्ही आतां त्या कामासाठीं गेलां आहांत तेव्हां तिकडचे कपडे वेगळे ठेवा आणि तसेच घरचेहि वेगळे ठेवा. 'कपडे बदलावे हें ठीक. पण रोजरोज डोकें कसें धुऊन घेऊं ?' मी गोमतीबहनला विचारलें. त्यांनीं उत्तर दिलें, 'डोक्याचा प्रश्न सोडून द्या.' अशा तऱ्हेनें मी रोज जाऊं लागल्यें.



ऑनररी मॅजिस्ट्रेट

जमनालालजी



जानकीदेवीजी



राष्ट्राचें अतिथिगृह : बजाजवाडी

काँग्रेस अध्यक्ष सुभाषबाबू यांचे वर्धा स्टेशनवर आगमन





बजाजवाडींत बजाज कुटुंबियांसमवेत पं. नेहरू व पं. रविशंकर शुक्ल



१९३० सालांतील राष्ट्रीय आंदोलनांत तुरुंगवास पत्करणाऱ्या भगिनी ( डाव्या बाजूला खुर्चीवर पहिल्या जानकीदेवी व त्यांच्या बाजूला जमनालालजींच्या भगिनी केसरबाई )

मी जमनालालजींची पत्नी आहें हें जेव्हां सरलादेवींना कळलें तेव्हां त्या म्हणाल्या कीं लघवीचें भांडें वारंवार नेऊं नका. शौचानंतर एकदां नेलें म्हणजे झालें. या गोष्टीनें मला आनंद झाला, कारण हें काम स्नानाच्या आधीं देखील होऊं शकत होतें.

## ३०. पहिलें अपत्य

बच्छराजजींच्या कुटुंबांत अपत्याची वाण होती. कित्येक पिढ्यांनंतर आमचें पहिलें अपत्य कमला जन्मास आली. लोकांनीं म्हटलें कीं यांच्याकडे तर मुलगी देखील होणें महत्त्वाचें आहे, पण आम्हांला कांहीं इनाम मिळणार होतें तें मात्र गेलें. ही गोष्ट जमनालालजींच्या मनाला फार लागली. ते तर मुलीची कदर विशेष करीत. त्यांनीं कमलाच्या जन्माच्या निमित्तानें चांदीचे खूप दागिने वगैरे नोकरचाकरांना इनामादाखल वांटले. त्यांच्या आनंदाला पार नव्हता. कमलेचें लालनपालनदेखील मोठ्या कोडकौतुकाचें झालें. माझें पहिलें बाळंतपण होतें म्हणून कांहीं त्रास वगैरे होऊं नये याची यांनीं खबरदारी घेतली होती. दादाभाई नौरोजींची मुलगी मुंबईंत डॉक्टर होती. जेव्हां जमनालालजी दादाभाई नौरोजींना भेटले आणि डॉक्टर माणकबाईचा उल्लेख आला तेव्हा ह्यांनीं माझ्या बाळंतपणासाठीं जेवणखाण व ८०० रुपये महिना या बोलीवर तिला ठरविलें. आणि येतांना ते तिला वर्ध्याला घेऊन आले. तिच्याबरोबर तिचे दोन मुलगेही आले. मला आठवतें कीं तिला शिधा म्हणून रोज एक शेर तूप, पीठ, दाळ, तांदूळ, साखर वगैरे दिलें जात असे. कमला झाल्यावर जमनालालजींनीं डॉक्टर माणकबाईंना पुष्कळसें इनाम वगैरे दिलें आणि खूष करून पाठविलें.

त्यावेळची एक गोष्ट आठवली कीं अजूनही मला खूप हसू येतें. कमला दोन वर्षांची होईपर्यंत तिला पाणी कधीं दिलें गेलें नाहीं. जेव्हां तो कांहीं प्यायला मागे तेव्हां तिला दूध किंवा फळांचा रसच दिला जाई. तसेंच तिला पायीं चालूंही दिलें जात नसे. जो तो तिला कंबरेवर उचलूनच हिंडवी. कुटुंबांत वर्षो-गणतीनंतर पहिलेंच मूल झालेलें आणि घर होतें संपत्तीनें भरलेलें. नोकरचाकर

आणि नातेवाईक या सर्वांना असेंच वाटावयाचें कीं एवढ्या लाडक्या बालकाला पाणी तें काय पाजायचें ? तिला द्यायचें झालें तर दूध किंवा फळांचा रसच द्यायला हवा. हाच प्रकार पायीं चालण्याच्या बाबतींत. यामुळें कमला फार उशिरानें चालूं लागली.

जेव्हां कमला चार वर्षांची झाली तेव्हां तिची सोरगत फत्तेहपूरच्या नेवटिया कुटुंबांत रामेश्वरप्रसादबरोबर करून देण्यांत आली. नेवटिया कुटुंब समाजांत प्रतिष्ठित, संस्कारी आणि सुधारक विचारांचें होतें.

कमला अकरा वर्षांची झाली तशा गांवच्या स्त्रिया तिचें लग्न केव्हां होणार असें विचारूं लागल्या. समाजांत बालविवाह प्रचलित असल्यानें त्यांचें विचारणें स्वाभाविक होतें. त्या म्हणत, 'तुमचा उंबरठा अजून कुंवार आहे. हिचें लग्न लवकर करा.' तिकडे मुलाच्या आईला देखील स्वाभाविकच अशी इच्छा होती कीं लवकर सून घरांत यावी. मारवाडी समाजांत बहुतेक लग्नें अल्पवयांत होत असत. पण जमनालालजींना बालविवाह पसंत नव्हता म्हणून त्यांनीं कमला चौदा वर्षांची झाल्यानंतर तिचा विवाह करण्याचें ठरविलें.

नेवटिया कुटुंबांतली मंडळीही सुधारक होतीच. जमनालालजी आणि केशवदेवजी यांनीं लग्न सुधारकपद्धतीनें व साधेपणानें करण्याचा विचार केला. पहिल्यानें असा विचार झाला कीं लग्न मुंबईंत झालें तर त्याचा समाजावर चांगला परिणाम होईल. बापूजींनींही याला संमति दिली. पण पुढें जमनालाल-जींनीं केशवदेवजींना साबरमतींत लग्न करण्याला अनुकूल करून घेतलें. बापूजींनाहि ही गोष्ट पसंत पडली. जमनालालजींनीं सांगितलें कीं आश्रमाच्या वातावरणांत लग्न झाल्यानें वधूवरांवर चांगले संस्कार होतील. या निर्णयानें जमनालालजींना फार आनंद झाला.

रामेश्वरप्रसादचे वडील दोन वर्षें आधींच स्वर्गवासी झाले होते. त्याचे आजोबा रामवल्लभजी म्हातारे होते आणि गांवीं राहात होते. चुलते केशवदेवजी मुंबईंत राहात असत. ते राष्ट्रीय विचारांचे होते आणि त्यांचा जमनालालजींशीं भावा-सारखा संबंध जडला होता. जमनालालजींच्या मनांत अशी इच्छा होती कीं लग्नांत स्त्रिया आणि सगळी वडीलधारी मंडळी यावी आणि त्यांनीं साधे-पणानें आणि सुधारकी ढंगानें होणार असलेलें हें लग्न पाहावें. म्हणून ते फत्तेह-पूरला गेले आणि रामवल्लभजीनें आणि बायकामंडळीनीं लग्नाला यावें याचा

त्यांनीं आग्रह घरला. वऱ्हाडाबरोबर स्त्रियांनीं येण्याचा प्रघात नव्हता. म्हणून वऱ्हाड नेण्याचा विचार सोडून देऊन "वैठा" विवाह करण्याचें ठरविलें. कारण अशा लग्नांत स्त्रियाहि भाग घेऊं शकतात. अर्थात् व्याही, विहीण वगैरे मंडळीहि आली.

रामेश्वरप्रसाद मुंबईंत मॅट्रिक पास झाल्यावर त्याला गुजराथ विद्यापीठांत शिकावयास ठेवण्यांत आलें. सरकारी कॉलेजचें शिक्षण सोडून राष्ट्रीय कॉलेजांत अहमदाबादेस जाणें त्या काळीं कांहीं मामुली गोष्ट नव्हती; विशेषत: राजस्थानी समाजांत. पण हें देखील केशवदेवजींच्यामुळेंच शक्य झालें. रामेश्वरजी तेथील वातावरणांत समरस झाले. खादी तर वापरीतच असत. लग्नाच्या वेळीं प्रथेप्रमाणें घालावयाचे थाटामाटाचे कपडे न वापरतां साध्या खादीच्या कपड्यां-निशींच ते लग्नाला आले.

नेवटिया कुटुंबाचा मुक्काम गुजराथ विद्यापीठांत होता आणि आमचा लाल बंगल्यांत. जमनालालजींनीं मला वरपक्षाकडील स्त्रियांना लग्नाच्या वेळीं येण्याचें आमंत्रण देण्यासाठीं पाठविलें. मी गेल्यें. मला बघतांच वरपक्षा-कडील स्त्रियांनीं तोंडावर घुंगट ओढून घेतला. त्या म्हणाल्या, "अहो आम्ही कां यावें? तिकडे तुम्ही लोक तर रीतभात कांहीं करणार नाहीं. बघायचें म्हटलें तरी काय बघणार?"

मी येऊन सगळी गोष्ट जमनालालजींना सांगितली. ते म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं. मी जाऊन त्यांची समजूत घालतों." त्याप्रमाणें जमनालालजी वरपक्षाच्या मंडळीकडे गेले. तिकडे त्यांनीं रामवल्लभजी व केशवदेवजी यांच्याशीं बोलणें केलें. रामवल्लभजी फार सज्जन गृहस्थ होते व विचारवंतही; पण अजून त्यांच्याकडे पड्याची प्रथा होती. अर्थात् आपल्या नातवाची वधू पड्याशिवाय आपल्यासमोर लग्नांत बसेल यांत त्यांना संकोच वाटला. पण हा पेंच बापूजींनीं सोडविला. त्यांनीं जमनालालजींना सांगितलें कीं ज्याअर्थी वरपक्षाकडील मंडळीनें पुष्कळशा सुधारणा पार पाडल्या आहेत, त्याअर्थी आपणदेखील त्यांचीही एक गोष्ट मानावी.

आज ती गोष्ट अगदीं मामुली वाटते पण तीस वर्षांमागें मारवाडी समाजाची जी स्थिति होती तिच्यात हें एक क्रान्तिकारक पाऊलच होतें. आणि जमनालालजींना जर वरपक्षाचें सहकार्य मिळालें नसतें तर हें सारेंच कठीण होऊन बसलें असतें.

लग्नांत मारवाडी पद्धतीचे खादीचे कपडे घालून आणि नाकापर्यंत घुंगट ओढून कमलाला मंडपांत बसविण्यांत आलें. लग्न मारवाडी ब्राह्मण आणि पंडित नेकीरामजी यांनीं लावलें. नंतर बापूजीनीं आशीर्वाद दिले आणि लग्न साधेपणानें केल्याबद्दल केशवदेवजी आणि जमनालालजी यांची प्रसंशा करून विवाहसंस्काराचें महत्त्व दाखवून दिलें. व्याही आणि विहीण हें सारें पाहून आनंदित झालीं. ती म्हणूं लागलीं कीं लग्नतर समाजाच्या चालीप्रमाणेंच उरकलें. वराच्या आजोबांनाही हें सर्व बरें वाटलें.

कमलाच्या सासूबाईंच्या पायांत इजा झालेली होती. पाय सुजले होते आणि दुमडत नव्हते. जमनालालजींनीं त्यांना साबरमतीला येऊन तेथील वातावरणाचा लाभ घ्यावा म्हणून बोलावलें.

त्या आल्या. बापूजी त्यांना म्हणत, माझ्याबरोबर हिंडायला चला. पण त्या म्हणत, " मला हिंडतां कसें येईल ? पायांची अवस्था तर ही अशी ! "

त्यांचें शरीर आपल्या स्वाभाविक पूर्वस्थितीवर यावें अशी बापूजींची इच्छा होती आणि तें फक्त निसर्गोपचारानेंच शक्य होतें. बापूजींनीं त्यांना उपासाचा सल्ला दिला.

बापूजींच्या सांगण्यावरून त्यांनीं उपास सुरू केला. पण तो पार पाडणें इतकें सोपें नव्हतें. त्यांना उपासाची सवय नव्हती. दोन तीन दिवसांनंतर त्यांना उलटचा होऊं लागल्या, घेरी येऊं लागली. त्यांचा ब्राह्मण आचारी होता. तो म्हणे – अन्न सुटलें कीं घर सुटलें. बापू इकडे धीर देऊन जात तर तिकडे ही मंडळी भय घाली.

कधीं कधीं त्या फार घाबरून जात तेव्हां मी धांवत बापूंच्या जवळ जायचीं आणि म्हणायचीं, ' चला ना, त्यांना तर सारख्या उलटचा होत आहेत. '

संध्याकाळीं बापूजी येत तेव्हां त्यांचा अर्धा आजार बापूजींचा हंसता चेहरा पाहूनच दूर होत असे. बापूजी म्हणत, ' आज् तर प्रकृति जास्तच बरी आहे. ' अशा रीतीनें ते उत्साह देत राहात. आणि असा पंधरा दिवसपर्यंत लिंबू-पाण्यावर हा उपास चालला. पुढें तर त्या बापूंच्याबरोबर मैल मैल हिंडून येत !

त्यांच्यावर बापूजींचा असा कांहीं प्रभाव पडला कीं त्या खादीच नेसूं लागल्या आणि खाण्यापिण्यांतहि फळें, उकडलेली भाजी आणि लिंबू यांचाच अधिक वापर करूं लागल्या.

कलकत्त्याला काँग्रेसचें अधिवेशन व्हायचें होतें. पं. मोतीलाल नेहरू अध्यक्ष निवडले गेले होते. तें पाहायची इच्छा तर होतीच. पण जमनालालजी जेव्हां म्हणाले कीं तिकडे मोठचा लोकांकडे उतरावें लागेल तेव्हां मुलांसाठीं चांगले कपडे शिवून घे, तेव्हां माझा धीर सुटला. त्या काळीं साधी खादी देखील महाग होती. त्यांत आतां उंची खादीचे कपडे शिवण्याचा प्रश्न आला. शिवाय माझ्या मनांत असाहि प्रश्न आला कीं पुढें या कपडचांचें काय करायचें? मीं विचार केला कीं मी न गेल्यानें हा सारा खर्च वांचेल. त्यावेळीं कमलाला दिवस गेले होते. मला वाटलें कीं यावेळीं कमला तिकडे गेली तर तिच्यावर चांगले संस्कार होतील. म्हणून मी जमनालालजींना कमलाला बरोबर न्यायला सांगितलें. सहजभावानें ते तिला घेऊन गेले. पण तिकडच्या जास्त हिंडण्याफिरण्यानें तिची प्रकृति बिघडली आणि त्यामुळें जमनालालजीना फार त्रास झाला. जमनालालजींना माझें आणि कमलाच्या सासूबाईचेंहि भय वाटलें असावें कीं तिकडे जाऊन काय सांगायचें? दोनचार दिवस तिकडे उपाय करून झाल्यावर त्यांनीं तिला वर्ध्याला पाठवून दिलें. जेव्हां मला हें सगळें कळलें तेव्हां मला माझ्या कंजूपपणावरून आणि बेसावधपणावरून फार दु:ख झालें. पण मागाहून पस्तावून काय फायदा?

●

## ३१. मिठाचा सत्याग्रह

जेव्हां साबरमती आश्रमांत मिठाच्या सत्याग्रहाची चर्चा चाललेली होती तेव्हां मी तेथेंच होत्यें. कित्येक दिवसपर्यंत आश्रमवासीयांच्या महत्त्वाच्या बैठका होत राहिल्या. मीहि चर्चेत हजर असें. बापूजींनीं सागितलें, "ज्याला सत्याग्रहांत सामील व्हायचें असेल त्यानें नि:संकोचपणानें सामील व्हावें. पण त्यानें सर्वस्वत्यागाला तयार राहिलें पाहिजे. हा एक गंभीर प्रश्न आहे. तेव्हां सामील होण्यापूर्वी आपल्या घरच्या मंडळीला विचारून, सल्लामसलत घेऊन, जो स्वत:ला यांत होमूं शकेल त्यानेंच आपलें नांव द्यावें. ज्याची पुरती तयारी झालेली नसेल, किंवा ज्याच्यांत थोडीफार कमजोरी असेल, त्यानें धैर्यानें सरळ नकार द्यावा, हें मला आवडेल. यांत स्त्री पुरुष सर्व सामील होऊं शकतात."

बापूजींच्या या निर्णयानें आश्रमभर गांभीर्याची लाट पसरली. प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या तोंडीं हीच चर्चा आणि हाच विषय होता. गांधीजींची प्रेरणा आणि संगतीमुळें वातावरणांत आरंभापासूनच उत्साह होता. तो आतां वाढला आणि दिवसेंदिवस वाढतच गेला. शेवटीं बापूजींच्या बरोबर जाणाऱ्यांची यादी तयार होऊं लागली. स्वराज्य घेऊनच घरीं परततील किंवा त्या कामांत मग्न राहतील असें व्रत घेतलेले लोकच या यादींत होते. एकूणऐंशीं मंडळी तयार झाली.

रोजच्या चर्चांमुळें उत्साह तर सर्वांमध्यें होताच. पण जमनालालजींची गंभीरता वाढत गेली. तिचें शब्दांत वर्णन करणें कठीण आहे. आम्हां उभयतांत चर्चा झाली. ते म्हणाले, 'या कार्यांत माझी तर सर्वस्व होमण्याची तयारी आहे. तुझी तूं बघ !' मी उत्तर दिलें, 'बापूजींच्या तुकडींत आपल्या घरचें एक तरी माणूस असलेंच पाहिजे !' कमलनयनच्या बाबतीत मी मुद्दाम बापूजींना विचारायला गेल्यें. बापूजी म्हणाले कीं त्याचें वय अठरा वर्षांहून कमी आहे तेव्हां त्याला घेतां येत नाहीं.

बापूजींच्या या उत्तरानें आरंभीं मी निरुत्तर झाल्यें खरी पण जेव्हां मला कळलें कीं अठरा वर्षांहून कमी वयाच्या एका मुलाला घेण्यांत आलें आहे; तेव्हां मी बापूजींना म्हटलें, "ज्याअर्थीं अशा एका मुलाला आपण घेतलें आहे त्या अर्थीं यालाहि परवानगी द्या.'

बापूजींनीं उत्तर दिलें, 'त्याला अपवाद म्हणून घेतलें आहे. एकाची गोष्ट निराळी. जास्त घेणें योग्य नाहीं.' पण जेव्हां मी जास्तच आग्रह धरला तेव्हां बापूजींनीं तें मान्य केलें. आतां कमलनयनला बोलवायचें होतें.

कमलनयन वर्धा आश्रमांत होता. गेलें वर्ष दीड वर्ष वारंवार येणाऱ्या मलेरियाच्या तापानें तो बेजार होता. एकशें तीन चारपर्यंत त्याला ताप येत असे. बराच अशक्त झाला होता तरी देखील ही बातमी कळून त्याला उसळी आली. आश्रमाहून बातमी आली कीं तो येऊं इच्छीत आहे. पण त्याची प्रकृति जाण्यासारखी नाहीं. मला तर वाटत होतें कीं त्यानें बापूंच्याबरोबर जावें. पण बापूजींनीं सांगितलें, 'सध्या तर तो आजारी आहे. बरा झाल्यावर मधें कुठेंतरी त्याला तुकडींत घेऊं.' मी तर घरांतला एक माणूस सत्याग्रहांत देऊं इच्छीतच होत्यें. जमनालालजींचा भाचा प्रल्हाद पोद्दार तिथेंच विद्यापीठांत

शिकत होता. त्यानें जाण्याची अनुमति दिली तेव्हां त्याला सामील करून घेण्यांत आलें.

शेवटीं दांडीयात्रेची तिथि बापूंनीं जाहीर केली. चैत्र कृष्ण द्वादशी, गुरुवार तारीख १२ मार्चचा तो दिवस होता. सगळ्या लोकांना असेंच वाटत होतें कीं बापूजींना दांडीयात्रा सुरू होण्यापूर्वींच पकडलें जाईल. पोलीस आतां येतील, मग येतील अशाच विचारांत मंडळी रात्र रात्र जागत राहायची. बापूजींचें काम तर स्वाभाविक पद्धतीनें पूर्ववत् चालत राहिलें. ते योग्य झोंपहि घेत असत.

दांडीयात्रेच्या आदल्या दिवशींच्या संध्याकाळची प्रार्थना अद्‌भुत होती. साबरमतीच्या कांठावर हजारों लोक गोळा झाले होते. गंभीरता पसरली होती. कांहीं खळबळहि होती. पण बापूजींनीं उभें राहून बोटानें इशारा करतांच जमावांत निःस्तब्धता पसरली. वातावरण एकदम गंभीर बनलें. ते म्हणाले, 'मी इकडे स्वराज्य घेऊनच परतेन. नाहींतर इथली ही माझी शेवटची प्रार्थना समजा.' हे शब्द ऐकून लोकांची जी स्थिति झाली ती शब्दांत लिहिणें अशक्य आहे. तें चित्र आज देखील डोळ्यांसमोर आहे.

दुसरे दिवशीं सकाळीं बापूजी आश्रमाचा निरोप घेणार होते. लोक रस्त्यावर, झाडांवर रात्रीपासूनच बसून राहिले होते. त्यांना शंका होती कीं कदाचित् बापूजींना निघण्याच्या पूर्वींच पकडलें जाईल. दुसरे दिवशीं सकाळची प्रार्थना होतांच ते निघाले. निरोपाचा तो प्रसंग रामवनवासासारखाच हृदयद्रावक होता. लाखों लोक भान विसरून त्यांच्यामागून चालले होते ; जणूं समुद्रच उसळत राहिला होता. त्यांना वस्त्रा-वहाणांची शुद्ध नव्हती. बायकापोरांचाहि तेथें कुठें कुणाला पत्ता होता ? अद्‌भुत होतें तें दृश्य !

घरचा प्रल्हाद तुकडींत होताच. तरी देखील तें दृश्य पाहून माझी भावना बलवत्तर होऊन उठली कीं कमलनें तुकडींत असलेंच पाहिजे. मी तर उत्तेजित होतेंच. जमनालालजी गंभीर होते. त्यांच्या डोक्यांत विचार भरला होता तो हाच कीं बापूजींनीं सुरू केलेलें हें काम तडीला कसें जाईल ? त्यांचें सारें चित्त कामाच्या रचनेंत लागलेलें होतें. आम्ही दोनतीन मुक्कामांपर्यंत बापूजींच्या बरोबर गेलों पण पुढें बापूजींनीं सर्वांना परत जायला लावलें. माझ्या मनाला तें रुचलें नाहीं तेव्हां बापूजींची परवानगी घेऊन मी कमलनयनला आणायला

वर्ध्याला गेल्यें. जमनालालजी विलेपार्ल्याला ( मुंबई ) सत्याग्रह छावणीच्या कामाला लागले.

कमलला लवकरांत लवकर तुकडींत पाठविण्याच्या तयारीनें मी वर्ध्याला आल्यें आणि तडक आश्रमांत गेल्यें. पाहतें तों कमल आजारी होऊन पडला आहे. पण मला तर एकच ध्यास लागला होता. मी त्याला आजारांतच बजाज-वाडीला घेऊन आल्यें आणि त्याला तुकडींत पाठविण्याच्या तयारीला लागल्यें. रातोरात तयारी करून सकाळच्याच गाडीनें रवाना होऊन त्याला बापूजीच्या तुकडींत दाखल केलें. इकडे जमनालालजी आणि किशोरलालभाई यांना सरकार बाहेर कसें राहूं देईल ? काम सुरू करतांच त्यांना पकडण्यांत आलें. मुलींना कन्याश्रमांत ठेवून मीहि विलेपार्ल्याला जाऊन पोंचल्यें.

कमलनयन आजारी तर होताच. पदयात्रेमुळें त्याचे डोळे सुजले आणि दिसणें बंद झालें. बापूजींनीं डॉक्टरला विचारलें तर ते म्हणाले कीं त्याच्या डोळ्यांतली ज्योत विझली. आतां दिसणार नाहीं. बापूजींनीं डोळ्यांवर माती बांधायला सांगितलें. आतां मला वाटूं लागलें कीं मी उत्साहाच्या भरांत बापूंना संकटांत मात्र टाकलें आणि एका परीनें मुलावरहि जुलूम केला. पण बापूंनीं हें संकट पेललें. आतां प्रश्न होता कमलनयनचें काय करावें ? तुकडींत घेऊन जाणें तर अशक्य होतें आणि तुकडींतला एक शिपाई या नात्यानें त्याला घरीहि परत जाणें शक्य नव्हतें. म्हणून त्याला गुजरात विद्यापीठांत रवाना केलें.

इकडे विलेपार्ले शिबिरांत आल्यावर मी पाहिलें कीं स्त्रीपुरुषांत खूप उत्साह भरला आहे. सभा, व्याख्यानें, मीठ आणण्यासाठीं तुकड्यांची येजा, ताडीच्या दुकानांपुढें धरणें धरणें, इत्यादि कामें मोठ्या उत्साहानें चाललीं होती. मी एका ताडीच्या दुकानासमोर धरणें देऊन राहिल्यें होते. तिकडे एक म्हातारा माणूस नशेंत तर्र होऊन ताडी पीत होता. मी त्याच्याजवळ जाऊन त्याची समजूत घालूं लागलें कीं ताडी पिऊं नको, ताडी पिणें पाप आहे. पण त्याच्या तोंडाचा दर्प सहन करणें कठिण होतें. तरी देखील मी समजावीत राहिल्यें. नशेंत असलेल्या माणसाला समजावीत राहणें व्यर्थ आहे याचें देखील भान मला राहिलें नाहीं.

ठिकठिकाणीं सभा होत होत्या. आणि चांगले चांगले वक्ते आणि कार्यकर्ते पकडले जात होते. नवेनवे तयार होऊं लागले. माझीहि बोलण्याची पाळी

आली. मी हिंदी, मराठी, गुजराथी आणि मारवाडी भाषांतून बोलूं लागल्यें. एकहि भाषा मला शुद्ध बोलतां येत नव्हती पण कमी शिकल्यापढलेल्या लोकांना आणि स्त्रियांना माझ्या घरगुती भाषेंत गोडी वाटत होती. गांवच्या लोकांनाहि ती आवडे. एकाच सभेंत विविध भाषांचे लोक असत. सभेंत मला ज्या भाषेच्या स्त्रिया समोर दिसत त्याच भाषेंत मी बोलूं लागायचीं. 'आंधळ्यांत काणा राजा' या न्यायानें माझी बूज होऊं लागली. पण माझी स्थिति काय ती ईश्वरालाच माहीत !

माझें गायीच्या दुधाचें व्रत होतें. पण सगळ्याच ठिकाणीं तें मिळणें शक्य होत नव्हतें. मी उकडलेली भाजीच खायचीं. कशी तरी गायीच्या दह्याची व्यवस्था होत असे. पण खाण्यापिण्याची आबाळ राहीच. त्यामुळें माझें पोट बिघडत राहिलें. शौचालाहि वारंवार लागायचें. पण असल्या प्रकृतींत देखील मला व्याख्यानासाठीं जावें लागे. जरी मी थकलेली होत्यें तरी देखील मी उभी राहिल्यें. लोकांना पाहिलें कीं मला हुरूप यायचा आणि ग्रामोफोनच्या रेकॉर्डप्रमाणें भाषण देऊन टाकायचीं.

एके दिवशीं पहांटे पांच वाजतां मला उठवण्यांत आलें आणि सांगण्यांत आलें कीं स्वयंसेवक धारासणाला चालले आहेत. मीं त्यांना आशीर्वाद द्यावा. मी गडबडून उठून बसल्यें आणि बाहेर आल्यें. उत्साह तर भरून राहिलाच होता. मी सांगितलें, 'भावांनो, यश घेऊन याल तर अमर व्हाल आणि मराल तर आकाशांत ताऱ्यांसारखे चमकत राहाल !' एवढे शब्द बोलून मी संडासला गेल्यें. तिकडे जेव्हां मी माझ्या शब्दांवर विचार केला तेव्हां मला रडूं येऊं लागलें. या मंडळीला असें सांगतांना केवढा उत्साह आला होता माझ्यांत ? जर कमलनयन या तुकडींत असता तर काय मी हे शब्द बोलूं शकल्यें असत्यें ? माझ्या हेंहि लक्षांत आलें कीं माझ्यांत आणि जमनालालजींत हाच फरक आहे. ते करून जातात पण दुसऱ्यांना सांगताना त्यांना संकोच वाटतो. मी लोकांना चटकन् सांगून टाकत्यें. मी बोलून तर गेल्यें पण आतां माझ्या जिवाची तडफड होऊं लागली. इच्छा झाली कीं आपणहि धारासणाला जावें. त्याप्रमाणें माझी नणंद केशरबाई आणि ऋषभदास रांका यांच्याबरोबर धारासणाला रवाना झाल्यें. रात्रीं तीनचारच्या सुमाराला बलसाड स्टेशनवर पोंचलों. स्टेशनावर एकदम गंभीर आणि भयप्रद असें वातावरण होतें. अंधारांत चोहोंकडे पोलीसच

दृष्टीस पडत होते. त्या गंभीर आणि काळोख्या वातावरणांत वाट दाखवणाराहि कुणी नव्हता. अखेर एका टांगेवाल्यानें चलायला सांगितलें. पण त्यानें दहा बारा रुपये मागितले. आम्हीं सांगितलें, घ्यायचें असेल तें घे, पण आम्हांला सहा वाजण्याच्या आंत पोंचवून दे. लोक धारासणाला पोंचूं नयेत म्हणून रस्त्यावर जागोजाग पोलीस पहारा बसवलेला होता. पण लोक धारासणाला जिथें तळ पडला होता तेथें पोंचतच होते. टांगा किंवा अन्य वाहन प्रयासानेंच जाऊं शकत होतें. बायका म्हणून आमचा टांगा जाऊं देण्यांत आला. टांगेवाला देखील हुषार होता. त्यानें आम्हांला सहा वाजण्याच्या पांच मिनिटें आधींच धारासणा कॅम्पमध्यें पोंचवून दिलें.

पोलिसांची चोख व्यवस्था असून देखील तेथें हजारों लोक गोळा झालेले होते. चोहींकडे सामसूम पसरली होती. तिकडे अब्बास तय्यबजी आणि सरोजिनीदेवी यांचीं भाषणें झालीं. भाषणें होतांच तुकड्या रवाना झाल्या. इकडे पोलीसदेखील बडगा घेऊन तयार होते. त्यांना दारू पाजून निःशस्त्र स्वयंसेवकांवर लाठी चालवण्यासाठीं तयार करण्यांत आलें होतें. आंटिया नांवाचा पारशी अधिकारी त्यांचा वरिष्ठ होता. स्वयंसेवकांनीं मिठाच्या कोठारावर हल्ला चढवला. चोहींकडून कांट्यांच्या लोखंडी तारांचें कम्पाउंड उभारलें होतें. तार तोडण्यासाठीं स्वयंसेवकांना चिमटे देण्यांत आले होते. स्वयंसेवक पुढें जाऊं लागतांच पोलिसांनीं दंडुक्यांनीं अशी मारझोड चालवली कीं इतक्या निष्ठुरतेनें जनावरांना देखील मारलें जात नाहीं. दंडुका लागायचा आणि स्वयंसेवक जमिनीवर कोसळायचा. ज्यांना मार कमी लागे ते पुढें सरकत आणि ज्यांना जास्त लागे ते मूर्च्छित होत. पडलेल्यांना स्ट्रेचरवरून नेलें जात होतें. कांहीं स्वयंसेवक शुद्धीवर येतांच पुन्हां पुढें दौडूं लागत. दंडुक्याचा मार खाऊनदेखील जेव्हां स्वयंसेवक असे पुढेंच जात राहिले तेव्हां पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें त्यांच्यावर घोडेस्वार घातले. त्यामुळें एकदम सामसूम पसरली. घोड्यांच्या टापांमुळें आणि दंडुक्यांमुळें स्वयंसेवक पडूं लागले. साडेदहा वाजेपर्यंत जवळजवळ सातशें जखमी स्वयंसेवकांना स्ट्रेचरवरून झोंपडीवगैरेमधें आणि मोकळ्या मैदानावर झोपवण्यांत आलें. चोहींकडची जागा घायाळ झालेल्यांनीं भरून गेली. वैद्यकीय व्यवस्था होती पण लोक पुष्कळच आल्यामुळें ज्याला जें सुचलें तो ते उपाय म्हणून करूं लागला. मी एक पाण्याची कळशी घेऊन गेल्यें आणि

ओल्या कपड्यानें डोळ्यांवर पाणी शिंपडूं लागल्यें. जखमी झालेल्यांत श्री. ढवणहि होते. त्यांनीं शुद्धीवर येतांच पुढें जाण्याची तयारी दाखवली. म्हणाले, 'जानकीबाई, तुम्ही त्यांच्याकडे लक्ष ठेवा.' त्यांचा हा इशारा त्यांच्या पत्नी-विषयीं होता. जणूं ते सांगत होते कीं आपण मरणाच्या तयारीनेंच चाललों आहोंत, पत्नीला सांभाळणें आतां माझी जबाबदारी. मी त्यांना इशाऱ्यानेंच थांबायला सांगितलें. त्यांना फारच लागलें होतें. तसें पाहिलें तर सगळ्याच स्वयंसेवकांनीं मार खाण्यांत पुष्कळच शौर्य आणि साहस यांचें प्रत्यंतर दिलें होतें. पण मोहन नांवाच्या एका गुजराती मुलानें तर कमालच केली होती. पहिल्या हल्ल्यांत त्याला उचलून कांटयाच्या तारांत फेंकण्यांत आलें होतें. दुसऱ्यांदा त्याच्या बोटांवर दंडुक्याचा असा मार बसला होता कीं बोटांचीं हाडें मोडून निघालीं होतीं आणि आतां तिसऱ्यांदा तो पुढें झाला तेव्हां त्याचा हातच तुटला! कमरेंतहि मार बसला. त्याच्या हाताचीं बोटें अजूनहि वांकडीं आहेत. केवढा आवेश आणि केवढा उत्साह होता!...

त्या दिवसाच्या हल्ल्याचे सरदार नरहरभाई परेख होते. त्यांच्या डोक्यावर दंडुक्याची भयंकर जखम झाली होती. त्यांना रक्तबंबाळ झालेले पाहून विठ्ठल-भाई पटेल स्तंभित झाले. त्यांची भव्य आणि लांब सफेत दाढीची मुद्रा दगडाच्या मूर्तीसारखी वाटली. नरहरभाईंची जखम धुऊन मलमपट्टी बांधण्यांत आली. शुद्धीवर येतांच ते पुढें जायला तयार झाले. पण वेळ होऊन गेल्यामुळें सत्याग्रह बंद ठेवण्यांत आला होता. ही एक अजब लढाई होती. सांगतात कीं लढाईंत उभयपक्षांकडून वार होत असतात, दोन्ही पक्ष आपापल्या शौर्याचे डावपेंच दाखवतात आणि प्राय: समान शक्तीनें एकमेकांवर तुटून पडतात. पण इकडे तर एकीकडून पोलीस मारण्यांत शौर्य दाखवीत होते आणि दुसरीकडून स्वयं-सेवक मार खाण्यांत वीरतेचा प्रत्यय घडवीत होते!

आम्ही जखमी झालेल्यांच्या तुकडीबरोबर शिबिरांत परतलों. विलेपारले शिबिराच्या तुकडीनें पुष्कळच शौर्य दाखवलें होतें आणि तिकडे काम देखील फार चांगलें होत होतें. शेंकडों पुरुष तुरुंगांत गेले आणि कामहि चालूं राहिलें. अखेर सरकार हें सारें कोठवर सहन करील? हें काम सरकारविरोधी आहे असें सांगून शिबिर जप्त करण्यांत आलें. लोकांना पकडून नेण्यांत आलें.

●

## ३२. आंदोलनांत भाग

विलेपार्ले शिबिर जप्त झालें तेव्हां मी माटुंग्याला केशवदेवजी नवेटिया यांच्याकडे राहात असें. एके दिवशीं पूज्य कस्तुरबांच्याबरोबर गोशीबहन, पेरिनबहन वगैरे चारपांच स्त्रिया आल्या आणि सांगूं लागल्या कीं आतां इकडे स्त्रिया पकडल्या जात आहेत. तुम्हांला काम करूं दिलें जाणार नाहीं. तुम्हीहि पकडल्या जाल. तुरुंगांतल्या लहानमोठ्या संख्येला महत्त्व नाहीं. पण काम हें चाललेंच पाहिजे. तेव्हां तुम्ही कलकत्त्याला जाऊन विदेशी कपड्यांच्या बहिष्काराचें काम हातीं घेतलें तर फार चांगलें होईल. तिथल्या मारवाडी समाजांत तुम्ही अधिक काम करूं शकाल.

तुरुंगांत जमनालालजींजवळ देखील या गोष्टी पोंचूं लागल्या. बाहेर असलेल्यांच्या त्रासाच्या गोष्टी ऐकून त्यांना बरें वाटत नव्हतें. ते म्हणत, आम्ही इकडे आरामांत राहतों. आणि बाहेरच्या कार्यकर्त्यांनीं त्रासांत असावें हें चांगलें नाहीं. पण जेव्हां त्यांना कळे कीं आपली आत्मीय मंडळी बाहेर काम करीत आहेत तेव्हां त्यांना फार आनंद होई आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठीं ते त्यांना पत्रें लिहीत. एका पत्रांत तर त्यांनीं मला इतकेंदेखील लिहिलें होतें कीं आतांपर्यंत तुला लोक जमनालालची पत्नी म्हणूनच ओळखतात; पण मी जेव्हां सुटून येईन तेव्हां लोक म्हणतील कीं जानकीबाईचे यजमान आले आहेत ! हीच त्यांची थोरवी होती. ते लहानांतल्या लहान कार्यकर्त्याचादेखील उत्साह इतका वाढवीत कीं तो अधिक उत्साहानें आणि अधिक वेगानें कामाला जुपून घेई. बाहेरच्या व्याख्यानांमुळें माझें नांव वर्तमानपत्रांत येऊं लागलें. एक दिवस बापूजींनीं येरवडा तुरुंगांतून पत्र पाठवलें :

२७।७।१९३०

चि. जानकीबहन,

तुमचें पत्र मिळालें. आतां उत्साह कां वाटणार नाहीं ? आतां तर तुम्ही भाषणें करतां, वर्तमानपत्रांत नांव येतें. अधूममधून जानकीबाई बजाजचें नांव वर्तमानपत्रांत वाचतों तेव्हां असें देखील वाटतें कीं जमनालालनें आणि आम्ही सर्वांनीं तुरुंगांतच राहावें. मला तर विश्वास होताच कीं तुमच्या दर्शनी अविश्वासाच्या पाठीमागें पूर्ण आत्मविश्वास आहे. ईश्वर त्यांत प्रगति करो.

बापूचे आशीर्वाद

माझा जास्तींत जास्त उपयोग व्हावा या विचारानें पेरिनबहन आणि कस्तुरबा वगैरेंच्या सल्ल्यावरून मी कलकत्त्याला जायला तयार झाल्यें. कमला माझ्याबरोबर राहिली; पण दोन महिनेच.

आम्ही मंडळी वर्ध्याला आलों. मी जाजूजींना म्हटलें कीं मला कलकत्त्याला विलायती कपडा बंद पाडण्यासाठीं जायचें आहे. त्यांनीं सांगितलें कीं खुशाल कलकत्त्याला जा, पण तिकडे विलायती कपडा बंद पडणें कठिण आहे. मी विचारांत पडल्यें कीं आतां काय करायचें? मुंबईहून कलकत्त्याला आल्यें आणि पाहिलें कीं तिकडे कामाची आशा अल्पच आहे. शिवाय बोलावल्या-शिवाय आल्यावर काम कसें होणार? म्हणून आधीं बिहारला जाण्याचें ठरवलें. बिहारी लोक सरळ असतात. ते माझा उपयोग करून घेऊं शकतील असें मला वाटलें. कमला, मदालसा आणि महादेवलाल सराफ यांच्याबरोबर मी बिहारला गेल्यें.

त्यावेळीं तेथें भयाची छाया पसरली होती. सभा घेणें, सभेला येणें जाणें, भाषणें करणाऱ्यांना ठेवून घेणें वगैरे गोष्टी गुन्हा मानल्या जात होत्या. या कारणामुळें लोक पकडले जात होते आणि त्यांना दंडहि बसे. लक्ष्मीबाबू आमची व्यवस्था ठेवीत होते. पण केव्हां केव्हां तर राहण्यालादेखील जागा मिळत नसे. धर्मशाळा वगैरे ठिकाणीं उतरावें लागे. गांवांत गेल्यावर सभेची दवंडी पिटवली जाई. कसेबसे कांहीं लोक सभेला येत असत. पुरुषांना तर भाषण करतांकरतांच पकडलें जाई, पण स्त्रियांना पकडण्यांत तिकडील अधिकाऱ्यांना संकोच वाटे. आमची तर तुरुंगांत जाण्याची तयारी होतीच. एका महिन्यांत आम्ही पंचेचाळीस गांवें फिरलों. सरासरी दरगांवीं तीन सभा होत. एक सार्व-जनिक, दुसरी व्यापाऱ्यांची आणि तिसरी स्त्रियांची. महादेवलालजी तर सभेंत कांहीं बोलतच नव्हते, कारण त्यांना माहीत होतें कीं बोलल्याबरोबर ते पकडले जातील मदालसा थोडथोडें बोलत होती. जास्त काय तें मलाच बोलावें लागे. शेवटीं माझा घसा बसला. मी बोलल्यें असत्यें तरी लोकांना ऐकूं गेलें नसतें म्हणून एक दिवस मी कमलाला बोलायला सांगितलें.

कमला त्याला कबूलच होईना. शेवटीं फारच ताणून धरल्यावर एकदम उठली आणि म्हणाली, 'तुम्ही सगळे मांजरासारखे बसून काय राहिलांत?

पुढारी मंडळी तर तुरुंगांत आहे.' अशा प्रकारचे दहा पांच शब्द बोलून ती खालीं बसली. हेंच तिचें पहिलें आणि शेवटचें भाषण !

फिरत फिरत आम्ही दुमक्याला पोंचलों. तिकडे आमच्या नात्याचे आणि ओळखीचे लोक होते. पण ते आम्हांला आपल्याकडे उतरून घेऊं शकत नव्हते आणि मोकळया मनानें पाहुणचारहि करूं शकत नव्हते. त्यांच्यावर हें एक धर्मसंकटच येऊन पडलें. त्यांनीं आम्हांला आपल्याकडे ठेवून घेतलें असतें किंवा खाऊं पिऊं घातलें असतें तर त्यांना तुरुंगांत जाण्याची किंवा जप्ती येण्याची भीति होती आणि कांहीं केलें नाहीं तर मनाचा त्रास चुकला नसता. पण आम्ही त्यांना अभयदान दिलें आणि आम्ही स्वत: होऊनच एका धर्मशाळेंत जाऊन उतरलों. त्यांनीं भीत भीत कुणाच्या तरी हातून मारवाडी समाजांत शौचाला जातांना वापरतात तसला खास घाटाचा लोटा दुधानें भरून पाठवून दिला आणि तो कोपऱ्यांत ठेवून आणणाऱ्या माणसानें खूण केली. आम्हांला असेंहि कळवलें कीं तुम्ही मंडळी आमच्या दुकानांत आलांत तर आमची मोठी पंचाईत होईल. पण आम्हांला तर सगळ्याच दुकानांवर जायचें होतें. लोकांत अशी घबराट होती कीं जिकडे आमची सभाहि होऊं शकत नव्हती. दवंडी तरी कोण पिटणार ? आमच्याशीं लोक बोलायला देखील घाबरत. दुकानांतून निघून जात असूं तेव्हां कुठें त्यांच्या जिवांत जीव यायचा. पोलीस गस्त घालीतच होते. तेव्हां ते तरी बिचारे काय करतील ? स्त्रियांना पकडण्याची कदाचित् त्यांना परवानगी असावी पण दुकानदार कायद्याच्या आवाक्यांत होतेच. ते बिचारे 'या, बसा' देखील म्हणत नसत. पोलीस आमच्या पावलावर पाऊल टाकून फिरतच होते.

बिहारच्या या दौऱ्यांत आम्हांला बिहारी लोकांची सरलता, नम्रता आणि भोळेपणा यांचा पुष्कळ अनुभव मिळाला. तसा राजेंद्रबाबूंशीं जुना परिचय होता आणि त्यांची नम्रता, सरलता आणि शांत स्वभाव यांची आम्हां सर्वांना ओळख होती. पण बिहारला आल्यावर बिहारी लोकांच्या सद्‍गुणांचा जास्तच परिचय घडला. त्या दिवसांत बिहारमध्यें पडदा इतका कडक होता कीं स्त्रियांच्या सभांत त्यांना त्यांचा हात धरून आणावें लागे. स्त्रियांची गोष्ट राहिली दूर, पुरुष देखील घाबरत कीं आपल्या स्त्रियांना सभेंत कसें जाऊं देतां येईल ! भिडेनें ते आम्हांला मना करूं शकत नव्हते आणि स्त्रियांना बाहेर जाऊं देणेंहि

त्यांना प्रशस्त वाटत नव्हतें. कारण सामाजिक रूढीच मुळी तशी होती. समाजाचें भय ही देखील काय चीज आहे ?

दुमक्याहून आम्ही कलकत्त्याला आलों. तिकडे आम्ही बॅरिस्टर कालिप्रसादजी खैतान यांच्याकडे गेलों. जमनालालजी त्यांच्याकडे उतरत असत. बातमी कळतांच सुभाषबाबू भेटायला आले. मोठ्या प्रेमानें गोष्टी केल्या. त्यांची इच्छा मला जास्तींत जास्त सहकार्य देण्याची होती. मी तर तिकडे परदेशी कपड्यांच्या बहिष्कारासाठीं गेल्यें होत्यें. त्यांनीं या विषयांत सल्ला दिला आणि दुसऱ्या मंडळीशीहि बोलणें केलें.

एक दिवस याच विषयापायीं मी दासबाबूंच्याकडे गेल्यें. ते तर २४-२५ मध्येंच वारले होते. पण त्यांच्या पत्नी वासंतिदेवी यांच्याशीं माझें बोलणें झालें. माझ्यावर तर आंदोलनाचा कैफ चढला होता. मीं त्यांना उपदेश द्यायला आरंभ केला. मी म्हटलें, 'आपण काम करून तुरुंगांत गेलांत तर लोकांवर फार परिणाम होईल.' त्यांच्या परिस्थितीची कल्पना मला मुळीं नव्हतीच. त्यांचा मुलगाहि वारला होता, विधवा सुनेची जबाबदारीहि त्यांच्यावर होती. या विपत्तींत देखील सहज भावानें मला म्हणाल्या कीं विधवा सुनेला एकटें सोडून जाणें कठीण आहे. जे महान असतात ते दुःखांत देखील आपली सहज नम्रता गमावीत नाहींत.

पण माझ्या या असल्या गोष्टींवरून महावीरप्रसादजी पोद्दार चेष्टा करीत. त्यांना हें माहीत होतें कीं माझ्यांत उत्साह खूप असला तरी या शहरांत हें सारें होणें कठिण आहे. पण तिकडे सीतारामजी सेक्सरिया मला पुरतें सहकार्य देत असत.

कांहीं लोक बाजारांत जाऊन पिकेटिंग करूं लागले. त्यांना पकडण्यांत येऊं लागलें. पण स्त्रियांची तयारी कमी दिसली.

दोन महिनेपर्यंत मी तिकडे राहिल्यें. इतर कामांच्या बरोबरीनें या दिवसांत मी तिकडे खादीप्रचार आणि पडदा-निवारण यांचेंहि थोडें काम केलें.

## ३३. घरांत सून आली

कमलनयन लहानपणापासूनच विनोबाजींच्या आश्रमांत राहात होता. आरंभीं आरंभीं तरी विनोबाजींच्या आश्रमांत राहणारा लहानगा मुलगा तोच. विनोबाजी स्वत: त्याची काळजी घेत आणि आश्रमाच्या कामाशिवाय त्याच्या लिहिण्यावाचण्याकडेहि लक्ष देत. कमलनयनचें आश्रमाच्या कामांत मन लागलें होतें पण लिहिण्यावाचण्याकडे त्याचें पुरतें लक्ष नसे. जवाहरलालजी-आणि घनश्यामदासजी बिडला कमलनयनच्या शिक्षणावरून जमनालालजींना ठपका देत राहात. एक दिवस जवाहरलालजींनीं बापूंना सांगितलें, 'कमल-नयन जमनालालजींचें काम सांभाळणार कसें ? त्याला अजून बोलतां लिहितां येत नाहीं. खड्डा खोदणें, संडास साफ करणें, पीठ दळणें, लाकूड चिरणें आणि भाकर भाजणें वगैरेनें पुढें जगांत काम कसें चालायचें ? कांहीं लेखन-वाचनहि झालें पाहिजे. थोडें इंग्रजीहि शिकलें पाहिजे." बापू म्हणाले, 'कमल-नयनची इच्छा असेल तर शिक्षण सुरू करायला हरकत नाहीं. बाकी त्याला आश्रमाच्या कामांतच गोडी वाटत असते, शिक्षणांत लक्ष लागत नाहीं. विनोबा म्हणतात कीं जेव्हां शिक्षणाची भूक लागेल तेव्हां शिकेल.'

दांडी मार्चच्यानंतर आणि मिठाच्या सत्याग्रहाच्या जमान्यांत कमलनयनला गुजरात विद्यापीठांत स्वयंसेवक शिबिरांत ठेवलें होतें. जेव्हां सत्याग्रह थांबला तेव्हां त्याला थोडी शिकण्याची इच्छा झाली. बापूंच्या सल्ल्यानें इंग्रजी शिकव-ण्याचें ठरलें. श्री. वालजीभाई देसाई आपल्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं आणि हवा-पालटासाठीं आपली सगळी मंडळी घेऊन अल्मोड्याला चालले होते. बापूजींनीं कमललाहि त्यांच्याबरोबर पाठविलें. वालजीभाईंनीं त्याच्यावर खूप श्रम घेतले. इकडे बापू गोलमेज परिषदेला निघून गेले. ते परतण्याच्या आधींच उत्तरप्रदेशांत साराबंदी आंदोलन सुरू झालें. बापूजींनीं आल्याबरोबर, जे दांडीयात्रेंत सामील होते त्या सर्वांना साबरमतीला बोलावलें. त्यांना या बैठकीं-तून पुढील कार्यक्रम मुक्रर करायचा होता. कमललाहि अशा प्रकारचें पत्र गेलें आणि त्यांत अशी ताकीद होती कीं त्यानें सरळ आश्रमांत आलें पाहिजे आणि त्या आधीं कोणत्याहि सत्याग्रहांत वगैरे भाग घेतां कामा नये. कमल वालजी-भाईंकडून सुटी घेऊन साबरमतीला जायला निघाला. डिसेंबरचे शेवटचे

दिवस होते. त्या दिवसांत वागेश्वरला प्रतिवर्षीं एक मोठी जत्रा भरते. हें ठिकाण अल्मोडयाहून ३०।४० मैलांवर गोमती आणि शरयू यांच्या संगमावर आहे. त्या जत्रेंत तिबेटचे भुतिये लोक माल घेऊन वरून खालीं येतात आणि उन्हाळ्याच्या आरंभाला इकडून सामान घेऊन तिबेटला परततात. कमलला वाटलें कीं आल्मोडयाहून खालीं उतरून वागेश्वरला गेलों तर जत्राहि पाहतां येईल. साबरमतीला योग्य वेळीं पोंचतां येईल. असा हिशेब करून तो अल्मोडयाहून निघाला.

जत्रेच्या व्यवस्थेसाठीं अल्मोडयाहून कांहीं कॉंग्रेस कार्यकर्ते आधींच तेथें जाऊन पोंचले होते. या दरम्यान उत्तर प्रदेशांत सारावंदी आंदोलन सुरू झाल्यामुळें जत्रेला गेलेल्या कार्यकर्त्यांनाही हुरूप होता आणि त्यांनीं एक सभा घेण्याचें जाहीर केलें. सभेचा मुख्य उद्देश जत्रेंतील सफाई वगैरे व्यवस्थेसंबंधीं विचार करणें हा होता. शिवाय कार्यकर्त्यांचा राजकीय व्याख्यानें करण्याचाहि हेतु होता. सरकारनें जत्रेच्या प्रसंगीं एकशें चव्वेचाळीस कलम लावून सभेला बंदी केली. ज्या दिवशीं सभा व्हायची होती, त्याच दिवशीं कमलहि तिकडे पोंचला. तो पोंचल्याचें जेव्हां कार्यकर्त्यांच्या कानावर आलें तेव्हां ते त्याला भेटायला आले. ते कैफांत होते आणि एकशे चव्वेचाळीस कलम लावल्यानें आपल्या स्वाभिमानावर आघात झाला अशा समजानें त्यांनीं तें मोडण्याचें ठरविलें होतें. त्यांनीं कमललाहि आग्रह केला कीं त्यानें सभेंत बोललें पाहिजे. कमल मिठाच्या सत्याग्रहांत अनेकदां पकडला गेला होता पण वय कमी असल्यामुळें त्याला सोडून देण्यांत आलें होतें. त्यामुळें तो तुरुंगांत गेला नव्हता याचें त्याच्या मनांत वैषम्य होतें. इकडे ही आयती संधि मिळाली असें त्याला वाटलें. परंतु बापूंचा आदेश आलेला असल्यामुळें त्यानें कार्यकर्त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें सांगितलें कीं बापूजींचा आदेश तोडणें शिस्तीच्या विरुद्ध होईल. त्यानें सभेंत भाग घेण्याची आपली असमर्थता प्रकट केली. पण कार्यकर्त्यांचा आग्रहच झाला. ते मोठ्या कष्टानें एवढ्या गोष्टीला कबूल झाले कीं वाटल्यास त्यानें भाषण करूं नये पण सभेंत सामील व्हावें. कमल ह्या म्हणण्याला कबूल झाला.

संध्याकाळीं सगळे लोक पोंचले तेव्हां कळलें कीं कार्यकर्त्यांनीं कमलचें नांवहि, त्याला न विचारतांच एक व्याख्यान म्हणून जाहीर केलें आहे. एवढेंच

## ३३. घरांत सून आली

कमलनयन लहानपणापासूनच विनोबाजींच्या आश्रमांत राहात होता. आरभीं आरंभीं तरी विनोबाजींच्या आश्रमांत राहणारा लहानगा मुलगा तोच. विनोबाजी स्वतः त्याची काळजी घेत आणि आश्रमाच्या कामाशिवाय त्याच्या लिहिण्यावाचण्याकडेहि लक्ष देत. कमलनयनचें आश्रमाच्या कामांत मन लागलें होतें पण लिहिण्यावाचण्याकडे त्याचें पुरतें लक्ष नसे. जवाहरलालजी- आणि घनश्यामदासजी बिडला कमलनयनच्या शिक्षणावरून जमनालालजींना ठपका देत राहात. एक दिवस जवाहरलालजींनीं बापूंना सांगितलें, 'कमल- नयन जमनालालजींचें काम सांभाळणार कसें ? त्याला अजून बोलतां लिहितां येत नाहीं. खड्डा खोदणें, संडास साफ करणें, पीठ दळणें, लाकूड चिरणें आणि भाकर भाजणें वगैरेनें पुढें जगांत काम कसें चालायचें ? कांहीं लेखन- वाचनहि झालें पाहिजे. थोडें इंग्रजीहि शिकलें पाहिजे." बापू म्हणाले, 'कमल- नयनची इच्छा असेल तर शिक्षण सुरू करायला हरकत नाहीं. बाकी त्याला आश्रमाच्या कामांतच गोडी वाटत असते, शिक्षणांत लक्ष लागत नाहीं. विनोबा म्हणतात कीं जेव्हां शिक्षणाची भूक लागेल तेव्हां शिकेल.'

दांडी मार्चच्यानंतर आणि मिठाच्या सत्याग्रहाच्या जमान्यांत कमलनयनला गुजरात विद्यापीठांत स्वयंसेवक शिबिरांत ठेवलें होतें. जेव्हां सत्याग्रह थांबला तेव्हां त्याला थोडी शिकण्याची इच्छा झाली. बापूंच्या सल्ल्यानें इंग्रजी शिकव- ण्याचें ठरलें. श्री. वालजीभाई देसाई आपल्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं आणि हवा- पालटासाठीं आपली सगळी मंडळी घेऊन अल्मोड्याला चालले होते. बापूजींनीं कमललाहि त्यांच्याबरोबर पाठविलें. वालजीभाईंनीं त्याच्यावर खूप श्रम घेतले. इकडे बापू गोलमेज परिषदेला निघून गेले. ते परतण्याच्या आधीच उत्तरप्रदेशांत साराबंदी आंदोलन सुरू झालें. बापूजींनीं आल्याबरोबर, जे दांडीयात्रेंत सामील होते त्या सर्वांना साबरमतीला बोलावलें. त्यांना या बैठकीं- तून पुढील कार्यक्रम मुक्रर करायचा होता. कमललाहि अशा प्रकारचें पत्र गेलें आणि त्यांत अशी ताकीद होती कीं त्यानें सरळ आश्रमांत आलें पाहिजे आणि त्या आधीं कोणत्याहि सत्याग्रहांत वगैरे भाग घेतां कामा नये. कमल वालजी- भाईकडून सुटी घेऊन साबरमतीला जायला निघाला. डिसेंबरचे शेवटचे

दिवस होते. त्या दिवसांत वागेश्वरला प्रतिवर्षी एक मोठी जत्रा भरते. हें ठिकाण अल्मोडयाहून ३०।४० मैलांवर गोमती आणि शरयू यांच्या संगमावर आहे. त्या जत्रेंत तिबेटचे भुतिये लोक माल घेऊन वरून खालीं येतात आणि उन्हाळयाच्या आरंभाला इकडून सामान घेऊन तिबेटला परततात. कमलला वाटलें कीं आलमोडयाहून खालीं उतरून वागेश्वरला गेलों तर जत्राहि पाहतां येईल. साबरमतीला योग्य वेळीं पोंचतां येईल. असा हिशेब करून तो अल्मोडयाहून निघाला.

जत्रेच्या व्यवस्थेसाठीं अल्मोडयाहून कांहीं काँग्रेस कार्यकर्ते आधींच तेथें जाऊन पोंचले होते. या दरम्यान उत्तर प्रदेशांत साराबंदी आंदोलन सुरू झाल्यामुळें जत्रेला गेलेल्या कार्यकर्त्यांनाही हुरूप होता आणि त्यांनीं एक सभा घेण्याचें जाहीर केलें. सभेचा मुख्य उद्देश जत्रेंतील सफाई वगैरे व्यवस्थेसंबंधीं विचार करणें हा होता. शिवाय कार्यकर्त्यांचा राजकीय व्याख्यानें करण्याचाहि हेतु होता. सरकारनें जत्रेच्या प्रसंगीं एकशें चव्वेचाळीस कलम लावून सभेला बंदी केली. ज्या दिवशीं सभा व्हायची होती, त्याच दिवशीं कमलहि तिकडे पोंचला. तो पोंचल्याचें जेव्हां कार्यकर्त्यांच्या कानावर आलें तेव्हां ते त्याला भेटायला आले. ते कैफांत होते आणि एकशे चव्वेचाळीस कलम लावल्यानें आपल्या स्वाभिमानावर आघात झाला अशा समजानें त्यांनीं तें मोडण्याचें ठरविलें होतें. त्यांनीं कमललाहि आग्रह केला कीं त्यानें सभेंत बोललें पाहिजे. कमल मिठाच्या सत्याग्रहांत अनेकदां पकडला गेला होता पण वय कमी असल्यामुळें त्याला सोडून देण्यांत आलें होतें. त्यामुळें तो तुरुंगांत गेला नव्हता याचें त्याच्या मनांत वैषम्य होतें. इकडे ही आयती संधि मिळाली असें त्याला वाटलें. परंतु बापूंचा आदेश आलेला असल्यामुळें त्यानें कार्यकर्त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें सांगितलें कीं बापूजीचा आदेश तोडणें शिस्तीच्या विरुद्ध होईल. त्यानें सभेंत भाग घेण्याची आपली असमर्थता प्रकट केली. पण कार्यकर्त्यांचा आग्रहच झाला. ते मोठ्या कष्टानें एवढया गोष्टीला कबूल झाले कीं वाटल्यास त्यानें भाषण करूं नये पण सभेंत सामील व्हावें. कमल ह्या म्हणण्याला कबूल झाला.

संध्याकाळीं सगळे लोक पोंचले तेव्हां कळलें कीं कार्यकर्त्यांनीं कमलचें नांवहि, त्याला न विचारतांच एक व्याख्यान म्हणून जाहीर केलें आहे. एवढेंच

नव्हे, तर आधींपासून तशीं पत्रकेंहि वांटलीं आहेत, हें पाहून त्याला आश्चर्य तर वाटलेंच पण तुरुंगांत जायची आयती संधि मिळते म्हणून आनंदहि झाला. पण दुसरीकडून बापूजींनीं कायदेभंग न करतां सरळ आश्रमाला निघून ये असें लिहिल्यामुळें असहाय्यताहि वाटत होती. अखेर निरुपाय होऊन सभेंत बोलणेंच त्यानें योग्य मानलें. तिकडे तो जत्रेच्या व्यवस्थेवगैरे संबंधींच बोलला. त्यानें साफ जाहीर केलें कीं बापूजींच्या आदेशाप्रमाणें आपल्याला कोणत्याच राजकीय विषयावर बोलणें शक्य नाहीं. पण सभा होऊन गेल्यावर इतरांबरोबर पोलिसांनीं कमललाहि अटक केली.

तिकडे मॅजिस्ट्रेट नव्हता. त्याला आपल्या सदर मुक्कामाहून बोलावून आणावें लागलें. तोंपर्यंत सर्वांना तीन चार दिवस कच्च्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. बागेश्वरला कोणा एका गवळ्याच्या घरच्या खालच्या भागाला, म्हणजे जिकडे गुरें ढोरें बांधलीं जात त्या जागेला कच्च्या तुरुंगाचें रूप देण्यांत आलें होतें. मॅजिस्ट्रेटसमोर कमलनें आपल्या फटकळ स्वभावानुसार उत्तरें दिलीं. त्यामुळें त्याचा खटला निकालांत काढायला मॅजिस्ट्रेटला फार उशीर लागला. मॅजिस्ट्रेट त्याच दिवशीं खटला आटपून आपल्या सदर मुक्कामाला जाऊं इच्छीत होता. तें होऊं शकलें नाहीं या रागानें किंवा जें कांहीं त्याला वाटलें त्यामुळें त्यानें कमलला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा, कांहीं दंड आणि तो न भरल्यास कैद आणि 'क' वर्ग दिला. दुसरे दिवशीं सर्वांना पायींच सोमेश्वर-पर्यंत आणण्यांत आलें आणि तेथून बसनें आल्मोड्याच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें. आल्मोड्याला त्याला सुमारें पंधरा दिवस ठेवण्यांत आलें. तिकडे लहान मुलांसाठीं कसलीच व्यवस्था नव्हती. म्हणून कमलची आणि दुसऱ्या एका सोबतच्या मुलाची हरदोई तुरुंगांत– म्हणजे जेथें मुलांची थोडीफार व्यवस्था होती तेथें बदली करण्यांत आली. हरदोई तुरुंगांत तो सुमारें चार पांच महिने राहिला. तिकडे त्याचा बहुतेक काळ 'क' वर्गांत सक्तमजुरींत गेला. यावेळीं त्याचें वय सतरा वर्षांचें होतें. तुरुंगांत त्याचें बेचाळीस पौंड वजन घटलें. दरम्यान असेंब्ली वगैरेमधून प्रश्नोत्तरें झाल्यामुळें त्याला दोनतीन आठवडे तात्पुरता 'बी' क्लास देण्यांत आला आणि मग त्याचा 'अ' वर्ग करण्यांत आला. त्यानंतर त्याला बरेलीच्या जिल्हा तुरुंगांत पाठविण्यांत आलें. बरेलीला 'अ' वर्ग मिळाल्यामुळें अन्न जरा चांगलें मिळालें. विश्रांति आणि चांगल्या

सहकाऱ्यांचा सहवास यांच्यामुळें (सहकाऱ्यांत श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांचे यजमान श्री. आर. एस्. पंडितहि होते. ह्यांच्याशीं कमलचा निकटचा परिचय झाला. त्याला ते आवडीनें शिकवीत.) त्याच्या घटलेल्या वजनापैकीं पंधरावीस पौंड त्याला परत मिळाले. शिक्षेंतला राहिलेला एक महिनाच तो इकडे राहिला. दंडाच्या वसुलींत पोलीसांनीं वर्ध्याच्या दुकानावर जाऊन कांहीं वस्तु जप्त केल्या आणि त्या विकून बळजबरीनें दंड वसूल केला.

तुरुंगांतून सुटल्यावर त्यानें हिंदी साहित्य संमेलनाची प्रथमा परीक्षा दिली आणि १९३२ चा सत्याग्रह बंद झाल्यावर बापूजींच्या सल्ल्यानें प्रो. जे. जे. वकील यांच्या शाळेंत पुण्याला आणि पार्ल्याला वर्षभर शिक्षण घेतलें आणि मग हिंदी साहित्य संमेलनाची मध्यमा परीक्षा दिली. १९३५ त बापूजींनीं त्याला इंग्रजीच्या अभ्यासासाठीं सीलोनला पाठविलें. या दरम्यान कलकत्त्याच्या लक्ष्मणप्रसादजी पोद्दार यांच्या मुलीशीं त्याची सोरगत करण्याविषयींच्या गोष्टी चालल्या.

सावित्री फारच सुंदर होती त्यामुळें माझें मन तर तिच्याकडे ओढ घेत होतेंच. पण ती फार नाजूक असल्यानें मनांत हीहि भीति होती कीं हिला मुलेंबाळें कशीं होणार ? मी ही गोष्ट बापूंना बोलून दाखवली तेव्हां ते विनोदानें म्हणाले, 'गोष्ट तर खरीच आहे. इतक्या नाजूक मुलीचा आपल्याकडे निभाव कसा लागणार?' पण महादेवभाईंनी तर थट्टेचा कळसच केला. ते म्हणाले, 'जानकी-बहन, तुम्ही तर मुलीच्या रूपावर भाळलां आहांत. पण ही तर तुमच्या मुलाला सोडून पळून जाईल !' या थट्टेनें मला धक्का तर लागलाच. पण मी लगेच स्वतःच सावरून घेतलें आणि म्हटलें, 'महादेवभाई, शेवटीं आहे मारवाड्याचें रक्त. पळणार कुठें ?' सावित्रीहि कधीं कधीं महादेवभाईंच्या त्या थट्टेची पुनरावृत्ति करते आणि म्हणते, 'माझी परीक्षा तर त्यांनींच केली होती.'

मुलीच्या मंडळीकडील विशेष आग्रहामुळें बापूंनीं सोरगत नक्की केली. कलकत्त्याच्या मंडळीची साहजिकच इच्छा होती कीं लग्नसमारंभ थाटामाटानें व्हावा. लग्नाला खूप लोक यावे. बापूजींचा सल्ला घेऊन वऱ्हाडाबरोबर पंधरा माणसें नेण्याचें ठरलें.बापूजींनीं पांच माणसें सुचवलीं होतीं तर विनोबाजींनीं तीन.

बच्छराज कुटुंबांतल्या तीन पिढ्यांत हा पहिला मुलगा. अर्थात् गांव, कुटुंबांतील मंडळी आणि नातेवाईक यांची अपेक्षा होती कीं त्यांच्या लग्नांत

येण्याची सगळ्यांना संधि मिळेल. पण जमनालालजींनीं जेव्हां पंधरा हा आंकडा ठरवला—त्यांत पुन्हा अर्ध्या स्त्रिया होत्या—तेव्हां अनेकांची निराशा झाली आणि कित्येकांना तर वाईटहि वाटलें.

विवाहांत खादीचा प्रयोगतर व्हायचाच होता. सावित्रीची इच्छा जरीची साडी नेसण्याची होती. म्हणून चरकासंघाला खास ऑर्डर देऊन जरीची साडी मागवण्यांत आली.

मुलीकडच्यानींहि कमलनयनसाठीं खादीचेच कपडे करायला टाकले. रेशमी शेरवानी आणि जरीचा साफा. कलकत्त्याच्या एक स्टेशनच्या आधींच ही मंडळी कपडे घेऊन आली आणि त्यांनीं इच्छा दर्शविली कीं ते कपडे वापरूनच कमलनें स्टेशनावर उतरावें. पण कमलनयन वर्ध्याहूनच पांढरा सदरा, धोतर, टोपी आणि केशरी उपरणें अंगावर घेऊन निघाला होता. आणि त्याच पोशाखांत तो कलकत्त्याला उतरला. त्याचें म्हणणें होतें कीं धार्मिक विधीच्या प्रसंगीं खादीचे साधे, चांगले आणि पांढरे कपडेच हवेत. बोहल्यावरहि त्यानें हेच कपडे वापरले.

स्टेशनवर वऱ्हाडी मंडळीच्या स्वागताची सर्व व्यवस्था होती. पण वऱ्हाडी मंडळींत अवधीं तेराच माणसें जेव्हां मुलीकडच्या मंडळींनीं पाहिलीं तेव्हां त्यांच्या उत्साहावर पाणी पडलें. कारण त्यांनीं तयारी फार मोठी केली होती आणि कमीत कमी पन्नास साठ तरी लोक असतील असें ते धरून चालले होते.

आम्ही सकाळीं पोंचलों आणि संध्याकाळीं सहा वाजतां सप्तपदी झाली. दुसऱ्याच दिवशीं आम्हांला परतायचें होतें. बिडलाजी आपल्याकडे पार्टी देऊं इच्छीत होते. मुलीकडचे लोक आपल्याकडे मेजवानी देऊं इच्छीत होते. जमनालालजींनीं सांगितलें कीं कुठें कां असेना, इकडे आपल्याला फक्त एक जेवण घ्यायचें आहे. अखेर बिडलाजींच्याकडे पार्टी झाली. मुलीकडची मंडळी कुटुंबांतील सगळ्या लोकांना कपडे वगैरे देऊं इच्छीत होती. पण आम्ही घ्यायला नकार दिला. रामच्यासाठींहि त्यांनीं कमलनयनसारखेच कपडे आणि दागिने बनवले होते. पण आम्ही सांगितलें कीं आम्ही वराचे पांच कपडेच काय ते नेऊं शकतों. केळवण, आहेर वगैरेंतल्या भेटी तर आम्हीं घेतल्याच नाहीत. कमलनयन अजूनहि ओवाळणीच्या प्रसंगीं शुभाचारादाखल एकच रुपया घेत असतो.

मुलीकडच्यांनी आपल्या मुलीला काय आहेर-करणी केली याची आम्हीं कधी चौकशी केली नाही. एवढेंच काय, त्याची आम्हांला कल्पनाहि नव्हती. वर्ध्याला पोंचल्यानंतर कलकत्त्याच्या कांहीं आप्तेष्टांनीं हुंड्याच्या बाबतीत विचारपूस केली कीं हुंडा किती घेतलात ? तेव्हां जमनालालजींना मोठें आश्चर्य वाटलें. कारण हुंडा म्हणून आम्हीं कांहींच घेतलें नव्हतें !

## ३४. तुरुंगयात्रा

इकडे सत्याग्रह चालला होता तर तिकडे मी परदेशी कपड्यांचा बहिष्कार, गुत्त्याचें पिकेटिंग वगैरे कामांत गुंतल्यें होत्यें. जानेवारीचे दिवस होते. लंडन-मध्ये चाललेली गोलमेज परिषद संपली होती. बापूजी आणि इतर मोठमोठे नेते तुरुंगांतून सुटले होते. गांधी-अर्विन समेट झाला. कराचीला कांग्रेसचें अधि-वेशन झालें. बापूजी दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठीं विलायतेला गेले. तिकडून रित्या हातांनी परतले आणि सत्याग्रह पुन्हा सुरू झाला. बापूजी आणि इतर सर्व पुढारी पकडले गेले. मीहि सत्याग्रहाच्या कामांत गुंतल्यें होत्यें. या खेपेला वर्ध्यांतल्या स्त्रियांनीं ह्यांत भाग घ्यावा म्हणून मी त्यांना तयार करूं लागल्यें. वर्ध्याच्या मूळचंदजी भय्यांची आईदेखील, पडद्यांत राहणारी आणि जुन्या विचारांची मारवाडी महिला असून तुरुंगांत जायला तयार झाली. मला तुरुंगांत जाण्याचा आणि भगिनीवर्गाला त्यासाठीं तयार करण्याचा असा ध्यास लागला कीं जणूं माहेरींच जायचें आहे. माझें हें काम जोरांत चालूं झालें, तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांना मला मोकळें राहूं देणें योग्य वाटलें नाहीं. त्यांनीं मला अटक केली. दुसरे दिवशीं तुरुंगांतच खटला चालला आणि मला सहा महिन्यांची सजा झाली.

जोंवर मी वर्ध्याच्या तुरुंगांत होत्यें तोंवर जेवणाचा डबा घरून येत होता. त्यामुळें मोठीशी अडचण वाटली नाहीं. कांहीं दिवस आधीं कमलाला मुलगा झाला होता आणि ती तिथेंच होती. तिचीहि वारंवार आठवण व्हायची. कांहीं दिवस वर्ध्याला राहिल्यानंतर नागपूरच्या बदलीचा हुकूम आला. मला भीति

वाटली, हे देवा ! आतां कसें होणार ? त्या दिवशीं रात्रीं झोंपलें तर स्वप्नांत देखील कमलाच्या मुलाचा पाळणा हलवूं लागल्यें ! माझी नागपूरच्या तुरुंगांत बदली झाली हें घरच्या मंडळीला कळूंच शकलें नाहीं. 'गांधीजी की जय' च्या घोषणा देत आम्ही चाललों होतों.

आतां मी नागपूरच्या तुरुंगांत होत्यें. तुरुंग कसा होता तर एक मोठा राजवाडाच. एकामागून एक असे तीनचार दरवाजे ओलांडल्यावर एक स्वच्छ कोठडी सांपडली. इकडे दहा कोठड्या होत्या. एका कोठडींत लोखंडी पट्ट्यांचे पलंग वगैरे सामान होतें. आपल्याजवळ असलेल्या वस्तु मी सोडल्या आणि घरच्याप्रमाणें तिकडे मांडल्या.

तेथले सुपरिंटेंडेंट शिस्तीचे फार कडक होते आणि कैदी त्यांना कर्दनकाळ म्हणत. मी तिकडे 'अ' वर्गांत होत्यें. त्यानें मला आवश्यक सामानाविषयीं वगैरे विचारलें. मीं सांगितलें, 'बाकी माझें कसेंहि भागेल पण माझा गायीच्याच दुधातुपाचा नियम आहे.' तो म्हणाला कीं गायीचें दूध येथें देऊं. तूप घरून मागवावें लागेल. मी उकडलेली भाजी आणि कोरडी भाकरच द्यायला सांगितलें; कारण मला मिरची खायची सवय नव्हती.

जेव्हां मी पाहिलें की तिकडे सोबतच्या कैद्यांना स्टोव्ह पेटवायला आगपेटी मिळण्याची देखील मारामार होते तेव्हां मी कच्च्या दुधांतच लिंबू पिळून दहीं लावण्याचें ठरविलें. वांग्याची उकडलेली भाजी आणि कोरडी भाकर येत असे. तिच्यावरच कढवल्याशिवाय तूप घालून मी ती खाऊन घेत असें. थंड पाण्यानेंच अंघोळ करीत होत्यें आणि कपडे धूत होत्यें. आमच्याकडे शौचाचा लोटा मातीनें घासण्याचा रिवाज आहे. पण तिकडच्या लोकांत त्यावर एवढें लक्ष दिलें जात नाहीं. जेव्हां कोणी शौचाहून आल्यावर आपल्या सवयीप्रमाणें बादलींत लोटा बुडवी तेव्हां मी बादली पुन्हां मातीनें घांसून घेत असें. अशा रीतीनें माझें काम वाढतच जाई.

पाण्यांत काम केल्यामुळें आणि थंड आणि कोरडें अन्न खाल्ल्यामुळें मला दिवसांतून तीनतीन-चारचारदां शौच आणि उलट्या होऊं लागल्या. तापहि येऊं लागला. डॉक्टरनें औषध घ्यायला सांगितलें. पण औषध घ्यायला मी विरोध केला. माझी प्रकृति दिवसेंदिवस बिघडतच चालली. संध्याकाळी पांच वाजतां कोठडीचीं कुलपें लावली जात. रात्रीं कोठडींत ठेवलेल्या कमोडवरच मला वारंवार

शौचाला जावें लागे. सात दिवसांत माझें तेवीस पौंड वजन घटलें. मुळव्याधीची तक्रार तर आधींपासूनचीच होती. आतां शौचांतून आणि उलटींतून रक्त पडूं लागलें. बाहेर बातमी पसरली कीं मी मेल्यें. जिवंत असलेला माणूस मेल्याची आवई उठली तर तें शुभ मानलें जातें. आणि त्यामुळें आयुष्य वाढतें असें समजतात. यांत खरें किती, देव जाणें, पण अजून मी जिवंत आहे हें तर खरेंच आहे. मी मेल्याची खबर पहिल्यानें कळली ती किशोरलालभाईंना. पण ती त्यांनीं जमनालालजींना सांगितली नाहीं. मी मेल्यें नसल्याचें नंतर लोकांना समजलें. पण माझी स्थिति मेल्यासारखीच होती. मला तुरुंगांतून इस्पितळांत नेण्यासाठीं स्ट्रेचर आणण्यांत आलें. दुर्गाबाई जोशी म्हणाल्या कीं संध्याकाळच्या वेळीं इस्पितळांत नेऊं देणार नाहींत. त्या म्हणाल्या, देवाचें नांव घेऊन एक औषध देतें. पहा, रात्र त्रासाशिवाय गेली तर इस्पितळापासून सुटका झाली असें समजा. त्यावेळीं माझ्या पोटांत कांहीच ठरत नव्हतें. डाळिंबाचा रस देखील जशाचा तसा शौचांतून जायचा. तरी देखील धीर करून त्यांनीं औषध दिलें. तें औषध कसलें होतें, तर एक चमचा तांदूळ तव्यावर भाजून वाटीनें ते ठेचले आणि पाण्यांत शिजवले. त्या खळीत मीठ आणि जिरें मिसळून त्यांत गायीच्या तुपाची फोडणी देऊन ती मला चाटायला दिली. त्यानें मला पुष्कळच आराम मिळाला. पोटांतली आग कमी झाली. मला तें रुचकरहि लागलें.

त्यानें प्रकृति थोडीथोडी सुधारत गेली आणि ताक-दहीं घेण्याचा प्रश्न आला. पण कच्च्या दुधांत लिंबू पिळून केलेल्या त्याच्या नुसत्या नांवानेंच मला उलटी होत असे. जेल सुपरिंटेंडंटनें सांगितलें कीं त्याच्याकडे मुलांसाठीं आणलेलें गायीचें दूध असतें, हवें असल्यास त्याच्या ताकाचें विरजण आपल्याला लावतां येईल. गायीच्या शुद्ध ताकाचें विरजण इथें कुठलें व्हायला? शुद्ध विरजण फक्त वर्ध्याहूनच येऊं शकलें असतें. मंडळी घाबरून जाईल एवढ्याचसाठीं आजाराची बातमी वर्ध्याला कळविण्यांत आली नव्हती. पण आतां तार देऊन विरजण मागवावें लागलें. एका मडक्यांतून माझ्यासाठीं विरजण आलें आणि सगळे भेटायलाहि आले. एका बाईनें म्हटलें, ‘दह्याच्या चक्क्याच्या वड्या वाळत टाका. बाटलींत भरून ठेवून द्या. बस, जेव्हां विरजण द्यावयाचें असेल तेव्हां दुधांत एक वडी टाकून द्या म्हणजे दहीं लागेल.’

तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं ‘क’ वर्गातल्या एका भगिनीला माझ्याबरोबर

राहायला संमति दिली होती. मी मूळचंदजी भैयांच्या आईला माझ्याजवळ बोलावून घेतलें. त्यांची सेवा आणि दुर्गाबाई जोश्यांचे उपाय यामुळेंच मी त्यावेळीं बचावलें. त्या उभयतांची सेवा मी विसरूं शकत नाहीं. भय्याजींच्या आईनें सहा महिन्यांत 'क' 'ब' 'अ' या तीनही वर्गांचा अनुभव घेतला आणि मी मात्र 'अ' वर्गांत राहून देखील आजारीच राहिल्यें.

या आजारांत मला एक अद्भुत स्वप्न पडलें. जेव्हां मला ताप वाढला तेव्हां मला क्विनाइन दिलें गेलें. प्रारंभीं मी तें घ्यायला नकार दिला पण मला सांगण्यांत आलें कीं तुरुंगांत वैद्याचें औषध देतां येत नाहीं. डॉक्टरनें सांगितलें कीं किमान ४० ग्रेन क्विनाइन घ्यावें लागेल. मी तर आयुष्यांत कधीं क्विनाइन घेतलें नव्हतें. अखेर वीस ग्रेन घेण्याचें ठरलें. तेवढें क्विनाइन डॉक्टरकडून घेऊन मी अर्धे फेकून दिलें. माझ्या पोटांत दहा ग्रेन क्विनाइन गेलें असेल. पण एवढ्या क्विनाइननेंच मी बेभान झाल्यें. आग फार होऊं लागली. त्या बेभानतेंत मी जें स्वप्न पाहिलें तें असें.

'मी पलंगावरून उठून चालूं लागल्यें आणि तुरुंगाच्या छपरावर जाऊन बसल्यें, आपल्या सुटकेची वेळ तर झालेली नाहीं आणि तरी मी बाहेर आल्यें आहे. तेव्हां आतां आंत कशी जाणार अशी भीति तेथें मला वाटली नाहीं. मी समोर नजर फिरवली तेव्हां घरासमोरच्या गांधीचौकांत सभा भरली आहे असें मला दिसलें. तिकडे हिरव्यागार दुर्वांचे गालीचे पसरलेले होते. झेंडे घेतलेले स्वयंसेवक ओळींत उभे राहून कवाईत करीत होते. ते मला बाहुल्यांसारखे टीचभर उंचीचे वाटत होते.'

कांहीं दिवसांनीं बातमी कळली कीं बजाजवाडी, मगनवाडी आणि महिला-श्रम या तिन्ही संस्था जप्त झाल्या. मला सरकारनें एक हजाराचा दंड केला होता. मला तो द्यायचा नव्हता. अधिकाऱ्यांनीं वाटल्यास जप्ती आणून हवें तें घेऊन जावें. बजाजवाडींत रात्रीचे सर्व झोपलेले होते. माझी नणंद गुलाबबाई राजस्थानहून आली होती. पोलीसांनीं सारें सामान जप्त करून सील लावलें. बजाजवाडीच्या दहाबारा गायींहि कबज्यांत घेतल्या. पोलीस जेव्हां गायींचें दूध विकण्यासाठीं हलवायांकडे गेले तेव्हां त्यांनीं जमनालालजींच्या गायींचें दूध कोणत्याहि भावांत खरेदी करण्यास इन्कार केला! फुकट देखील घ्यायला ते राजी होईनात. जोंवर दाणावैरण होती तोंपर्यंत गायींना मिळत राहिली पण

पुढें पोलिसांना कुठली आली आहे काळजी ? बिचाऱ्या गायी भुकेमुळें भाकड झाल्या. त्याहि जणूं तुरुंगवास भोगीत होत्या !

दुकानांत मोठमोठ्या तिजोऱ्या होत्या. त्या उचलून नेणें म्हणजे कांहीं चेष्टा नव्हती. दोनचार माणसांच्या शक्तीबाहेरची गोष्ट होती. पोलीस सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत डोकीं आपटून हैराण झाले—पण तिजोरी उचलायला त्यांना एकहि हमाल मिळाला नाहीं. तिजोरी उचलण्याचीहि एक पद्धत असते आणि हें काम हमालच करूं शकतात. हमालांनीं साफ सांगून टाकलें कीं आपण जमनालालजींच्या तिजोऱ्या बिलकुल उचलणार नाहीं. पोलीस त्यांना दहा रुपये रोजगार देखील द्यायला तयार होते ! पण हमालांत देखील त्यावेळीं चैतन्य उफाळून आलें होतें आणि देशहितासाठीं त्यांनीं सरकारशीं सहकार्य करण्याचें नाकारलें. शेवटीं दिवस पडायला अनेक पोलिसांनी मिळून कशाबशा तिजोऱ्या उचलल्या. पण तसें करतांना त्यांचे आंगठे चेंगरले, दारांच्या चौकटी तुटल्या. फरशी फुटली. कशा बशा त्यांनीं तिजोऱ्या बाहेर काढल्या. पांच महिने-पर्यंत तिजोऱ्या सरकारच्या ताब्यांत राहिल्या. त्यांत लोकांचे, नातेवाईकांचे पुष्कळसे दागदागिने होते. लग्नाचा मोसम होता. दागिन्यांची गरज होती. पण करतां आलें असतें काय ?

जमनालालजींचा दुकानावरच्या लोकांना हुकूम होता कीं सरकारला जप्ती आणून कांहीं न्यायचें असलें तर सर्वांनीं दुकानांतून बाहेर जावें आणि कोणत्याहि प्रकारें त्याच्या कामाची दखल घेऊं नये. पोलीस तिजोऱ्या तर घेऊन गेले पण जेव्हां अधिकाऱ्यांना कळलें कीं त्यांत हजारों रुपयांचें जडजवाहीर आहे तेव्हां ते देखील घाबरून गेले !

●

## ३५. नवें रत्न शोधून काढलें

दुसरी मुलगी मदालसा लहानपणापासूनच आश्रमाच्या वातावरणांत वाढली होती. ती विनोबाजींजवळ राहिल्यामुळें तिच्या अंगीं अत्यंत साधेपणा आणि कष्टाळूपणा आला होता. ती शहरी अगर घर-संसाराच्या वातावरणा-पासूनहि दूर राहिली.

एकदा महिलाश्रमांतील मुलीच्या डोक्यांत उवा पडल्या. बापूजींनीं सांगितलें, केंस काढून टाका. पण मुलींचे केस कापायचे कसे ? बापूजींनीं सांगितलें खरें, पण तयार कोण होणार ? मुलीच्या आईबापांची परवानगी हवी. परंतु मी मदालसेला बापूसमोर नेलें आणि सांगितलें, " बापूजी, मदालसेचे तर केस कापून टाका !" बापूंना काय, त्यांनीं मशीन घेतलें व आपल्या कांपऱ्या हातांनीं तिचे केस कापले !

मी तिला बजाजवाडीला घेऊन आल्यें. समोरच खुर्चीवर आजी बसलेल्या असत. मदालसेला अशा अवतारांत पाहून त्यांना रडूंच आलें. जमनालालजींनाहि याचें दुःख झालें. ते हळूच म्हणाले, 'केस कापायची काय जरूरी होती ?' सुरवातीस मी म्हणाल्यें, 'कापले म्हणून काय झालें ? गवत आहे, उगवेल परत."
पण नंतर मलाहि वाईट वाटलें. उपवर मुलीचे केंस कापण्यांत काय स्वारस्य होतें ? पण मी तरी काय करणार होत्यें ? मदालसा कांहीशा अशाच वातावरणांत राहिली कीं मला वाटायचें तिचें लग्न वगैरे करायचें नाहींच आहे, ती तर या बाबतींत उदासीन आहे.

मदालसा विनोबांकडे गोपुरी-नालवाडींत राहत होती. आश्रमांत लहान-मोठे किंवा गरीब-श्रीमंत समान भावानेंच राहात. ती रोज सकाळीं चार वाजतां नालवाडीहून बंगल्यावर स्नानासाठीं येई. तिची शौचाची तक्रार असे आणि म्हणून ती चार वाजतां गरम पाणी पीत असे. चार वाजतां ती पाणी तापवी आणि तें पिऊन गोपुरीहून निघे ; प्रातर्विधि आटोपी. बंगल्यावर येऊन स्नान करी. कपडे धुऊन वाळवी आणि पुन: नालवाडीला जाई. परत जातांना तिच्या एका हातांत ताकाचें मडकें असे. त्यांतच थोडें लोणीहि असायचें. दुसऱ्या हातांत काठी व कंदील असायचा. थोडेंसें शेणहि ती बंगल्यावरूनच घेऊन जाई. शेण तिला नालवाडींत मिळूं शकलें असतें, पण ती म्हणायची की यामुळें गरीबांचें नुकसान होईल. त्यांना गोवऱ्या थापायला शेण कमी पडेल. विजार आणि कमीज चढवून ती जात येत असलेलें दृश्य मला आजहि आठवतें. आश्रमांत नोकर ठेवण्याची मनाई होती. कारण तेथें हातानेंच सारीं कामे करायचा नियम होता.

मदालसेची प्रकृति लहानपणापासूनच नाजुक. आमच्या इथें एक स्वयंपाकी असा होता, कीं जो चोरून लपवून तिला गोडधोड खायला देई. हेतु एवढाच

कीं मदालसेची प्रकृति सुधारावी. पण गोडधोड खाण्यानें तिचें रक्त आणि दांत बिघडले. दहीं वगैरे आंबटापासून ती दूरच राहिली. अखेर जेव्हां आम्ही अल्मोड्याला निघालों, तेव्हां तिलाहि बरोबर घेऊन गेलों. अल्मोड्याला मी व मदालसा आठ महिने होतों. तिकडे तिला श्री. रणजित पंडित शिकवीतहि असत. तिथें तिचें वजन २० पौंडांनीं वाढलें. अशा प्रकारें मदालसाचें जीवन एकांगी बनत चाललें होतें. पण जमनालालजींना तिच्या भावी आयुष्याची चिंता होतीच. आणि ते तिच्यासाठीं योग्य वराच्या शोधांत होते.

लखनौ काँग्रेसमधें श्रीमन्नारायण अग्रवालांवर जमनालालजींची नजर गेली. श्रीमन्जी त्यावेळीं विलायतेहून परतले होते. जमनालालजींच्या मनांत आलें, हा मुलगा लक्षांत ठेवला पाहिजे. ते श्रीमनजींना घेऊन वर्ध्याला आले. श्रीमन्जी इतके शिकलेसवरले असून देखील विनम्र होते. त्यांची बुद्धि तरतरीत होती. जें काम हातीं घेत तें एकाग्रतेनें करण्याची त्याची सवय होती. जमनालालजींनीं त्यांच्या आवडीचें आणि योग्यतेजोगतें काम त्यांच्यावर सोंपवलें. ते मारवाडी विद्यालयाचें काम करूं लागले. जमनालालजींची विशेषता ही होती कीं जे पुढें चांगले होतील अशा तरुणांचा परिचय वाढवीत आणि त्यांची पारख करून आणि त्यांना योग्य कामाला लावून विकासाची संधि देत. त्यांनीं श्रीमन्जीना पारखलें होतें कीं तें पुढें चांगलें जबाबदार आणि महत्त्वाचें कार्य करणारे होऊं शकतील. श्रीमन्जी दीड वर्ष वर्ध्याला राहिले. सगळ्यांचे ते आवडते झाले होते. बापूहि म्हणाले, मुलगा तर चांगला आहे. बापू आणि विनोबाजी यांची अनुमति मिळाली. पण मदालसेकडे गोष्ट कशी काढायची ? तिला विचारायचें कसें ? तिचें मत विचारूनच श्रीमन्जीना विचारणें शक्य होतें.

त्यावेळी मदालसा पांढऱ्या कपड्यांत असायची आणि केसहि कापलेले होते. जेव्हां श्रीमन्जीना विचारण्यांत आलें तेव्हां मदालसेला त्या वेषांत पाहून त्यांनीं विचारलें, "ही याच वेषांत राहणार आहे काय ?" जमनालालजी हंसत म्हणाले, "लग्नानंतर तर ती ढंगांत राहील!"

याप्रमाणें श्रीमन्जीची अनुमति मिळाल्यावर जमनालालजी मदालसेला घेऊन मैनपुरीस श्रीमन्जींचें घर दाखविण्यास घेऊन गेले. तेथें श्रीमन्जींचे आई-वडील आणि कुटुंबांतील मंडळीचें प्रेम, अतिथि-सत्कार इत्यादि पाहून मदालसा खूप खुप झाली. श्रीमन्जींची आई तिथल्या महिलामंडळाची अध्यक्ष

होती. कवितेनें तेथें यांचें स्वागत करण्यांत आलें होतें. या साऱ्या मदालसेच्या आवडत्या गोष्टी होत्या. येथून जमनालालजी मदालसा व श्रीमन्‌जींना घेऊन कलकत्त्यास कमलनयनच्या लग्नास गेले. कमलनयनची सप्तपदी आटोपतांच जमनालालजींनीं मदालसेचा वाङ्‌निश्चय जाहीर केला आणि वाङ्‌निश्चयाच्या दहा दिवसांनीं वर्ध्याला लग्न उरकलें. त्यावेळीं बंगल्यावर कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक चालली होती. देशांतील मोठमोठे पाहुणे घरीं आलेले होतेच. अशा संधीचा अनायसें फायदा उचलणें जमनालालजींच्या स्वभावांत होतेंच.

सकाळीं गांधीचौकांत ७ वाजतां विवाह व्हायचा होता. गांधी चौकांतच आम्ही राहात होतों. तीन पिढ्यांमध्यें मुलीचें लग्न घरीं करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

पहांटे पांच वाजतां दहीं आणि तेल लावून मीच तिला न्हाऊं घातलें आणि मंडपांत घेऊन गेल्यें. यावेळीं तिची अवस्था अशी झाली होती कीं जणूं कांहीं तिला सुळावर चढवलें जात आहे. तिचा तांबडा लाल चेहरा जणूं फुटूं पाहात होता.

सप्तपदीनंतर तिनें बापूजींना आणि बांना नमस्कार केला. मदालसेनें आपल्या सासऱ्याला नमस्कार करून सासूबाईंना नमस्कार करतांच तिनें तिला पोटाशीं घेतलें. त्यामुळें मदालसेला जणूं आपुलकीच लाभली. यावेळीं मदालसेच्या वडिलांनीं तिच्या चेहऱ्यावरचे आणि डोळ्यांतले भाव पाहून म्हटलें, हिची आई तर हिला सासूसारखी आहे आणि आज हिला आई मिळाली आहे. मदालसेच्या सासरचे लोक फारच संस्कारी आणि भल्या स्वभावाचे मिळाले. तिच्यासारख्या भावनाप्रधान मुलीला तर त्यांच्या घरांतल्या प्रेम आणि सौजन्याच्या वातावरणानें मोहून टाकलें. मदालसेच्या बाबतींत जी काळजी होती ती दूर झाली. श्रीलक्ष्मीनारायणमंदिरांतून दर्शन घेऊन जेव्हां वधूवरें मंडपांत आलीं तेव्हां बापूनीं नेहमींप्रमाणें वराला उपदेश करतांना सांगितलें, तुम्हांला या मुलीला अनुकूल करून घेऊनच वागलें पाहिजे हिच्या विचारांवर बळजबरी होतां कामा नये.

विवाहाच्या वेळीं अचानक तार आली कीं श्री शारदादेवी बिडला व्यंकटलाल पित्तींच्याबरोबर येत आहेत. या बातमीनें जमनालालजींना आनंद होणें स्वाभाविकच होतें. पण त्यांना आश्चर्यहि वाटलें. लग्नांत खूप लोकांना बोलावणें

किंवा थाटमाट करणें समाजहिताच्या दृष्टीनें त्यांना योग्य वाटत नव्हतें. त्यामुळें आपल्या निकटवर्ती मित्रांना आणि आप्तांनाहि आमंत्रण देतांना त्यांना संकोच वाटे. म्हणून ते निमंत्रणाऐवजीं दूरच्या मंडळीला आशीर्वाद पाठवायची विनंति करीत. पण पाहुणे आलेले त्यांना आवडेच. त्यांत बिडलाजीचा विशेष घरोबा होता. त्यामुळें शारदादेवींच्या येण्यानें आम्हां सर्वांना फार आनंद झाला.

शारदादेवींनीं आल्याबरोबर मला विचारलें, "मदालसेकरतां कांहीं साड्या तयार केल्या आहेत काय ?" असल्या विषयांत मी किती व्यवहारशून्य आहे हें त्यांना माहित होतें. मी म्हटलें, खादी-भांडारतर घरांतच आहे. तिला हवें असेल तें ती घेईल. शारदाबहननीं टोमणा दिला, 'जानकीबहन, तुम्हीं आई आहांत, उद्यां मुलगी सासरीं जाणार आहे तेव्हां चार तरी चांगल्या साड्या तयार करायला हव्या होत्या.' मी निरुत्तर होऊन गेल्यें. पण लागलीच आठवण झाली कीं कलकत्त्याच्या स्टेशनवर सावित्रीच्या आईनें तिच्या पेटींत कांहीं खादीच्या साड्या घातल्या होत्या. मी सावित्रीला साड्या काढायला सांगितलें. त्यांतल्या दोन दादीजींना दिल्या, एक नणंदेला, एकेक वहिनीला आणि एक मोठ्या दादीला. राहिल्या दोन त्या मदालसेच्या पेटींत ठेवण्यांत आल्या.

## ३६. माझा कंजूषपणा

जमनालालजींची धर्मपत्नी असल्यामुळें देशांत माझेंहि नांव बऱ्याचशा लोकांना माहीत झालें होतें. खडीसाखरेबरोबर सूतहि गोड होतें आणि खडी-साखरेच्या भावानें विकलें जातें. परंतु ज्या स्वभावामुळें माझी प्रसिद्धि आपल्या आणि नात्याच्या लोकांत आहे तो म्हणजे कंजूपपणा. या कंजूषपणामुळें माझी थट्टाहि होते. लोक त्रासतातहि आणि टोमणेहि देतात. परंतु जो स्वभाव बनला त्याच्यापासून सुटणेंहि कठीणच.

जेव्हां मी माझ्या नातवाला–राहुलला–म्हटलें, "बाळ,सांग पाहूं तुझ्या मनावर माझ्या कोणत्या गोष्टीची कायमची छाप पडली आहे ?" तेव्हां तो म्हणाला, "तुझ्या कंजूषपणाची ! जेव्हां आजोबा गोपुरींत राहात होते आणि आम्ही

जेव्हां त्यांच्याजवळ जात असूं तेव्हां ते आम्हांला बिस्किटें वगैरे देऊं करीत परंतु तूं देऊं देत नव्हतीस." तीन चार वर्षें वयांतली ही गोष्ट अजूनहि त्याला आठवते.

माझा स्वभावच कांहीं असा झाला आहे कीं, लहानमोठ्या वस्तूंच्या सुरक्षिततेची मी फार काळजी घेत्यें. मोठ्या वस्तूंची तितकीशी काळजी घेत नाहीं. म्हणत्यें कीं, मोठी वस्तु कोणीहि सांभाळूं शकतो. शंभराची नोट उचलून देणें मला सोपें आहे, पण आणा दोन आणे देणें मला कठीण जातें.

बापूदेखील "कंजूषांचे सरदार" म्हणून प्रसिद्ध होते. पण त्यांच्यांत नि माझ्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. ते आलेल्या लिफाफ्याचाहि उपयोग करीत. निमंत्रणपत्रिकांवरच आशीर्वाद आणि संदेश लिहून परत पाठवीत, एकेक टांचणीसुद्धां राखून ठेवीत. परंतु बापू आपल्या कंजूषपणाला असें आगळें रूप देत कीं, समोरचा माणूसदेखील संतुष्ट होई आणि धडा शिकून परत जाई. माझ्याजवळ तर अशी कोणतीच कला नाहीं. तेव्हां होतें असें कीं, माझ्या मनांत भावना असते एक आणि समोरच्या माणसावर परिणाम होतो दुसराच. परंतु इतकें समाधान अवश्य वाटतें कीं, एवढ्या मोठ्या दुनियेंत निदान बापूजींनीं तरी माझ्या कंजूषपणाची तारीफ केली. कंजूषाची भाषा कंजूषालाच कळायची ! त्यांनीं तर मला सर्टिफिकेटदेखील दिलें होतें !

बापूजींचें एक लोकरीचें कांबळें चाळणीसारखें झालें होतें. मी तें रफू करून आणि तिच्यावर खादी शिवून त्यांच्याकडे पाठविलें. तें घेऊन ते लंडनला गोलमेज परिषदेंतसुद्धां गेले. त्यांनीं २०।८।३२ रोजीं तुरुंगांतून मला एक पत्र लिहिलें. तें असें,

चि. जानकीमैया,

छान ! अखेर पेन्सिलनें दोन ओळी लिहिण्याचे कष्ट घेतलेस म्हणायचे ! तुरुंगांत जाऊनदेखील आळस गेला नाहीं ना ? "अ" वर्ग देण्यांतच चूक झाली. "क" वर्ग देऊन खूप काम करवून घ्यायला पाहिजे होतें. आळसाचें ठीक आहे, पण प्रकृति सुधारून घे. पत्रें नीट आलीं नाहींत तर शिक्षा मिळेल. जुनी कांबळ, जिच्यावर तूं खादी शिवून नीट केली होतीस, ती राजमहालांत जाऊन आली, ही गोष्ट मी तुला सांगितली आहे ना ? इथेंहि ती आहेच. अजूनहि बरीच टिकेल.

बापूचे आशीर्वाद

जेव्हां त्यांच्याजवळ जात असूं तेव्हां ते आम्हांला बिस्किटें वगैरे देऊं करीत परंतु तू देऊं देत नव्हतीस." तीन चार वर्षें वयांतली ही गोष्ट अजूनहि त्याला आठवते.

माझा स्वभावच कांहीं असा झाला आहे कीं, लहानमोठ्या वस्तूंच्या सुरक्षिततेची मी फार काळजी घेत्यें. मोठ्या वस्तूंची तितकीशी काळजी घेत नाहीं. म्हणत्यें कीं, मोठी वस्तु कोणीहि सांभाळूं शकतो. शंभराची नोट उचलून देणें मला सोपें आहे, पण आणा दोन आणे देणें मला कठीण जातें.

बापूदेखील "कंजूषांचे सरदार" म्हणून प्रसिद्ध होते. पण त्यांच्यांत नि माझ्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. ते आलेल्या लिफाफ्याचाहि उपयोग करीत. निमंत्रणपत्रिकांवरच आशीर्वाद आणि संदेश लिहून परत पाठवीत, एकेक टांचणीसुद्धां राखून ठेवीत. परंतु बापू आपल्या कंजूषपणाला असें आगळें रूप देत कीं, समोरचा माणूसदेखील संतुष्ट होई आणि धडा शिकून परत जाई. माझ्याजवळ तर अशी कोणतीच कला नाहीं. तेव्हां होतें असें कीं, माझ्या मनांत भावना असते एक आणि समोरच्या माणसावर परिणाम होतो दुसराच. परंतु इतकें समाधान अवश्य वाटतें कीं, एवढ्या मोठ्या दुनियेंत निदान बापूजींनीं तरी माझ्या कंजूषपणाची तारीफ केली. कंजूषाची भाषा कंजूषालाच कळायची ! त्यांनीं तर मला सर्टिफिकेटदेखील दिलें होतें !

बापूजींचें एक लोकरीचें कांबळें चाळणीसारखें झालें होतें. मी तें रफू करून आणि तिच्यावर खादी शिवून त्यांच्याकडे पाठविलें. तें घेऊन ते लंडनला गोलमेज परिषदेंतसुद्धां गेले. त्यांनीं २०।८।३२ रोजीं तुरुंगांतून मला एक पत्र लिहिलें. तें असें,

चि. जानकीमैया,

छान ! अखेर पेन्सिलनें दोन ओळी लिहिण्याचे कष्ट घेतलेस म्हणायचे ! तुरुंगांत जाऊनदेखील आळस गेला नाहीं ना ? "अ" वर्ग देण्यांतच चूक झाली. "क" वर्ग देऊन खूप काम करवून घ्यायला पाहिजे होतें. आळसाचें ठीक आहे, पण प्रकृति सुधारून घे. पत्रें नीट आलीं नाहींत तर शिक्षा मिळेल. जुनी कांबळ, जिच्यावर तूं खादी शिवून नीट केली होतीस, ती राजमहालांत जाऊन आली, ही गोष्ट मी तुला सांगितली आहे ना ? इथेंहि ती आहेच. अजूनहि बरीच टिकेल.

बापूचे आशीर्वाद

विनोबाजीसुद्धां मोठे सूक्ष्मदर्शी आहेत. माझ्या वृत्तीचें रहस्य त्यांच्यापुढें कुठचें लपून राहतें ! एकदां मी विनोबाजींबरोबर सर्वोदय प्रदर्शनाला चालल्यें होत्यें. तेथें जुने कपडे फाडून त्यांपासून गालिचे वनविण्याचा प्रयोग दाखविला जात होता. तो पाहून विनोबाजी म्हणाले, "ही तर जानकीबाईच्या आवडीची गोष्ट चालली आहे."

छोटया छोटया वस्तु सांभाळण्याची माझी वृत्ति पाहूनच बापूजींनीं मला सेवाग्रामांत फळें सांभाळण्याचें काम दिलें होतें.

गरज असो वा नसो, अशी कांहीं संवयच झाली आहे कीं, फळें मी खरेदी करत्येंच आणि तीसुद्धां बुट्टीबुट्टीभर. खरेदी करतांना मोलतोल करायची संवय पडली आहे. बापूजी म्हणत कीं, गरिबांना आणा दोन आणे कमी देण्यांत काय फायदा ? विनोबाजीदेखील सांगतात कीं, गरीबांबरोबर मोलतोल करतांच कामा नये. इतकेंच नव्हे तर ते सांगतील त्यापेक्षां थोडे अधिकच पैसे दिले पाहिजेत. गरीब लोक आपल्या मेहनतीची योग्य किंमत करूं शकत नाहींत. याकरितां आम्हींच समजून उमजून त्यांना योग्य आणि थोडी अधिक किंमत दिली पाहिजे. सर्वोदयाचें अर्थशास्त्र तर हेंच आहे. माझ्या मनांतहि असेंच करण्याची भावना जागी होते, पण पडलेली सवय सुटत नाहीं. बुट्टीभर फळें भरून घेतल्यावर त्यांचा प्रयोग करतांनाहि तोच कंजूषपणा. तीं सडत चाललीं कीं त्यांतलीं बिघडलेलीं मी वेंचून वेंचून वेगळीं काढत्यें आणि चांगलीं चांगलीं बाजूला काढून ठेवत्यें. बिघडलेल्या फळांचाहि होईल तो उपयोग करत्यें किंवा करायला लावत्यें. कमलनयन तर म्हणत असतो कीं 'हा बिघडण्याचा मामला अशा तऱ्हेनें संपायचा नाहीं. कारण बिघडलेल्यांचा आज उपयोग होईल खरा, पण तोंपर्यंत दुसरीं सडूनबिघडून जातील.'

आम्ही मंडळी काश्मीरहून अमरनाथला गेलों होतों. कोणत्याशा विश्राम-गृहांत थांबलों. तिकडे सह्या करावयाच्या होत्या. कुणाचकडे पेन किंवा पेन्सिल सांपडेना. अखेर मी आपल्या चष्म्याच्या घरांतून पेन्सिलीचा लहानसा तुकडा काढून दिला. लिहून झाल्यावर रामनें म्हटलें कीं आईची पेन्सिल परत करा नाहींतर ती बैचेन होईल !

एकदां मी विनोबाजींबरोबर पदयात्रा करीत होत्यें. कुणाच्यातरी पायांत कांटा रुतला. मी सुई काढून दिली. ती मोडली तेव्हां दुसरी दिली. मी म्हटलें,

'परत द्यायची बरं!' बरोबरच्यांना आश्चर्य वाटलें कीं एका सुईसाठीं मी एवढी बेचैन कां होत्यें. मला ही गोष्ट लागली. जिकडे सुईचें काम असतें तिकडे तलवारीचा काय उपयोग? आजकाल लहान गोष्टींकडे जें दुर्लक्ष होतें तें पाहून मनाला वाईट वाटतें.

थोड्या खर्चांत काम भागत असेल तर अधिक खर्च करणें मला रुचत नाहीं. मातीनें काम होत असेल तर सावण कां खर्च करावा? राखेनें दांत साफ होऊं शकत असले तर मी मंजन वापरीत नाहीं.

एकदां ऋषभदासजींबरोबर मी बजाजवाडीला चालल्यें होत्यें. वाटेंत त्यांच्या पत्नी म्हणाल्या, 'टांगा मागवा'. पण ऋषभराजजी आणि मी, दोघेंहि पडलों एकाच स्वभावाचीं. त्यांना बच्छराजभवनला जायचें होतें. वाटेंत आमचे रस्ते वेगळे झाले. मी थोडी दूर गेल्यें असेन तोंच वाट चुकल्यें. पन्नास वेळां या रस्त्यानें बजाजवाडीला गेल्यें असेन, पण त्या दिवशीं असें काय झालें तें कांहीं समजत नाहीं. कुणाला विचारण्याचाहि धीर होत नव्हता. मी जरी कुणाला ओळखलें नाहीं तरी गांवचे लोक मला ओळखतच होते. बजाजवाडीचा रस्ता कुठला हें मी विचारावें कसें? लोक म्हणतील, छान शेटाणी आहे. वर्ध्यांत वर्षोगणती राहिली पण आपल्या बंगल्याचा रस्ताहि माहीत नाहीं! इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फेरे घालीत राहिल्यें. अखेर एका पांच वर्षांच्या मुलाला विचारलें. 'बाळ, ज्ञानमंदिराचा रस्ता कोणता?' त्यानें साधेपणानें सांगितलें, 'बजाजवाडीच्या समोरच तर आहे!' आतां मी काय म्हणणार! हें तर मलाहि माहीत होतें. शेवटीं तिथून येणारा एक टांगा दिसला, त्यांत मुकाट्यानें बसल्यें. आणि बजाजवाडीला पोंचल्यावर टांगेवाल्यानें मागितलेले आठ आणे त्याला चुकते केले. मला माहीत होतें कीं चार आणे भाडें दिलें जातें पण त्यावेळच्या माझ्या त्या अवस्थेंत तेंच शक्य होतें. आरंभालाच टांगा केला असता तर इतकी पायपीट करावी लागली नसती. आणि त्रासहि झाला नसता.

पण जेथें मी एका पैशाचा इतका विचार करत्यें तेथें हजारांच्या विषयांत मला चिंताच होत नाहीं. मोठ्या गोष्टीचा मला लोभहि नसतो. सीकरमधें जेव्हां आमचा बंगला तयार झाला तेव्हां तो वस्तीबाहेर होता. पण वस्ती वाढली तसा त्याचा हवाशीरपणा गेला. मोकळी हवा कमी झाली. आंघोळीची आणि शौचाची व्यवस्थाहि नीट नव्हती. मारवाडमध्यें पुरुषमंडळी परसा-

कडला जायचें झालें तर जंगलांत जातात आणि स्त्रिया आंगणाबाहेर बसतात. संडास फार कमी होते. आमच्या बंगल्यांत संडास होता तरी पण बंगला व्यवस्थित आणि आरामशीर बनवण्यासाठीं वीस हजारांचा खर्च करायला हवा होता. जमनालालजींच्या मनांत आलें कीं हा बंगला विकून टाकून शहराबाहेर एक आरामशीर घर बांधावें. त्यांनीं सीकरच्या अधिकाऱ्यांना सांगितलें कीं हा बंगला घेऊन आपल्याला स्टेशनजवळ एकादी जागा द्यावी. बंगला देऊन वर तेरा हजार देण्याची गोष्ट होती. मी त्या दिवसांत तिकडेच होत्यें. मला अतिथि-गृह पाहायला सांगण्यांत आलें. मी पाहायला गेल्यें. अतिथिगृहाच्या आवारांत बगीचा होता आणि घरहि मोठें आणि आरामशीर होतें; पण मीं विचार केला, एवढें मोठें घर घेऊन करायचें काय ? कधीं महिना पंधरा दिवस येऊन राहिलों तर राहिलों. हें सांभाळायलाच पांच सात नोकर ठेवावे लागतील. म्हणून मीं विरोध केला. तें विकत घेतलें असतें तर सोय आणि उत्पन्न या दोन्ही दृष्टींनीं तें फायद्याचें झालें असतें. पण कटकटी वाढवणें मला आवडत नव्हतें.

सीकरच्या अतिथिगृहाप्रमाणें मुंबईलाहि एक घर कर्जापायीं मिळत होतें. तें पाहायला मला पाठवण्यांत आलें. त्या घराचा थाटमाट आणि फर्निचर पाहून मी तर घर आंतून पाहिल्याशिवायच परत फिरल्यें. मला असेंहि वाटलें कीं आपण इथें राहिलों तर मुलांवर या वातावरणाचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं आणि मुंबईंत घर असलें म्हणजे तिकडे जाऊन राहण्याचा मोहहि होणार.

माझ्या कमी खर्चिक स्वभावामुळें बरोबरच्या मंडळीला कधीं कधीं फार त्रास होई. एकदां स्टेशनला जायचें होतें. दुपारची वेळ होती. माझ्याबरोबर माझ्या नणंदेचे यजमान डेडराजजीहि होते. मला उन्हांत चालण्याची सवय होती. पण ते विचारे फार बेजार झाले. स्टेशनला पोंचतां पोंचतां घामानें अगदीं चिंब झाले. म्हणाले, 'यापुढें कधीं मी शेठाणीबरोबर जाणार नाहीं. फार कंजूष आहे. त्यांना टांग्याचा खर्च देखील करवत नाहीं !' ते संतापणें स्वाभाविक होतें पण मीहि माझ्या स्वभावाची गुलाम होत्यें.

तेवढें कशाला ? अजूनदेखील स्वप्नांत जमनालालजी मला माझ्या कंजूषपणावरून टोमणे देत असलेले दिसतात. अगदीं अलीकडची गोष्ट आहे. ते स्वप्नांत येऊन मला म्हणाले, "हें पहा पाहुणे, आले आहेत. त्यांना चांगलीं फळें

निवडून दे. आपल्या स्वभावावर जाऊं नकोस." त्यांनीं असें सांगितलें खरें. पण तरीदेखील मी त्याप्रमाणें करीनच असें जणू त्यांना वाटत नव्हतें.

बापू कंजूष होते आणि मीहि. पण बापू दुसऱ्याच्या सुखसोयींचें पुरतें भान ठेवीत. ते कंजूष होते ते समजून उमजून. माझ्याजवळ आहे ती केवळ संवय. तिच्यांत दुसऱ्याच्या सुखसोयींचें भान नाहीं आणि समयसूचकताहि नाहीं.

पण काय करूं ? म्हणतात ना, 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं' म्हणून ! त्यांतली गत.

## ३७. बापू वर्ध्यास आले

जमनालालजींच्या मनांत साबरमतीसारखा वर्ध्यालाहि सत्याग्रहाश्रम काढण्याची इच्छा होती. याबाबत त्यांनीं बापूजींबरोबर चर्चा केली. बापूजींनीं विनोबाजींना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वर्ध्याला पाठविलें. प्रथम त्या सर्वांना बगीच्यांत उतरविण्यांत आलें. नंतर ते बजाजवाडींत राहूं लागले. आश्रम सुरवातीस बजाजवाडींत राहिला. नंतर आज जेथें महिलाश्रम आहे तेथें गेला. जरी जमनालालजींची आश्रमासंबंधींची इच्छा पूर्ण झाली होती, तरी एवढ्यावरच त्यांचें समाधान झालें नाहीं. कांहीं दिवसांनंतर त्यांनीं वर्षांतून एक महिना वर्ध्यांत राहण्याचें बापूजींकडून वचन घेतलें. त्यानंतर बापूजी प्रत्येक डिसेंबरमध्यें कॉंग्रेसला जाण्यापूर्वी वर्ध्यांत येऊन राहूं लागले. जेव्हां बापूजी वर्ध्याला राहात तेव्हां पुढारी आणि कार्यकर्ते यांचा जणू मेळावाच भरत असे.

मिठाच्या सत्याग्रहानंतर बापूजींनीं जेव्हां स्वातंत्र्य मिळेपर्यंत साबरमतीस न परतण्याची प्रतिज्ञा केली, तेव्हां प्रश्न उभा राहिला कीं, आतां बापूंनीं कुठें राहावें ! बापूजींना तर सर्वच प्रांतांतले लोक आपल्या इथें बोलवायला उत्सुक होते. पण गुजरातचे लोक आणि विशेषतः सरदार यांची इच्छा होती कीं, बापूंनीं गुजरातेंतच राहावें. त्यांचें कार्यक्षेत्रहि प्रारंभीं गुजरातच होतें. गुजरातच्या लोकांची त्यांच्यावर एकनिष्ठ भक्ति होती. त्यांच्या कार्यास आणि चळवळींना गुजरातनें सुरुवातीपासूनच आपलेसें केलें होतें. म्हणून सरदार

वल्लभभाई पटेलांनीं प्रयत्न केला कीं, बापूंनीं गुजरातमधेंच राहावें आणि बारडोलीला आपलें केंद्र बनवावें. परंतु जमनालालजी बापूजींना वर्ध्याला आणूं इच्छित होते. जरी महाराष्ट्रांत गांधीजींच्या सिद्धांताला अनुकूल वातावरण नव्हतें तरीसुद्धां जमनालालजींमुळें त्यांनीं वर्धाच पसंत केलें. जमनालालजींनीं विनोबा, काका कालेलकर वगैरेंना आधींच वर्ध्याला आणलें होतें. शिवाय ठिकठिकाणाहून गांधीवादी रचनात्मक कार्यकर्त्यांना आणून अनेक कामें सुरूं करून दिलीं होतीं. हळू हळू असें वातावरण निर्माण झालें कीं, बापूजींनीं वर्धा हेंच आपलें कार्यक्षेत्र बनविलें.

सरदार वल्लभभाईंना हें आवडलें नाहीं. हें स्वाभाविकहि होतें. ते नेहमीं बापूजींबरोबर वाद घालीत आणि टोमणे देत राहात कीं, मुंबई आणि गुजरात सोडून जेथें कसलीच राजकीय जागृति नाहीं आणि कार्यानुकूल वातावरण नाहीं अशा खड्ड्यांत येऊन बसलां आहांत.

बापूजींच्या वास्तव्यामुळें जमनालालजींच्या मनासारखी गोष्ट झाली खरी; पण त्यांच्या जबाबदाऱ्याहि खूप वाढल्या. बापूजींचीं विधायक कामें व्यवस्थित चालावीं यासाठीं साधनें आणि व्यक्ती यांची जुळवाजुळव करणें आणि आल्यागेल्या पाहुण्यांची योग्य व्यवस्था ठेवणें सोपी गोष्ट नव्हती. पण ते या कामांत इतके मग्न झाले कीं त्यांना स्वतःला बापूंच्यामध्यें मिसळून टाकलें. ते बापूंमध्यें लीन होऊन गेले. गांधीजींना तेथें आणून बसवल्यावर ग्रामोद्योगाकरितां त्यांनीं आपला बगीचा त्यांना देऊन टाकला. बगीचा त्यावेळीं सुमारें एक लाख किंमतीचा होता आणि गांवचे लोक तेथें न्हाण्याधुण्याकरितां आणि फिरण्याकरितां जात असत. जेव्हां शेठजींनीं हा बगीचा गांधीजींना देऊन टाकण्याचें ठरविलें तेव्हां दुकानावरचे सगळे लोक नाखुष झाले आणि त्यांच्यांत खळबळ माजली कीं, हा गांधी आला कुठून ? जमनालालजी तर याला आपलें सर्वस्व लुटूं देणार. त्यांच्या मनांत जमनालालजींच्या हिताचा विचार अधिक होता, गांधीजींचें आणि त्यांच्या कामाचें महत्त्व त्यांना काय माहित ?

इकडे हा बगीचा दिला आणि तिकडे तिसऱ्याच दिवशी जिची मुळींच आशा नव्हती ती ७५ हजारांची वसुली झाली. सेवाग्रामचें नांव पूर्वी 'सेगांव' होतें तें कर्जापायीं गहाण टाकलेलें होतें. कर्जदार होता गांवचा पाटील. तो वारला.

त्याची जी विधवा वायको होती तिच्यावर कोणतीच जुलूमजबरदस्ती किंवा दावा-फिर्याद करण्याची शेठजींची इच्छा नव्हती. पण त्या विधवेच्या मनांत ईश्वर जागा झाला आणि तिनें जमनालालजींना सांगितलें कीं, माझे पति तर गेले, कुणास ठाऊक मला कधीं जावें लागेल? म्हणून आपण कर्जापायीं सेगांव घ्या आणि मला मुक्त करा.

हें दृश्य पाहून दुकानची मंडळी सर्दच झाली. म्हणूं लागली, जननालालजींचें भाग्य कुणीच टाळूं शकत नाहीं. एका हातानें देऊन टाकतात तर दुसऱ्या हातानें मिळत राहातें!

बगीचा दिल्यानंतर बापूजींनीं जमनालालजींना सांगितलें कीं, खादीबरोबरच ग्रामोद्योगसुद्धां चालवावे लागतील. आम्हांला खेड्यांना स्वावलंबी बनवायचें आहे. म्हणून तेथें ग्रामोद्योगाचे प्रयोग सुरूं करण्याचें ठरलें. गांधीजींचे एकनिष्ठ कार्यकर्ते आणि पुतण्ये श्री. मगनलाल गांधी यांचा मृत्यु बिहारमध्यें अगोदरच झाला होता. जमनालालजींना त्याचें फारच दु:ख झालें होतें. आणि मगनलाल-भाईच्या स्मृतीचें योग्य स्मारक करण्याचा त्यांचा विचार चालूच होता. म्हणून त्यांनीं त्या बगीच्याचें नांव 'मगनवाडी' ठेवण्याची सूचना केली आणि बापूजीं-नाहि ती पसंत पडली. ग्रामोद्योगाचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि कार्यकर्ते श्री. जे. सी. कुमारप्पा यांना बापूजींनीं येथें आणलें आणि ठेवून घेतलें.

बापूजींना ठिकठिकाणाहून हातानें बनवलेल्या वस्तु भेटीदाखल मिळत असत. त्यांच्या संग्रहाचीहि गरज होती. म्हणून मगनवाडींतच एक संग्रहालय बनवण्यांत आलें. त्याचेंहि नांव 'मनगसंग्रहालय' ठेवण्यांत आलें. त्यांत गांधी-जींच्या भेटीच्या वस्तूंच्या जोडीला खादी ग्रामोद्योगाची सर्व सामग्री ठेवण्यांत आली. बापूसुद्धां येणाऱ्यांना मगनसंग्रहालय पाहायला सांगत.

त्या दिवसांत बापू ग्रामोद्योग आणि ग्रामसेवा वगैरेंवर विशेष जोर देत असत. त्यामुळें बापूंनीं वर्ध्यासारखा छोट्या शहराऐवजीं गांवांत राहण्याचें ठरवलें. ते सेगांवला राहायला गेले. नंतर त्याला सेवाग्राम नांव पडलें. बापूंसाठीं आरंभीं तिकडे एक झोपडी बांधली होती. तिच्यांत एका बाजूला बा आणि मीराबेन यांचा निवास आणि दुसऱ्या बाजूला बापूजींचा. महादेवभाई रोज वर्ध्याहून पायीं येत जात. पुढें यांच्यासाठीं निराळी झोंपडी बांधण्यांत आली.

गांवांत बापूंना पुष्कळ गैरसोय आणि त्रास सोसावा लागला. बापूजींच्या

जवळ एक हरिजनहि होता. गांवांतल्या विहिरीवरून इतरांबरोबर तोहि पाणी भरीत होता. गांवकऱ्यांनीं त्या विहिरीचें पाणी प्यायचें सोडून दिलें. बापूंची हजामत देखील न्हाव्यानें दोन वर्षेपर्यंत केली नाहीं. गांवचे लोक म्हणत कीं बापूंची हजामत करायला तशी हरकत नाहीं पण त्यांच्याबरोबर हरिजन राहतो ना! त्यामुळें आम्ही बापूंना शिवलों तर जातवाले आम्हांला वाळींत टाकतील.

बापू सेगांवला गेल्यावर सरदार अधिकच चिडले. त्यांचें म्हणणें होतें कीं असली जागा जिथें धड एक सडक नाहीं कीं तार-टेलिफोनची सोय नाहीं तिथें बापूंनीं राहणें योग्य नाहीं. कधीं तसा प्रसंग पडला तर करणार काय ? आपल्याला आमचा उपयोग होणें शक्य नाहीं आणि आम्हांला आपला. येथें बापूजींना फार त्रास होईल.

हें बरोबरहि होतें. बापूजींना भेटायला येणाऱ्याला खूप त्रास व्हायचा. एकदां म्हैसूरची महाराणी बापूजींना भेटायला आली. बैलगाडींतून सेवाग्रामला गेली. पावसानें कपडे भिजून गेले. सेवाग्रामला मीराबेनचे कपडे घेऊन वापरले. परत येतांना बैलगाडी चिखलांत रुतली, तेव्हां तिला उतरून पायीं चालावें लागलें! वरून पाऊस पडतच होता. पायांत उंच टांचांच्या सँडल्स होत्या. त्या चिखलानें जड झाल्या आणि चालणें दुरापास्त झालें. महाराणी भिजल्या कपड्यांनीं आणि चिखलाच्या पायांनीं वर्ध्याला पोंचली. इकडे आल्यावर गरम पाण्यांत मीठ टाकून तिला शेकण्यांत आलें. कपडे बदलले. ती सांगूं लागली, 'जर ही घटना म्हैसूरला घडली असती तर पंधरा दिवस बिछान्यांतून उठतां आलें नसतें, पण इकडे तर मी दुसऱ्याच दिवशीं तयार झाल्यें !'

शेवटीं बापूंच्या मनांत नसून देखील सडक तयार करण्यांत आली, टपालघर उघडलें आणि टेलिफोनहि लागला. हळुहळू घरेंहि झालीं आणि सेवाग्राम आश्रमाचें काम वाढतच गेलें. बापूजी पक्कें घर बांधूं देत नसत. त्यामुळें त्यांना विचारल्याशिवायच वर्धा-नागपूर रस्त्यावर जराशा अंतरावरील पवनार टेंकडीवर एक बंगला जमनालालजींनीं बांधायला घेतला. हेतु हा कीं तो तयार होतांच त्यांना तिथें घेऊन जायचें. बंगला तयार झाला आणि दाखवण्यासाठीं बापूंना तिकडे नेण्यांत आलें. पुढें जेव्हां त्यांच्या राहण्याची गोष्ट काढण्यांत आली तेव्हां बापू म्हणाले, 'नागपूरची सडक झाल्यामुळें येजा चालूच

राहणार आणि मग खेड्यांत राहिल्याचा फायदा थोडाच मिळणार? ’

बापूजी वर्ध्याला येऊन राहिल्यावर नेते आणि कार्यकर्ते येऊं जाऊं लागले आणि त्यांचा संपर्क अधिक वाढला. जेव्हां कुणी पुढारी आजारी पडे तेव्हां जमनालालजी त्याला बोलावून घेत. कुणाला कसली अडचण पडली तर त्यालाहि बोलावून घेत. सरहद्द गांधी अब्दुल गफारखाँ यांना सरहद्द प्रातांत जाण्याला मनाई करण्यांत आली तेव्हां जमनालालजी आग्रहपूर्वक त्यांना आमच्याकडे घेऊन आले. उभयता खानबंधू, त्यांचीं मुलेंमुली सहा महिने इकडे राहिलीं. राजेंद्रबाबूहि जेव्हां त्यांचा दमा उचल खाई तेव्हां आमच्याकडे राहायला येत. अशा रीतीनें आपल्या देशभक्तांना ठेवून घेण्याची संधि मिळते याचा जमनालालजींना संतोष असे.

•

## ३८. सीकर आणि जयपूर

बजाजकुटुंब मूळचें राजस्थानांतील सीकरचें राहणारें. जयपूर राज्यांतली ही एक मोठी जहागीर होती. सीकरच्या राजाला ‘ रावराजा ’ म्हणत. त्यांचे अधिकारहि जहागीरदारांहून अधिक होते. आम्ही जरी वर्ध्याला स्थायिक झालों होतों तरी सीकरला आमचें जाणें येणें असेच. तिथें आमचें ‘ कमरा ’ या नांवानें प्रसिद्ध असलेलें एक घर देखील होतें. तेथील सार्वजनिक कार्यांत आणि हालचालींत जमनालालजींचा हात असे. त्यांच्या वतीनें तेथें एक दवाखाना आणि एक हरिजन शाळाहि चालत असे.

सीकरचें हवापाणी कोरडें आणि आरोग्यदायक असल्यामुळें कांहीं दिवसांसाठीं श्रद्धेय राजेंद्रबाबूहि एक दोनदां तिकडे येऊन राहिले होते. विनोबाजीहि जाऊन आले होते.

सीकरचे रावराजे स्वभावानें सालस होते आणि प्रजेविषयीं आपुलकी बाळगणारे होते. ते आणि जयपूर राज्य यांच्यामध्यें आपल्या अधिकारांबाबत कांहीं ना कांहीं कुरबुर चाललेलीच असे. रावराजांचा उदार स्वभाव जयपूर राज्य आणि इंग्रज अधिकारी यांना पसंत नसे. अशा रीतीनें त्यांच्यामधलें

मनोमालिन्य दिवसेदिवस वाढतच गेलें. सांगायला राजा प्रजेचा मालक म्हटला जाई पण त्याकाळीं खरी सत्ता होती इंग्रजांच्याच हातांत. राज्यकारभार चालायचा तो त्यांच्याच रेसिडेंटच्या इशाऱ्यावर. जमनालालजी म्हणत,संस्थानी प्रजा दुहेरी गुलाम. संस्थानी प्रजेंत जागृति व्हावी हें इंग्रजांना नको होतें आणि राजाचा प्रजेशीं विशेष संबंध आलेलाहि त्यांना चालत नसे. त्यामुळें जयपूर राज्य आणि तिथले मुख्य इंग्रज अधिकारी यांनीं सीकरच्या रावराजांबरोबरचा तंटा वाढवून ठेवला. सीकरच्या राजकुमाराला शिक्षणासाठीं विलायतेला पाठविण्याच्या प्रश्नावरून जयपूर राज्याच्या अधिकाऱ्यांनीं रावराजांच्या घरच्या मंडळीवर आगगाडींतच गोळी चालवायला लावली. या प्रकारानें सीकरची प्रजा क्षुब्ध झाली आणि जयपूर राज्याविरुद्ध शस्त्रानें लढण्याची तयारी करूं लागली.

इकडे जयपूर राज्याच्या अधिकाऱ्यांनींही आपलें सैन्य पाठवून सीकरच्या लोकांना सैन्यानें आणि शस्त्रानें दाबून टाकण्याचा घाट घातला. दोन्हींकडून मोर्चेबंदी होऊं लागली.

मी त्या दिवसांत सीकरलाच होत्यें. केवळ रजपूतच नव्हे, तर ब्राह्मण, हरिजन, वाणी, मुसलमान सगळेच लढायला सज्ज झाले होते. सीकरमध्यें अठरा दिवसांचा जबरदस्त हरताळहि झाला. गावांत क्षोभ फार तीव्र होता. मी घरोघर जाऊन लोकांना समजावून सांगत होत्यें कीं भयभीत होऊं नका.

कमऱ्यासमोरच्या घरांत स्त्रियाच राहात होत्या. कमरा आणि राजवाडा यांच्यामध्यें मोर्चा बांधलेला होता. वाळूची पोतीं रचलीं होतीं. शिपाई बाहेरून शिड्या लावून छतावर तार बांधीत होते. आंतल्या स्त्रिया कदाचित् घाबरतील असे वाटलें म्हणून मी आंत गेल्यें आणि त्यांना म्हटलें, 'तुम्ही मुळींच घाबरूं नका. शिपाई आंत आले तर तुम्हांला निसटतां तर येईलच. शिवाय ही मी इथें फिरत्येंच आहें.' पण स्त्रियांना अज्ञानांत ठेवल्यामुळें केव्हां काय करावें याची त्यांना कल्पना नव्हती.

एकदां मी लोसलहून सीकरला येत होत्यें. जयपूर राज्याच्या शिपायांना हुकूम होता कीं पूर्वसूचना दिल्याशिवाय कुणी सीकर राज्यांत शिरूं पाहील तर त्याच्यावर तुम्हांला गोळी चालवतां येईल. मला यांतलें कांहीं माहीत नव्हतें आणि मी सरळ आंत गेल्यें. शिपायांनीहि कदाचित् स्त्री म्हणून मला जाऊं दिलें असावें.

हा आपापसांतील तंटा मिटवण्यासाठीं सीकर आणि जयपूर या दोहोंच्याहि वतीनें जमनालालजींना अनेक तारा आणि पत्रें आलीं होतीं. रावराजांचा निरोपहि पोंचला होता. जमनालालजींनीं दोन्ही पक्षांना कळवलें कीं आपल्या येण्याचा उपयोग असेल तर आपण येऊं, नाहीं तर जाऊन तरी काय होणार होतें ? शेवटीं त्यांना सीकरला जावें लागलें. एकदां तर जयपूर राज्य आणि रावराजा यांच्यामध्यें समेटहि झाला !

पुढें एकदां सीकरच्या रावराजांना अजमेरला नेण्यांत आलें आणि त्यांना ‘ वेडे ’ ठरवून सीकर राज्याचा कारभार ‘ कोर्ट ऑफ वॉर्ड्स् ’च्या हातीं सोंपवण्यांत आला. एवढेंच नव्हे तर रावराजांना जयपूर राज्यांत प्रवेश करण्याला मनाई करण्यांत आली. या गोष्टीनें सीकरच्या प्रजेंत पुष्कळच क्षोभ पसरला. जमनालालजींनीं या प्रश्नांत पुष्कळ वेळ आणि शक्ति खर्चून सामोपचारानें तो सोडवण्याची खटपट केली आणि अशा रीतीनें रक्तपात टळला.

जमनालालजी जयपूर राज्याच्या प्रजामंडळाचे अध्यक्ष होते. जयपूर राज्याला त्यांचा, संस्थेचा आणि कार्यकर्त्यांचा हा वाढता प्रभाव रुचला नाहीं आंतल्या आंत नाराजी वाढत चालली होती. एकदां प्रजामंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीसाठीं जमनालालजी जयपूरला चालले होते. ही बैठक दुष्काळपीडितांच्या मदतीसाठींच होती. पण सवाई माधोपूरमधेंच गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनीं त्यांच्यावर हुकूम बजावला कीं त्यांना जयपूर राज्यांत प्रवेश करतां येणार नाहीं.

जमनालालजींना ही गोष्ट फारच लागली. त्यांनीं पोलीस अधिकाऱ्यांना सांगितलें कीं ही गोष्ट अयोग्य आहे. पण इन्स्पेक्टर जनरल यंगनें सांगितलें, ‘ या घटकेला तुम्ही हा हुकूम माना आणि परत जा. मी तो रद्द करून घेण्याची खटपट करीन. ’

जमनालालजी सत्याग्रहाचें महत्त्व जाणत होते. त्यामुळें त्यांनीं पहिल्या खेपेला संधि दिली कीं समेटाचा एकादा मार्ग निघत असेल तर ठीक आहे. त्याप्रमाणें ते परत फिरले. बापूजींच्या अनुज्ञेशिवाय त्यांना सत्याग्रह सुरू करायचा नव्हता. पण जयपूर राज्यांतील अधिकाऱ्यांनीं तेथें खादी-कार्य करणारांकडून आश्वासन मागितलें कीं ते प्रजामंडळाशीं संबंध ठेवणार नाहींत. यावरून अधिकाऱ्यांना प्रजामंडळाशीं दोन हात करायचे आहेत हें पुरेपूर

स्पष्ट झालें. जमनालालजींची तुरुंगांत जाण्याची स्वतःपुरती तयारी होतीच. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान थोडेंच होणार होतें ! त्यांना सत्याग्रह नीट चाललेला हवा होता आणि त्याची पुरती तयारीहि त्यांनीं केली होती. शेवटीं बापूंचा आशीर्वाद घेऊन त्यांनीं १ फेब्रुवारी १९३८ रोजीं जयपूर राज्याचा हुकूम मोडून राज्याच्या सीमेंत प्रवेश केला आणि अशा रीतीनें सत्याग्रहाची सुरुवात झाली. पोलीस त्यांना मोटारींत घालून सीमापार सोडून देत आणि ते पुन्हां आंत प्रवेश करीत. जेव्हां त्यांना दुसऱ्या मोटारींतून उतरायला सांगितलें तेव्हां ते उतरले नाहींत. बळजबरीनें त्यांना उतरविण्यांत आलें. उतरण्याची इच्छा नसल्यामुळें उतरवतांना त्यांना खरचटलें आणि त्यांचा सदराहि फाटला.

अशा रीतीनें सीमेबाहेर नेऊन सोडल्यामुळें त्यांनीं अन्न सोडून दिलें आणि ते नुसत्या गाजरावर राहूं लागले. तिसऱ्यांदा त्यांना अटक करून जयपूरपासून चाळीस मैल दूर सोडण्यांत आलें. तेथें ते रोज बाराबारा मैल फिरत असत. अंगांत चरबी वाढल्यानें तूप तर त्यांनीं सोडलेंच होतें. पहाऱ्यावरचे शिपाई स्वतःसाठीं जशा प्रकारची जाड भाकरी बनवतात तसलीच ते आपल्यासाठींहि मागवीत. जाड भाकरी आणि साधें जेवण तर त्यांना नेहमींच आवडे. मुगांची डाळ तेवढी त्यांना मानवत नव्हती. पण त्या दिवसांत जें मिळेल तेंच ते खात असत. अशा प्रकारच्या खाण्यामुळें त्यांच्या मनालाहि कितीहि समाधान झालें तरी त्यांच्या शरीरावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? सुक्या कोरड्या अन्नामुळें त्यांची अशक्तता वाढली. ते फिरतहि खूप. शेवटीं गुडघ्यांतली व्यथा वाढली. उपाय केले पण ते करतांना डॉक्टरच्या चुकीमुळें विजेनें त्यांचा पाय भाजला. उपाय चालला होता तो विजेचा होता. जखम झाली. पण त्यांनीं डॉक्टरला अभय दिलें. कातडी जळून जखम झालेली होती. पण त्यांनीं हूं कीं चू देखील केलें नाहीं. त्यांची प्रकृतीच अशी कांहीं होती कीं त्यांना आपल्या व्यथा-वेदनांची थोडीशी देखील पर्वा वाटत नसे. स्वतः डॉक्टर भांबावून जात. ते जितके स्वतःचें दुःख सोसण्यांत कठोर होते तितकेच दुसऱ्याच्या दुःखाच्या बाबतींत कोमल असत. दुसऱ्याचें थोडें देखील दुःख त्यांना सहन होत नसे.

पायाला जखम झाल्यामुळें आतां त्यांना जयपूरनजीक राहणें अगत्याचें झालें. त्यांना कर्णावतांच्या बागेंत ठेवण्यांत आलें.

हा आपापसांतील तंटा मिटवण्यासाठीं सीकर आणि जयपूर या दोहोंच्याहि वतीनें जमनालालजींना अनेक तारा आणि पत्रें आलीं होतीं. रावराजांचा निरोपहि पोंचला होता. जमनालालजींनीं दोन्ही पक्षांना कळवलें कीं आपल्या येण्याचा उपयोग असेल तर आपण येऊं, नाहीं तर जाऊन तरी काय होणार होतें ? शेवटीं त्यांना सीकरला जावें लागलें. एकदां तर जयपूर राज्य आणि रावराजा यांच्यामध्यें समेटहि झाला !

पुढें एकदां सीकरच्या रावराजांना अजमेरला नेण्यांत आलें आणि त्यांना 'वेडे' ठरवून सीकर राज्याचा कारभार 'कोर्ट ऑफ वॉर्ड्स्'च्या हातीं सोंपवण्यांत आला. एवढेंच नव्हे तर रावराजांना जयपूर राज्यांत प्रवेश करण्याला मनाई करण्यांत आली. या गोष्टीनें सीकरच्या प्रजेंत पुष्कळच क्षोभ पसरला. जमनालालजींनीं या प्रश्नांत पुष्कळ वेळ आणि शक्ति खर्चून सामोपचारानें तो सोडवण्याची खटपट केली आणि अशा रीतीनें रक्तपात टळला.

जमनालालजी जयपूर राज्याच्या प्रजामंडळाचे अध्यक्ष होते. जयपूर राज्याला त्यांचा, संस्थेचा आणि कार्यकर्त्यांचा हा वाढता प्रभाव रुचला नाहीं. आंतल्या आंत नाराजी वाढत चालली होती. एकदां प्रजामंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीसाठीं जमनालालजी जयपूरला चालले होते. ही बैठक दुष्काळ-पीडितांच्या मदतीसाठींच होती. पण सवाई माधोपूरमधेंच गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनीं त्यांच्यावर हुकूम बजावला कीं त्यांना जयपूर राज्यांत प्रवेश करतां येणार नाहीं.

जमनालालजींना ही गोष्ट फारच लागली. त्यांनीं पोलीस अधिकाऱ्यांना सांगितलें कीं ही गोष्ट अयोग्य आहे. पण इन्स्पेक्टर जनरल यंगनें सांगितलें, 'या घटकेला तुम्ही हा हुकूम माना आणि परत जा. मी तो रद्द करून घेण्याची खटपट करीन.'

जमनालालजी सत्याग्रहाचें महत्त्व जाणत होते. त्यामुळें त्यांनीं पहिल्या खेपेला संधि दिली कीं समेटाचा एकादा मार्ग निघत असेल तर ठीक आहे. त्याप्रमाणें ते परत फिरले. बापूजींच्या अनुज्ञेशिवाय त्यांना सत्याग्रह सुरू करायचा नव्हता. पण जयपूर राज्यांतील अधिकाऱ्यांनीं तेथें खादी-कार्य करणारांकडून आश्वासन मागितलें कीं ते प्रजामंडळाशीं संबंध ठेवणार नाहींत. यावरून अधिकाऱ्यांना प्रजामंडळाशीं दोन हात करायचे आहेत हें पुरेपूर

स्पष्ट झालें. जमनालालजींची तुरुंगांत जाण्याची स्वतःपुरती तयारी होतीच. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान थोडेंच होणार होतें ! त्यांना सत्याग्रह नीट चाललेला हवा होता आणि त्याची पुरती तयारीहि त्यांनीं केली होती. शेवटीं बापूचा आशीर्वाद घेऊन त्यांनीं १ फेब्रुवारी १९३८ रोजीं जयपूर राज्याचा हुकूम मोडून राज्याच्या सीमेंत प्रवेश केला आणि अशा रीतीनें सत्याग्रहाची सुरुवात झाली. पोलीस त्यांना मोटारींत घालून सीमापार सोडून देत आणि ते पुन्हां आंत प्रवेश करीत. जेव्हां त्यांना दुसऱ्या मोटारींतून उतरायला सांगितलें तेव्हां ते उतरले नाहींत. बळजबरीनें त्यांना उतरविण्यांत आलें. उतरण्याची इच्छा नसल्यामुळें उतरवतांना त्यांना खरचटलें आणि त्यांचा सदराहि फाटला.

अशा रीतीनें सीमेबाहेर नेऊन सोडल्यामुळें त्यांनीं अन्न सोडून दिलें आणि ते नुसत्या गाजरावर राहूं लागले. तिसऱ्यांदा त्यांना अटक करून जयपूरपासून चाळीस मैल दूर सोडण्यांत आलें. तेथें ते रोज बाराबारा मैल फिरत असत. अंगांत चरबी वाढल्यानें तूप तर त्यांनीं सोडलेंच होतें. पहाऱ्यावरचे शिपाई स्वतःसाठीं जशा प्रकारची जाड भाकरी बनवतात तसलीच ते आपल्यासाठींहि मागवीत. जाड भाकरी आणि साधें जेवण तर त्यांना नेहमींच आवडे. मुगांची डाळ तेवढी त्यांना मानवत नव्हती. पण त्या दिवसांत जें मिळेल तेंच ते खात असत. अशा प्रकारच्या खाण्यामुळें त्यांच्या मनालाहि कितीहि समाधान झालें तरी त्यांच्या शरीरावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? सुक्या कोरड्या अन्नामुळें त्यांची अशक्तता वाढली. ते फिरतहि खूप. शेवटीं गुडघ्यांतली व्यथा वाढली. उपाय केले पण ते करतांना डॉक्टरच्या चुकीमुळें विजेनें त्यांचा पाय भाजला. उपाय चालला होता तो विजेचा होता. जखम झाली. पण त्यांनीं डॉक्टरला अभय दिलें. कातडी जळून जखम झालेली होती. पण त्यांनीं हूं कीं चूं देखील केलें नाहीं. त्यांची प्रकृतीच अशी कांहीं होती कीं त्यांना आपल्या व्यथा-वेदनांची थोडीशी देखील पर्वा वाटत नसे. स्वतः डॉक्टर भांबावून जात. ते जितके स्वतःचें दुःख सोसण्यांत कठोर होते तितकेच दुसऱ्याच्या दुःखाच्या बाबतींत कोमल असत. दुसऱ्याचें थोडें देखील दुःख त्यांना सहन होत नसे.

पायाला जखम झाल्यामुळें आतां त्यांना जयपूरनजीक राहणें अगत्याचें झालें. त्यांना कर्णावतांच्या बागेंत ठेवण्यांत आलें.

जेव्हां ते मोरासागरला राहात तेव्हां ते आसपासच्या खेड्यांतून हिंड
आणि लोकांचीं सुखदु:खें लक्षपूर्वक ऐकून घेऊन जमेल तें त्यांच्यासाठीं करीत
असत. लोकांना वाघाची शिकार करण्याचा हक्क नसल्यामुळें वाघांचा फा
उपद्रव होई. वाघ जनावरांनाच नव्हे तर माणसांनादेखील घेऊन जात. य
बाबतींत त्यांनीं राज्याच्या अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहारहि केला. अशाच प्रका
जेयरा गांवांत पाण्याचे फार हाल होते. गांवकऱ्यांनीं मिळून विहीर खणावि
असें त्यांनीं सांगितलें आणि आपल्यापरीनें पैशांचें आश्वासनहि दिलें.

इकडे सत्याग्रह जोरांत होता. सुमारें पांचशें स्त्रीपुरुषांनीं त्यांत भाग घेतला
श्री हिरालाल शास्त्री, राधाकृष्ण बजाज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीं फार श्रम
घेतले. बापूजी आणि जमनालालजी यांची इच्छा होती कीं संख्येच्या ऐवजी
त्यांत निवडक सत्याग्रहींनींच भाग घ्यावा.

जमनालालजी गेल्यानंतर गोष्ट अशी कांहीं घडली कीं मला एकदां प्रजा-
मंडळाची अध्यक्ष व्हावें लागलें. प्रजामंडळाच्या सदस्यांत थोडा मतभेद होता
शास्त्रीजी माझ्याकडे आले आणि म्हणाले, कांहीं तरी मार्ग काढला पाहिजे
मी म्हटलें, 'मी अध्यक्ष झाल्यानें उभय पक्षांचें समाधान होत असेल तर
होईन.' मला माझ्या शक्तीची मर्यादा माहीत तर होतीच पण त्यांची भावना
लक्षांत घेऊन मी म्हटलें, 'माझा उपयोग करून घ्यायचा असेल तर तुम्ही करू
शकतां.' त्यांनीं मला अध्यक्ष बनवलें.

संस्थानांतील सत्याग्रहासंबंधीं बापूजींचीं व्हाइसरॉयशींहि कांहीं बोलणी
झालीं होतीं. उभयपक्षीं समेट होईल असें सांगण्यांत आलें तेव्हां सत्याग्रह बंद
करण्यांत आला. सत्याग्रही आणि जमनालालजीहि सुटले. जयपूर राज्य आणि
प्रजामंडळ यांच्यांत समेट झाला. प्रजामंडळाच्या अटी मान्य करण्यांत आल्या
जमनालालजींनीं बरेच दिवस तिकडे राहून कार्याची घडी बसवून दिली

या सत्याग्रहांत जमनालालजींना पुष्कळच कष्ट उपसावे लागले. एक
परीनें त्यांची कसोटीच लागली. आधींच त्यांची प्रकृति बरी नव्हती. त्यांतच
तुरुंगवास आणि गुडघ्याची व्याधि व जखम यामुळें त्यांची प्रकृति अधिक
ढासळली. पण सगळे कष्ट सोसून त्यांनीं आवेशांत येऊन किंवा क्षुब्ध होऊन
कोणतेंहि काम केलें नाहीं आणि सत्याग्रह-भावनेचें परिपूर्ण पालन केलें. ते
नेहमीं समतोल राहिले.

## ३९. 'खोती सुंदरी'

ओम् आमची तिसरी मुलगी. तिसरी मुलगी म्हणून ती जन्मल्यापासूनच तिच्याविषयीं माझें मन बेफिकीर राहिलें. कमला बच्छराजजीच्या घरचें पहिलें संतान होती. त्यामुळें तिच्याकडे विशेष ओढा होता. मदालसेच्या आधीं कमलनयन झाला होता. त्यामुळें तिचेंहि स्वागतच झालें. ओम् आनंदी आणि नाचरीबागडणारी होती. ती लहानपणापासून पिंडानें धष्टपुष्ट होती आणि प्रकृतीनेंहि चांगली होती.

ओम् पिशवींत गुंडाळलेली जन्माला आली. मारवाडींत याला 'कुतेवडो' म्हणतात. पिशवी फाडून तिला माझ्या सासूबाईंनीं बाहेर काढलें. त्या म्हणाल्या, 'बाई, पोरगी तर गुलाबाच्या फुलासारखी सुंदर दिसते. भाग्यवान आहे.' एका दृष्टीनें हें म्हणणें खरेंहि होतें. त्यावर्षीं मिळकत पुष्कळ झाली होती. जमनालालजींनीं ओम् झाल्याच्या आनंदांत घरच्या मंडळीला आणि नोकरांना विमा कंपनीचे शेअरदेखील वांटले होते. त्यांना नेहमीं मुलीच आवडत.

लहानपणापासून पूजापाठ आणि 'ओम्'चा नेमानें जप करण्याची माझी सवय होती. पण बाळंतपणांत पूजा-पाठांत अडचण येऊं लागली. या गोष्टीची मनांत थोडी रुखरुख राहायची. वाटलें कीं या मुलीचें नांव 'ओम्' ठेवलें तर त्या निमित्तानें ओम्चा जप होतच राहील. मी तिला 'ओम्' 'ओम्' म्हणूं लागल्यें. त्यामुळें तिचें नांवच 'ओम्' पडलें.

मला मुलांना मारण्याची सवय नोकरांमुळें लागली असावी. नोकर जेव्हां मी सांगितलेली गोष्ट ऐकत नसत किंवा सांगितलेलें काम माझ्या मनासारखें होत नसे तेव्हां मला राग यायचा. मी त्यांच्यावर चिडायची. पण चिडल्यावर ते काम सोडून निघून जातील या भयानें राग आवरण्याचा मी प्रयत्न करीत असें; पण क्रोध आवरला नाहीं तर तो मुलांवर काढला जायचा.

नवव्या वर्षी मी ह्या घरांत आल्यें होतें. वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत घरांत अशीच राहिल्यें की कुठें काय चाललें आहे, याचा मला पत्ता देखील नव्हता. सारीं कामें नोकर-नोकराण्या करीत असत. एक तर मी पडद्यांत राहात होत्यें. दुसरी गोष्ट ही कीं सदान्कदा मी पूजापाठ, शिवणें टिपणें आणि शिकवणें यांतच गुंतलेली असायचीं. नोकरांशीं माझें कांहीं कामच नसे. नोकराण्यांशीं

जेव्हां ते मोरासागरला राहात तेव्हां ते आसपासच्या खेड्यांतून हिंडत आणि लोकांचीं सुखदु:खें लक्षपूर्वक ऐकून घेऊन जमेल तें त्यांच्यासाठीं करीत असत. लोकांना वाघाची शिकार करण्याचा हक्क नसल्यामुळें वाघांचा फार उपद्रव होई. वाघ जनावरांनाच नव्हे तर माणसांनादेखील घेऊन जात. या बाबतीत त्यांनीं राज्याच्या अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहारहि केला. अशाच प्रकारें जेयरा गांवांत पाण्याचे फार हाल होते. गांवकऱ्यांनीं मिळून विहीर खणावी असें त्यांनीं सांगितलें आणि आपल्यापरीनें पैशांचें आश्वासनहि दिलें.

इकडे सत्याग्रह जोरांत होता. सुमारें पांचशें स्त्रीपुरुषांनीं त्यांत भाग घेतला. श्री हिरालाल शास्त्री, राधाकृष्ण बजाज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीं फार श्रम घेतले. बापूजी आणि जमनालालजी यांची इच्छा होती कीं संख्येच्या ऐवजीं त्यांत निवडक सत्याग्रहींनींच भाग घ्यावा.

जमनालालजी गेल्यानंतर गोष्ट अशी कांहीं घडली कीं मला एकदां प्रजा-मंडळाची अध्यक्ष व्हावें लागलें. प्रजामंडळाच्या सदस्यांत थोडा मतभेद होता. शास्त्रीजी माझ्याकडे आले आणि म्हणाले, कांहीं तरी मार्ग काढला पाहिजे. मी म्हटलें, 'मी अध्यक्ष झाल्यानें उभय पक्षांचें समाधान होत असेल तर होईन.' मला माझ्या शक्तीची मर्यादा माहीत तर होतीच पण त्यांची भावना लक्षांत घेऊन मी म्हटलें, 'माझा उपयोग करून घ्यायचा असेल तर तुम्ही करूं शकतां.' त्यांनीं मला अध्यक्ष बनवलें.

संस्थानांतील सत्याग्रहासंबंधीं बापूजींचीं व्हाइसरॉयशीहि कांहीं बोलणीं झालीं होतीं. उभयपक्षीं समेट होईल असें सांगण्यांत आलें तेव्हां सत्याग्रह बंद करण्यांत आला. सत्याग्रही आणि जमनालालजीहि सुटले. जयपूर राज्य आणि प्रजामंडळ यांच्यांत समेट झाला. प्रजामंडळाच्या अटी मान्य करण्यांत आल्या. जमनालालजींनीं बरेच दिवस तिकडे राहून कार्याची घडी बसवून दिली.

या सत्याग्रहांत जमनालालजींना पुष्कळच कष्ट उपसावे लागले. एका परीनें त्यांची कसोटीच लागली. आधींच त्यांची प्रकृति बरी नव्हती. त्यांतच तुरुंगवास आणि गुडघ्याची व्याधि व जखम यामुळें त्यांची प्रकृति अधिकच ढासळली. पण सगळे कष्ट सोसून त्यांनीं आवेशांत येऊन किंवा क्षुब्ध होऊन कोणतेंहि काम केलें नाही आणि सत्याग्रह-भावनेचें परिपूर्ण पालन केलें. ते नेहमीं समतोल राहिले.

●

## ३९. 'ओतीं सुंदरी'

ओम् आमची तिसरी मुलगी. तिसरी मुलगी म्हणून ती जन्मल्यापासूनच तिच्याविषयीं माझें मन बेफिकीर राहिलें. कमला बच्छराजजींच्या घरचें पहिलें संतान होती. त्यामुळें तिच्याकडे विशेष ओढा होता. मदालसेच्या आधीं कमलनयन झाला होता. त्यामुळें तिचेंहि स्वागतच झालें. ओम् आनंदी आणि नाचरीबागडणारी होती. ती लहानपणापासून पिंडानें धष्टपुष्ट होती आणि प्रकृतीनेंहि चांगली होती.

ओम् पिशवींत गुंडाळलेली जन्माला आली. मारवाडींत याला 'कुतेवडो' म्हणतात. पिशवी फाडून तिला माझ्या सासूबाईनीं बाहेर काढलें. त्या म्हणाल्या, 'बाई, पोरगी तर गुलाबाच्या फुलासारखी सुंदर दिसते. भाग्यवान आहे.' एका दृष्टीनें हें म्हणणें खरेंहि होतें. त्यावर्षीं मिळकत पुष्कळ झाली होती. जमनालालजीनीं ओम् झाल्याच्या आनंदांत घरच्या मंडळीला आणि नोकरांना विमा कंपनीचे शेअरदेखील वांटले होते. त्यांना नेहमीं मुलीच आवडत.

लहानपणापासून पूजापाठ आणि 'ओम्'चा नेमानें जप करण्याची माझी सवय होती. पण बाळंतपणांत पूजा-पाठांत अडचण येऊं लागली. या गोष्टीची मनांत थोडी रुखरुख राहायची. वाटलें कीं या मुलीचें नांव 'ओम्' ठेवलें तर त्या निमित्तानें ओम्चा जप होतच राहील. मी तिला 'ओम्' 'ओम्' म्हणूं लागल्यें. त्यामुळें तिचें नांवच 'ओम्' पडलें.

मला मुलांना मारण्याची सवय नोकरांमुळें लागली असावी. नोकर जेव्हां मी सांगितलेली गोष्ट ऐकत नसत किंवा सांगितलेलें काम माझ्या मनासारखें होत नसे तेव्हां मला राग यायचा. मी त्यांच्यावर चिडायचीं. पण चिडल्यावर ते काम सोडून निघून जातील या भयानें राग आवरण्याचा मी प्रयत्न करीत असें; पण क्रोध आवरला नाहीं तर तो मुलांवर काढला जायचा.

नवव्या वर्षी मी ह्या घरांत आल्यें होतें. वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत घरांत अशीच राहिल्यें कीं कुठें काय चाललें आहे, याचा मला पत्ता देखील नव्हता. सारीं कामें नोकर-नोकराण्या करीत असत. एक तर मी पडद्यांत राहात होत्यें. दुसरी गोष्ट ही कीं सदान्कदा मी पूजापाठ, शिवणें टिपणें आणि शिकवणें यांतच गुंतलेली असायचीं. नोकरांशीं माझें कांहीं कामच नसे. नोकराण्यांशीं

माझा संबंध यायचा तो एवढाच कीं त्या माझीं कांहीं नेमून दिलेलीं कामें करीत असत. सांगण्या ऐकण्याचा प्रसंगच मला कधीं आला नाहीं. त्यांना पगार मिळायचा तो दुकानांतून. मुलें झालीं तसें नोकराण्यांकडून काम घ्यावें लागलें. डॉक्टरीणबाईनीं असे कांहीं नियम सांगितले कीं त्याप्रमाणें मुलांचें लालनपालन करणें त्यांच्या सवयीबाहेरचें होतें. डॉक्टरीण म्हणे, या नीट कामें करीत नाहींत. हें असें केलें पाहिजे. वारंवार तक्रारी ऐकून मी नोकराण्यांना सांगत होत्यें. आणि सांगितल्याप्रमाणें गोष्टी झाल्या नाहींत म्हणजे चिडत होत्यें. नोकराण्या आपसांत म्हणत, शेटाणीला स्वतःला कांहीं कळत नाहीं आणि आम्हांला मात्र सांगत असते. हें कर आणि तें करूं नकोस. जसें कांहीं आम्ही मुलें सांभाळलींच नाहींत. त्या जेव्हां वैतागून जायला निघत तेव्हां डालूराम त्यांची समजूत घालून आणि थोडी अधिक लालूच दाखवून त्यांना कामाला लावी. मला तर देण्याघेण्यांतलें कांहीं कळत नव्हतें आणि सारखी त्यांच्यावर चिडत होत्यें. मग त्यांनीं तरी माझें कां ऐकावें ? मला सांगण्यांत येई कीं त्यांना प्रेमानें सांभाळलें पाहिजे. नाहींतर त्या यायच्या नाहींत. तेव्हां माझा राग बिचाऱ्या मुलांवर निघायचा. पुढें पुढें मारण्याची सवय वाढत गेली आणि ती जास्तींत जास्त भोंवली ओम्‌ला. रामकृष्ण झाला तेव्हांची गोष्ट. मी बाळंतीण होत्यें. ओम् सारखी खेळांत दंग असायची. कसल्या तरी कामासाठीं मी तिला बोलावलें. पण ती लगेच आली नाहीं. जेव्हां आली तेव्हां मी तिला इतक्या जोरानें मारलें कीं तपेलीला पोचा गेला आणि माझ्या हाताला असा मार लागला कीं त्याची दूख कित्येक दिवस राहिली आणि थंडीच्या दिवसांत ती उचल खात राहिली. कित्येक वर्षे माझ्या नणंदेनें मला हळद खावबली तेव्हां कुठें ती निवळली.

साबरमती आश्रमांत राहात होतों तेव्हांची गोष्ट. ओम्‌ला लहानमोठे फोड झाले होते. मी तिला अंघोळ घालीत होत्यें. फोड धुतांना ती रडूं लागली. मी तिला तोंड आवरायला सांगितलें आणि फोड धुऊं लागल्यें. तशी ती अधिकच जोरजोरानें रडू लागली. मला राग आला. अंघोळीचा पेला मी तिच्या डोक्यावर आपटला. तिला लागलें आणि रक्त वाहूं लागलें. मी जखम धुऊन पट्टी बांधली. पट्टी देखील रक्तानें लाल झाली. पण ओम् माझ्या हातांतून सुटून पळाली आणि पुन्हा खेळायला गेली. मी घाबरल्यें आणि मला रडूंहि आलें. जमनालालजींना

अशा तऱ्हेनें मारणें खपत नसे. ते बापूजींच्याकडे गेले आणि म्हणाले, 'जानकीदेवींची मुलांना मारण्याची सवय सुटायची कशी ? आज तिनें ओम्‌ला मारलें.' बापूजींनीं उपवास करायला सांगितलें. त्यांनीं तोहि केला. त्याचा परिणामहि झाला माझ्यावर; पण मारणें कांहीं सुटू शकलें नाही.

ओम्‌वर माझ्या मारण्याचा किंवा रागावण्याचा फारसा परिणाम होत नसे. एकदां तर माझ्यावर रुष्ट होऊन तीन दिवस ती कांहीं खाल्लीप्याली देखील नाहीं ! त्या दिवसांत बजाजवाडींत सभा-बैठकींची धामधूम होती. एकामागून एक पाहुण्यांच्या पंगती बसत आणि उठत. मुलांच्या खाण्यापिण्याकडे लक्ष द्यायला सवडच नसे. पण जेव्हां मला कळलें कीं ओम् जेवलीच नाहीं तेव्हां मी घाबरल्यें कीं जमनालालजींना पत्ता लागला तर अनर्थ होणार. तेव्हां ओम्‌नें जेवण घ्यावें म्हणून मी तिची समजूत घालूं लागल्यें. पण तिनें आपला हेका सोडला नाही. पण तिला जेव्हां सांगितलें कीं हें तिच्या वडिलांना कळलें तर त्यांना फार त्रास होईल. तेव्हां या युक्तिवादाचा उपयोग झाला आणि ओम्‌नें जेवण घेतलें. आपल्या वडिलांना कोणत्याहि रीतीनें त्रास होऊं नये ही भावना मुलांत नेहमीं राहिली. खाण्यापिण्यावांचून ती तीन दिवस राहिली पण तिच्या मुद्रेवरून किंवा बोलण्याचालण्यावरून या गोष्टीचा कुणालाच पत्ता लागला नाहीं. जमनालालजींची मनीषा होती कीं मुलांनीं संस्कारी आणि शिस्तशीर व्हावें, त्यांच्यांत वक्तशीरपणा यावा. घरीं राहून हें साधणें कठीण होतें. त्यांना साबरमतीला ठेवण्यामागला उद्देशहि हाच होता कीं मुलांनीं चांगल्या वातावरणामुळें आणि दुसऱ्या मुलांकडून या गोष्टी शिकाव्या. इतरांचीं मुलें घंटा होण्याच्या आधींच न्हाऊन धुऊन तयार होत आणि वर्गांत किंवा प्रार्थनेंत नीटनेटके पोंचत. आमचीं मुलें जशीं घरांत राहात तशींच जात. म्हणून त्यांना वाटलें कीं मुलाना छात्रालयांत ठेवल्यामुळें त्यांच्यांत व्यवस्थित-पणा येईल आणि सर्वांच्या बरोबरीनें राहण्याची सवय होईल. म्हणून त्यांनीं मदालसेला आणि ओम्‌ला शारदामंदिरांत ठेवण्याचें ठरविलें. मी मुलांची तयारी केली आणि कपड्यालत्त्यासह त्यांना घेऊन शारदामंदिरांत गेल्यें. मदालसा तर मोटारीतून खुशीनें आश्रमांत गेली पण ओम् मोटारीतच बसून राहिली. मोठ्या मुष्कीलीनें दोनतीन शिक्षिकांच्या मदतीनें मी तिला उतरवलें आणि मोटर घेऊन परत फिरल्यें. तिकडे ओम्‌नें असा उच्छाद मांडला कीं शिक्षिका

तिला परत घेऊन आल्या. कांहीं दिवसांनंतर बावापुता करून मोठ्या प्रयासानें एकदांची तिला शारदामंदिरांत पाठवणें शक्य झालें.

मी जरी तिच्यावर रागावत होत्यें आणि तिला मारीत होत्यें तरी देखील ती मला सोडून राहायला राजी नसे आणि मलाहि तिला दूर ठेवणें आवडत नसे. पण जमनालालजींना तिच्या शिक्षणाची काळजी लागली होती. त्यांनीं आणि बापूजींनीं तुरुंगांतून पत्र लिहून तिला कन्याश्रमांत पाठविण्याचा सल्ला दिला. दुसरे दिवशीं सकाळच्या प्रार्थनेनंतर तिला पाठवण्याचें ठरलें. रात्रीची मला झोप लागली नाहीं. कमलनयन आणि मदालसा आश्रमांत होतींच. आतां हीहि चालली या विचारानें मला रडूं येत होतें. मी जेव्हां मोठ्यानें रडूं लागल्यें तेव्हां कमला येऊन म्हणाली, 'आई, तूं कां रडतेस?' मी म्हणालें, 'बेटा, ओम्‌ला 'राधाकिसनभाया' कन्याश्रमांत पाठवताहेत म्हणून मला रडूं आलें.' तेव्हां कमलानें जाऊन ओम्‌चें कन्याश्रमाला जाणें रद्द करायला लावलें.

माझें ओम्‌ला मारणें दादीजींनाहि आवडत नसे. मी तिच्यावर रागावल्यें कीं ही रडूं लागायची. तिनें कधींच आपल्या मुलांना मारलेलें नव्हतें. त्यामुळें मी मारलें कीं ती रडूं लागायची.

बापूजी आणि जमनालालजी जेलमधून सुटून आल्यावर बापूजींची हरिजन दौऱ्यावर निघण्याची गोष्ट निघाली. ओम्‌ला बापूजींबरोबर हरिजनदौऱ्यावर पाठविल्यास कसें असा शेठजींनीं मला प्रश्न केला. मी म्हटलें, फार छान. मी तिला बापूजींच्या बरोबर पाठवायला तयार झाल्यें पण जमनालालजींना हें बापूजींना सांगण्यांत सकोच वाटूं लागला. बापूजींची पार्टी लहानांत लहान असावी, असा त्यांचा प्रयत्न चालला होता; पण बापूजींच्याबरोबर जाण्यांत तिचें हित होईल म्हणून ते मोठ्या संकोचानें बापूजींना म्हणाले, 'बापूजी, ओम्‌ला बरोबर घेतल्यानें आपल्याला भार होणारच, पण तिचा फायदा होईल. म्हणून घेऊन जाऊं शकलांत तर बरें होईल." बापूजी म्हणाले, 'वा: हिचा कसला भार? ही तर खेळणं आहे!'

वर्षभर ओम् बापूजींच्याबरोबर राहिली. बापूजींनीं तिच्याकडून कामहि घेतलें आणि तें घेतां घेतां ते तिला शिकवीतहि राहिले. तिला पुष्कळच शिकायला मिळालें. बापूजींनीं दौऱ्यावरून जीं पत्रें लिहिली होती त्यांत त्यांनीं ओम्‌च्या आनंदी आणि बेफिकीर स्वभावाबद्दल लिहिलें होतें. ती हंसत हंसत काम करी.

पण तिनें खाण्यापिण्याच्या किंवा राहण्यावागण्याच्या बाबतींत कधीं तक्रार केली नाहीं. बेफिकीर तर इतकी होती कीं तिला कुठें झोपायला मिळेल तिकडे लागलीच झोपीं जाई. मोटारींत बापूजींच्या पायांशींच त्यांचा आधार घेऊन झोपीं जाई. म्हणूनच बापूजी तिला 'सोती सुंदरी' म्हणत असत. तिचें वजनहि चांगलें वाढलें होतें. प्रवासाहून परतली ती चांगली जाडजूड होऊन. याच दौऱ्यांत बापूजींवर पुण्यांत बाँब फेकण्यांत आला होता. ओम्हि बरोबर होती. बापूजी आणि ओम् वगैरे बरोबरची मंडळी वांचली. बापूजी 'सोती सुंदरी'-शिवाय तिला पंडिताहि म्हणत. पंडिता म्हणण्यांतला त्यांचा आशय होता दुसऱ्याला उपदेश करण्यांत प्रवीण. तिनें बापूजींना आपलें आरोग्य चांगलें राखण्याविषयीं एक उपदेशानें भरलेलें पत्र लिहिलें होतें. उत्तरांत बापूजींनीं तिला 'पंडिता' ही पदवी दिलेली होती.

एकदां बच्छराज कंपनीच्या डायरेक्टरनीं कापडाची गिरणी घेण्याबद्दल सुचवलें. त्यांच्या आग्रहावरून जमनालालजींच्या मनांत असा विचार आला कीं तिच्यांत मजुरांना सर्व प्रकारच्या सवलती असतील अशी एक आदर्श गिरणी चालवण्यांत यावी. मला आणि मुलांना ही गोष्ट रुचली नाहीं. आम्ही बापूजींच्याकडे गेलों. मी बापूजींना म्हटलें, 'जमनालालजी ही बला आपल्या अंगावर कां घेत आहेत?' ओम् बोलण्यांत थोडी धीट असल्यामुळें म्हणाली, 'आम्ही बाहेर तर खादीचा प्रचार करीत असतों, मग गिरणी झाल्यावर लोकांवर काय परिणाम होणार? आपल्याला कॉंग्रेससाठीं पैसे हवेत म्हणून आपण गिरणी घेण्याबद्दल काकाजींना प्रवृत्त करीत आहांत.' बापूजींनीं जमनालालजींना पत्र लिहिलें कीं त्यांनीं गिरणी घेतां कामा नये. पण जमनालालजींनीं पत्र पोंचण्यापूर्वींच गिरणी न घेण्याचें ठरविलें होतें. त्यांच्यापुढें खादीचा विचार होता. त्या दिवसांत अगदीं स्वस्तांत गिरण्या मिळत असत आणि त्यांतली मिळकतहि लाखांची असे.

बापूजींच्या सल्ल्यावरून ओम्ला शिक्षणासाठीं आधीं मद्रासला कुमारप्पांच्या बहिणीच्या संस्थेंत आणि त्यानंतर मदनापल्लीच्या मिसेस् कजिन्सच्या संस्थेंत पाठविण्यांत आलें. मद्रासमध्यें जमनालालजींनीं अंबुजम्माला ओम्ची स्थानिक पालक बनवलें होतें. बापूजींची अपेक्षा होती कीं तिकडे ती इंग्रजी, संगीत इत्यादि शिकेल आणि तिचे संस्कृतचे उच्चार चांगले होतील. जेव्हां ती मद्रासला

जायला निघाली तेव्हां मी तिला बरेंचसें सामान बांधून दिलें. बरीच तयारीहि केली, तेव्हां जमनालालजी हंसून म्हणाले, 'घरीं असली कीं तिला रागावतेस, मारतेस आणि आतां बाहेर जायला निघतांच प्रेमाला पूर येतो!' ओम्च्या इच्छेवरून तिच्या सोबतिणीलाहि इतक्या दूर पाठवण्यांत आलें. अशा रीतीनें मुलींच्या मनांतली इच्छा पुरी करून जमनालालजी त्यांना लाडांनीं बिघडवीतहि असत. जयपूर सत्याग्रहाच्या वेळीं आग्र्याला जमनालालजींचा राजनारायण-जींच्या कुटुंबाशीं परिचय झाला. घरची मंडळी चांगली आणि संस्कारी वाटली. पुढें जेव्हां राजनारायणजींचे वडील प्रकृतीसाठीं जुहूला येऊन राहिले तेव्हां जमनालालजीहि तिकडेच होते. त्यांतून संपर्क अधिकच वाढला. मुलांशींहि त्यांचा संपर्क आला. पुढें जमनालालजींच्या मनांत आलें कीं या घरांतली मुलगी आणली पाहिजे किंवा तिकडे मुलगी दिली पाहिजे.

जमनालालजींमध्यें माणसाची पारख करण्याची फार मोठी शक्ति होती. याच कारणामुळें त्यांनीं मुलामुलींचे लग्नसंबंध अशा ठिकाणीं जोडले कीं त्यांचें जीवन सुखाचें होऊं शकलें. जेव्हां ओम्चें राजनारायणजींशीं लग्न झालें तेव्हां ते खादी वापरीत नव्हते. पण गप्पागोष्टींवरून जमनालालजींनीं ताडलें कीं ते राष्ट्रीय विचाराचे आहेत आणि गांधीजींच्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करतील. आणि झालेंहि तसेंच. ते आपण होऊनच खादी वापरूं लागले आणि त्यांच्या घरीं बहुतेक खादीच वापरली जाते. मुलांना देखील खादी घालायला लावतात. दुर्व्यसन तर तिघांपैकीं एकाहि जावयांत नाहीं! ही सारी ईश्वराचीच कृपा असें समजलें पाहिजे.

जमनालालजी आग्र्याहून लग्न ठरवून आले. ते आले त्याच्या सातव्या दिवशीं लग्न होतें. इतक्या थोड्या वेळांत लग्न संपादणें सोपें नव्हतें. पण जमनालालजींनीं व्यवस्थेचें काम सावित्री आणि राम यांच्यावर सोंपवलें. मी टायफॉइडनें आजारी होत्यें आणि मदालसेकडे होत्यें. मी आल्यें ती केवळ लग्नाच्या वेळींच. लग्नाची सगळी तयारी सावित्रीनें आणि रामनेंच केली. कापड चोपड धरून खाण्यापिण्यापर्यंतची सर्व व्यवस्था करावयाची होती. मेवामिठाईची नामावलि धुडाळून तयार केलेली लांबलचक यादी घेऊन सावित्री जमनालालजींपर्यंत पोंचली. ते म्हणाले, यांतली आवडेल ती एक मिठाई निवड आणि ती करायला लाव. तिचा उत्साह मनांतल्या मनांत राहिला पण त्यांच्या सांगण्याप्रमाणें एकाच मिठाईवर तिनें समाधान मानलें.

ओमच्या पाठवणीच्या वेळीं जमनालालजींचे डोळे ओले झाले. कमलाच्या लग्नाच्या वेळीं त्यांच्यावर काय परिणाम झाला होता हें मी पाहूं शकलें नव्हतें. मदालसा वर्ध्यालाच राहणार असल्यानें तिच्या पाठवणीचा प्रश्नच नव्हता. पण ओम्च्या बाबतींत त्यांच्यासारखा धीरगंभीर पुरुषदेखील सद्‌गदित झाला. मुलीची पाठवणी सगळ्यांच्याच भावनांना कोमल बनवीत असते.

जेव्हां ओम् आणि राजनारायणजी नैनितालला होतीं जेव्हां जमनालालजी तिकडे गेले. त्यांचें एकमेकांमधलें प्रेम पाहून त्यांना फार समाधान झालें. परत आल्यावर जमनालालजी मला म्हणाले, 'पाहा, आतां ओम् आली तर लक्षात ठेव, तिच्यावर रागवायचें नाहीं. राजनारायणाला ती फार आवडते, तिला बोललें केलेलें त्याला रुचायचें नाहीं.'

ओम् दीडदोन महिने वर्ध्यालाच होती. राजनारायणजी तिला न्यायला वर्ध्याला आले. थोडे दिवस थांबून दोघेंहि मुंबईला गेलीं. तेथून सरळ तीं आपल्या कार्यक्रमानुसार नैनितालला जायचीं होतीं. पण कां कोण जाणे, एकाएकीं त्यांचें मन उठलें. त्यांना सारखें वर्ध्याला जावें असें वाटूं लागलें. जणूं वर्धा त्यांना हांक घालीत होतें. सामानाची खरेदी करण्याचें टाकून ते वर्ध्याला आले.

तीं दोघें जमनालालजी गेले त्याच दिवशी सकाळीं आठ वाजतां वर्ध्याला पोंचलीं.

जमनालालजी गेल्याचा धक्का सगळ्यांनाच बसला होता. अर्थात् घरच्या मंडळीला स्वाभाविकच जास्त. घरच्या सगळ्याच मंडळीची भावना ही होती कीं आपण त्यांचें काम पुढें चालवून त्यांच्या आत्म्याला संतोष द्यावा. सावित्री जेव्हां 'करेंगे या मरेंगे' च्या आंदोलनांत तुरुंगांत जायला निघाली तेव्हां राजनारायणजींनीं ओम्लाहि परवानगी दिली.

## ४०. शेंडेफळ

रामकृष्ण आमचें शेंडेफळ. तो लहानपणीं प्रकृतीनें सुदृढ आणि शांत होता. रडणें सुद्धां कमी होतें. लहानपणीं त्याचें बोट दारांत चेंगरलें आणि तुकडा

तूटून पडला. तो उचलून घेऊन तो आजीजवळ गेला आणि म्हणाला, 'दादीजी, बघ माझ्या एका बोटाचीं दोन बोटें झालीं!' दादीजींनीं बोटाचे दोन तुकडे झालेले पाहिले तशा त्या रडूं लागल्या. हें पाहून तोहि रडू लागला. आरभीं त्याच्या लक्षांतहि आलें नव्हतें. नंतर बोट जोडलें गेलें. तो मोठ्यांच्या समोर सरळ आणि आज्ञाधारक होता पण संवगड्यांबरोबर तो नेहमी थट्टामस्करी करीत असे. त्याचा हाच स्वभाव आजदेखील आहे.

रामचें लिहिणेंवाचणें पुष्कळ उशिरां सुरू झालें. पहिल्या पहिल्यानें तरी बस्तान कांहीं नीट जमेना. बापूजींनीं जोंवर शाळा-कॉलेजांच्या बहिष्कारावर जोर दिलेला होता तोंवर मुलें शाळा-कॉलेजांत गेलींच नाहींत. घरीं किंवा आश्रमांत जें कांहीं शिक्षण होई तेवढेंच. पण जेव्हां बापूजींच्या सल्ल्यानें वर्ध्यांत नवभारत विद्यालय सुरू झालें तेव्हां राम तिथें जाऊं लागला. शिक्षण उशिरां सुरू होऊनदेखील वयाच्या सोळाव्या वर्षीं तो मॅट्रिक पास झाला.

कित्येक वर्षेंपर्यंत आमच्यापैकीं कुणीच सिनेमा पाहिला नव्हता. मिठाई तर घरांतहि बनत नव्हती आणि बाहेरहि खाल्ली जात नव्हती. कुंवार मुला-मुलींना लग्नांतसुद्धां मी जाऊं देत नसें. एकदां माझी थोरली वहिनी आली होती. तिनें मोतीचुराचे लाडू आणले असावे. ते पाहून राम म्हणाला, 'मामी, यांना काय म्हणतात?' ती म्हणाली. 'मोतीचूर लाडू.' बस. एवढें ऐकून तो खेळायला पळाला. पण हें पाहून माझ्या वहिनीला रडूं आलें. ती म्हणाली, 'तुमच्या एवढ्या मोठ्या घरांत मुलांचे कोण हे हाल? मी आतां लाडू तयार केले असते, पण आपल्या या घरांत असले पदार्थ करायलाहि मज्जाव.'

माझ्या गैरहजेरींत ओम्नें लाडू खाल्ले आणि माझ्या वहिनीला म्हटलें, 'मामी, आईला सांगूं नको हां! पण माझ्यासाठीं लाडू जरूर पाठव.'

माझ्या वहिनीनें इंदूरला गेल्यावर पार्सल पाठवलें. पार्सल उघडलें तर त्यांत लाडू! तेव्हां प्रश्न पडला हे आले कसे. ओम् धांवत जाऊन हळूच आजीला म्हणाली, 'दादीजी, हे तर मामीनें माझ्या सांगण्यावरून पाठविले आहेत.' तेव्हां कुठें ध्यानांत आलें कीं ही सारी ओम्‌ची करामत. साध्या राहणीची ही परिस्थिति १९३४ पर्यंत चालली. पुढें ती कमी होत गेली.

जेव्हां रामकृष्ण वर्ध्याला शिकत होता तेव्हां त्यानें आणि त्याच्या सोबत्यांनीं 'घनचक्कर क्लब' चालू केला होता. त्यांत सारीं मुलें खेळत बागडत असत.

त्याच्या जोडीला खेड्यांतून प्रौढ शिक्षणाचें आणि चरख्याचेंहि काम करीत. या क्लबांत कधीं कधीं म्हातारेकोतारेहि खेळत असत.

घनचक्कर क्लबांतील मुलांशीं राम भावासारखा वागे. पण मला त्यांची चीड यायची. मुलें म्हणत श्रीमंतांचा पैसा आणि आपली अक्कल लावून देशाचें काम करूं. मला छोट्या तोंडीं हा मोठा घास वाटे. त्यांना मी काय सांगणार ? पण मी आपल्या मुलांना म्हणें, तुम्हीं या घनचक्करवाल्यांच्या संगतीनें स्वतःहि घनचक्कर व्हाल. या घनचक्करवाल्या पोरांवर माझा आणखीहि एका कारणा-साठीं राग होता. तें म्हणजे रामला ते कधीं निवांत बसून खाऊं देत नसत. पाहावें तेव्हां त्यांच्याबरोबर.

वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला आणि जमनालालजी तुरुंगांत जाऊं लागले तसा राम त्यांना म्हणाला, 'परीक्षा झाल्यावर मलाहि सत्याग्रह करायचा आहे.' अवधि थोडा होता, अधिक बोलणें कांहीं होऊं शकलें नाहीं, पण ते एवढेंच म्हणाले कीं काय करायचें असेल तें बापूजींच्या सल्ल्यानें कर. तीनचार महिन्यांनीं परीक्षा आटोपल्यावर राम बापूंकडे गेला. त्यावेळां त्याचें वय सोळा वर्षांचें होतें. बापूजी म्हणाले, 'मी या सत्याग्रहांत इतक्यांतच मुलांना पाठवूं इच्छित नाहीं.' तो तेव्हां हटूनच बसला तेव्हां बापूजींनीं त्याला तीनचार दिवस आपल्याजवळ ठेवून घेऊन त्याची तपासणी केली. त्याला सांगितलें, जोंवर हा सत्याग्रह चालेल तोंवर तुला पुन्हा पुन्हा जावें लागेल. तुझी तयारी असली पाहिजे.' तो म्हणाला, 'अखेर किती दिवस तुरुंगांत जाऊन राहावें लागेल ?' ते म्हणाले, 'किमान पांच वर्षें असें धरून तर चाललेंच पाहिजे.' तो म्हणाला, 'माझी पांच वर्षांची तयारी आहे.' कुटुंबांतील बरीचशी मंडळी आणि मी तुरुंगांत जाऊन आलों होतों. अर्थात् अनुभव होता. माझें मन रामला तुरुंगांत पाठवायला राजी नव्हतें म्हणून बापूंना खुणावलें कीं याला थोपवून धरणेंच चांगलें. पण तो आपला विचार कांहीं सोडीना. शेवटीं बापूंना परवानगी द्यावी लागली.

त्यानें सत्याग्रह केला तेव्हां त्याला पहिल्या खेपेला शंभर रुपये दंड झाला. दुसऱ्यांदा केला तेव्हां दोनशें. तिसऱ्यांदा चार महिन्यांची शिक्षा झाली. शिक्षा पुरी करून तो शनिवारीं आला. सत्याग्रहींना दहा दिवसांच्या आंत परत जाण्याचा आदेश होता. पण त्याची लगेच जाण्याची तयारी होती. दुसरे दिवशीं

रविवार आला. त्यामुळें त्याला थांबावें लागलें. त्यानें सोमवारीं पुन्हां सत्याग्रह केला आणि त्याला सहा महिन्यांची शिक्षा झाली. जेव्हां सत्याग्रह स्थगित झाला तेव्हां तो विनोबाजीच्याबरोबर सुटला.

तुरुंगांत जाण्यापूर्वी तो मॅट्रिक पास झालेला होता. तुरुंगांतून सुटून आल्यावर त्याने पुन्हा अभ्यासाला सुरुवात केली. मोठ्या प्रयासानें त्याला कॉलेजांत प्रवेश मिळाला. कॉलेजचे वर्गतर केव्हांच सुरू होऊन गेले होते आणि परीक्षेला आतां फार थोडे दिवस राहिले होते. त्यामुळें त्याला परवानगी मिळाली ती देखील मोठ्या मुष्किलीनें. तरीहि त्यानें परीक्षा दिली आणि तो पास झाला. दरम्यान त्याचे वडील गेले. अशा प्रसंगीं मन शांत ठेवून अभ्यास करणें सोपें नव्हतें. पण सोंपवलेल्या कामांत एकाग्र होणें ही त्याची नेहमींचीच सवय आहे. जमनालालजींच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशीं मी त्याला कॉलेजला पाठविलें. त्यांच्या निधनानिमित्त कॉलेजच बंद राहिल्यामुळें त्याला परत यावें लागलें ही गोष्ट निराळी.

त्याच्या वडिलांच्या निधनानंतर घरच्या मंडळीनें आपले केस वाहिले. गंगाबिशनजी, राधाकृष्ण वगैरे कुटुंबीयांनीं मुंडन केलें तेव्हां रामलाहि सांगण्यांत आलें. पण तो म्हणाला, 'केस वाहण्यांत विशेष काय आहे? वडिलांसाठी आपण करूं तें तें थोडेंच आहे.' त्यानें मुंडन करून घेतलें नाहीं. तिकडे कमलनयन गोला गोकर्णनाथला होता. त्यानेंहि मुंडन करून घेतलें नाहीं. कमलनयन वर्ध्याला आला तेव्हां मला म्हणाला, केस देण्यानें तुला वरें वाटत असेल तर मी देईन. पण मलाहि त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. पाहायला गेलें तर दोघाहि भावांच्या विचारांत केवढें साम्य होतें! राम वर्ध्याला होता आणि कमल गोल्याला; पण दोघांचा समान विचार, इतकी क्षुद्र वस्तु आपण वडिलांना काय अर्पण करावयाची! या मुलांच्या बाबतींत हा पहिलाच मृत्यु होता आणि अशा प्रकारची चर्चाहि आधीं झालेली नव्हती. कमलनयन तर असें देखील म्हणाला होता कीं सुतकी चेहरा करून वडिलांच्या दु:खाचें प्रदर्शन तें काय करायचें! झालेल्या दु:खाचें प्रदर्शन थोडेंच करायचें आहे! रामदेखील तिसऱ्या दिवशीं घनचक्कर क्लबांत खेळायला निघून गेला. मुलांनीं हें दु:ख मोठ्या धीरानें सहन केलें आणि वडिलांविषयीं जी श्रद्धा होती ती त्यांनीं त्यांच्या इच्छेच्या पूर्तींतच आहे असें मानलें. सगळी घरची मंडळी गंभीर होती. पण कुठेंच रडारड नाहीं असें पाहून मारवाडहून आलेली मंडळी आश्चर्य करूं लागली.

पुन्हा जुलैमध्यें उन्हाळ्याच्या सुटीनंतर कॉलेज सुरू झालें. पण ऑगस्टमधें जेव्हां 'करो या मरो' आंदोलन सुरू झालें तेव्हां राम पुन्हां तुरुंगांत गेला आणि १९४४ मध्यें सुटला. तुरुंगांत तो आपल्या सहकाऱ्यांशीं मिळूनमिसळून असे. तुरुंगांतून सुटून आलेले लोक त्याच्याविषयीं प्रेम आणि आपुलकी व्यक्त करीत. आपल्या सहकाऱ्यांच्या सुखदु:खांकडे त्याचें लक्ष असे. त्यांना एकाद्या वस्तूची गरज लागली तर तो आपल्याजवळची देई आणि नसली तर मागवून देई.

त्यानें तुरुंगांत खेळणें बागडणें, लिहिणेंवाचणें आणि सूत कांतणें यांत आपला वेळ आनंदानें घालवला. कसल्याहि प्रकारची तक्रार कधीं केली नाहीं. एवढें खरें कीं आपण तुरुंगांतून बाहेर आलों कीं आपला भाऊ आपल्याला व्यापारांत गुंतवील ही भीति त्याला होती. त्यानें तसें मला पत्रांत लिहिलेंहि होतें. तेव्हां मी त्याला लिहिलें, तुला काळजी करण्याचें कारण नाहीं. तुझी इच्छा असेल त्याप्रमाणें बापूजींच्या साहचानें सारें कांहीं केलें जाईल. आणि झालेंहि तसेंच. बापूजींच्या साह्यानेंच तो व्यापारांत पडला. पण व्यापारांत पडलास तरी युवक आणि विद्यार्थीवर्गातलें तुझें काम चालू ठेव असेंहि त्यांनीं सांगितलें. व्यापारांत पडेपर्यंत तो देशकार्यच करीत राहिला. पहिल्यांदा तो तुरुंगांत गेला तेव्हांपासून शेवटच्या खेपेला सुटून येईपर्यंत पावणे चार वर्षें त्यानें तुरुंगांत काढलीं होतीं. त्यानें बापूजींना म्हटलें, 'आपणास दिलेल्या पांच वर्षांपैकीं पंधरा महिने राहिले आहेत. आपण या पंधरा महिन्यांत वाटेल तें काम घ्या.' बंगाल, आसाम, आणि मद्रासच्या दौऱ्यांत रामला बापूजींनीं आपल्याबरोबर घेतलें. त्याच्यावर हरिजन फंड आणि बापूंच्या सह्यांचे पैसे वसूल करण्याशिवाय बापूंचें सामान सांभाळण्याचीहि जबाबदारी होती. त्यामुळें बापू थट्टेनें त्याला 'हमाल' म्हणत. त्याचे संवगडीहि त्याला 'बापूंचा हमाल' म्हणू लागले. त्यानंतर तो युवकमंडळींत आणि विद्यार्थीवर्गांत विशेष काम करूं लागला. विद्यार्थीकाँग्रेसच्या कामांत त्यानें पुष्कळच भाग घेतला. मध्यप्रदेश विद्यार्थी-काँग्रेस अध्यक्ष, अखिल भारतीय विद्यार्थी काँग्रेसचा खजिनदार, प्रागला आंतर-राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसचा प्रतिनिधि या नात्यानें त्यानें बरेंच काम केलें. युवक काँग्रेस संघटित करण्यांत त्याचा बराच हात होता. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें एक युवक मंडळ रशियाला पाठविलें. त्याचें नेतृत्व रामनेंच केलें होतें. आतां तो वर्ल्ड असेंब्ली ऑफ यूथच्या भारतीय समितीचा अध्यक्ष

आहे. या संस्थेतर्फे अमेरिकेला गेलेल्या दुसऱ्या एका युवक-मंडळाचाहि तो नेता होता. या दौऱ्यांच्या निमित्तानें जो अनुभव मिळाला त्याच्या आधारें त्यानें जपान, रशिया आणि अमेरिका यांच्यावर पुस्तकेंहि लिहिलीं आहेत.

त्याच्या लग्नाचीं बोलणीं जमनालालजींसमोरच चालत असत. पण त्यावेळीं त्याचें वय एकोणीस वर्षांचें होतें. त्यामुळें इतक्या लवकर लग्न करणें आम्हांला पसंत नव्हतें. जेव्हां तो तुरुंगांतून सुटला तेव्हां पुन्हा बोलणीं सुरू झालीं. जाती-बाहेरची चांगली मुलगी मिळाली तर पहिल्यानें अन्यजातिविवाह व्हावा असेंच घरांतलें वातावरण होतें. बोलणीं सुरूं झालीं पण मला मात्र वाटत होतें कीं जातींतली मुलगी आली तर बरें. बोलणीं झाली पण शेवटीं त्याचें लग्न सावित्रीची बहीण विमला हिच्याशींच ठरलें. या लग्नासंबंधाच्या बाबतींत सावित्री अगदींच तटस्थ राहिली. दोघाहि भावांनींच निर्णय घेतला आणि विवाहहि वडिलांची इच्छा होती तसाच झाला.

तसा विमलाला जमनालालजींचा आशीर्वाद तर मिळालेलाच होता. सावित्रीचें लग्न झाल्यावर ते तिला आपल्याबरोबर वर्ध्याला घेऊन आले होते. त्यावेळीं तिचें वय सुमारें दहा वर्षांचें असावें. पण तिच्या बुद्धिमत्तेवर ते फार खूष होते. ते म्हणत, मुलगी फार हुषार आहे. तेव्हां ती त्यांच्याबरोबर पत्ते खेळायची, गप्पा करायची. तेवढ्यावरून पारख करून ते बोलले असावेत. त्यांच्या डायरींतहि याचा उल्लेख सांपडतो. तिच्या या घरांत येण्यामुळें दोघाहि भावांतला जिव्हाळा इतका वाढला कीं जो आजकाल दुर्मिळ आहे. मला तर असें वाटतें कीं जमनालालजींचे आणि इतर वडीलजनांचे आशीर्वाद आणि ईश्वराची कृपा यामुळेंच घरांत सगळ्यांचे ऋणानुबंध इतके चांगले झाले आणि त्यांना जोडीदारहि परस्परपूरक मिळाले.

राममध्यें आज देखील आपल्या वडीलजनांबद्दल श्रद्धा आहे आणि तो अगदीं त्यांच्या शिस्तींत वागतो. कष्टाळूपणा, कामाची एकाग्रता आणि व्यवस्थितपणा यांच्यामुळें त्याच्यावर व्यापाराचा भार असूनदेखील जमनालाल-जींच्या पत्रांचें संकलन करण्यांत आणि त्यांच्या डायऱ्या नीट करण्यांत तो आपला वेळ देत असतो. 'पांचवे पुत्र को बापूके आशीर्वाद' या पुस्तकाच्या कामीं त्यानें खूपच श्रम घेतले. मुलांना नेहमीं आपल्या वडिलांच्या कीर्तीचें आणि कार्याचें भान असतें, हीच माझ्या बाबतींत विशेष संतोषाची गोष्ट.

## ४१. माझे हाल

जमनालालजींचा कान दुखत असायचा. पुष्कळ उपाय करून पाहिले पण कांहींच फायदा झाला नाहीं. याची माझ्याहि मनाला काळजी लागून राहिली होती. त्यांत त्यांची प्रकृति ठीक नसूनहि ते सारखे कामांत गढलेले राहात या विवंचनेचीहि भर. माझ्या सांगण्याचा कांहींच परिणाम नव्हता. ते घरीं असले कीं येणारांची रीघ लागलेली असायची. त्या लोकांचें आगतस्वागत, व्यवस्था आणि कामांविषयींच्या गोष्टी होतच राहात. जमनालालजींना अतिथिसत्कारांत आणि सार्वजनिक कामांतच आनंद आणि सुख वाटत असे. बाहेर जात तेव्हां-देखील कार्याविषयीं आणि कार्यकर्त्यांच्याबरोबर बोलणीं करण्यांत गुंतलेले असत. मोटारींत वा आगगाडींत असो, सारख्या कामाच्याच गोष्टी चाललेल्या. मला वाटायचें कीं त्यांनीं थोडा विसावा घ्यावा. पण त्यांच्या गोष्टी कुठल्या थांबतात? शेवटीं ते इतके थकून जात कीं मला देखील त्यांच्याशीं बोलायचें म्हटलें कीं त्यांची दया यायची. मनांतून राग तर येत होता पण मी करणार काय होत्यें? अतिप्रेमाच्या या द्विधा अवस्थेंत माझी शरीरप्रकृति बिघडूं लागली आणि कमजोर मन चिडचिडें बनूं लागलें. प्रत्येक बाबतींत बोलण्याच्या ऐवजीं रडूं यायचें.

मला वाटायचें, त्यांना विश्रांति मिळावी आणि मला त्यांची सेवा करण्याची थोडी संधि मिळावी. पण असें कांहीं जमेचना. याचें मुख्य कारण होतें सार्व-जनिक कामें, पाहुण्यांचें येणेंजाणें आणि सेक्रेटरी आणि नोकरांचें डोकें उठवणें. मला वाटूं लागलें कीं याच गोष्टींमुळें त्यांना विसावा मिळत नाहीं आणि त्यांची सेवा करण्यापासून मी वंचित राहत्यें. माणूस मोहामुळें काय काय मनांत आणीत नाहीं? त्यांना व्यग्र आणि बेजार करणाऱ्या या सर्वच गोष्टींवर मी चिडूं लागल्यें. त्यांनीं एकाद्या सार्वजनिक कार्याची गोष्ट काढली किंवा दौऱ्यांत मला बरोबर यायला सांगितलें कीं माझा पारा चढायचा. दिवस जाऊं लागले तसतशी आमच्यामधली ही रस्सीखेंच वाढत चालली. आम्हां दोघांत ही रस्सी-खेंच कां चालली आहे हें त्यांना चांगलें माहीत होतें. आणि आपल्यापरीनें समाधान निर्माण करण्याचा ते मनापासून प्रयत्नहि करीत होते. पण त्यांचें जीवन संपूर्णतया सार्वजनिक होऊन बसलें होतें. त्यांतून इच्छा असली तरी-

देखील त्यांना सुटणें कसें शक्य होतें ? त्यांत ते केव्हांच नखशिखान्त बुडाले होते. त्यांचा स्वभाव आणि आवड लक्षांत घेऊन त्यांना साथ देणें आणि त्यांच्या आनंदांत आपण आनंद मानणें हें आतां माझेंच काम होतें. असें घडतें तर त्यांच्या मनावर माझ्या असमाधानाचा भार राहिला नसता. त्यांनीं सार्वजनिक कामें केलीं तर माझी आडकाठी होती थोडीच ! तसें पाहिलें तर मलाहि सार्वजनिक कार्याची आवड होती. तरीदेखील मला वाटत होतें कीं शरिराचीदेखील शुद्ध राहणार नाहीं इतकें त्यांत त्यांनीं गढूं नये.

त्यांना चणे, भुइमूग, कच्चा मका वगैरे आवडत असत. श्रीलक्ष्मीनारायण-मंदिरांत प्रतिवर्ष उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं तळलेले काबुली चणे प्रसाद म्हणून वांटले जात. प्रसाद घेण्यासाठीं फारच गर्दी व्हायची. ते लागायचे फार रुचकर. एके वर्षी उत्सवाच्या वेळीं जमनालालजी बाहेरगांवीं गेलेले होते. म्हणून त्यांच्यासाठीं कांहीं चणे मी सांभाळून ठेवले. मीं मनांत योजलें होतें कीं तें एकटे भेटतील तेव्हां मी ते त्यांना खावबीन. एकटयानें एकादा पदार्थ खाणें त्यांना विषवत् वाटे. सगळयांना खाऊं घालणें आणि सगळयांबरोबर खाणें यांतच त्यांना सुख मिळे. वारंवार मी ते चणे टोपलींत लपवून घेऊन जायचीं. पण ते कधीं एकांतात सांपडतच नसत. चणे घेऊन समोर गेल्यें कीं ते कांहीं ना कांहीं कामच सांगत असायचे. कुणाला सेवाग्राम दाखवायचें आहे, कुणाला चहा पाजायचा आहे, कुणाला मोरी दाखवायची आहे तर कुणासाठीं दुसरी कांहीं व्यवस्था करायची आहे. मी रडकुंडीला येत असें, पण करणार होत्यें काय ? एक दिवस ते जेवण आटोपून उठले. कुणी सुपारी खाण्यांत गुंतले होते तर कुणी जायला निघाले होते. जमनालालजी व्हरांड्यांतून जात आहेत असें पाहून मी चणे त्यांच्यापुढें केले. त्यांनीं कांहीं खाल्लें तर मला संतोष होतो हें ते जाणत होते. पण त्यांनी थांबावें तरी कसें ? पुढेंहि कांहीं लोक होते आणि मागेंहि कांहीं लोक होते. त्यांनीं चणे घेतले आणि त्यांचा फांका मारला. आतां त्यांची मोठीच कुचंबणा झाली. चोळणें आणि चावणें एकाच वेळीं कसें व्हावें ? त्यांनीं ते सारे चणे गिळून टाकले. त्याचा त्यांना थोडा त्रासहि झाला. त्यांची ती स्थिति पाहून मला अधिकच दु:ख झालें.

अशा तऱ्हेनें माझी अशांति वाढत गेली. लहानमोठ्या गोष्टीवरून असंतोषांत भरच पडत गेली. आणि मी चिडचिडी बनत गेल्यें. माझा स्वभाव चिडचिडा

बनवण्यांत नोकरांनींहि हातभार लावला. जमनालालजींना राजी राखण्या-साठीं ते सारखी धांवपळ करीत, पण मी कांहीं सांगितलें कीं तिकडे काणाडोळा करीत. जमनालालजी नाना प्रकारांनी नोकरांना खूप ठेवीत आणि त्यांना घरच्यासारखे वागवीत. ते म्हणत कीं नोकर ठेवायचे असतील तर त्यांना चांगल्या रीतीनें सांभाळा नाहींतर नोकरांशिवाय कामें करा. नोकरांशीं कोण-त्याहि प्रकारचा अन्याय केलेला त्यांना खपत नसे. त्यांच्या बाबतींत ते फार उदार असत. नोकरांशिवाय कामें रेटणें शक्य नव्हतें आणि नोकर माझ्या सांगण्याप्रमाणें वागतील हेंहि संभवनीय नव्हतें. अशा प्रकारें नोकरांवरूनहि मनाला क्लेशच होत राहिले.

जमनालालजींच्या सेक्रेटरींचा थाट तर यापेक्षांहि वरचढ असे. ते नेहमीं नवनव्या तरुणांना सेक्रेटरी बनवीत, व्यवहाराच्या गोष्टी शिकवीत, त्यांच्या गरजांकडे लक्ष देत. पण जमनालालजींचा व्याप पाहून या तरुणांनाहि व्यापार करून पैसा कमावण्याची इच्छा होत असे. त्यांच्या मनांतली ही इच्छा लक्षांत घेऊन जमनालालजीदेखील दोनतीन वर्षानंतर आपल्या सेक्रेटरीला एकाद्या चांगल्या जागीं लावून देत. कॉलेजमधून निघालेल्या त्या तरुणांची बुद्धि तल्लख तर होतीच पण त्यांना व्यवहाराचा अनुभव नसे. त्यामुळें त्यांना व्यवहार-चातुर्य आणि कामकाज शिकविण्यांत जमनालालजींचें डोकें खलास व्हायचें. त्यांच्याजवळ शिकून तयार झालेल्या मंडळीला मोठ्या जागांवर ठेवलें जात होतेंहि. काम शिकून तयार झालेलीं हुपार माणसें आपल्याला हवींत अशी त्यांच्या मित्रांची मागणीहि असे. 'लाओजी, तुम ऐसा नर, पीर, बबर्जी-भिश्ती, खर" (असा माणूस पाठव कीं जो होईल पीर, बबर्जी, भिश्ती गाढव) अशी मागणी त्यांच्याजवळ सदासर्वकाळ खडी असायची. अशा वेळीं ते आपल्या सेक्रेटरीला देऊन टाकीत आणि स्वतःसाठीं नवे रिक्रूट शोधूं लागत. अशा रीतीनें दर दुसऱ्या तिसऱ्या वर्षी त्यांचे सेक्रेटरी बदलले जात. नव्या माणसांना काम समजे-पर्यंत थोडा उशीर लागायचाच.

ते कोणाहि माणसाला ठेवून घेण्याच्या वेळीं त्याच्यासाठीं 'पीर, बबर्जी, भिश्ती, खर' तयार ठेवीत असत. ते आधींच सांगून ठेवीत कीं कोणत्याहि वेळीं कसलेंहि काम त्यांना सांगितलें जाईल. आरंभीं उत्साहाच्या आणि आवडीच्या भरांत प्रत्येक माणूस त्यांच्या म्हणण्याला कबूल व्हायचा आणि

त्यांच्या असाधारण प्रेमामुळें त्यांचे सेक्रेटरीदेखील त्यांचें काम मन लावून करीत.

अशा तऱ्हेनें कित्येक सेक्रेटरी आले आणि गेले. त्यांतले कित्येक तर आज मोठमोठ्या जागांवर आहेत आणि चांगलें काम करीत आहेत. पण त्यांतले थोडे असेहि निघाले कीं ज्यांच्यामुळें नंतर जमनालालजींना आणि आम्हां सर्वांना पुष्कळच उपद्रव झाला. त्यांनीं आपणाला मिळालेल्या संधींचा दुरुपयोग केला. या सेक्रेटरींच्यामधें मलाहि राहावें लागे. माझ्या स्वभावामुळें कित्येक सेक्रेटरींशीं माझें जमत नसे. कारण जमनालालजी त्यांना पुष्कळ स्वातंत्र्य देत पण माझ्यामुळें त्यांच्यावर घरच्या गोष्टींत आणि व्यवहारांत कांहीं बोल येत असे. या रिक्रूट सेक्रेटरीशीं व्यवहार करतांना माझी मोठी अडचणहि होत असे. जमनालालजी प्रत्येकाची पाठ थोपटून आणि त्याचा गुण शोधून काढून त्याच्याकडून काम घेत असत पण मला त्यांच्यांत खोटेपणा आणि उणीवाच दिसत आणि त्यांचें कोणतेच काम पसंतीला येत नसे. प्रत्येक कामांत मी खोडच काढायचीं. शेवटीं जमनालालजींनीं अशी तोड काढली कीं जो कोणी नवा माणूस येईल तो त्यांनीं माझ्याकडे पाठवावा आणि तो माझ्या पसंतीला उतरला तरच मान्य केला जावा. माझी कसोटी कितीतरी कडक असे. कुणी म्हणालें कीं तो बी. ए. पास आहे तर मी त्याला सेक्रेटरीसाठीं नापास ठरवायचीं. जरी अविवाहित असला तरीहि तो नापास व्हायचा. कारण त्याचा कान बायकोनें धरलेला नसेल तर तो आमचे कान पकडायचा.

जमनालालजींचें सेक्रेटरीला बजावणें असे कीं पाहुण्यांकडे संपूर्ण लक्ष दिलें पाहिजे. त्यांची कसलीच गैरसोय होतां कामा नये. एकदां कुणीसें सांगितलें कीं पाहुणपुऱ्यांत दुधाचे पेले भरभरून पिण्यांत येतात. मालीशहि चालतें. फळांचीहि चंगळ आहे. जमनालालजी म्हणाले, 'बाबा, जातें तें पोटांतच जातें ना? एकाद्याची प्रकृति सुधारली तर ती आनंदाची गोष्ट आहे.'

दामोदरजी जमनालालजींचे शेवटचे सेक्रेटरी होते. मीरा आणि दामोदरजींचा मला परिचय करून देत जमनालालजी म्हणाले कीं हें दांपत्य मोठें सेवाभावी आणि भाविक आहे. आपण ठेवून घेण्यालायक आहे. तुझ्या कसोटीला उतरून आपल्याजवळ टिकण्यासारखें आहे.

आणि खरोखरच दामोदरजींनीं जमनालालजींवर चांगलाच प्रभाव टाकला आणि त्यांचें मन असें कांहीं जिंकलें कीं मला ते सवतीसारखे वाटूं लागले. ते

पाहुण्यांशीं फारच प्रेमानें वागत. साऱ्यांच्या साऱ्या गरजा पुऱ्या करण्यांत मग्न असत आणि समभावानें वागण्याच्या उत्साहांत खर्चाचें भान ठेवीत नसत. पाहुण्यांना घरींच असल्यासारखें वाटावें, त्यांना कशाची उणीव भासूं नये, याचेंहि तें पुरतें भान ठेवीत. माझ्या दृष्टीनें हा नष्टखर्च होता पण मन मारून मी तें सहन करीत असें; कारण तेहि आपल्या सवयीचे गुलाम होते.

सेक्रेटरी आणि नोकर यांच्यामुळें मला जो त्रास होई त्याला विनोदाचें रूप देऊन मी तो सहन करण्याचा प्रयत्न करीत असें. तो कितपत सफल झाला देव जाणे, पण मी आपली आपल्याशींच गुणगुणत असायचीं.

राज सिकरेटरियों का भारी, राज सरवंटोंका भारी।
राज सरवंटों का भारी।
कहने को तो राज हमारा, बात चले भारी।।
सिकरेटरि इक जाय दूसरा तुरत यहां आवे
दूसरा तुरत यहां आवे
नींद तजे पर दूध सुबह धारोषण पा जावे, राज सरवटों का भारी।।
मंत्रीपद यह बना, द्रौपदी चीड बडा भारी।
द्रौपदी चीड बडा भारी।
जादूटोना करो सिलसिला रहे सदा जारी
राज सरवंटो का भारी।
राज सिकरेटरियों का भारी।।

●

## ४२. *पंगतीची रंगत*

बापूजी वर्ध्याला आल्यानंतर तेथें पुढाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची ये-जा वाढत गेली. मुंबई-कॉंग्रेसमध्यें बापूजी कॉंग्रेसमधून बाहेर पडले आणि त्यांनीं वर्ध्याला राहून 'ग्रामोद्योग-संघाची स्थापना केली. कन्याश्रम सोडून बापू मगनवाडींत राहूं लागले. नंतर सेवाग्रामला गेले. पण कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठका बहुधा बजाजवाडीलाच (वर्धा) होत असत. रचनात्मक कामाचीं

अन्य सभासंमेलनें वगैरेहि वर्ध्याला होतच असत. बापूजींना आणि जमनालाल-जींना भेटा-बिटायला येणाऱ्यांचीहि रीघ असे. देशीविदेशी प्रवासी, पत्रकार, पुढारी आणि कार्यकर्ते यांच्या आगमनानें बजाजवाडी फुललेली असे. लोकांचा मेळावा सदाचाच असायचा. त्यामुळें पाहुणपुरा वाढवावा लागला. आणखी घरें बांधावीं लागलीं. भोजनालयाची व्यवस्था वाढवावी लागली. देशाच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांपासून राजेमहाराजे आणि सामान्य कार्यकर्ते यांच्यापर्यंत सगळेच वर्ध्याला येत आणि बजाजवाडींत मुक्काम करीत. कधीं कुणी ओळखीचा असायचा तर कधीं अनोळखी देखील. कुणी कांहीं कामासाठीं आलेला तर कुणी केवळ यात्रेच्या हेतूनें आलेला. एकाद्या काळजींत सापडलेल्याला टांगेवालेच बजाजवाडीला घेऊन येत. खादी वापरणाऱ्याला किंवा कोणत्याहि सार्वजनिक कार्यकर्त्याला बजाजवाडी ही जणु धर्मशाळा झाली होती ! पण येणारा कोणीहि असो, जमनालालजी सगळ्यांच्या सुखसोयींचें सारखेंच भान ठेवीत. त्यांनीं आपल्या मुलाबाळांना, सेक्रेटरींना आणि नोकराचाकरांना सगळ्यांची संपूर्ण व्यवस्था ठेवण्याबद्दल पूर्वसूचना दिलेलीच असे. तरीदेखील सारी व्यवस्था स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून घेईपर्यंत त्यांना संतोष नसे. ते प्रत्येकाच्या आवडीचें जेवण करायला लावीत आणि त्यांच्या सुखसोयींकडे पुरतें लक्ष ठेवीत.

सरोजिनी नायडूंना तळलेली हिरवी मिरची आवडायची. राजाजींना रसम्, मौलाना आझादना जाड पोळी, जवाहरलालजींना बटाटा, सुकी रोटी आणि लोणी, कृपलानींना गरम सूप आणि त्यांत लोणी किंवा क्रीम, खानसाहेबांना खिचडींत गरम गरम उकळतें तूप, पट्टाभींना जेवणाच्या शेवटीं दहींभात, जयरामदास दौलतरामना उकडलेली भाजी, शंकरराव देवांना ताकभात, गोविंदवल्लभ पंतांना दाळीच्या आमटींत तूप, आणि यांशिवाय वेगवेगळे नियम आणि व्रतें पाळणाऱ्या लोकांच्या आवडी आणि गरजा या सगळ्यांची जमनालालजी पुरती आठवण ठेवीत. पुढें पुढें त्यांनीं अशी कांहीं व्यवस्था लावून दिली कीं ते वर्ध्याला नसले तरीदेखील असल्या सगळ्या गोष्टींची पुरी दक्षता घेतली जात असे.

बंगल्यावरची भोजनाची पंगत तर अजबच असे. मोठ्यांतल्या मोठ्या पुढाऱ्यापासून सामान्यांतल्या सामान्य कार्यकर्त्यापर्यंत सारे एकाच पंगतींत बसून भोजन करीत. त्यांत कसल्याहि प्रकारचा भेदभाव पाळला जात नसे.

घरचे नोकर, सेक्रेटरी, लेकलेकी, जांवई वगैरे जेवण वाढीत असत.

काँग्रेस कार्यकारिणीच्या डोकें उठवणाऱ्या गंभीर चर्चानंतर पंगतींतलें वातावरण थट्टा, उपहास, चुटके आणि हास्यकल्लोळ यांनीं दुमदुमून जात असे. घंटा वाजल्यावर पंगत बसे. पण कधीं बैठक लवकर संपे आणि गमतीनें सरदार पटेल, किंवा कृपलानी किंवा जवाहरलालजी पंगतींत आधीं पोंचत आणि चमच्यानें समोरची थाळी वाजवू लागत ! पंगतींत बसतांच कधीं महादेवभाई हळूच म्हणत, 'अरे बाबा, उशीर असेल तर आधीं पापडच वाढ ना ?' तेव्हां सरदार पटेल दुसऱ्या कोपऱ्यातून गंभीर आवाजांत म्हणत,'अरे महादेव, हा मारवाड्याचा भटारखाना आहे. पापड सांभाळून माग बाबा ! पापड आला कीं भोजन खलास !'

अशा प्रकारें एकदां घनश्यामदासजी बिडलांनीं जेवणाच्या वेळीं विचारलें, 'आज 'मेनू' काय आहे ?' जवळच बसलेले हरीभाऊ म्हणाले, 'आज तर राबडी तयार झालेली दिसते !'

घनश्यामदासजी चाखीत चाखीत म्हणाले, ' आपण तर काँग्रेसच्या खजिन-दाराकडे दुधाच्या रबडीची आशा बाळगली होती पण ही तर निघाली ताकाची रावडी ! काय हरिभाऊजी, तुमचें वजन वाढू शकत नाहीं हें या असल्याच खाण्यामुळें असें दिसतें !'

सुभाषबाबू जेव्हां काँग्रेसमधून बाहेर पडले तेव्हां वर्ध्याला दुसरीकडे उतरूं लागले. पण त्यांचा नोकर जेवायला बजाजवाडीलाच येत असे. त्याला भातांत लोणी लागायचें. सरदार पटेल त्याला पाहून म्हणत, 'याच्या मालकानें काँग्रेस खुशाल सोडलेली असो, हा नाहीं सोडायचा. याला भातांत लोणी लागतं ना !'

अशा प्रकारच्या थट्टाविनोदाचें वातावरण जेवणाच्या वेळीं निर्माण व्हायचें.

याच पंगतींत मुलांबाळांचें नामकरण, कुणाचा वाङ्निश्चय, एकाद्या मुलासाठीं मुलगी शोधणें, एकाद्या मुलीसाठीं मुलाचा तपास वगैरे कामेंहि होत. मदालसेच्या थोरल्या मुलाचें 'भरत' हें नांव असें पंगतींतच ठेवलें गेलें.

जमनालालजींच्या डायरींत लग्नाच्या उमेदवार मुलामुलींचीं नांवें लिहिलेलीं असत. एक दिवस सरदार पटेल जेवायला जरा आधीं येऊन पोंचले होते. जमनालालजींच्या खोलींत त्यांची डायरी ठेवलेली होती. सरदारांनीं ती उलटून पाहिली आणि लग्नाच्या उमेदवारांच्या यादींत मुकाट्यानें आपलें नांव लिहून

टाकलें ! नंतर जेव्हां त्यावर जमनालालजींची नजर गेली तेव्हां एक दिवस पंगतींत ते साळसूदपणें म्हणाले, 'आज एका उमेदवारासाठीं आपणां सर्वांना मुलगी हुडकायची आहे !' जेव्हां जमनालालजींनीं सरदारांचें नांव सांगितलें तेव्हां हास्याचा एकच जल्लोश झाला ! इतक्यांत एका पुढाऱ्यानें म्हटलें, 'आधीं यांची मुलगी मणिबेन हिच्यासाठीं मुलगा शोधा, आणि मग यांच्यासाठीं मुलगी !' जमनालालजी म्हणाले, 'मुलगा काय, सहज मिळेल. पण मुलगा दुसऱ्याच दिवशीं रुळावर जाऊन झोपेल !" समोर रूळ दिसतच होते. त्यामुळें हें वाक्य ऐकून मोठाच हंशा पिकला.

पंगतींत वाढण्याचे नियमहि करण्यांत आले होते. वाढणाऱ्यांना बजावून ठेवलेलें असे कीं जेवणाऱ्याला मागावें लागूं नये आणि वाढणाऱ्यांना जेवणारांना विचारावें लागूं नये आणि वाढणें चालू राहावें. इतकें झाल्यानंतर देखील जर कुणी कांहीं पानांत टाकलें तर जमनालालजी लगेच सांगत, 'आज फलाण्या थाळींत जेवणाऱ्यावर आणि वाढणाऱ्यावर एक एक रुपया दंड बसवला गेला आहे.' एकाद् दुसरा पुढारी किंवा मूल ताटांतल्या उष्टया पदार्थांवर वाटी उलटी झांकून ठेवी. जमनालालजींच्या नजरेंतून हें सुटत नसे आणि ते वाटी उलटी करायला सांगत. त्यांत उष्टें दिसलें तर दुप्पट दंड जाहीर होई. दंड देण्याघेण्याचें जाऊं द्या, त्यामुळें थट्टाविनोदाचें वातावरण पैदा होई आणि दिवसभराचा डोक्याचा शिणवटा दूर होण्याबरोबर पानांत टाकून देण्याची संवय सुटावी, असाहि त्यांचा प्रयत्न असे.

आरंभाआरंभाला जमनालालजींना पैजा लावून जेवायला लावण्याचा षोक असे. बागेंत संत्र्याच्या झाडांखालीं बसून पैज लावून शेंकडो संत्रीं ते अशा रीतीनें खायला लावीत. असेंच आंब्याच्या दिवसांत ते आंबे खाववीत. वर्ध्याला मोसमांत हुरडा भाजून खाण्यांत येई. मोसमांत कित्येकदां याचा फड पडे. त्यांतहि पैजा लागत. अशाच प्रकारें कच्च्या ज्वारीचा शिरा, त्याचेच दहींवडे, वांग्याचें भरीत, कच्चा मुळा, पेरू आणि तीळ यांची चटणी वगैरेबाबतहि चाले. हें सारें ज्वारीच्या दांड्यापासून बनवलेलें असे; चमच्यांनीं खाल्लें जायचें. अशा रीतीनें पंगतीची रंगत जमायची.

भोजनोत्तर मधल्या दालनांत बैठक जमे. मोठमोठे लोक मुलांचे खेळ खेळत. जवाहरलालजी घोडा बनत; सरोजिनी नायडू स्वार बनत. पण त्यांना आपला

भरभक्कम देह सांभाळतां येत नसे. दोन दोन माणसें हात धरून त्यांना बसवीत, पण हंसण्यामुळें त्या अधिकच वांकायच्या. बॅरिस्टर असफअल्ली सर्कशींतल्या-सारखी वाकबगारी दाखवीत. राजाजी आगपेटी घेऊन मुलांचे खेळ दाखवीत.

राजेंद्रबाबूंची दम्याची तक्रार असे. त्यांना या खेळांत भाग घेतां येत नसे. म्हणून जमनालालजी त्यांच्या खोलींत जाऊन बुद्धिबळें लावीत बसत. ––पण पाहतां पाहतां सगळीं दृश्यें आणि त्यांची रंगत ही आतां स्वप्नांतली गोष्ट होऊन गेली !

●

## ४३. *गोसेवा*

वैयक्तिक सत्याग्रहांत भाग घेणारांना जेलमधून सुटतांच पुन्हा जेलमध्यें जाणें आवश्यक होतें. पण आजारी माणसाला सत्याग्रहांत भाग घेतां येत नसे. या सत्याग्रहांत पहिले सत्याग्रही म्हणून विनोबाजींना निवडण्यांत आलें होतें. यानंतर एकामागून एक असे अनेक लोक तुरुंगांत जाऊं लागले.

जमनालालजींची प्रकृति बरी न राहिल्यामुळें त्यांना एक महिना आधींच सरकारनें सोडून दिलें. बापूजींनी त्यांना विश्रांति घ्यायला सांगितलें. पण ते म्हणाले, 'मला काम केल्याशिवाय कसें राहतां येईल ? मला कोणत्या ना कोणता कामांत गर्क झालेंच पाहिजे.' बापूजींनीं सांगितलें कीं निदान जेलचा अवधि संपेपर्यंत आपण जेलमधेंच आहोंत असें समजून विश्रांति घ्या. मुदत संपल्यावर कामाबद्दल विचार करूं. यानंतर बापूंनीं त्यांना सिमल्याला राज-कुमारी अमृतकौरकडे पाठविलें. त्यांचा बंगला फार मोठा आहे. त्यांत त्यांच्या कुटुंबांतलीं पांच माणसें राहात. एक कुत्राहि होता आणि नोकर होते पस्तीस ! एकाद्याच्या मुलाचें देखील होणें कठीण असें तेथें त्या कुत्र्याचें लालनपालन होत असे. राजकुमारी जमनालालजींची खूप काळजी घेत. त्यांना विश्रांति मिळावी म्हणून त्यांनीं जरूरीपेक्षां अधिक व्यवस्था ठेवली होती. पण राज-कुमारींवर आपल्यामुळें भार पडतो याचा जमनालालजींना संकोच होऊं लागला. त्या हरतऱ्हेनें त्यांना आराम मिळावा म्हणून खटपट करीत होत्या आणि खूप

काळजी घेत होत्या. पण जमनालालजींचें मन तेथें लागेना. कसेवसें मोठ्या मुष्किलीनें त्यांनीं पंधरा दिवस काढले. पण जेलचा अवधि संपायला अजून पंधरा दिवस बाकी होते.

जमनालालजीनीं तेथून बापूंकडे आपली इच्छा व्यक्त केली कीं आपल्याला आपल्या मांडीवर झोपवूं शकेल अशी आध्यात्मिक आई हवी आहे! गोष्ट मोठी विचित्र होती! इतर सारें मिळूं शकतें पण अशी आई का कुठें मिळूं शकते? बापू म्हणाले, पहाडासारख्या मुलाला मांडीवर झोपवणारी आई कुठें मिळणार? तरीहि बापूंनीं त्यांना लिहिलें कीं सिमल्याहून परततांना डेहराडूनला कमला नेहरूंच्या गुरुमाउली आनंदमयींना भेटून यावें. जमनालालजी येतांना तिकडे गेले. गेले होते दोन तासांसाठींच पण राहिले पंधरा दिवस! तेथें त्यांचें मन रमलें. तेथील वातावरणानें ते फार प्रभावित झाले. माता आनंदमयींच्याजवळ त्यांना शांति आणि प्रसन्नता यांचा प्रत्यय आला. त्यांची चर्चा अत्यंत सात्त्विक, प्रसन्न आणि तेजस्वी असे. तेथील धार्मिक आणि भक्तिमय वातावरणांत जमनालालजींनीं आपल्या स्वभावानुसार कर्मयोगाचें काम सुरू केलें. माता आनंदमयींशीं त्यांनीं चर्चा केली कीं धार्मिक कार्याबरोबर विधायक कार्य चाललें तर फार चांगलें. माताजींनीं हें मान्य केलें. मग काय? लगेच तेथें हिंदीचे वर्ग, खादीचें काम, चरखा वगैरे कामें सुरू करून देण्यांत आलीं.

माता आनंदमयीकडे प्रत्येक भक्त एकांतांत आपलें आत्मनिवेदन करीत असे. एक दिवस जमनालालजींनींहि वेळ मागून घेतला. ते म्हणाले, "मातुःश्री, मला आपल्या मांडीवर झोंपतां येईल काय?" माता आनंदमयी म्हणाल्या, "आईच्या मांडीवर झोपायला काय हरकत आहे?" बस्स. जमनालालजी डोळे मिटून माताजींच्या मांडीवर असे झोपीं गेले की जणूं प्रेत पडलें आहे! थोड्या वेळानें डोळे उघडून त्यांनीं म्हटलें, 'या वेळीं माझे प्राणहि निघून गेले तरी चालेल, आतां माझें मन कशांतच राहिलें नाहीं.'' यांची आध्यात्मिक आईची भूक आनंदमयींच्या मांडीवर झोपल्यानें पूर्ण झाली. जमनालालजींनीं माताजींकडे तीन गोष्टी मागितल्या.

(१) माझी अशी इच्छा आहे कीं आश्रमाजवळ जमीन घेऊन तेथें घर बांधावें म्हणजे एकाद्या कार्यकर्त्याला विश्रांति आणि मानसिक शांति मिळवावी असें वाटलें तर तेथें पाठवतां यावें.

(२) मला 'शेठजी' अशा नांवानें संबोधलें जाऊं नये. एकादें लहानसें नांव असावें.

(३) माझा मृत्यु केव्हां होईल हें सांगाल तेव्हांच मी फराळ करीन.

पहिल्या गोष्टीला रुकार देणें सोपें होतें. दुसऱ्या गोष्टीच्या मागणीपायीं माताजींनीं 'भय्या' शब्द निवडला. पण तिसरी मागणी मोठी कठीण होती. माताजी म्हणाल्या, 'मृत्यूची वेळ कुणालाच सांगतां येत नाहीं. एक गोष्ट खरी आहे कीं क्षणोक्षण मृत्यु शिरावर उभा आहे हें माणसानें ओळखलें पाहिजे.'' पण एवढ्यानें जमनालालजींचें समाधान झालें नाहीं. ते म्हणाले, 'हें ठीक आहे. पण वेळ सांगा ना!' अखेर माताजींनीं सांगितलें, "सहा महिन्यांच्या तयारीनें काम करा." या वचनावर जमनालालजींची दृढ श्रद्धा बसली असें वाटतें. सहा महिनेपर्यंत वर्धा सोडायचें नाहीं, आगगाडींत वा मोटारींत बसायचें नाहीं असें त्यांच्या रोजनिशींत लिहिलेलें आढळतें. हा निर्णय त्यांनीं १५ ऑगस्ट १९४१ ते १५ फेब्रुवारी १९४२ पर्यंत म्हणून घेतला होता.

या दिवसांत त्यांचें आत्ममंथन मोठ्या वेगानें चाललें होतें. त्यांनी व्यापारातून आणि इतर कामांतून अंग काढून घेतलें आणि आपल्या व्यापारी बुद्धिनुसार असा हिशेब बसवला कीं या सहा महिन्यांत जावें लागलें तर त्याची तयारी असावी. अशी साधना करावी कीं जास्तींत जास्त वेळ पारमार्थिक कामांत आणि चित्तशुद्धींत जाईल. आणि जर पुढें राहावें लागलें तर सवयी सुधारल्या जाव्या. त्यासाठीं घरसंसारांतून निवृत्त होऊन त्यांनीं जीवन अशा कामांत गुंतवलें कीं आपला आत्मीय भाव मुक्या प्राण्यांपर्यंत वाढेल. म्हणूनच त्यांनीं गोसेवेचें काम निवडलें. मानवसेवेंत कुठें ना कुठें कांहीं ना कांहीं संघर्ष होऊं शकतो. जमनालालजी संपूर्ण चित्तशुद्धींत तन्मय झाले. प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करण्याच्या प्रयत्नाला ते लागले.

आपली जन्मतिथि आली कीं ते आपल्या मागील सालाचा आढावा घेत आणि नव्या वर्षांत पदार्पण करतांना मंगल संकल्प करीत. हे संकल्प पुरे व्हावे म्हणून पहाटेच्या प्रार्थनेनंतर गुरुजनांचे आशीर्वाद घेत, आणि त्यानंतर न्यहारी करीत.

बापूजीच्या सल्ल्यानें जमनालालजीनीं गोसेवेचें कार्य स्वत:साठीं पसंत केलें आणि गोसेवा-संघाची स्थापना करून ते त्या कामाला लागले. ते त्यांत

इतके तन्मय झाले कीं गोसेवेशिवाय त्यांना अन्य कांहीं सुचेचना. गोसेवा-संघाची स्थापना ऑक्टोबर १९४१ मध्यें झाली होती आणि त्याचे ते अध्यक्ष झाले होते. पण त्याची तयारी त्यांनीं त्या पूर्वींच करून ठेवली होती.

त्यांची इच्छा होती कीं आपलें उरलेलें जीवन प्राचीन ऋषींच्याप्रमाणें आपण झोंपडींत कंठावें. म्हणून गोपुरीजवळ एक झोंपडी त्यांना बांधायची होती. तेथें राहून त्यांना गोसेवेंत आणि आत्मचिंतनांत वेळ घालवायचा होता. त्यांनीं झोपडया बांधण्याचें काम सुरू करायला लावलें होतें आणि त्या शक्य तितक्या लवकर तयार व्हाव्या अशी ताकीद दिली होती.

रात्रीं लवकर उठण्याची त्यांची सवय होती. एक दिवस ते तीन वाजतां उठले आणि कंदील घेऊन शौचाला गेले. त्यांच्या हातांतून कंदील पडला आणि कांच फुटली. याचें त्यांना फार दु:ख झालें. त्यांनीं त्या दिवशीं आपल्या रोज-निशींत लिहिलें: 'माझ्याकडून दुसऱ्यांना त्रास होतो, माझा भार दुसऱ्यावर पडतो असा कसा मी माणूस?' या दिवसांत जमनालालजींना दुसऱ्यांचा विचार फार असे. कुणाचें थोडें देखील नुकसान झालेलें त्यांना सोसत नसे. जरादेखील चूक झाली तरी ती त्यांच्या मनाला फार लागून राही.

कशा-बशा अर्धवट बनलेल्या झोपडींत दुसऱ्याच दिवशीं ते राहायला गेले. त्यांना संपूर्ण एकान्त हवा होता. त्यामुळें भयानें मी देखील त्यांच्याजवळ राहायला गेल्यें नाहीं. कारण त्यांच्या खाण्यापिण्याची अथवा विश्रांतीची मीं काळजी केली कीं त्यांना त्रास होई. तिकडे त्यांनीं आपल्याजवळ कौसल्या नांवाची एक गाय बाळगली होती. तोंड व हात धुऊन ते तिची सेवा करीत, तिला गोंजारीत. मग ते आपल्या आईकडे जात आणि तिच्या मांडीवर डोकें ठेवून भजन ऐकत आणि डायरी लिहीत. त्यानंतर प्रार्थना करून हिंडायला जात. वाटेंत सगळ्यांना भेटत, सुखदु:खाची विचारपूस करीत आणि ज्याच्याशी विशेष बोलायचें असेल त्याला बरोबर घेत. अशा प्रकारें रात्रंदिवस जमनालाल-जींचें गोसेवेसंबंधींचें चिंतन चाले. कुणी व्यापाराची गोष्ट काढली तर म्हणत, 'माझ्याकडे व्यापाराच्या गोष्टी करूं नका.' झोपडीचें नांव 'जानकी-कुटिर' ठेवलें होतें.

दरम्यान जेव्हां राधाकृष्ण खादीच्या कामासाठीं सीकरला जायला निघाला तेव्हां मीहि त्याच्याबरोबर गेल्यें. वर्ध्यांतला जमनालालजींचा नवा जीवनक्रम

पाहून मन थोडें विषण्ण झालें होतें. मी त्यांच्या कामांत सहकार्य तर करूं शकत नव्हत्यें. म्हणून मनाला जरा विरंगुळा वाटावा या विचारानें मी सीकरला गेल्यें होत्यें.

कांही दिवसांनीं रामकृष्ण न्यायला आला. मी वर्ध्याला परतल्यें. मी परतल्यावर जमनालालजी खूप आनंदित झाले आणि हंसून म्हणाले, 'जानकीजी आल्या.' त्या दिवसांत जमनालालजी नेत्रयज्ञाच्या आणि गोसेवासंमेलनाच्या कामांत गर्क होते. मी बंगल्यावर राहूं लागल्यें. एक दिवस ते म्हणाले, "तुझ्या मनांत काय आहे ? बापूच्याजवळ सेवाग्रामला जायचें असेल तर तुला जातां येईल. झोपडींत यायचें असेल तर तिकडे चल." मी म्हणाल्यें, "मी झोपडींतच येईन." जमनालालजी म्हणाले, "मग आपलें सामान आणून ठेव टमटम्मधें.' माझ्या मनासारखें झालें होतें. तावडतोब बिस्तरा गुंडाळून तो मी टमटम्मध्यें ठेवला आणि गोपुरीला पोंचल्यें. आम्हां दोघांना तिकडे पांचच दिवस सोबतीनें राहतां आलें.

झोंपडींत पोंचल्यावर जमनालालजींना कसलाच त्रास होऊं नये किंवा अशांति वाटूं नये म्हणून मी संपूर्ण लक्ष देऊं लागल्यें. ते लवकर उठत पण माझी सवय जरा उशिरानें उठण्याची होती. त्यांनीं उठावें आणि मी झोंपून राहावें हें ठीक नाहीं या जाणिवेनें मला झोंप नीट लागत नसे. वारंवार मनांत यायचें, ते उठले तर नसतील ना ? तेव्हां मी त्यांना सांगितलें, तुम्हीं उठाल तेव्हां मलाहि उठवीत जा. तेव्हांपासून आपण उठल्यावर ते मला उठवीत. मीहि उठल्यावर ते करीत तें करायला लागायचीं. माझें मन एकाद्या कामांत रमावें या विचारानें, गोसेवेच्या कामासाठीं आलेल्या एका साधूला त्यांनीं सांगितलें, 'जानकीदेवींना सतार शिकवा.' मी शिकूं लागल्यें, पण जमनालालजी रात्रंदिवस गोसेवेच्या कामांत गढलेले असत.

गोसेवेचें काम वाढवण्याच्या दृष्टीनें जमनालालजींनीं बापूजींच्या सल्ल्यानें एका गोसेवा संमेलनाची योजना आंखली. संमेलन यशस्वी झालें. त्यांत भाग घेण्यासाठीं उभ्या हिंदुस्थानचे लोक आले. जमनालालजींना आपल्या जुन्या मित्रांना आणि कार्यकर्त्यांना भेटल्यानें फार संतोष झाला.

●

## ४४. जमनालालजींचें देहावसान

समेलन संपल्यापासून त्यांचें डोकें ठणकतच राहिलें. वेदना मुकाट्यानें सोसावी अशी त्यांची सवय होती. तिची फारशी चर्चा ते करीत नसत. ठणका फारच होई तेव्हां कुठें त्यांच्या तोंडून शब्द निघे.

मातादिनजी भगेरिया यांनीं गांधीजींसंबंधीं काव्य लिहिलें होतें. ते त्या दिवसांत तिकडे आले होते आणि तें ते वाचून दाखवूं इच्छित होते. ऐकण्या-सारखी जमनालालजींची स्थिति नव्हती. पण त्यांचें मन राखण्यासाठीं एक दिवस त्यांनीं महिलाश्रमांत हा कार्यक्रम ठेवला. हेतु हा कीं महिलाश्रमांतल्या मुलीनाहि तो ऐकायला मिळावा. आम्ही मंडळीहि पोंचलों. कसेबसे थोडा वेळ ते बसले. जेव्हां वेदना असह्य झाली तेव्हां ते उठून 'जानकी-कुटिर'मध्यें गेले आणि झोंपले. दुसऱ्याहि दिवशीं डोक्यांत वेदना होती, म्हणून म्हणाले, 'आज डोकें दुखतें आहे, तेव्हां सेवाग्रामला कांहीं जाणार नाहीं.' पण त्या दिवसांत घनश्यामदासजी बिडला सेवाग्राममध्यें राहिले होते. त्यांचा फोन आला म्हणून ते जायला निघाले. मी म्हटलें, तुम्हीं म्हणालां होतां कीं आज त्रास होतो, तेव्हां कुठें जाणार नाही. तसे ते म्हणाले, "आज बापूचें मौन आहे. घनश्याम-दासजी एकटे असणार. त्यांच्याशीं थोडा थट्टाविनोद करीन. त्यांचें मन प्रसन्न होईल." इतकें बोलून ते टमटम्‌मध्यें बसले आणि सेवाग्रामला चालते झाले. पण त्यांची डोकेदुखी वाढतच गेली. तिकडे पोंचतांच महादेवभाई, किशोर-लालभाई आणि कृष्णदास गांधी ह्यांना ते म्हणाले, "मला तुमच्याशीं बोलायचें आहे, पण आज डोकें फार दुखतें आहे, पुन्हां येऊन बोलेन." बिडलाजी थोडें फार बोलून परत आले. बापूजींचा निरोप घ्यायला गेले तेव्हां ते न्हाणी-घरांत होते. म्हणून भेटल्याशिवायच परतले. बापूजींना हें कळलें तेव्हां ते म्हणाले, डोकेदुखी आहे असें कळतें तर मी त्यांना ठेवून घेतलें असतें.

सेवाग्रामहून ते परत आले. त्या दिवसांत चीनचे प्रधान चांग-कै-शेक यावयाचे होते. म्हणून बजाजवाडीत करावयाची व्यवस्था समजावून देऊन ते लागलीच 'जानकीकुटिर'मध्यें परतले आणि झोपले. दुसरे दिवशीं सकाळीदेखील थोडी डोकेदुखी होती. म्हणून एनिमा घेतला. त्यामुळें वेदना थोडी कमी झाली. तसे ते म्हणाले, "पाहा, मीं औषधावांचून रोग बरा केला!" मग ते फिरायला

गेले. मीहि बरोबर होत्यें. बजाजवाडीला पोंचल्यावर चांग-कै-शेकचा कार्यक्रम रद्द झाल्याची बातमी मिळाली. ते लोकांशीं चर्चा करूं लागले. मीहि बंगल्यांतल्या कामाची पाहणी करूं लागल्यें. त्या दिवशीं बंगल्यांतली व्यवस्था वगैरेसंबंधीं त्यांनीं बोलणीं केलीं. त्यानंतर ते दुकानाला जायला निघाले. आज एकादशी होती आणि सावित्रीनें फराळासाठीं आम्हां उभयतांना दुकानावर बोलावलें होतें. राजनारायण, ओम् वगैरे मंडळीहि आजच मुंबईहून आली होती. जमनालालजी म्हणाले, 'चला, आज पत्ते खेळूं म्हणजे डोकें हलकें होईल.' ते दुकानावर एका वर्षानंतर आले होते.

कांहीं वेळ विसावा घेतल्यावर फलाहार केला. दोन वाजतां सेवाग्रामला जाण्यासाठीं टमटम् तयार ठेवायला सांगितलें. पण ओम् म्हणाली, आम्हांला आज तुमच्याबरोबर चार वाजेपर्यंत ब्रिज खेळायचा आहे. जमनालालजी म्हणाले, 'ठीक; मी थोडा पडतों, तूं चरखा तयार करून ठेव.' राजनारायणला म्हणाले, 'तुमच्याशीं डेअरी फार्म उघडण्याची गोष्ट करायची आहे. तेव्हां मी उठेन तेव्हां मला आठवण करा.' पंधरा मिनिटें झोंपून ते शौचाला गेले. परतले तेव्हां फार गळून गेले होते. तक्क्याचा आधार घेऊन ते पडून राहिले. ते विसावा घेत आहेत असें पाहून मी दुसऱ्या खोलींत गेल्यें. ओम्नें पाहिलें कीं काकाजी झोपून उठल्यावर पुन्हा झोंपत नाहींत. मग आज असें काय झालेंय ? सावित्रीनें आणि ओम्नें त्यांना उठवलें. ते सावित्रीला म्हणाले, 'मेन्थॉल असलें तर घेऊन ये.' ती धांवतच खालीं आली. घरांत मेन्थॉल नव्हतें म्हणून तें औषधांच्या दुकानांतून मागवण्यांत आलें. त्यावेळीं त्यांच्या डोक्यांत भयंकर कळा येत होत्या. त्यांना वांति झाली. त्यासाठीं ते उठले. वांति करून पुन्हां झोंपले. पायांना तूप चोळण्यासाठीं मी ओम्ला बोलावलें तेव्हां त्यांनीं खुणेनें सांगितलें, तूंच कर. लेकीसुनांना ते पायांना हात लावू देत नसत. मी तूप चोळूं लागल्यें. डोक्यांतल्या कळा अधिकच वाढल्या. तसे ते म्हणाले, 'अरे, कुणी ॲस्पिरिन द्या रे !' नंतर त्यांना पुन्हां उलटी आली. हें सारें पाहून डॉक्टरला बोलावण्यांत आलें. ते आले. मी ह्यांचे डोळे उघडून पाहिलें तों ते लालबुंद झालेले. डॉक्टरनी रक्तदाब घेतला तर तो २५० होता. त्यांची नस तोडण्याच्या गोष्टी डॉक्टर मंडळी बोलू लागली. पण कुणाचाच धीर झाला नाही. थोड्या वेळानें सिव्हिल सर्जननें डोळे तपासले आणि ते बाहेर गेले. आम्हांला वाटलें कीं त्यांना

त्रास होऊं नये म्हणून ते बाहेर गेले असतील. पण सारें कांहीं आटोपलें आहे हें कळायला उशीर लागला नाहीं. बातमी चोहींकडे पसरली. विनोबाजी आले. बापूंना फोन गेला. तेहि आले. पण ते येण्याच्या आधींच हे गोलोकवासी झाले होते ! जेथें ते आधीं बसत-झोंपत असत आणि जिथें बसून त्यांनीं आजोबांना वैराग्यानें भरलेलें पत्र लिहिलें होतें, तेथेंच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. ओम् म्हणाली कीं त्यांनीं घर टाकून झोंपडीत वस्ती केली तरी ते राजयोगी होते म्हणून वाड्यांतच गेले.

बापूजींचा फोन आला तेव्हां मला भीति वाटली कीं बापूजी आले आणि ह्यांनी डोळे उघडून पाहिलें तर ! बापूजीना पाहून पहिल्यानें तर त्यांना धक्काच बसेल. मग कितीहि बरें वाटो. कारण आपल्यामुळें बापूजींना जरा-देखील त्रास झालेला त्यांना नको होता. विनोबाजी तर येऊन मुकाट्यानें बसून राहिले. पण बापूजींनीं आल्याबरोबर जमनालालजीच्या डोक्यावर हात ठेवला. बापूजीना पाहतांच मी उद्‌गारलें, 'बापूजी, तुम्ही यांच्याजवळ असतां तर हे गेले नसते. ह्यांची तब्येत बिघडल्याबरोबर तावडतोब निरोप पाठवला असता तर बरें झालें असतें. पण आतां तरी यांना जिवंत करा. काय आपण त्यांना जिवंत नाहीं करूं शकत ?'

बापू म्हणाले, "जानकी, तुम्हांला आतां रडायचं नाहीं. तुम्हीं तर आतां हसलं पाहिजे आणि मुलाबाळांना हंसवलं पाहिजे. जमनालाल तर जिवंतच आहे ! ज्याचें यश अमर झालें त्याला मृत्यु कुठला ? तुम्ही त्याचा रस्ता सोडून दिलात तरच त्याचा मृत्यु होणें शक्य आहे. त्यानें पारमार्थिक जीवन घालवलें. जें काम त्यानें आपल्या खांद्यावर घेतलें होतें तें आतां तुम्ही सांभाळा. तुम्हांला खोटा धीर आणायला मी आलों नाहीं. जमनालाल तर जिवंतच आहे ! त्याला जिवंत ठेवणें आमचें काम आहे."

मी विनोबाजींना उद्देशून म्हणाल्यें, 'तुम्हीं ह्यांना ईश्वराचें दर्शन घडवा.' पण ते अवाक् बसले होते. बापू म्हणाले, 'जानकी, जमनालालला ईश्वरदर्शन केव्हांच होऊन चुकलें आहे. आतां तें तुम्हांला करून घ्यायचें आहे. त्याची तयारी करा. त्याचें काम अर्धें राहिलें असेल तें पुरें करा. त्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम करा.'

लहानपणीं सती जाण्याची माझी इच्छा होती. ती आतां जागी झाली. मी

म्हणाल्यें, 'वापूजी, मी सती जाऊं इच्छितें, अनुज्ञा द्या.' वापू म्हणाले, 'शरीर जाळून काय फायदा ? तें तुच्छ आहे. माती आहे. आपल्या सर्व दुर्गुणांचा होम करणे हें खरें यतीत्व आहे. आपल्या सर्व अवगुणांचा चितेंत होम करा. राहील तें शुद्ध सुवर्ण राहील. तें कसें जाळतां येईल ? तें फक्त कृष्णार्पण होऊं शकतें. स्त्रियांना मी त्यागमूर्ति मानतों, कारण हिंदू स्त्री विधवा झाल्यावर सर्व भोगांना तिलांजलि देते, विकारांचें शमन करते. आतां तुम्ही त्यागमूर्ति झालांत. आपले अवगुण जमनालालच्या चितेंत जाळून टाका. आपलें जें कांहीं असेल तें त्याच्या कार्यांत लावा. हेंच सती होणें. उठा, चला, तुम्ही सती व्हा.' मी म्हणाल्यें, 'मी आणि माझी संपत्ति त्यांच्या कामीं अर्पण !'

वातमी तर चोहींकडे पसरली होती. मुंबईहून फोन आला कीं लोक खास गाडीनें येऊन जमनालालजीच्या अंत्ययात्रेंत सामील होऊं इच्छितात. आतां प्रश्न पडला काय करावें ? मुंबईत अभ्यंकरांचा मृत्यु झाला त्यावेळीं ह्यांनीं जे उद्गार काढले होते ते मला आठवले. 'प्राण निघून गेल्यावर शरीराचें काय महत्त्व ? त्याचा गाजावाजा कशाला ?' मी म्हटलें, 'मृत शरीर रात्रभर ठेवणें त्यांच्या आत्म्याला आवडणार नाहीं. सर्वांना त्रास होईल. त्यांना तर कुणाला त्रास देणें आवडत नसे.' तेव्हां लगेच तयारी केली जावी असें ठरलें. राधाकृष्णनें विचारलें, 'स्नान कुठें घालायचें ?' मी म्हटलें 'खालीं अंगणांत.' घरांत गंगाजळाची घागर होती ती आणवली गेली. त्यांचा देह खालीं नेला जाऊं लागला. मी हात धरून 'ओम्, ओम्' म्हणत चालूं लागल्यें. गंगाजळानें जमनालालजींना न्हाऊं घालण्यांत आलें. चरणामृत घेण्याची माझी सवय होती. स्नानानंतरचें ओंजळभर गंगाजळ मीं पिऊन टाकलें. त्या पाण्याची मीं एक बाटलीहि भरून घेतली पण मागाहून विनोबाजींच्या सांगण्यावरून तें पाणी मी समाधीवर लावलेल्या झाडांना घातलें.

वातमी मिळतांच लोक गोळा झाले. कुणालाच ही गोष्ट खरी वाटेना. कोणी म्हणे मीं त्यांना गोरक्षणमध्यें पाहिलें, कोणी म्हणे ते बजाजवाडीत बसले होते. कुणी सांगितलें, दुकानावर जातांना आपण त्यांना पाहिलें. हें कसें शक्य आहे ? पण येऊन जेव्हां पाहिलें तेव्हा ते स्तंभितच झाले. न्हाऊं घातल्यानंतर वापूजींनीं आपलें उत्तरीय काढून त्यांच्या देहावर घातलें. जमनालालजींसाठीं शेवटचें वस्त्र तर विनोबाजींनीं कांतलेल्या सुताच्या

खादीचें मागवलें होतें. मीं विचार केला, बापूजीचें उपरणें कशाला जळूं द्यावें, म्हणून मी तें उचलून गळ्याभोंवतीं गुंडाळलें. तें माझ्याकडे अजून आहे.

तिरडी बांधली जाऊं लागली तशी दादीजी एकदम ओरडून म्हणाली, 'हें काय करतां आहां ?' आतांपर्यंत ती अशा समजांत होती कीं येथें एकादी मोठी सभा चालली आहे, लोक जमले आहेत, गांधीजीहि आले आहेत. अशी भयानक घटना होऊन गेली आहे, याचा तिला थांगपत्ता तरी कसा लागावा ? कारण रडणें ओरडणें नव्हतेंच मुळीं. आजूबाजूला एकाद्दुसऱ्यानें मुकाटयानें रडूनहि घेतलें असेल, पण जमनालालजीचें सांगणें असे की मरणसमयीं रडणें ओरडणें नसावें, मरणाला अमंगल मानूं नये. दादीजींचें रडणें बघवत नव्हतें. बापूजी बराच वेळपर्यंत त्यांची समजूत घालीत राहिले. पण त्यांचें रडें थोपवणें अशक्य होतें. याच ठिकाणीं त्यांचे दोन मुलगे आणि एक जांवई निधन पावले होते; त्यांच्या आठवणीनें त्यांचें दुःख वाढतच जात होतें.

तयारी झाल्यावर अंत्ययात्रा चालू झाली. मी ओम ओम् करीत तिरडीला धरून चालल्यें होतें. महिलाश्रमाच्या मुली, घरकुटुंबांतल्या स्त्रिया, गांवचे लोक —जणू समुद्रच उधाणला होता. मुली म्हणत होत्या–'रामधुन लागी, गोपाळधुन लागी.' सगळे लोक हेंच म्हणत चालले होते. मी म्हटलें, ज्याला खांदा द्यायचा असेल, त्यांना देऊं द्या. मग हिंदु असो वा मुसलमान. जमनालालजी तर सगळ्यांचे होते.

गोपुरीला जमनालालजींच्या झोंपडीसमोर भडाग्नि देण्याचें ठरलें. चिता तयार झाली. कापरानें ती पेटवण्यांत आली. मी गोवरी बापूजींच्या हातीं दिली. मी चितेंत उडी टाकूं नये म्हणून बापूजींनीं मला घट्ट धरून ठेवलें होतें. बापूजींनीं विनोबाजींना वेद आणि उपनिषदांचे मंत्र म्हणायला सांगितलें. विनोबाजींनीं उपनिषदांचा मंत्रपाठ केला. परचुरेशास्त्र्यांनींहि श्लोक म्हटले. अमतुस्सलामनें कुराणाच्या आयत्या म्हटल्या. बा, महादेवभाई आणि भगवानदेवी सेक्‌सरिया यांना तर मूर्च्छाच आली, पण मी शून्यभावानें चितेकडे बघत राहिल्यें ! यावेळीं मनांत हाच भाव होता कीं ते जणूं माझ्यांत प्रवेश करीत आहेत. पण हळुहळू जसजसा अंधार पडूं लागला तसतसा रितेपणा जाणवूं लागला. विनोबाजी रात्रभर माझ्यापाशीं बसले होते. मी त्यांना वारंवार विचारीत होत्यें ते आतां कुठें भेटतील ?

जमनालालजी गेल्याचें दुःख नंतर हळूहळू वाढत गेलें आणि आतां तर क्षणोक्षणीं जाणवत असतें.

## ४५. बेचाळीसची क्रांति आणि त्यानंतर

जमनालालजींना आपल्या निर्याणाचा थोडासा भास आधींपासूनच झालेला होता. पण आम्हां कुणालाच कल्पनाहि नव्हती कीं ते इतक्या लवकर जातील. बापूनाहि कल्पना नव्हती त्यामुळें सर्वांनाच मोठा धक्का बसला. बापूंना तर आपला हातच तुटून पडला असें वाटलें. पण ते योगी होते. त्यांनी हें दुःख गिळून टाकलें आणि लगेच स्वतःला सांवरून जमनालालजींचीं कामें सांभाळावीं कशीं या विचाराला लागले. त्यांनीं सुरू केलेलीं विधायक कामें पुरीं करण्याच्या प्रश्नावर विचार करण्यासाठीं बापूजीनीं जमनालालजींच्या इष्टमित्रांची एक सभा त्यांच्या बाराव्या दिवशीं बोलावली. तेथें बापूनीं सांगितलें कीं जमनालाल-जींचे चाहते, प्रेमी आणि मित्र यांनीं त्यांचीं कामें चालवलीं पाहिजेत. हें त्यांचें कर्तव्य आहे. त्यामुळें त्यांच्या आत्म्यास संतोष लाभेल. त्या दिवसांत वातावरणांत गांभीर्य होतें आणि जमनालालजींबद्दल लोकांच्या अंतःकरणांत जी सद्भावना होती ती बापूजी कामीं लावू पाहात होते. मृत्यूमुळें वैराग्याची भावना स्वभावतःच उचंबळून येते. त्यांत जमनालालजींसारख्या कर्मशील प्रेममूर्तीच्या वियोगामुळें हें वैराग्यमय वातावरण अधिकच गाढ झालें होतें. पुन्हा बापूजींसारख्या महापुरुषाच्या बोलण्याचा प्रभाव सगळ्यांवर पडणाराच होता. त्या दिवसांत माझी अवस्था विचित्र होती. मी या आघातानें सुन्नच होऊन गेल्यें. त्यांच्या जीवनाचा महान् उद्देश मला पावलोपावलीं आठवू लागला. त्याची सत्यशीलता जाणवूं लागली आणि ती आपल्या जीवनांत आणावी हीच भावना वाढत गेली.

जमनालालजींच्या स्वर्गवासानंतर त्यांच्या शरीराच्या साक्षीनें माझ्या सर्वस्वाचें समर्पण करण्याचा संकल्प तर मी अगोदरच केला होता. पण आतां प्रश्न होता तो आपण होऊन आपल्याला कामांत गुंतवण्याचा. आमच्या कुटुंबांत

बापूजींच्या विचारांचा खोल प्रभाव होता. जें कांहीं माझ्याकडून झालें त्याचें श्रेय बापूजींनाच आहे. गेली वीस वर्षें जो उपदेश ते करीत राहिले त्याचाच हा परिणाम होता. मी माझा क्षणन् क्षण जमनालालजींच्या कामांत लावावा असें बापूजींनाहि वाटत होतें. त्यामुळेंच गोसेवेची जबाबदारी त्यांनीं माझ्यावर टाकली. मीहि गोसेवेचें काम करण्याचा संकल्प करुन टाकला. पण जेव्हां गोसेवा-संघाची अध्यक्ष होण्याबद्दल सांगण्यांत आलें तेव्हां माझी हिंमत होईना. मी बापूजींना म्हणाल्यें, मी काम करीन. पण एवढा भार माझ्यावर घालूं नका. पण त्यांनीं चूप बसण्याचा इशारा करून हा भार माझ्यावर घातला आणि म्हटलें, ‘तत्त्व आणि व्यवहार सांभाळूं शकतील अशा लोकांची मदत तुम्हांला मिळेल.’ त्या दृष्टीनें विनोबाजी आणि घनश्यामदासजी बिडला यांना उपाध्यक्ष करण्यांत आलें. वातावरणच असें होतें कीं बापूजींनी सांगितलेलें मानावें आणि सोंपवलेलें काम यथाशक्ति करावें. याच मनोवृत्तीमुळें विनोबांनीं आणि घनश्यामदासजींनीं मान्यता दिली. बाराव्या दिवशी मृतकाच्या मागून वळू सोडण्याची प्रथा आहे. म्हणून पांच लाखांचे एक हजार वळू त्यांच्या नांवें सोडण्याचा संकल्प रामेश्वरदासजी बिडलांनीं केला आणि तो त्यांनीं पुरा केला.

जमनालालजींचें देहावसान झालें तेव्हां कमलनयन गोलाच्या साखर-कारखान्यांत होता. वर्ध्याला फार मोठी दुर्घटना घडल्याचा कलकत्त्याहून त्याला फोन आला तेव्हां त्याच्या मनांत आलें, एक काकाजी तरी राहिले नाहींत, नाहीतर बापूजी. पण दुसऱ्याच क्षणीं त्याला विचार आला कीं बापूजींची देशाला अधिक जरुरी आहे आणि त्यांचें राहणें आवश्यक आहे. काकाजी राहिले नाहींत हें जेव्हां त्याला खात्रीपूर्वक समजलें तेव्हां त्यानें फोन ठेवून देऊन कारखान्याच्या कार्यकर्त्यांना आणि मजुरांना एकत्र बोलावून घेतलें आणि फोनवरचें दुःखद संभाषण निवेदन करून म्हटलें, ‘काकाजींच्या शोका-पायीं कारखाना बंद होतां कामा नये.’ अशी गंभीरता त्यावेळी त्याच्यांत होती. घटना हृदय हलवणारी होती. देशसेवक पित्याच्या गोलोकवासाची ( निध-नाची ) वातमी कळून एका मुलाकडून अशा गोष्टी केल्या जाणें साधी गोष्ट नाही. पण आमच्याकडे असल्या गोष्टी जमनालालजींच्या आचारव्यवहारा-मुळें स्वाभाविक झालेल्या आहेत. गोलाहून निघाल्यावर लखनौ स्टेशनवर

त्याला माता आनंदमयी भेटल्या. त्या वर्ध्याला यायला तयार होत्या. गेल्या सहा महिन्यांत जमनालालजींनीं माता आनंदमयींना वर्ध्याला बोलावण्याचे बरेच प्रयत्न केले होते परंतु त्या येऊं शकल्या नव्हत्या. जमनालालजी जेव्हां एकाद्याला वर्ध्याला बोलावण्याचें ठरवीत तेव्हां तो आल्याशिवाय त्यांना चैन नसे. पण माता आनंदमयी आल्या नाहींत. तथापि आतां त्या येत होत्या. कमलनयन त्यांना म्हणाला, 'काकाजी तर निघून गेले.' तेव्हां त्या म्हणाल्या, "भैया"ला आत्मदर्शन होत आहे.' त्यानतर त्या थांबल्या आणि तीन दिवसांनीं वर्ध्याला आल्या.

जमनालालजींच्या देहावसानाची बातमी ऐकल्यानंतर कमलनयननें पाणीहि घेतलें नव्हतें. विनोबाजी रामायणाचें पारायण करीत असल्याचें स्टेशन-वर जेव्हां त्याला कळलें तेव्हां तो स्नान करूनच तिकडे गेला. त्यावेळच्या स्थितीचें वर्णन करणें कठीण आहे. येतांक्षणींच त्यानें माझ्या गळ्याला मिठी घातली. आम्ही दोघें शून्यवत् झालों होतों. रडूं तर येतच नव्हतें. लोकांच्या डोळ्यांतून आंसवें वाहात होतीं. जेव्हां त्याला ताक प्यायला सांगण्यांत आलें तेव्हां कळलें कीं तीन दिवसांत त्यानें पाणीहि घेतलेलें नाहीं. अखेर मला ताक पाजल्यावरच त्यानें स्वत: तें घेतलें.

घरचे मुलगे, मुली, सुना – साऱ्यांची सारखीच दशा होती. जणू जमनालाल-जीच्या आत्म्यानें आम्हां सर्वांत प्रवेश केला होता! अशाच भावावेगांत आम्हीं सारीं होतों. सर्वांच्या मनांत एकच गोष्ट घोळत होती. ती ही कीं त्यांचीं कार्यें करून त्यांच्यासारखें व्हावें. कमलनें सर्वप्रथम हें जाणण्याचा प्रयत्न केला कीं आपल्याला काकाजींनीं कोणत्या संस्थेला काय द्यायला सांगितलें होतें किंवा त्यांची इच्छा काय होती. त्यानें आधीं त्यांच्या सर्व अभिवचनांची पूर्तता केली. पवनारचा बंगला त्यानें विनोबाजीना अर्पण केला, बजाजवाडींत येणाऱ्या जाणाऱ्याची जमनालालजीकडून जशी सोय होई तशी ती चालू राहावी यासाठीं लक्ष्मीनारायणमंदिरांत त्यानें एक लाख रुपये जमेला टाकले. ते सात वर्षांत खर्चून गेले आणि आतां तो खर्च मुलेंच चालवतात. दोघांहि भावांनी विचार करून जमनालालजींच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या वडिलार्जित संपत्तीचा ट्रस्ट केला. घनश्यामदासजी बिडलांनीं जेव्हां घरचे हिशेब पाहिले तेव्हां ते थक्कच झाले. म्हणाले, जमनालालजी आपलीं कामें चालवीत राहिले ते धनाच्या

बळावर नव्हे तर आत्मबळावरच. विडलाजी त्यांचे जिवाभावाचे मित्र होते. त्यांनाहि त्यांच्या मृत्यूचा मोठा धक्का बसला. आमच्या कुटुंबाविषयीं त्यांना आत्मीयता होती आणि ती आजतागायत चालत राहिली आहे.

बारा दिवसांनंतर बापूजींनीं मला सेवाग्रामला बोलावून घेतलें. सावित्रीहि माझ्याबरोबर तिकडे राहायला आली. तिच्या जीवनांत खास परिवर्तन घडूं लागलें होतें. साऱ्या राजस सुखांना फांटा देऊन ती आश्रमजीवन कंठूं लागली. आश्रमांत जें कांहीं खायला मिळे तेवढ्यावर ती आश्रमांतलीं कामें करीत असे. जेव्हां बापूजींचें 'करो या मरो' आंदोलन सुरू झालें तेव्हां तीहि तुरुंगांत गेली. ती नाजूक होतीच. शिवाय ऐषआरामांत वाढलेली होती. तिला तुरुंगांतलें जीवन कितपत पेलेल हा प्रश्न होता. पण त्या दिवसांत तिच्यावरहि एक प्रकारची धुंदी चढलेली होती. ओम्हि बरोबर गेली. त्या गेलेल्या पाहून महिला-श्रमाच्या ऐंशीं मुलीहि बाहेर पडल्या. सावित्रीनें तुरुंगांतलें जीवन जरी मोठ्या उत्साहानें आणि आनंदानें सोसलें, मनाला मुळींच ढळूं दिलें नाहीं, तरी शेवटीं शरीर किती म्हणून सोसणार ? ती आजारी पडली. जेलमधून जेव्हां ती सुटली तेव्हां तिला खुर्चीवरून आणावें लागलें. तिचा चेहरा पाहून सगळ्यांना रडूं कोसळलें. तिच्या प्रकृतीवर झालेला हा जेलचा परिणाम भरून काढण्यासाठीं तीन वर्षें तिला मसूरीला राहावें लागलें.

रामदेखील ९ ऑगस्टच्या बापूजींच्या अटकेनंतर खेड्यांत जाऊन त्यांचा संदेश पोचवूं लागला. पोलीस त्याच्या मागावर होतेच. त्यांना हुलकावण्या देत तो खेड्यांत जाई आणि लोकांना समजावून सांगे. एक दिवस पोलिसांनीं त्याला शेतांत टेहळलें आणि त्याचा पाठलाग चालवला. तो पुलाखालीं दडला. पण पोलिसांनी त्याला दंडुक्यानें झोडपीत बाहेर काढलें आणि मारमारून शिवीगाळहि केली. तो म्हणाला, 'लागेल तितकें मारा पण शिव्या कां देतां ?' मग पोलिसांनी त्याला जेलमध्यें नेलें.

बापूजींनीं 'करो या मरो'ची घोषणा अशा तऱ्हेनें प्रवर्तित केली होती कीं सर्वांवर तिचा खोल परिणाम झाला आणि सर्व लोक प्राणाचीहि पर्वा न करतां काम करूं लागले. हळूहळू सर्वांनाच पकडण्यांत आलें. राधाकृष्णवर सरकारनें असा खटला भरला होता कीं त्याला फांशीच व्हावी. त्यामुळें कमलला तुरुंगांत जातां आलें नाहीं. त्या खटल्यासाठीं त्याला बाहेर राहावें लागलें. तो हरप्रकारें

आंदोलनाला मदत करीत राहिला. तनमनधनानें त्यानें या आंदोलनाला साथ दिली.

मी गोसेवेच्या कार्याला लागल्येंच होत्यें. तेवढ्यांत या आंदोलनापायीं एका-मागून एक कार्यकर्ते जेलमधें गेले. त्यावेळीं गो-सेवा-संघाचे चिटणीस स्वामी आनंद होते. साहाय्यक चिटणीस ऋषभदास रांका होते. ते तुरुंगांत गेले आणि पारनेरकर आणि स्वामी आनंद आंदोलनाच्या कामाला लागले. राधाकृष्णवर चाललेला खटला भयंकरच होता. तो जेलमधें होताच. श्रीमन्‌जीलाहि पकडण्यांत आलें. वाळुजकर आधीं आंदोलनाच्या कामांत पडले आणि पुढें तेहि तुरुंगांत गेले. काम कसेंबसें चाललें होतें. मीहि थोडी फार देखरेख करीत होत्यें. पण ४२ च्या महान् आंदोलनापुढें कांहीं काळपर्यंत विधायक कार्याकडचें लक्ष कमी झालें. सरकारनेंहि अशी जोराची दडपशाही चालवली कीं आतां दहा वर्षें तरी कॉंग्रेस डोकें वर करूं शकणार नाहीं असें वाटूं लागलें, अशा रीतीनें तिचा बींमोड करण्यांत आला. मुलांनादेखील 'महात्मा गांधीकी जय' म्हटल्याबद्दल निर्दयपणें झोडपण्यांत आलें.

या आंदोलनांत अनेकांनीं बलिदान केलें, अनेकांनीं क्लेशकष्ट सोसले. बापूहि महादेवभाईंना गमावून बसले. नंतर बाहि गेल्या ! हे धक्के मोठे तर होतेच. पण बापूंनीं आजवर विषाचे अनेक पेले पचवले होते त्यामुळें हेंहि त्यांनीं पचवलें. बापूजींनीं हें आंदोलन पूर्ण विचारांतीं आणि सरकारला अनेक संधि दिल्यानंतर सुरू केलें होतें. इंग्रजांना अडचणींत टाकण्याचा त्यांचा हेतु नव्हता. त्यांच्या अडचणींचा फायदा काढावा हें त्यांना पसंत नव्हतें. म्हणून त्यांनीं अनेक संधि देऊन पहिल्या. इंग्रजांची दानत साफ नाहीं असें दिसून आलें आणि क्रिप्स-मिशन आल्यानंतरच्या वाटाघाटींत त्यांना काळेंबेरें दिसलें तेव्हां त्यांच्या जिवाची लाही झाली. जेव्हां ते दिल्लीहून परतले तेव्हां ते फारच गंभीर झाले आणि आतां पाऊल टाकलेंच पाहिजे अशा निश्चयावर येऊन ठेपल्यासारखे दिसले. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठका झाल्या. त्यांत बहुतेक सर्व लोक बापूजींच्याच विचाराचे होते. राजाजीचा विचार निराळा होता. ते म्हणत की या संधीचा फायदा घेतला पाहिजे. बापू असें पाऊल टाकू पाहात होते कीं ज्यामुळें स्वातंत्र्याचें निश्चित अभिवचन तरी मिळेल किंवा आत्मोत्सर्ग तरी होईल. सरकारनें पकडलें तर प्रायोपवेशन करून देहत्याग करायचा. आता सारे

गंभीरपणें विचार करूं लागले. सहकाऱ्यांशीं सल्लामसलती होऊं लागल्या. विनोबाजींना विचारण्यांत आलें. महादेवभाई आणि किशोरलालभाई यांचा तर असल्या प्रायोपवेशनाला विरोध होता. बापूंच्याबरोबर युक्तिवाद चाले पण विनोबाजींनीं सांगून टाकलें कीं बापूंचा विचारच बरोबर आहे. झालें ! सारे गंभीर आणि सुन्न होऊन गेले !

जेव्हां बापू मुंबईला निघाले तेव्हां असेंच वाटत होतें कीं ते कदाचित् आतां परतणार नाहींत. बापू बा आणि महादेवभाई यांना बरोबर घेऊन गेले होते. पण तुरुंगांतून सुटले तेव्हां बा आणि महादेवभाई त्यांच्याबरोबर नव्हते ! त्यांना एकटें पाहून आश्रमीय मंडळीचें अंतःकरण गलबलून गेलें. दुर्गाबहनची स्थिति काय वर्णावी ? बापूंनाहि बांची आणि महादेवभाईंची उणीव जाणवत होती आणि जेव्हां इकडची वस्तु तिकडे होई तेव्हां ते म्हणत, 'पूर्वी काय हिंमत होती एकादी वस्तु इकडची तिकडे होईल ? महादेव नसल्यानें आतां ही गडबड होते !'

हळूहळू बापूंनी आपल्या विधायक कामांची विचारपूस सुरू केली आणि ते फिरून कामांत मग्न झाले. कुठलीहि परिस्थिति असो, तिच्यांतून आपल्या कामाचा फायदा कसा करून घ्यावा, याचा विचार करून ते कामाला लागत. ही त्यांची विशेषता होती. स्वतःचा समतोलपणा राखणें हा त्यांचा विशेष गुण होता.

'करो या मरो' या आंदोलनाच्या दरम्यान मध्यप्रदेशांतील चिमूर-अष्टीच्या कांहीं खवळलेल्या लोकांनीं कांहीं हिंसेचीं काम केलीं. सरकारच्या सैनिकांनीं त्याचा भयंकर मोठा वचपा काढला, लोकांवर भयानक अत्याचार केले आणि आयाबहिणींची अशी लाज घेतली कीं लोक त्या बातम्या ऐकूनच सर्द झाले. या घटनांनीं सेवाग्राम आश्रमाच्या योगी भंसाळींना तीव्रतेनें हलवून सोडलें. ते चिमूरला जायला निघाले. पण सरकारला त्यांना तिकडे जाऊं द्यायला नको होतें. त्यांना पकडून सेवाग्रामला आणून सोडलें. यावर भंसाळीजींनीं प्रायोपवेशन सुरू केलें. त्यांची मागणी होती कीं अष्टी-चिमूरच्या अत्याचारींची चौकशी केली जावी. प्रायोपवेशन त्रेसष्ठ दिवस चाललें. उभ्या देशांत त्यामुळें मोठी खळबळ उडाली. भंसाळीभाईंची प्रकृति फार नाजूक बनली. श्री. कन्हय्यालाल मुनशी, वाळुंजकर आणि कमलनयन यांनीं या प्रश्नाला वृत्तपत्रांतून

जोराची चालना दिली. सरकार ही गोष्ट दाबून टाकूं पाहात होतें. पण प्रश्न देशांतील आयाबहिणींच्या अब्रूचा होता. भंसाळीजींनीं आपले प्राण पणाला लावले होते. अंती सत्याचा विजय झाला. सरकारनें भंसाळीजींना चिमूरला जाण्याची परवानगी दिली. त्रेसष्ठाव्या दिवशीं भंसाळीजींनीं जाऊन पारणें केलें. देशानें सुटकेचा श्वास सोडला !

## ४६. बापूंचें बलिदान

बापूंनीं जेव्हां फिरून कामांत लक्ष घातलें तेव्हां त्यांच्यापुढें गोसेवा-संघाच्या कार्याचाहि प्रश्न आला. नव्या दमानें पुन्हा गोसेवा संघाचें काम सुरू झालें. जमनालालजींनीं आपल्या हयातींत गोरसभांडार तर सुरू करून दिलेंच होतें आणि तें चाललें होतें. त्यांत गायीचें दूध मणांनीं येई आणि विकलें जाई. ग्राम-सेवा-मंडळ, बच्छराज शेती आणि लक्ष्मीनारायणमंदिर यांच्या डेअरीज्हि चालू होत्या. गवळीहि आपल्या परीनें गायी पाळूं लागले होते. अशा रीतीनें वर्ध्यामध्यें गोपालनाचें काम वाढत राहिलें होतें. पण त्या कार्याचा बाहेर फैलाव करावा आणि तें देशव्यापी बनवावें म्हणून बापूंची इच्छा होती कीं मी त्यांत पडावें. बापूजींच्या सांगण्यावरून मी ठिकठिकाणीं जाऊं लागल्यें. गोसेवा-संमेलन राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं भरवण्यांत आलें. तेहि या कार्यांत रस घेऊं लागले आणि त्यांनीं बिहारमध्यें काम सुरू करण्याच्या दृष्टीनें संमेलन बोलावलें. तेथेंहि काम सुरू झालें. आग्रा, अमृतसर, पाटणा, भागलपूर, सीकर, कलकत्ता, मुंबई वगैरे ठिकाणीं मी गेल्यें आणि कार्य वाढविण्याचा यथाशक्ति प्रयत्न करीत राहिल्यें.

शांतिकुमार मुरारजींची बापूजी आणि जमनालालजी यांच्यावर श्रद्धा तर होतीच. ते गोसेवा-संघाचें काम करूं लागले आणि कांहीं दिवस संघाचे चिटणीसहि राहिले. वर्ध्याला त्यांचें जाणें येणें होत असे आणि ते मोठ्या प्रेमानें आणि श्रद्धेनें हें काम करीत असत.

राधाकृष्णला या कामांत फार गोडी होती. आणि गोसेवा-संघाच्या कार्याच्या

पुनर्रचनेंत त्याचा वांटा फार मोठा होता. तसें गोसेवा-संघाचें काम तो करीतच होता. शिवाय त्या दिवसांत इतर कामांची जबाबदारीहि त्याच्यावर होती. विशेष म्हणजे ग्रामसेवा मंडळाची जबाबदारी. त्यामुळें रिषभदासना पुन्हा चिटणीस करण्यांत आलें. ते माझ्याबरोबर कित्येक ठिकाणीं आले आणि काम वाढविण्याचा प्रयत्न करीत राहिले. पण असल्या थोर कार्यासाठीं जी शक्ति हवी होती तिची माझ्यांत आणि माझा सहकाऱ्यांत उणीव होती. अर्थातच या कामांत विशेष प्रगति होऊं शकली नाहीं. कांहीं दिवस मी या कामाला जुंपून घेतलें. पण कसा कोण जाणे, उत्साह मावळत गेला आणि बापूजींच्या अपेक्षेप्रमाणें काम होऊं शकलें नाहीं याचें मलाहि दु:ख झालें. तेहि मला 'कामचोर' म्हणत. हळूहळू मला त्यांच्यासमोर जाण्यास संकोच वाटूं लागला. मी करणार होत्यें तरी काय? माझ्याकडून हा भार सांभाळणें झालें नाहीं किंवा वाटल्यास असें म्हणा कीं माझा नीट उपयोग करून घेणें कुणाला जमलें नाहीं.

बापूजी जेव्हां दिल्लीच्या भंगी-वस्तींत राहात होते तेव्हां मी एकदां तिथें गेल्यें. बापूजी त्या दिवसांत थकल्यामुळें चार तास मौन धरीत. पण मला पाहतांच ते एकदम प्रेमभरानें म्हणाले, 'चोर आली, चोर आली!" बापूनीं जरी हें थट्टेनें म्हटलें होतें तरी त्यांच्या हंसण्यांत मी सहभागी होऊं शकल्यें नाहीं. कारण या बाबतींत त्यांच्या मनांत केवढें दु:ख आहे हें मला माहीत होतें.

ज्या दिवशीं बापूना गोळी लागल्याची बातमी आली त्या दिवशीं सकाळीं राजेंद्रबाबू वर्ध्याला आले होते. सगळी मंडळी बातमी मिळतांच राजेंद्रबाबूंकडे जमली. प्रार्थना झाली. राजेंद्रबाबूंनीं दिल्लीला जायचें ठरविलें पण सगळ्यांचें म्हणणें पडलें कीं रात्रीचें निघणें योग्य होणार नाहीं. ते थांबले. रात्रीं एक वाजतां जवाहरलालजींचा फोन आला की त्यांना यायलाच पाहिजे. त्यांच्यासाठीं विमानाची तजवीज करण्यांत आली. तेथें माझ्यासाठींहि सीट ठेवली गेली. जायचें मनांत तर होतेंच पण सगळे आश्रमीय जाऊं शकत नाहींत तेव्हां मीच कसें जावें असेंहि वाटलें. बापूजींना गोळी लागल्याच्या बातमीनें मनावर कांहीं विचित्र परिणाम झाला होता. आधी वाटलें कांहीं विशेष गोष्ट झालेली नाहीं. मग असा विचार आला कीं पहा, बापूजींना माझ्याविषयीं जी अपेक्षा होती ती मला पुरी करतां आली नाही. त्यांच्यासमोर मी कुठल्या

तोंडानें जाऊं ? माझ्या मनांत विचार आला कीं बापूजींनीं जर डोळे उघडून पाहिलें आणि विचारलें कीं काम तर करीत नाहींस, इथें कां आलीस ? तर मी काय सांगणार ? आतां ते पाहूं शकत नाहींत म्हणून मी त्यांच्यापुढें जाणें हें त्यांना फसवणेंच नव्हे काय ? या विचारानें मी थांबल्यें, दिल्लीला गेल्यें नाहीं.

रामकृष्ण दिल्लीहून परत आला तेव्हां म्हणाला कीं आई, तू तिकडे कां नाहीं आलीस ? तुला तर यायला हवें होतें. त्यानें असें म्हटल्यावर मलाहि वाटलें कीं मी अखेरचें दर्शन घेतलें असतें तर बरें झालें असतें. आतां मीं पस्तावूं लागल्यें. विमान तर माझ्यासमोरूनच गेलें होतें आणि बाबूजी दुसऱ्याच दिवशीं परतले होते. मी पण येऊं शकलें असतें. मग वाटूं लागलें, आपण खरोखरच कांहीं तरी गमावलें.

बापूजींच्या निधनानें देशांत दुःखाची लाट पसरली आणि अनेकांवर अनेक तऱ्हांनी आघात झाले. आमच्याकडे मदालसेवर मोठाच परिणाम झाला. तिनें बारा दिवसपर्यंत अन्न घेतलें नाहीं. उपनिषदांच्या प्रार्थनेचे तिनें **छापून घेतलेले** कागद घेऊन ती घरोघर जाऊन सांगे, 'अरे, आतां तरी उठा ! बापूंना गमावल्यानंतर देखील का झोपून राहणार ?' तिची स्थिति बावचळल्यासारखी झाली होती. आम्ही सारीं मोठ्या काळजींत पडलों. श्रीमन्‌जींवर इतका भार असूनहि त्यांच्या धैर्याला पार नव्हता. इकडे बापूजी गेल्याचें दुःख तर होतेंच. तिकडे मदालसेची ही स्थिति ! या भ्रमिष्ट अवस्थेंत ही केव्हां काय करून बसेल असा धसका आम्हीं घेतला होता. तिच्या ओठांतून रक्त निघत होतें. तोंड आलें होतें.

बापूंच्या जाण्यानें आपल्यावरचें छत्रच गेलें असें आमच्या घरच्या सगळ्याच मंडळीला वाटलें. बापूजी गेल्यामुळें मुलें पोरक्यांसारखीं झालीं ; कारण जमनालालजींच्या पश्चात् बापूंनीं त्यांना वडिलांची उणीव जाणवूं दिली नव्हती.

जेव्हां वृत्तपत्रकारांनीं बापूंविषयीं मला कांहीं सांगायला सांगितलें तेव्हां मी म्हटलें, 'आम्ही आज पितृविहीन झालों.' मी हें गोपुरीला सांगितलें होतें ; तिकडे मुंबईला कमलनयनहि हेच शब्द बोलला होता.

बापूंच्या जाण्याचा माझ्यावर प्रारंभीं फारसा परिणाम झाला नव्हता, पण हळुहळू दिवसामागून दिवस जाऊं लागले तसा तो परिणाम वाढत चालला

आणि त्यांचें अंत्यदर्शन मला घेतां आलें नाहीं याची सल मनांत घर करूं लागली. जेव्हां त्यांची रक्षा बदरी, केदार, गंगोत्री वगैरे ठिकाणीं नेण्याची गोष्ट निघाली तेव्हां माझ्या मनांत आलें कीं मलाहि त्या पार्टीबरोबर जातां आलें तर बरें. पण मनांत पुन्हां संकोच आला कीं रक्षेबरोबर जाणाऱ्यांची संख्या मोजकी आहे. माझ्या जाण्यानें अडचण तर नाहीं होणार ? पण अखेर भीतभीत मी ब्रजकृष्णजी चांदीवालांना विचारलें, 'मी आल्यें तर चालेल का ?' बदरीकेदार यात्रेच्या जथ्याचे ते अग्रणी होते. ते म्हणाले, "त्यांत मला काय विचारायचं ? आपणच धनी आहांत." हें ऐकून मला समाधान झालें. मनांत आलें कीं बापूजीना गोळी लागली त्या दिवशीं जो संयम पाळला त्याचें हें असें प्रत्यक्ष फळ मिळालें. मला वाटलें, जणूं बापूजीच हात धरून माझ्याकडून ही यात्रा करवीत आहेत. गंगोत्री, जम्नोत्री, बदरी-केदारची कठीण यात्रा मी करूं शकेन अशी मला आशा नव्हती. अशा स्थितींत मला हा अपूर्व योग होता. पण मी हेंहि ओळखून होतें कीं अशा प्रकारें रक्षा मोठमोठ्या तीर्थावर नेणें अवडंबरच आहे आणि याला जास्त महत्त्व देतां कामा नये. पण लोकभावनेच्या समाधानासाठीं, सैद्धांतिक दृष्ट्या रक्षा नेणें बापूंना पसंत नसून देखील हें सारें क्रियाकांड आपोआप होत गेलें. बापूजींच्या अस्थि खास गाडीनें प्रयागला नेल्या जात होत्या. तेव्हांहि मी गेल्यें नव्हतें; कमलच गेला होता. माझ्या मनावर त्यावेळींहि सैद्धांतिक गोष्टीचाच प्रभाव होता. यावेळीं मात्र मला असें वाटलें कीं ही संधि मीं जाऊं दिली तर ती पुन्हां मिळायची नाहीं. बापूंच्याबरोबर माझा उत्तरकाशीचा कार्यक्रम होता पण ते जाऊं शकले नव्हते. आतां मला वाटलें कीं मी बापूंच्याबरोबरच निघाल्यें आहे ! चालली होती ती जरी बापूंची रक्षा होती तरी तिचा सन्मान बापूंपेक्षांहि अधिक होत होता. टेहरी राज्याच्या वतीनें फार चांगली व्यवस्था होती. झेंडे घेऊन लोक पुढें चालत होते. वाद्यांच्या गजरांत रक्षा नेली जात होती. कार्यक्रम ठरलेला असे. ठिकठिकाणीं स्वागत होत होतें. लहानमोठे, श्रीमंत-गरीब, वृद्धप्रौढ, स्त्री-पुरुष, साक्षरनिरक्षर, साधु-संन्यासी——सगळेच रक्षेला नमन आणि श्रद्धातर्पण करायला येत होते. आपल्या गादीवरून उतरण्यांत आणि कुणाच्याहि पुढें जाण्यांत कमीपणा मानणारे साधु देखील आले. बापूंनीं सर्वांच्या अंत:करणांत जें स्थान मिळवलें होतें तें अवर्णनीय होतें. आमच्या सुखसोयींची व्यवस्थाहि फार चांगली होती आणि गांधीजींचे भक्त समजून आमच्याविषयीं आदर व्यक्त केला जात होता.

## ४७. बजाजवाडी सुनी झाली !

जमनालालजींच्या स्वर्गवासानंतर बजाजवाडींतली वर्दळ कांहीं अंशांनीं कमी झालीच होती. तरी देखील बापू सेवाग्राममधें असेपर्यंत येणाऱ्या-जाणाऱ्यांची रीघ लागलेलीच होती. बापूजी गेल्यावर लोकांचें येणें जाणें कमी झालें; पण किशोरलालभाईंच्या बजाजवाडींतल्या राहण्यानें एक प्रकारें ती त्यांची वस्ती होऊन राहिली होती आणि तेथें 'हरिजन'च्या कामापायीं कांहीं कार्यकर्ते राहात असत, त्यामुळें आणि किशोरलालभाईंना भेटायला येणाऱ्या लोकांमुळें अजून थोडी येजा चालली होती. कशावरच मन लागत नाहीं असें झालें कीं मी त्यांच्याकडे जायचीं. जावें तेव्हां ते आणि गोमतीबहन कामांत गुंतलेलीं दिसत. दोघांचीहि शरीरें अस्थिपंजर झालीं होतीं. आजार तर चालूच होता. आजारानें माणूस चिडचिडा होतो म्हणे; पण किशोरलालभाई तर एवढे कष्ट सोसूनहि हंसतमुख असत. मी गेल्यें कीं काम टाकून बघत राहात आणि म्हणत, 'केम न बोलवानुं प्रण कर्युं छे ?' हेतु हा कीं मी त्यांच्यापाशीं बोलावें. त्यांच्याशीं बोलणें केल्यानें त्यांच्या कामाचा बोजा आणखी वाढायचा अशी मला भीति वाटायची. ते जसे थोर, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि सिद्ध पुरुष होते तसेच व्यवहारकुशलहि होते. अर्थात व्यवहाराचा सल्ला घेण्यासाठीं सगळेच त्यांच्याकडे जायचे. त्याचा त्यांना शीण होईल हें जाणून देखील त्यांचा सल्ला घेणें सर्वांना जरूरीचें वाटे. बजाजवाडींत मी एकटी राहत्यें असें पाहून एकदां ते रामला म्हणाले, 'रामकृष्ण, जानकीबहनना इकडे ठेवण्याऐवजीं एकाद्या कामांत गुंतव नाहींतर स्वतःजवळ ठेवून घे. कारण अशा प्रकारें लहान सहान कामांत त्यांचा वेळ जावा हें मला आवडत नाहीं.' रामकृष्ण मला म्हणाला तूं मुंबईला ये. पण मी मुंबईला गेल्यें तरी माझें मन तिथें थोडेंच लागलें असतें ! तो काय किंवा घरचीं माणसें काय, मुंबईला जा, असें सांगतच होतीं.

बजाजवाडींत मुलांचें खेळण्याचें मैदान होतें. रामकृष्ण आणि त्याचे संवगडी तेथे खेळत असत. तो तुरुंगांत असतांना हें मैदान ठाकठीक करा असें लिहीत असायचा. रोलर फिरवून मैदान पक्कें करण्यांत आलें होतें. पण बंगालच्या दुष्काळानंतर जेव्हां देशाला अधिक धान्य पिकवण्याची गरज पडली तेव्हां

मला वाटलें की या जमिनीचा कांहीं तरी उपयोग झाला पाहिजे. त्या दिवसांत किशोरलालभाई बजाजवाडींतून फेरफटका करीत. मी त्यांना म्हटलें, "या मैदानांत देखील मला धान्य पेरायचें आहे. पण मुलें नाखूष होतील. ही जमीन पक्की करण्यांत पुष्कळ खर्च झाला आहे. आतां ती कसायची तर आणखी खर्च. तेव्हां कसं करायचं ? ते म्हणाले, "करा हिंमत." मी हिंमत करून नांगर चालवायला लावला आणि तिथें भुइमुगांचें पीक फार चांगलें आलें.

मश्रूवाला कुटुंबाशीं आमच्या कुटुंबाचा आधींपासूनच घरोबा होता. जमनालालजींच्या व्यापारांत देखील त्यांच्या कुटुंबाशीं लागेबांधे होते. किशोरलालजींच्या त्यागामुळें ते फार प्रभावित झाले होते. ते नेहमीं म्हणत, 'पाहा ते किती त्यागी, मितव्ययी, तपस्वी आणि ज्ञानी आहेत ! त्यांचें शरीर इतकें दुबळें आहे तरी देखील कुणाचीच सेवा घेत नाहींत, फक्त ती देत असतात आणि कुणाच्याहि सुखदु:खाच्या वेळीं हजर असतात.'

गोमतीबहन आणि मी तर साबरमती, विलेपार्ले, सेवाग्राम या ठिकाणीं बरोबरच राहात होतों. त्यांचें बजाजवाडींतलें राहणें सर्वच दृष्टींनीं सुखावह वाटायचें आणि मनापासून वाटे कीं त्यांनीं नेहमींच बजाजवाडींत राहावें.

जेव्हां किशोरलालभाई दिवंगत झाल्याचा फोन मुबईला आला तेव्हां मी स्तंभित झाल्यें. गाडी सुटायला अजून एक तास होता. मी तयारी केली पण गाडी गांठायची कशी ? रामकृष्ण आला तेव्हां अर्धा तासच राहिला होता. स्टेशनवर वेळेवर पोंचणें शक्य नव्हतें. आतां काय करावें ? किशोरलालभाई निवर्तल्याची वार्ता ऐकल्यानंतर तर मला मुंबईंत राहणें शक्यच नव्हतें. गोमतीबहन रात्र कशा काढतील हेंच दृश्य माझ्या डोळ्यांसमोर येऊं लागलें. केव्हां एकदां वर्ध्याला पोंचतें असें मला झालें होतें. पण पोंचायचें कसें ? शेवटी विमानाची कल्पना सुचली. फोनवर चौकशी केल्यावर कळलें कीं तिथें जागा नाहीं. ऐनवेळी कुणी यायचा राहिला तर जागा मिळू शकेल. तसें पाहिलें तर विमानानें जाण्याचा खर्च करायला मी धजत नव्हत्यें, पण आज मला वर्ध्याशिवाय दुसरें कांहीं सुचतच नव्हतें. मी आणि रामकृष्ण तर होतोंच, मीलूभाईचे मेहुणेही होते. म्हणजे आम्ही जाणारे तिघे होतों. एकच जागा मिळाली तर कुणी जायचें असें जेव्हां रामनें विचारलें तेव्हा मी म्हणाल्यें,' मला तर थांबणें अशक्य आहे.' आम्ही विमानतळावर गेलों.

सुदैवानें तीन जागा मोकळ्या होत्या. पहाटें पाच वाजतां आम्ही बजाजवाडीला पोंचलों.

त्यावेळीं किशोरलालभाईंना डोक्यामागून तक्क्यांचा आधार देऊन निजवलें होतें. गळ्यांत फुलांच्या आणि सुताच्या माळा घातल्या होत्या. त्यांना गाढ झोप लागली आहे असें वाटत होतें. मुद्रेवर अपूर्व शांति होती. गीतापाठ चालला होता. वातावरण गंभीर आणि शांत होतें.

उशाशीं गोमतीबहन बसल्या होत्या. जणूं करुणमूर्तीच ! डोळ्यांतून आंसवें वाहात होतीं. डोळे सुजले होते पण हिमतीनें आणि धीरानें तें दुःसह दुःख त्या सहन करीत राहिल्या होत्या. त्यांनीं आयुष्यभर किशोरलालभाईंत लीन होण्याचा प्रयत्न केला होता. अशा रीतीनें ते गेल्याचें दुःख जिथें लोकांना देखील असह्य झालें होतें तिथें गोमतीबहनबद्दल काय बोलावें ?

किशोरलालभाई आजारीच असत. कित्येकदां तर श्वासहि घेतांना त्यांना त्रास होई. पण आज जणूं त्यांचे सारे त्रास दूर झाले होते. ते निवांत झोंपले आहेत असें वाटत होतें. कृष्णदास जाजूसारखे विरागी पुरुषदेखील किशोरलालभाईंच्या निधनानें कासावीस झाले. ते देखील अश्रु थोपवूं शकले नाहीत.

जणू एकाद्या हवनाची किंवा पूजनाची तयारी चालली आहे असें त्यावेळीं वाटलें. शवाबरोबर महिलाश्रमांतल्या मुली, स्त्रिया आणि हजारों लोक होते. गोमतीबहनही बरोबर गेल्या. दहाच्या सुमाराला गोपुरींत जमनालालजींच्या समाधीशेजारी दहन झालें. दोघांमधें भावांसारखें प्रेम आणि सख्य होतें. निवर्तल्यावर उभयतांचें दहन देखील एकमेकांच्या शेजारीच झालें.

बाहेरचे लोक पुष्कळच होते. कारण किशोरलालभाईंचा मित्रपरिवार आणि आत्मीयवर्ग फार मोठा होता. त्यांना गोमतीबहन स्वतःच्या हातानें चहा करून देत. घेणाऱ्याला संकोच वाटे खरा पण इलाज काय ? सेवा हा गोमतीबहनचा स्वभावच होता मुळीं.

गोमतीबहननीं वर्ध्यातच राहावें अशी आम्हां सगळ्यांचीच इच्छा होती. पण त्या बार्डोलीला निघून गेल्या आणि त्यांच्या जाण्यामुळें बजाजवाडींतली रहदारी आणखी घटली.

●

## ४८. विनोबाजींच्या यज्ञांत

विनोबाजींना मी पहिल्यांदा साबरमतींत पाहिलें. ते आणि त्यांचे बंधु बाळकोबाजी दिवसभर खड्डे वगैरे खणीत राहात. अशी अंगमेहनत करून आण्या-दोन आण्यांत ते आपला खर्च चालवतात असें मीं ऐकलें होतें. ते फार कमी बोलत. गीतेचा वर्ग घेत. त्यांच्या वर्गांत स्त्रियाहि जात. शिकवतांना फार चांगलें समजावून सांगत. वेळेच्या बाबतींत मोठे दक्ष असत. वर्गांत एकादा विद्यार्थी मिनिटभर उशिरां पोंचला तर त्याला वर्गाबाहेर उभें राहावें लागे. शिकवतांना इतक्या मोठ्यानें बोलत कीं शेवटीं घामानें चिंब भिजून जात. जेव्हां गीतेचा वर्ग सुरू करण्याची गोष्ट निघाली तेव्हां त्यांनीं शिकूं इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची पात्रता समजून घेण्यासाठीं त्याला बोलावून घेतलें आणि गीतेच्या पांचव्या अध्यायांतला नववा श्लोक त्याला वाचायला सांगितला. मी पण त्यांच्यांत होतें. पुढें मला कळलें कीं गीतेंत सर्वांत अधिक जोडाक्षरें या श्लोकांत आहेत.

विनोबाजींप्रमाणें त्यांचे दोघेहि भाऊ बालब्रह्मचारी आहेत. विनोबाजी विद्वान तर आहेतच. त्यामुळें त्यांचा आम्हां मंडळीवर फार प्रभाव होता आणि त्यांच्या ठिकाणीं आमची श्रद्धाहि खूप होती. पण त्यांच्याशीं बोलण्याची कुणाची हिम्मत नसे; कारण ते फार कमी बोलत. माझ्या मनावरहि त्यांचा प्रभाव होता. मला सारखें वाटायचें, माझीं मुलें त्यांच्यासारखींच व्हावीं. एकदां जमनालालजींनीं मला विचारलें होतें, तुला आपलीं मुलें कशीं बनवायचीं आहेत? त्यावर मी बोलून गेल्यें कीं मला त्यांना विनोबांसारखें फकीर बनवायचें आहे. मी भावनेच्या भरांत हे शब्द बोलून गेल्यें होत्यें. पण जमनालालजी त्यांचा गंभीर अर्थ जाणत होते आणि त्यांना हेंहि माहीत होतें कीं ही आपल्या हातची गोष्ट नाहीं. ते म्हणाले, 'तूं शब्द तर मोठेमोठे शिकली आहेस. पण त्यांचा अर्थ तरी जाणतेस का?'

मला सारखें वाटायचें कीं आपलीं मुलें भीष्मासारखी ब्रह्मचारी आणि विद्वान व्हावीं. लग्न काय सगळेच करतात, पण त्यांतून बचावण्यांतच आगळे-पण आहे. मुलांसमोरहि याची चर्चा चाले. एकदां कमलनयन चेष्टेनें म्हणाला, "तूं तर नवव्या वर्षींच लग्न केलंस. मग आम्हांला फकीर बनवण्यांत तुझं

काय जातं !" आमच्या कुटुंबांत तीन पिढ्यांनंतर मुलें झाली होतीं. अर्थात् सगळ्यांनीं त्यांचे लाड करावे हें स्वाभाविक होतें. तरी देखील मी श्रद्धेनें आणि भक्तिभावानें मुलांना विनोबाजीजवळ शिकायला ठेवलें. केवळ मुलांनाच नव्हे तर पंधरा पंधरा वर्षांच्या मुलींनादेखील मी त्यांच्या हवालीं केलें. विनोबाजीच्या आश्रमांत जिथें मुलांना राहणें कष्टाचें होतें तेथें मुलींना ठेवणें सोपें होतें थोडेंच ! विनोबाजी तर मुलामुलींत भेदच मानीत नसत. सगळ्यांकडून सारखेच श्रम करवून घेत.

साबरमतीला त्यांच्या ठिकाणी जी श्रद्धा निर्माण झाली होती ती वर्ध्याला त्यांचा संपर्क वाढला तशी वाढतच गेली. जमनालालजी आणि बापूजी यांच्या पश्चात् जो ओकेपणा जाणवला त्यामुळें विनोबाजीच्या अधिक जवळ जाणें आवश्यक होऊन बसलें. त्यांच्याबरोबर अनेक ठिकाणीं मी फिरत राहिल्यें. विनोबाजीचें खाणेंपिणें, राहणी-करणी, चालचलणूक सारें कसें मला आवडत असतें. त्यांच्याजवळ राहण्यांत मला जीवनाची सार्थकता वाटते.

एकदां मला स्वप्न पडलें की माझा स्वर्गवासी धाकटा भाऊ हात हलवीत मला बोलावीत आहे. जागी झाल्यावर देखील मला त्या स्वप्नाचा विसर पडेना. अंगात खादीचा सदरा, डोक्याला पांढरी टोपी घातलेल्या स्वर्गवासी भावाचें 'बाई ये ! बाई ये !' हें बोलावणें जणू मला मृत्यूचेंच बोलावणें वाटलें. माझ्या मनानें घेतलें की मी आतां या बारा महिन्यांत मरून जाणार ! मी ठरवलें, कांहीहि होवो, हे बारा महिने विनोबाजींच्या जवळच राहायचें. मरायचें असलेंच तर त्यांच्यासमक्ष मरावें. त्याप्रमाणें हे बारा महिने मी विनोबाजींच्याजवळ राहिल्यें. बारा महिने उलटले तसा मला विश्वास आला कीं आतां एक वेळ तर बचावल्येंच.

लग्नानंतर जेव्हां ओम् तांबडेपिवळे कपडे करून विनोबाजींना नमस्कार करायला गेली तेव्हां ते म्हणाले, 'या होलिकादेवी !' मी म्हटलें, ही लग्नानंतर आली आहे. आपण हिला होलिका कसं म्हटलं ?" ते म्हणाले, "लाल रंग होळीचा आहे." मी विचारलें, "मग चांगला रंग कोणता ?" ते म्हणाले, 'हिरवा रंग चांगला, कारण त्यांत सृष्टीचें स्वाभाविक सौंदर्य भरलेलें आहे.' मला हें म्हणणें पटलें. मी माझ्या तकलीवर कांतलेल्या सुताचे अडीच वार लांबीचे दुपट्टे करायला लावले. ते चाळीस झाले. मीं ते हिरव्या रंगांत रंगवून

घेतले आणि बापूजींच्या अस्थिविसर्जनाच्या दिवशीं म्हणजे १२ फेब्रुवारीला पवनारला यात्रा भरते तेव्हां त्यांतला एक विनोबाजींना आणि एक तुकडोजींना भेट म्हणून दिला. विनोबाजींनी तो हिरवा दुपट्टा दुपारच्या उन्हांत डोक्यावरून घेतला. जेव्हां तुकडोजींना मी त्या हिरव्या रंगाचा आणि तकलीच्या सुताचा इतिहास सांगितला तेव्हां त्यांनीं तो दुपट्टा गळ्याभोवतीं गुंडाळून घेतला. विनोबाजींनीं तर आपल्या सर्वोदय यात्रेंत आणि तेलंगणाच्या यात्रेंत त्या दुपट्ट्याचा चांगला उपयोग केला. मला वाटतें कीं फुरसतीच्या वेळांत तकलीनें काढलेलें सूत, विनोबाजींनीं सुचवलेला रंग आणि माझी प्रेमाची भेट यांमुळें त्या दुपट्ट्याला हें स्थान प्राप्त झालें. आजहि विनोबाजी त्याचा उपयोग भूदान-यात्रेंत करीत असतात. महादेवीताइनीं तर नंतर विनोबाजींच्या चादरी वगैरेहि हिरव्या रंगांत रंगवून घेतल्या.

एकदां जमनालालजींनीं विनोबाजींशीं चर्चा केली होती कीं रामलक्ष्मणांची पूजा सगळेच करतात, पण भरताची तपश्चर्या मुळींच कमी नसूनहि त्याचें देऊळ कुठेंच कसें दिसत नाहीं ? ते म्हणाले, ‘आणखी देऊळ कशाला ? आपल्या देवळांत भरताची मूर्ति ठेवा, म्हणजे झालें.’ त्यानंतर कांहीं दिवसांनीं जमना-लालजी तुरुंगांत गेले. पवनारमधें खणतांना मूर्ति सांपडतच असतात. विनोबाजी खड्डा खणीत होते; तेव्हां तेथें भरतभेटीची मूर्ति सांपडली. विनोबाजींना जमनालालजींच्या इच्छेचें स्मरण झालें. त्यांनीं एका लहानशा घरांत त्या मूर्तीची स्थापना केली आणि स्वतः ते तिथें प्रार्थना करूं लागले. ते इतक्या जोरानें प्रार्थना करीत कीं घामानें भिजून जात. प्रार्थनेच्या वेळीं ते इतके तन्मय होऊन बोलत कीं तें अद्‌भुत दृश्य पाहण्यासाठीं गांवचे आणि आजूबाजूचे लोक तेथें गोळा होत. जसा विनोबाजींचा हा प्रयोग चाललेला होता तसाच पवनारला त्यांनीं कांचनमुक्तीचा प्रयोगहि चालवला होता. त्यांची इच्छा होती कीं संस्थांनीं परावलंबी नसावें, त्यांचा खर्च त्यांच्या परिश्रमांवर चालावा. पोटांत अल्सर झाल्यामुळें अंगमेहनतीनें आपलें आरोग्य सुधारून घ्यायचें त्यांनीं ठरविलें होतें. प्रवासाकडे त्यांचा ओढा नव्हता. पण जेव्हां हैदराबादच्या सर्वोदय संमेलनाला त्यांनीं हजर राहणें कार्यकर्त्यांना अगत्याचें वाटलें तेव्हां त्यांनीं तिकडे जाण्याचें ठरविलें आणि तेंहि पायीं. अशा तऱ्हेच्या यात्रा करण्यांत त्यांना आरंभापासून गोडी होती.

विनोबाजींनीं वर्ध्याच्या लोकांचा ९।३।५१ ला निरोप घेतला. लक्ष्मीनारायणमंदिरांतील प्रार्थनेनंतर त्यांचें निरोपाचें भापण झालें. त्यांत ते म्हणाले, "कदाचित् हैदराबादेहून पुढेंहि जाईन. अशा स्थितींत केव्हां परतेन कांहीं सांगतां येत नाहीं. म्हणून हा निरोप अखेरचाहि होऊं शकतो." ते अशा कांहीं गांभीर्यानें बोलले कीं अखेरच्या निरोप चाललेला आहे. त्यामुळें वर्धावासीयांना तो प्रसंग रामाच्या वनवासासारखा वाटला.

त्यांचें निरोपाचें भापण ऐकून मला राहवेना. मी त्यांना म्हटलें, "जसा आपल्याला जाण्याचा अधिकार आहे तसाच आम्हांला आणण्याचा आहे. भरताप्रमाणें आम्ही आपल्याला परत आणण्यासाठीं येऊं शकतों. एवढेंच काय, विमानांतूनहि आपल्याला आणूं शकतों." पहिल्या मुक्कामापर्यंत मी त्यांच्याबरोबर गेल्यें. त्या दिवशीं मुक्काम चौदा मैलांवर होता. ते हैदराबादला पोंचण्याच्या पूर्वींच मी ७ मैलांच्या मुक्कामावर पोंचल्यें. मी जेव्हां त्यांच्याबरोबर चालत्यें तेव्हां ते ताशीं साडे तीन मैल वेगानें चालतात. पण त्या दिवसांत त्यांची चाल ताशीं पांच मैल झाली होती. त्या दिवशीं सात मैलच चालायचें होतें. म्हणून ते साडेचार मैल वेगानें चालले. तेवढ्यानें मी पार थकून गेल्यें. मुक्कामाला पोंचतांच तरटांच्या झोंपडींत जाऊन झोंपी गेल्यें. तेथून ऊन्ह कडकत होतें. उठून थंड पाण्यानें आंघोळ केली. कपडे धुऊन वाळत टाकले. त्या दिवशींच्या स्वैंपाकांत पुरणपोळी आणि भजीं होती. असल्या पदार्थाच्या आवडीमुळें ते अधिक खाल्ले जातात या भीतीनें मी घरून आणलेल्या शिळ्या पुऱ्या खाऊनच झोंपीं गेल्यें. त्यानें ताप भरला. महावीरप्रसादजी पोद्दार संमेलनाला आले होते. त्यांच्या निसर्गोपचारांमुळें थोड्याच दिवसांत माझी प्रकृति सुधारली, पण सर्वोदय संमेलनांत मला फारसा भाग घेतां आला नाहीं आणि प्रकृति बरी नसल्यामुळें विनोबाजींच्या बरोबर मला तेलंगणालाहि जातां आलें नाहीं. हैदराबादहून परततांना भूदानयज्ञाला प्रारंभ झाला. विनोबाजी मध्यप्रदेशांत आले तेव्हांहि हें काम चाललें. सुरवातीपासून विनोबाजींचें प्रत्येक काम मला आवडायचें. तसेंच हेंहि आवडलें. पण हें इतकें मोठें काम आहें हें मला माहीत नव्हतें. मी चांडिलच्या सर्वोदय संमेलनाला गेल्यें तेव्हां तिथला उत्साह आणि वातावरण कांहीं निराळेंच वाटलें. सगळ्यांच्यांत उत्साह होता आणि साऱ्यांनाच असें वाटत होतें कीं या यज्ञांत प्रत्येकानें भाग घेतला

पाहिजे राजेंद्रबाबूंचें भाषण फारच परिणामकारक झालें. पण विनोबाजींचें भाषण कांहीं अद्‌भुतच होतें. त्यांनीं सगळ्यांच्या जीवनांत स्फूर्तीची ज्योत पेटवली होती. मधल्या वेळांत स्त्रियांचें संमेलन झालें. निर्मलाच्या सांगण्यावरून मी अध्यक्ष झाल्यें आणि मी भगिनीवर्गाला कांचनमुक्तीसाठीं आवाहन केलें की त्यांनीं आतां दागिन्यांचा त्याग करावा.

एका बंगाली मुलीनें आंगठी आणून दिली. विनोबाजी आलेले होते. मी ती आंगठी त्यांच्या बोटांत घातली. मग पुष्कळशा स्त्रियांनीं एकामागून एक दागिने आणून दिले. एकीने तर मंगळसूत्र पाठविलें ! मीं तें विनोबाजींच्या गळ्यांत घातलें तों तें त्यांच्या दाढींतच गुंतलें ! सगळे हंसूं लागले. अशा गंभीर संताशीं विनोद करण्याचें धाडस एकाद्याला होऊं शकतें याचें कित्येकांना आश्चर्य वाटलें. जयप्रकाश म्हणाले, 'आपण विनोबाजींची इतकी चेष्टा करीत असतां हें मला माहीत नव्हतें !' तेथें सुमारें २८ तोळे सोनें गोळा झाले. विनोबाजींना विचारण्यांत आलें, 'याचें काय करायचें ?' यावर मी म्हटलें, "भगिनींनीं प्रेमानें दिलेल्या दानाचा उपयोग पाण्यासाठीं व्हावा हेंच इष्ट." त्यांना तें पटलें आणि म्हणून विहिरी खोदणें अगत्याचें मानण्यांत आलें. कारण मनुष्य कसेंबसें पाणी मिळवूं शकतो पण पाण्याच्या अभावी जनावरांचे फार हाल होतात. त्यांची सेवा या विहिरींमुळे अधिक होईल आणि जमीनहि हिरवीगार बनेल. म्हणून कूपदान निघालें.

चांडिलच्या संमेलनानंतर मी विहारमध्यें राहिल्यें आणि घरोघर जाऊन आयाबहिणींकडे कूपदान मागूं लागल्यें. स्त्रिया स्वभावतःच धार्मिक असतात. त्यांची ही धर्मभावना वाटेल तशी वळवतां येते. हवा असतो तो ती योग्य दिशेनें वळवणारा. मला स्थळकाळाचें भान राहिलें नाहीं. गयेंत माझी कुठें फारशी ओळखपाळख नव्हती. ज्येष्ठ-वैशाखाच्या उन्हांत मी घरोघर हिंडून स्त्रियांना भेटत होत्यें. तीन तीन, चारचार जिने चढत होत्यें आणि माझें म्हणणें समजावून सांगत होत्यें. आजकाल मागणाऱ्याच्या भेटीनें कुणी खूप होत नसतें. पण मला तर ध्यास लागला होता. माझ्या मनांत आलें कीं एकशें आठ विहिरी मिळाल्या पाहिजेत. सुताच्या एका गुडींत धाग्यांची संख्या हीच असते. पहिल्या महिन्यांत काम कांहीं नीट जमेना. निराशाशी वाटूं लागली. मन डळमळूं लागलें कीं एकशेंआठांऐवजीं आठ मिळाल्या तरी पुष्कळ झालें ! जेव्हां मी

सांगायचीं कीं गायींना पिण्यासाठीं पाणी मिळत नाहीं तेव्हां मोठ्या घरच्या स्त्रिया म्हणायच्या, पाणी तर खूप आहे. तेव्हां मी म्हणाल्यें, एक दिवस खेड्यांत चला. गयेचे श्री भूपराज मोठे भाविक जमीनदार आहेत. ते गांधी-विनोबाजींचे मोठे भक्त आहेत. पण विहिरीच्या अभावीं खेडेगांवांतील माणसांची आणि जनावरांची काय दुर्दशा आहे याची त्यांना आणि त्यांच्या घरच्या मंडळीला कल्पना नव्हती. म्हणून त्यांना आणि त्यांच्या घरच्या मंडळीला घेऊन मोटार-मधून खेडेगांवांत जाण्याचा कार्यक्रम ठरवला. आम्हीं जेव्हां खेडेगांवांत पोंचलों तेव्हां चोहोंकडे सारें कसें उजाड आहे हें त्यांनी पाहिलें. उन्हाळ्याच्या कडाक्यांत जनावरांचीं हाडें बाहेर आलेली दिसत होतीं आणि चाऱ्यापाण्याच्या अभावीं तीं हैरांण झालीं होतीं. पन्नास घरांना एक विहीर होती आणि तीहि पावसांत मिटून जायची. लोकांना प्रत्येक वर्षी ती नव्यानें खोदावी लागे. चुना, वीट, सीमेंट वगैरे वापरून ती पक्की करणें त्यांच्या शक्तीबाहेरचें होतें. हे हाल पाहून स्त्रियांचें काळीज विरघळून गेलें. त्या म्हणाल्या, "शंभर तोळ्यांच्या ऐवजीं आम्ही दहा तोळे सोनें घालूं पण विहिरी बांधून घेऊं." मग गांवकऱ्यांना बोलावून त्यांच्याशीं बोलणें केलें. ते म्हणाले, 'आम्ही विहिरी खणूं, वीट भाजूं, आम्हांला चुना आणि सिमेंट मिळालें म्हणजे झालें.' गांवकरी श्रमदानानें विहिरी बनवतील. म्हणून एका विहिरीचें काम पांचशें रुपयांत भागेल. एकशें आठ विहिरीसांठीं कमींत कमी पन्नास हजार रुपये हवेत असें ठरवण्यांत आलें. हवा पसरत गेली. गयेला लक्ष्मीनारायण डालमिया राहतात. साधुसंतांचे भक्त आहेत. त्यांनीं दहा तोळे सोनें दिलें. आणि सत्यदेवजींकडूनहि मीं दहा तोळे सोनें मिळवलें. हळूहळू तेथें ३९ विहिरी खोदल्या गेल्या आणि ३० चीं अभि-वचनें मिळालीं. दुकानांतून सिमेंट घेण्यांत आलें तों लॉरीवाले भाडें घेतल्या-शिवाय तें मुक्कामाला पोंचवूं लागले. फक्त पेट्रोल तेवढें घेत.

विनोबाजी पायीं फिरत फिरत एका महिन्यांत रांचीला आले आणि मी गयेहून आगगाडीनें गेल्यें. रांचीलाहि घरोघर जाऊन समजावून सांगूं लागल्यें कीं विनोबाजी आले आहेत तेव्हां त्यांना विहिरीची भेट दिली जावी. १३।। तोळे सोनें आणि तीस विहिरीसाठीं पांचपांचशांची अभिवचनें मिळालीं. पाऊस सुरू झाल्यामुळें विहिरी खोदण्याचें काम तर शक्य नव्हतें. म्हणून रक्कम तेथेंच पंचांच्या हवालीं करून मीं कलकत्त्याला गेल्यें. तिकडे ६१ विहिरीसाठीं

३० हजार पांचशें रुपये आणि ४।। तोळे सोनें मिळालें. ही रक्कम खादी भांडार-मधें जमा करण्यांत आली. कलकत्त्यांत सगळे लोक ओळखीचे होते. मी अशा रीतीनें घरोघर हिंडावें हें त्यांना रुचलें नाहीं. ते म्हणाले कीं आपणाला एक दोन ठिकाणांहून रक्कम मिळाली तर काम होऊं शकतें मग अशी पायपीट कां करतां? पण मी म्हटलें, "मला तर स्त्रियांत प्रचार करण्यासाठीं आणि देशाच्या मागणीची माहिती करून देण्यासाठीं हिंडायचें आहे.' म्हणून घरोघर हिंडत राहिल्यें. जेव्हां मी तलावावर लोकांच्या सकाळच्या सहलीच्या जागीं विहिरी मागण्यासाठीं जायचीं तेव्हां घनश्यामदास बिडला हंसून म्हणत, 'आज मण्याजींच्या झोळीत किती विहिरी पडल्या?' मी म्हणें 'आज दोन पडल्या. आज कांहीं नाहीं मिळालं.' मी त्यांच्याकडे काय मागायचें!

एक दिवस घनश्यामदासजी म्हणाले, 'बिर्लापार्कला या." जेव्हां जेव्हां कलकत्त्याला जायचें काम पडे आणि त्यांची भेट होई तेव्हां तेव्हां ते असे बोला-वीत असत. मीहि कलकत्त्याला गेल्यावेळीं त्यांना भेटत असें. मी भेटायला गेल्यें त्या दिवशीं कांहीं बडी मंडळी त्यांना भेटायला आली होती आणि ते फार कामांत गुंतले होते. पण वर्दी मिळतांच एकदम बाहेर येऊन माझ्याजवळ बसले आणि जिव्हाळयानें जुन्या गोष्टी करूं लागले. म्हणाले, "माझा आणि जमना-लालजींचा काय संबंध होता हें तुम्हांला अपरिचित नाही." हें ऐकतांच माझे डोळे डबडबून आले. तेहि गंभीर झाले. अंमळशानें म्हणाले, 'तुमच्या झोळींत पांच विहिरी टाकायच्या आहेत.' मी म्हटलें, 'खूप झाल्या. माणशीं एक मिळाली कीं बस्स.' ते म्हणाले," माझे तीन मुलगे आणि तीन सुना. तेव्हां सहा विहिरी घ्या." तेव्हां मी म्हटलें, 'म्हणजे लेकासुनांना पाणी मिळालें. आपण तेवढे पाण्याशिवाय राहिलों!' मी तेथून निघून आल्यें. त्या आधीं मी जुगल-किशोरजींना पत्र लिहून एका विहिरीची मागणी केलेली होती. त्यांनीहि पांचशें रुपये पाठवून दिले होते.

कलकत्त्याहून निघायचें माझ्या मनांत नव्हतें. तेथें विहिरींचें काम करायचें होतें, पण गायींच्या संबंधांत एक शिष्टमंडळ पं. जवाहरलालजींकडे जायचें होतें. त्यांत भाग घेण्यासाठीं मला दिल्लीचें बोलावणें आलें आणि त्यामुळें मला जावें लागलें.

जेव्हां मी दिल्लीला पोंचलें तेव्हां तिकडच्या लोकांनीं मला सांगितलें कीं

इकडे विहिरींचें काम व्हायचें नाहीं, इकडे रोजच वर्गणी गोळा केली जाते. तरीदेखील मी ब्रजकृष्णजी चांदीवाला आणि नंदलाल मेहता यांच्यामागें लागल्यें आणि घरोघर फिरणें सुरू केलें. सकाळीं आठ वाजल्यापासून संध्याकाळचे आठ वाजेपर्यंत तोच ध्यास. एक दिवस बावा राघवदासजी म्हणाले, "पंडित जवाहरलालजीकडून विहीर कोण मिळवणार ?" मी म्हणाल्यें, "मी मिळवीन."

११ सप्टेंबरला शुक्रवारीं अकरा वाजतां त्यांना भेटल्यें. तो दिवस विनोबाजीचा जन्मदिवस होता. मी रामेश्वरीबहन आणि ओम् यांच्यासह तिकडे पोंचल्यें. जवाहरलालजी पार्लमेंटमधून नुकतेच आले होते. थकले होते.—जणूं झोंपेंतून उठल्यासारखे. पाहून दया आली आणि वाटलें कीं इतक्या थकलेल्यांशीं गोष्ट न काढलेली बरी. पण वेळ मागून घेतलेली, तेव्हां बोलणें करणें प्राप्तच होतें. मी म्हटलें, "आज विनोबाजींचा जन्मदिवस आहे. आपणांला हंसावें लागेल." ते म्हणाले, "हंसेन ना खूप !" बसले आणि मग कूपदानाच्या गोष्टी चालल्या. रामेश्वरीबहननें सांगितलें कीं ही बायकांकडून दागिने लुटते आणि या कामाला जोरानें लागली आहे. मी विनोबाजीच्या गळ्यांत घातलेले दागिने त्यांना दाखवले. मग मी म्हटलें, "जमिनीत बाण मारून अर्जुनानें भीष्मपितामहांना पाणी पाजलें होतें त्याप्रमाणें आपणहि बाण मारून असें पाताळ फोडा कीं विनोबाजींना पाणीच पाणी मिळून जाईल !" ते खूप हंसले. मी म्हटलें, "आपल्या नांवें एक विहीर द्या. आपला आशीर्वाद पाहिजे." रामेश्वरीबहननें सांगितलें की राजघाटच्या प्रार्थनेंत तुमचा संदेश पाहिजे. ते म्हणाले, 'पाठवीन.' त्यांनीं संदेशाबरोबर एका विहिरीचें आश्वासन आठवणीनें पाठवून दिलें.

संध्याकाळच्या राजघाटच्या प्रार्थनेला राजेंद्रबाबू आले. भूदानाच्या विषयावर त्यांचें अत्यंत महत्त्वाचें भाषण झालें आणि त्यांनीं कूपदानाची थोरवीहि सांगितली. मी म्हटलें कीं आपल्या वतीनें छपऱ्यांत एक विहीर बांधली जावी. ते म्हणाले, 'छपऱ्याला तर एक दिलीच. अबोल्यालाहि एक व्हावी.' अशा तऱ्हेनें त्यांच्याकडून दोन विहिरी मिळाल्या. त्यांनीं रामेश्वरीबहनजवळ हजार रुपये पाठवून दिले. राजेंद्रबाबूच्या व्याख्यानानंतर मी विचारलें, "बाबूजी, मी बोलूं का ?" ते म्हणाले 'हो. हो. बोला.' मी म्हणाल्यें, "बाबूजींनीं मोठ्या प्रेमानें आणि गंभीरतेनें आपल्याला सांगितलें आहे. ते तर संतच आहेत. माझी वहिणीच्या नात्यानें आपल्याला प्रार्थना एवढीच कीं आज १०८ विहिरी

पुऱ्या करून द्या." सकाळपर्यंत ७९ विहिरी होत्या. एक जवाहरलालजींची. अशा प्रकारें ऐंशीं झाल्या. एक गृहस्थ दहा विहिरींसाठीं नगद पांच हजार रुपये घेऊन आले. एका गुजराती बंधूनें ८ विहिरींचें अभिवचन दिलें. अशा रीतीनें ९८ झाल्या. कुणालाहि इतक्या विहिरी होतील अशी आशा नव्हती. बाबूजीहि बराच वेळपर्यंत बसून राहिले. घरीं पोंचतांच श्रीमनजीला म्हटलें कीं १०७ तर झाल्या. केवळ एक राहिली आहे. ते एके गांवीं सभेसाठीं गेले आणि रात्रीं पावणे-बाराच्या सुमाराला परतले. पाऊस पडत होता. त्यांनीं दार ठोठावलें आणि म्हटलें, "माताजी, तुमच्यासाठीं एक विहीर घेऊन आलों आहे आणि ती देखील दोन अडीच हजारांची मोठी !" माझें अंत:करण भरून आलें. असें वाटलें की हें बापूजींच्या आणि विनोबाजींच्या तपाचें फळ आहे. म्हणूनच माझा हा संकल्प अशा रीतीनें पुरा झाला !

त्या दिवसांत विनोबाजी कांचनमुक्तीवरच जोर देत असत. त्यामुळें त्यांना पैशाचें आकर्षण नव्हतें. कुणी रुपये, पैसे दिले तर ते परत करीत. बिहारच्या भूदानयज्ञांत एका बाईनें एक रुपया आणि दुसऱ्या एकीनें पांच रुपये दिले तर त्यांनीं ते परत केले. नवाद्याला जयदयालजी डालमियांच्या बहिणीनें शंभर रुपयांची नोट आणली तीहि त्यांनीं परत केली. जेव्हां स्त्रिया दागिने देत तेव्हां कूपदानासाठीं तेवढे माझ्या हवालीं करीत. म्हणत, स्त्रियांचा त्याग खरा असतो. पण सगळ्याच स्त्रिया दागिने देतील हें शक्य नव्हतें आणि पैसे तर ते परत करीत. मग काय करायचें ? रांचीला एका भगिनीनें ७ तोळे सोनें आणलें आणि दुसरीनें पांचशें रुपये आणले. माझ्या मनांत आलें, हे तर रुपये घेणार नाहींत. मग करायचें काय ? तेव्हां म्हटलें एक वेळ देऊन तरी पाहूं. मी त्या भगिनींना घेऊन गेल्यें. विनोबाजींनीं रुपये घेऊन माझ्या हातीं दिले. तेव्हां मी म्हटलें, चला. ठीक झालें. रस्ता मोकळा झाला. अशा रीतीनें कूपदानांत पैसे घेतले जाऊं लागले. कृष्णदासभाई भेटले तेव्हां म्हणाले, तुम्ही तर विनोबाजीं-पेक्षां वरचढ निघालांत ! त्यांना पैसे घ्यायला शिकवलंत ! याचसाठी विनोबाजी म्हणत असतात कीं जानकीबाई म्हणजे एक अपवाद आहेत !

## ४९. उपसंहार

माझी गोष्ट पुरी झाली, पण जीवनयात्रा अजून चाललीच आहे. वयाच्या नवव्या वर्षी जावऱ्याहून वर्ध्याला अनोळखी मंडळींत राहायला गेल्यें. त्या चिमुरड्या कोवळ्या वयांत आईवडिलांकडून जे संस्कार लाभले ते घेऊन सासरीं गेल्यें. जेव्हां जाग आली तेव्हां सासूबाई आणि आजेसासरे यांची छाया मला पारखी झाली होती. जमनालालजींचा सहवास आणि परिचय वाढत गेला अणि त्यांनीं माझें जीवन आपल्या विचारांना अनुकूल करून घ्यायला सुरुवात केली. पण ते आपली इच्छा माझ्यावर कधीं लादीत नसत. चांगल्या गोष्टीकडे इशारा तेवढा करीत. अशा तऱ्हेनें जीवन चाललें असतांनाच गांधीजी आले. त्यांनीं तर माझ्या जीवनांत तुफानासारखा प्रवेश केला. सारें जीवनच पालटून गेलें. त्यानंतर विनोबाजींचा परिचय आणि सहवास वाढला. अशा रीतीनें आज माझें जें कांहीं जीवन आहे तें आईवडिलांच्या संस्कारांखेरीज जमनालालजी, बापूजी आणि विनोबाजी यांनीं घडवलें आहे. बापूजींना आपल्या जीवनसाधनेपायीं प्रयत्न करावे लागले होते. त्यांनीं नियमपूर्वक निश्चयानें आणि परिश्रमानें आपलें जीवन सिद्धीला नेलें. विनोबाजींच्या बाबतींत सगळें कसें अगदीं सहज आहे. अशा रीतीनें या तीन साधक महापुरुषांच्या निकट सहवासांत राहून आणि यथाशक्ति प्रयत्न करीत राहून मी जी काय झालें किंवा आहें त्याचें बिंब या पुस्तकांत आहे.

राहून राहून माझ्या मनांत येतें कीं या गोष्टीचा कुणाला कांहीं खरोखरच उपयोग होईल काय? यांतून लोक काय घेतील? लेखमालेच्या स्वरूपांत जेव्हां ही गोष्ट निघत होती तेव्हां ती वाचून माझे नातू आणि नाती त्यांतल्या कांहीं प्रसंगांची थट्टा उडवीत. माझ्या बाळपणच्या ज्या एका प्रसंगांत माझ्या सासूबाईनीं मला आणि जमनालालजींना एका खोलींत झोंपवल्याचा आणि जमनालालजींनीं माझ्या पायाला चिमटा काढल्याचा उल्लेख आला आहे त्याचा निर्देश करून माझा थोरला नातू राहुल मला एक दिवस म्हणाला, "आजी, तूं तर झोंपली होतीस. मग आजोबांनीं चिमटा काढला हें तुला कसं समजलं?" मी त्याला म्हटलें, "अरे, गुलामा, एवढ्यावरच तुझं लक्ष गेलं कीं आणखीहि कांहीं वाचलंस?" त्यामुळें मला शंका वाटते कीं या पुस्तकाचा

कुणाला उपयोग होईल की नाहीं! जगांत वाचायला आणि मनन करायला इतकें पडलें आहे, मग आणखी कागद काळे करून त्यांत कचऱ्याची भर कां टाका! पण अशा आठवणींची गोडी असलेल्या आणि त्या इष्ट मानणाऱ्या कांहीं स्नेह्यांकडून सूचना आली कीं त्या पुस्तकरूपांत आल्या पाहिजेत. कित्येकांचा तर आग्रह झाला आणि निरुपाय होऊन मी कबूल झाल्यें.

माझ्या जीवनावर ज्या तीन महापुरुषांचा खोल ठसा उमटला त्यांतले जमनालालजी आणि बापूजी आज राहिले नाहींत! विनोबाजी आहेत पण ते तर मला धाकट्या भावासारखे वाटतात. त्यांच्याकडे जाण्यांत मला जरा सुद्धां भीति वाटत नाहीं. बापूजींसमोर जातांना थोडीशी कां होईना भीति वाटायची. जमनालालजींनीं त्यांना वडील मानल्यामुळें माझ्या मनानें त्यांना श्वशुर मानून आंत कुठेंतरी त्यांची भीति घेतली असावी. जमनालालजींच्या बाबतींत त्यांचीं कामें पत्करण्यांत मला एक प्रकारची ईर्षा होती. त्यांच्याशीं मी भांडणतंटाहि करीत असें, तशीच त्यांना राजी राखण्याचा प्रयत्नहि करीत असें. पण आतां हे दोघे निघून गेल्यावर एक प्रकारचा अभाव म्हणा, रितेपणा म्हणा, मला जाणवूं लागला. त्यांच्या मृत्युसमयीं मला तो जाणवला नव्हता. मला आंतून काम करण्याची प्रेरणा होते; उत्साहहि आहे. पण कुणीतरी हात धरून काम करून घ्यावें असें सारखें वाटतें. विनोबाजींच्या भूदानांत, कूपदानांत मन लागतें, बरेंहि वाटतें, कामाला लागत्येंहि; पण जमत नाहीं. अंगांतलें त्राणहि दिवसेंदिवस तुटत चाललें आहे, आणि तरीहि राहून राहून मनांत येतें कीं कुणीतरी वेठीला धरून काम करून घ्यावें.

कामाला लागल्यें कीं मी फिरत असत्यें तेव्हां घरच्या मंडळीची आठवण देखील होत नाहीं. पूर्वीं असेंच होतें. आतांहि तेंच आहे. पण एकदां घरच्या मंडळींत गेल्यें की गुंतल्यें तिथें. माझे मुलगे, मुली, जांवई सारे सुखी आहेत. आपापल्या उद्योगधंद्यांत गर्क आहेत. त्यांची मला कसलीच काळजी नाहीं. कुणाला कसलेंच व्यसन नाहीं. आपापल्या कुवतीनुसार सगळींच सेवाकार्यंहि करीत असतात. हा संतोष कांहीं मला थोडाथोडका नाहीं. थोडीफार काळजी आहे ती कमलच्या आणि मदालसेच्या प्रकृतीची. मदालसेनें महावीरप्रसाद पोद्दारजींनीं चालवलेल्या निसर्गोपचार केंद्रांत राहून उपचार करून घेतलेहि आणि आतां ती तिकडेच जास्त राहिली असती तर एव्हांना ती बरीहि झाली असती.

अनुक्रम ३०७२० ... ५१२९
क्रमांक ... २०६ ... ५/५/६


कमलनयननें आपल्या जीवनाला जरा नियमितपणा लावून घेतला, थोडा व्यायाम आणि खाण्यापिण्यांत शिस्त पाळली तर त्याचीहि प्रकृति ठीक होईल, पण तो कुणाचें ऐकेल तर ना! त्याला योग्य वाटेल तेंच तो करीत राहतो.

माझी प्रकृति कधीं बिघडली तर औषधोपचाराच्या बाबतींत मी सारें कांहीं महावीरप्रसादजी पोद्दार आणि राधाकृष्ण यांच्यावर सोपवत्यें. पोद्दारजींच्या गोष्टी ऐकूनच अर्धा आजार बरा होतो. राधाकृष्ण जवळपास असला कीं आपल्या होमिओपाथीच्या पेटींतल्या ४।६ गोळचा देत असतो आणि तेवढयानें बरेंहि वाटतें. पण माझी खरीखुरी श्रद्धा आहे ती निसर्गोपचारावर. आवळे तर मला अमृततुल्य वाटतात आणि मी ते सारखे वाटीत राहात्यें.

कधीं वर्धा, कधीं दिल्ली, कधीं मुंबई तर कधीं विनोबाजींच्या बरोबर अशी मी सारखी भटकत असत्यें. सर्वांत जास्त समाधान मला मिळतें तें विनोबाजींच्या बरोबर.मुंबईतलें माझ्या आकर्षणाचें केंद्र म्हणजे माझ्या तीन मैत्रिणी—श्रीमति शारदादेवी बिडला, सरस्वतिदेवी गाडोदिया आणि शांताबाई पित्ती ह्या. आमचे विचार वेगवेगळे असले तरी मुंबईत एकादें सभासंमेलन असलें, कथाकीर्तन असलें किंवा स्विमिंग पूलमधें पोहायला जायचें असलें कीं आम्ही चौघीहि सोबतीनें जातों. पण या मंडळीत हिंडतांफिरतांना देखील खादी, निसर्गोपचार, गोसेवा आणि विशेष म्हणजे कूपदान हीं कामें मी यथाशक्ति करीतच असत्यें. त्याचबरोबर बापूजी आणि जमनालालजी यांच्या आत्म्यांजवळ मी नेहमीं असा आशीर्वाद मागत असत्यें कीं या शरीराकडून जी काय सेवा घडूं शकेल ती करण्याची प्रेरणा मिळत राहावी.

मागे केव्हां तरी मी कांहीं भक्तिपर यमकें जोडलीं होतीं. कविता करणें मला काय माहित ? पण मनांत जे भाव आले ते उलटसुलट जोडून दिले. त्या कडव्यांनीच या गोष्टीचा शेवट करत्ये.

*हे परम सृष्टि-करतार,*
*मानूँ मैं तेरा उपकार!*
*दिया पति मुझको अपन समान*
*दिये सब साधन औ' सब साज*
*धाम, धन, बुद्धि, कुटुम्ब, समाज*
*कमी क्यों दया-धरम की की ?*

बनाओ मेरा हृदय उदार,
हे परम सृष्टि-करतार!
रूप बिन खूब बचाई जी
रुप बिन खूब सम्भाली जी
मिलता जो यदि रूप तो मैं
आकाशां उडती जी
किया तुमने मेरा उपकार,
हे परम सृष्टि-करतार॥
संगति गांधी अलबेले की
लाज बचाई इस मेले की
अन्त में की कैसी खिलवार
बताओ दुनिया के रचनार।
हे परम सृष्टि-करतार॥
लगाई तुमने दारुण चोट
दूर करने को मेरी खोट
जगाने को अथवा हे देव,
छुडाने को ममता की टेव?
तुम्हारी माया अपरम्पार,
हे परम सृष्टि-करतार।
मानूँ मैं तेरा उपकार॥

REFBK-0010968

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ठाणे
अनुक्रम २०७२० दि: ५।१२।७२
दा. क्र. १०९५८